# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level*

*Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access Journal*

*ISSN:2230-9578 April - 2026 Volume-18 Issue-4(XXII)*



**Mob: +91-9552416001 Website: https://jrdrvb.org Chief Editor: Prof. Ramesh V. Bhole**

# MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL JOURNAL

Website: https://jrdrvb.org



JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

ISSN: 2230-9578
April- 2026
Volume-18 Issue-4( XXII)

**Please Get in Touch**
Email: jrdrvb.org@gmail.com
Mob: +91-9552416001,+91- 8888454089

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII) | April- 2026

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

**Volume No-18, Issue-4(XXII), April- 2026**
Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

CHIEF EDITOR
**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

***Disclaimer***
*The Editors shall not be held responsible for the originality or the views and opinions expressed in the papers. The author(s) alone shall bear full responsibility for the originality of their work and the ideas expressed therein.*
***© All rights reserved with the Editors.***

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL PARTICULARS

| Name of Journal | JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT |
|---|---|
| Frequency | Monthly : Jan to Dec (12 issues per year) |
| ISSN | 2230-9578 |
| Publisher | Dr. Ramesh V. Bhole |
| Chief Editor | Dr. Ramesh V. Bhole |
| Copy right | Journal of Research and Development |
| Starting Year | January 2010 |
| Subject | Multi-Disciplinary |
| Review Process | Double Blind Peer |
| Language | English, Hindi, Marathi, and other Indian Constitutional Languages. |
| Publication Format | Print |
| Access | OPEN ACCESS |
| License | Creative Commons (CC BY-NC-SA 4.0) |
| Phone No. | +91 93256 65856, +91-8888454089 |
| Email | jrdrvb.org@gmail.com |
| Journal Website | https://jrdrvb.org |
| Registered office Address | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon, Maharashtra, India |
| Admin. Office Address | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon , Maharashtra, India |
| Printing | **Amitsons Digital Copiers** 106 and 110, Paras Chambers 1st Floor, Near Laxmi Narayan Theatre, Above Bank Of India, Swargate-411042 |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

## CHIEF EDITOR

**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

## ASSOCIATE EDITORS

**Prof. (Dr.) Madan Mohan Goel**
Vice-Chancellor (Former)
Rajiv Gandhi National Institute of Youth Development, Govt. of India
Starex University, Gurugram, Haryana, India

**Dr. Praveen G. Saptarshi**
Visiting Faculty
Salisbury University, United States

## MANAGING EDITOR

**Dr. Santosh P. Mane**
Assistant Professor,
Head Department of Geography,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

## EDITORIAL BOARD

| | | |
|---|---|---|
| **BABALOLA, Ayodele Samuel**<br>Department of Pure and Applied Zoology, Federal University of Agriculture, PMB 2240, Abeokuta, Ogun State, Nigerian | **Dr. Lal Mervin Dharmasiri**<br>Senior Professor and Chair Head of Geography<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Vijayanand Selvaraj**<br>Data Strategist and Artificial Intelligence Lead<br>Information Technology (IT), Houston,Texas, USA |
| **Dr. Munther Moh'd Ibrahim Zyoud**<br>Assistant Professor of English Language Teaching Methods-Al-Quds Open University, Palestine. | **Prof. A.G. Amarasinghe**<br>Senior Lecturer Grade<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Dr. Gyanaranjan Sahoo**<br>Extension Scientist<br>Orissa University of Agriculture & Technology, Orissa India |
| **Dr. RVS Praveen**<br>Director<br>Digital Engineering and Assurance, USA | **Dr. Ranjan Kalita**<br>Principal<br>Rangapara College, Amaribari, Rangapara, (Autonomous) Assam | **Dr. S. C. Advitot**<br>Principal<br>CBK's B. Sci, R.V. Com. & R. J. Arts College, Akkalkot |
| **Dr. Kulkarni Swanand Gajanan**<br>Associate Professor,<br>Mechanical Engineering Department, S.K.N. Sinhgad College of Engineering,Korti, Pandharpur- | **Dr. Anurag Shrivastava**<br>Professor & Post Doctoral,<br>Lincoln University College (LUC)<br>Petaling Jaya, Malaysia, Malyasia | **Prof. (Dr.) F. M. Nadaf**<br>Principal,<br>Government College Borda Margao Goa (Autonomous), India |
| **Dr. Tushti Sharma**<br>Royal School of Languages,<br>The Assam Royal Global University, Guwahati, Assam | **Dr. Sandeep Rout**<br>Faculty of Agriculture,<br>Sri Sri University, Cuttack, Odisha | **Dr. Daneshwar. R. Pandey**<br>Assistant Professor,<br>Head Of Department<br>S.S Agrawal College Of Commerce And Management Navsari Gujarat |

**PUBLISHER**
**Dr. Ramesh V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com Journal Website: https://jrdrvb.org

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org


## CHIEF EDITOR

**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

## संपादक

**डॉ. पंडित एन. शेळके (संयोजक)**
प्राचार्य
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघीरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सासवड
ईमेल: pnshelke@gmail.com

## संपादक मंडळ

**डॉ. संजय हरिभाऊ झगडे (सहसंयोजक)**
उपप्राचार्य, प्राध्यापक, इंग्रजी विभाग प्रमुख व
पीएच.डी. संशोधन केंद्र समन्वयक
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघीरे कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, सासवड, पुणे
ईमेल: zagadesanjay2009@gmail.com

**डॉ. तुषार बालमोहन घोरपडे (समन्वयक)**
भूगोल विभाग प्रमुख
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघीरे कला, वाणिज्य
आणि विज्ञान महाविद्यालय, सासवड
**ईमेल:** tushar241210@gmail.com

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

**डॉ. सारंगे आनंदा रामराव (समन्वयक)**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघीरे कला, वाणिज्य
आणि विज्ञान महाविद्यालय, सासवड
ईमेल: anandramraosarange@gmail.com

**प्रा. नितीन लगड रमेश (समन्वयक)**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघीरे कला, वाणिज्य
आणि विज्ञान महाविद्यालय, सासवड
ईमेल: nitinlagad77@gmail.com

**प्रा. सुनील आबा शिंदे (समन्वयक)**
मानसशास्त्र विभाग प्रमुख
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघीरे कला, वाणिज्य
आणि विज्ञान महाविद्यालय, सासवड
ईमेल: sunilshinde4321@gmail.com

**डॉ. सिध्दार्थ सहादु घोंगडे (सहसमन्वयक)**
अर्थशास्त्र विभाग, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे
वाघीरे कला, वाणिज्य आणि विज्ञान
महाविद्यालय, सासवड
**इमेल:** ghongadadesid358@gmail.com

## परिषदेविषयी

**शाश्वत विकास, सुशासन आणि मानवी वर्तन : एक आंतरशाखीय दृष्टिकोन**

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या मार्गदर्शनाखाली वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड येथील भूगोल, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि मानसशास्त्र विभागांच्या संयुक्त विद्यमाने "शाश्वत विकास, सुशासन आणि मानवी वर्तन : एक आंतरशाखीय दृष्टिकोन" या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेचा उद्देश संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि धोरणनिर्माते यांना शाश्वत विकासाशी संबंधित विविध पैलूंवर विचारमंथनासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता. आजच्या काळात हवामान बदल, पर्यावरणीय ऱ्हास, आर्थिक विषमता, सामाजिक न्याय आणि सुशासनाशी संबंधित प्रश्नांमुळे शाश्वत विकासाचे महत्त्व अधिक वाढले आहे. या पार्श्वभूमीवर शाश्वत विकास, पर्यावरण व्यवस्थापन, सार्वजनिक धोरण, हरित अर्थव्यवस्था, समावेशक विकास, सामाजिक जबाबदारी, मानवी वर्तन आणि तंत्रज्ञान यांसारख्या विषयांवर परिषदेत सखोल चर्चा करण्यात आली. परिषदेमध्ये सादर करण्यात आलेले संशोधन लेख विविध विषयांतील संशोधकांचे ज्ञान, अनुभव आणि अभ्यास प्रतिबिंबित करतात. हे लेख शाश्वत विकास, प्रभावी सुशासन आणि सामाजिक परिवर्तनासाठी उपयुक्त ठरणारे विचार व निष्कर्ष मांडतात. विविध शाखांतील तज्ज्ञांच्या सहभागामुळे आंतरशाखीय संशोधनाला चालना मिळाली असून भविष्यातील संशोधनासाठी नवीन दिशा उपलब्ध झाली आहे. या कार्यवाहीत समाविष्ट संशोधन लेख संशोधक, शिक्षक, विद्यार्थी आणि धोरणनिर्माते यांच्यासाठी मौल्यवान संदर्भसाहित्य ठरतील, असा विश्वास आहे. शाश्वत, समावेशक आणि जबाबदार समाजनिर्मितीसाठी आवश्यक असलेल्या ज्ञाननिर्मितीत या परिषदेचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल.

## महाविद्यालयाविषयी



सन १९७२ मध्ये स्थापन झालेले वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड, पुणे हे ९ एकर परिसरात वसलेले असून गेल्या पाच दशकांहून अधिक काळ गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण प्रदान करत आहे. मूल्याधिष्ठित शिक्षण देण्याच्या ध्येयाने प्रेरित हे महाविद्यालय विशेषतः ग्रामीण व डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांना सक्षम बनवून त्यांच्यामध्ये नैतिक मूल्ये, राष्ट्रीय भावना आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विकसित करते. महाविद्यालयाला DST-FIST अनुदान तसेच DBT-STAR दर्जा प्राप्त झाला आहे. २०२४ मध्ये NAAC च्या चौथ्या मूल्यांकन चक्रात महाविद्यालयास B++ दर्जा प्राप्त झाला. येथे बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बीसीएस, बीबीए, बीबीए (सीए), १२ पदव्युत्तर अभ्यासक्रम, UGC पुरस्कृत बी.व्होक. अभ्यासक्रम तसेच इंग्रजी, रसायनशास्त्र आणि वाणिज्य विषयांतील संशोधन केंद्रे कार्यरत असून ५,००० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



**शुभेच्छा संदेश**

**मा. सुनेत्रा अजितदादा पवार**

**उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्षा, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे**

आजच्या युगात शाश्वत विकास ही केवळ संकल्पना नसून समाज, प्रशासन आणि नागरिक यांची सामूहिक जबाबदारी बनली आहे. पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता, आर्थिक प्रगती आणि मानवी कल्याण यांचा समतोल साधून विकासाची वाटचाल करणे ही काळाची गरज आहे. “शाश्वत विकास, सुशासन आणि मानवी वर्तन : एक आंतरशाखीय दृष्टिकोन” या विषयावरील राष्ट्रीय परिषद या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. विविध ज्ञानशाखांतील अभ्यासकांनी एकत्र येऊन समकालीन प्रश्नांवर विचारमंथन करणे ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. अशा शैक्षणिक उपक्रमांमधून समाजोपयोगी संशोधनाला चालना मिळते आणि विकास प्रक्रियेला नवी दिशा प्राप्त होते. या संशोधन कार्यवाहीमध्ये प्रकाशित झालेले लेख शाश्वत व सर्वसमावेशक विकासासाठी उपयुक्त ठरतील, असा मला विश्वास आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व आयोजक, संशोधक आणि सहभागी यांचे मनःपूर्वक अभिनंदन करते. या प्रकाशनास माझ्या हार्दिक शुभेच्छा.



**शुभेच्छा संदेश**

**मा. राजेंद्र घाडगे**

**उपाध्यक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे**

उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन संस्कृतीची जोपासना करणे हे ज्ञानसमृद्ध समाजनिर्मितीचे महत्त्वपूर्ण साधन आहे. संशोधनाच्या माध्यमातून केवळ नवीन ज्ञानाची निर्मिती होत नाही, तर समाजासमोरील समस्यांचे शास्त्रीय विश्लेषण आणि त्यावरील उपायांचाही शोध घेतला जातो. भूगोल, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि मानसशास्त्र या शाखांमधील संशोधकांना एकत्र आणणारी ही राष्ट्रीय परिषद आंतरशाखीय संशोधनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. विविध विषयांच्या समन्वयातून निर्माण होणारे ज्ञान समाजाच्या विकासासाठी अधिक प्रभावी ठरते. या परिषदेच्या कार्यवाहीमध्ये समाविष्ट संशोधन लेख विद्वानांच्या सखोल अभ्यासाचे द्योतक असून ते विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि अभ्यासकांना नवे बौद्धिक दृष्टिकोन प्रदान करतील. या महत्त्वपूर्ण प्रकाशनासाठी सर्वांचे अभिनंदन व शुभेच्छा.



**शुभेच्छा संदेश**

**मा. संदीप कदम**

**सचिव, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे**

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचारसरणी, सामाजिक जाणीव आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना विकसित करण्यासाठी शैक्षणिक संस्था सातत्याने विविध उपक्रम राबवत असतात. राष्ट्रीय परिषदा आणि संशोधन कार्यवाही ही त्यातील महत्त्वाची साधने आहेत."शाश्वत विकास, सुशासन आणि मानवी वर्तन : एक आंतरशाखीय दृष्टिकोन" या विषयावरील परिषदेमुळे विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना आपले विचार मांडण्याची तसेच नव्या संकल्पनांचा अभ्यास करण्याची संधी प्राप्त झाली आहे. अशा उपक्रमांमुळे संशोधनवृत्ती विकसित होऊन शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत होते. या कार्यवाहीतील संशोधन लेख विद्यार्थ्यांसाठी आणि संशोधकांसाठी प्रेरणादायी ठरतील, असा मला विश्वास आहे. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व आयोजक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतो आणि या प्रकाशनास हार्दिक शुभेच्छा देतो.



**प्राचार्यांचे मनोगत**

**डॉ. पंडित निवृत्तीराव शेळके**

**प्राचार्य, वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड**

वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड येथे आयोजित "शाश्वत विकास, सुशासन आणि मानवी वर्तन : एक आंतरशाखीय दृष्टिकोन" या राष्ट्रीय परिषदेच्या संशोधन कार्यवाहीचे प्रकाशन करताना मला विशेष आनंद होत आहे. या परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट विविध सामाजिक विज्ञान शाखांतील संशोधकांना एकत्र आणून समकालीन सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि प्रशासकीय प्रश्नांवर शास्त्रीय चर्चा घडवून आणणे हे होते. परिषदेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि संशोधन लेखांची गुणवत्ता यामुळे हा उपक्रम यशस्वी ठरला आहे. या कार्यवाहीमध्ये समाविष्ट लेख विविध विषयांवरील संशोधनाचा समृद्ध दस्तऐवज आहेत. विद्यार्थी, संशोधक, शिक्षक आणि धोरणनिर्माते यांच्यासाठी हे प्रकाशन उपयुक्त संदर्भसाहित्य ठरेल, असा मला विश्वास आहे. या परिषदेच्या आयोजनासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व विभागप्रमुख, समन्वयक, प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. या कार्यवाहीमुळे ज्ञाननिर्मिती आणि संशोधन संस्कृतीला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

# संपादकीय मंडळ

| | |
|---|---|
| <br>**प्राचार्य डॉ. पंडित निवृत्तीराव शेळके**<br>**(संयोजक)** | **प्राचार्य डॉ. पंडित निवृत्तीराव शेळके** हे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवडचे प्राचार्य म्हणून कार्यरत असून शिक्षण, संशोधन आणि प्रशासन क्षेत्रातील एक मान्यवर व्यक्तिमत्त्व आहेत. भौतिकशास्त्र विषयातील संशोधक म्हणून त्यांनी बहुविद्याशाखीय भौतिकशास्त्र, पदार्थ विज्ञान (Material Science), वायू संवेदक (Gas Sensors) आणि सौर ऊर्जा तंत्रज्ञान (Solar Technology) या क्षेत्रांत उल्लेखनीय संशोधन कार्य केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त एम.फिल. आणि पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक म्हणून त्यांनी संशोधन क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एक संशोधकाला पीएच.डी. पदवी प्राप्त झाली असून अनेक संशोधक सध्या संशोधन कार्य करीत आहेत. त्यांना शैक्षणिक प्रशासनाचा ३२ वर्षांहून अधिक अनुभव असून त्यांनी विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. भौतिकशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) कार्यक्रम समन्वयक तसेच विविध शैक्षणिक व सामाजिक समित्यांमध्ये त्यांनी प्रभावी नेतृत्व केले आहे. डॉ. शेळके यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये ५४ पेक्षा अधिक संशोधन लेख सादर व प्रकाशित केले आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकास, करिअर मार्गदर्शन आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध महाविद्यालयांमध्ये ५०० हून अधिक व्याख्याने दिली आहेत. ते ३७ हून अधिक पाठ्यपुस्तके आणि संदर्भग्रंथांचे लेखक असून शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना “आदर्श शिक्षक”, “आदर्श प्राचार्य” यांसह विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे शैक्षणिक नेतृत्व, संशोधननिष्ठा आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन यांमुळे ते शिक्षण क्षेत्रात प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. |
| <br>**डॉ. संजय हरिभाऊ झगडे**<br>**(सहसंयोजक)** | **डॉ. संजय हरिभाऊ झगडे** हे वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड, पुणे येथे उपप्राचार्य, इंग्रजी विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख तसेच पीएच.डी. संशोधन केंद्राचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना पदवी स्तरावर २७ वर्षांचा आणि पदव्युत्तर स्तरावर २१ वर्षांचा अध्यापनाचा समृद्ध अनुभव आहे. ते विद्यापीठमान्य पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन संशोधकांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे, तर सध्या सात संशोधक पीएच.डी. संशोधन कार्य करीत आहेत.<br>सन २०२१ मध्ये महाराष्ट्र मराठी साहित्य परिषदेतर्फे प्रदान करण्यात आलेल्या 'उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने' त्यांना गौरविण्यात आले आहे. ते एच. व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे येथील अभ्यास मंडळाचे (Board of Studies - BoS) सदस्य तसेच जेएसपीएम विद्यापीठाच्या संशोधन समितीवर बाह्य तज्ज्ञ (External Expert) म्हणून कार्यरत आहेत.<br>डॉ. संजय हरिभाऊ झगडे यांनी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) समन्वयक, |

| | |
|---|---|
| | परीक्षा नियंत्रक, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) कार्यक्रम अधिकारी तसेच AISHE नोडल अधिकारी अशा विविध महत्त्वाच्या शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या समकक्ष-समीक्षित (Peer-reviewed) नियतकालिकांमध्ये ४६ संशोधन निबंध प्रकाशित केले आहेत. तसेच, राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषद (NAAC) मानांकन प्रक्रिया, गुणवत्ता हमी आणि उच्च शिक्षण या विषयांवर विविध महाविद्यालये व संस्थांमध्ये व्याख्याने आणि कार्यशाळा आयोजित करणारे निमंत्रित तज्ज्ञ (Resource Person) म्हणून त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. अध्यापन, संशोधन, शैक्षणिक प्रशासन आणि उच्च शिक्षणातील गुणवत्ता वृद्धी या क्षेत्रांत त्यांनी मोलाचे कार्य केले आहे. |
| <br>**डॉ. तुषार बाळमोहन घोरपडे**<br>**(समन्वयक)** | **डॉ. तुषार बाळमोहन घोरपडे** हे वाघीरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड येथे सहयोगी प्राध्यापक व भूगोल विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी राष्ट्रीय तसेच यूजीसी मान्यताप्राप्त समकक्ष-समीक्षित (Peer-reviewed) नियतकालिकांमध्ये २० संशोधन लेख प्रकाशित केले आहेत. धरणांमधील गाळसंचयन (Dam Sedimentation) आणि नदीजन्य भूआकृतिशास्त्र (Fluvial Geomorphology) ही त्यांची प्रमुख संशोधनाची क्षेत्रे आहेत. यांनी भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) आणि दूरसंवेदन (Remote Sensing – RS) या विषयांवर विविध कार्यशाळांचे आयोजन केले आहे. तसेच, आधुनिक सर्वेक्षण पद्धती व तंत्रांमध्ये ड्रोनच्या वापराविषयी कार्यशाळाही आयोजित केल्या आहेत. यांनी प्रगत GPS तंत्रज्ञानाचा वापर करून विविध क्षेत्रीय सर्वेक्षणे (Field Surveys) आणि सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणे (Socio-economic Surveys) यशस्वीपणे पूर्ण केली आहेत. विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक घटनांविषयी आवड आणि जिज्ञासा निर्माण करण्यासाठी यांनी विविध माहितीपटांचे (Documentary Shows) आयोजन केले आहे.<br>डॉ. तुषार बाळमोहन घोरपडे यांनी परीक्षा विभाग प्रमुख (CEO), राष्ट्रीय सेवा योजना (NSS) कार्यक्रम अधिकारी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे संयोजक अशा विविध शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. सध्या ते महाविद्यालय विकास समिती (College Development Committee – CDC) चे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. |

| | |
|---|---|
| <br>**डॉ. सारंगे आनंदा**<br>**(समन्वयक)** | **डॉ. सारंगे आनंदा** हे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या (PDEA) वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड येथे अर्थशास्त्र विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी या महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र) म्हणून १६ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव संपादन केला आहे. त्यांनी विविध राष्ट्रीय परिसंवाद व परिषदांमध्ये संशोधनपर लेख सादर व प्रकाशित केले आहेत. अध्यापन, संशोधन आणि शैक्षणिक कार्यात त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. |
| <br>**प्रा. नितीन लगड**<br>**(समन्वयक)** | **प्रा. नितीन लगड** हे राज्यशास्त्र विषयाचे सहाय्यक प्राध्यापक असून सध्या पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वाघीरे महाविद्यालय, सासवड येथे राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. भारतीय राज्यघटना आणि लोकप्रशासन हे त्यांच्या अभ्यासाचे मुख्य विषय आहेत. पुणे शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-एक अभ्यास या विषयावर त्यांचे एम.फिल झाले असून पीएचडी संशोधन देखील चालू आहे. भारतीय राज्यघटना आणि लोकप्रशासन या विषयावरील त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अनेक स्पर्धा परीक्षा केंद्रात त्यांनी मार्गदर्शक म्हणून काम केले आहे. अनेक नामवंत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये त्यांचे लेख प्रकाशित झाले आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषद, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद यासारख्या नामवंत संस्थांवर ते पदाधिकारी म्हणून काम करीत आहेत. समाजातील अनेक सामाजिक संस्था आणि चळवळींशी ते संबंधित आहेत. शिक्षण आणि सामाजिक मूल्यांची व्यावहारिक सांगड घालून एक सक्षम भारतीय नागरिक घडविणे हे त्यांचे ध्येय आहे. |
| <br>**प्रा. सुनील शिंदे**<br>**(समन्वयक)** | **प्रा. सुनील शिंदे** हे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या (PDEA) वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सासवड येथे मानसशास्त्र विभागाचे विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी मानसशास्त्र विषयातील राज्य पात्रता परीक्षा (SET) व राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) यशस्वीरित्या उत्तीर्ण केल्या असून सध्या ते मानसशास्त्र विषयात पीएच.डी. संशोधन कार्य करीत आहेत. त्यांना पदवी (UG) व पदव्युत्तर (PG) स्तरावर अध्यापनाचा १६ वर्षांहून अधिक समृद्ध अनुभव आहे. आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत त्यांनी अध्यापन, संशोधन, विद्यार्थी मार्गदर्शन आणि शैक्षणिक प्रशासन या क्षेत्रांमध्ये सक्रिय योगदान दिले आहे. मानसशास्त्रीय मापन (Psychological Assessment), मानसिक आरोग्य (Mental Health), समुपदेशन मानसशास्त्र (Counselling Psychology), संशोधन पद्धतीशास्त्र (Research Methodology), शैक्षणिक मानसशास्त्र (Educational Psychology) आणि सकारात्मक मानसशास्त्र (Positive Psychology) ही त्यांची विशेष अभ्यास व आवडीची क्षेत्रे आहेत. प्रा. शिंदे यांनी अभ्यासक्रम विकास, संशोधन उपक्रम आणि विविध विस्तार कार्यक्रमांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी अनेक विद्यार्थी संशोधन प्रकल्पांना मार्गदर्शन केले असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंवाद, |

| | |
|---|---|
| | कार्यशाळा, परिषद तसेच प्राध्यापक विकास कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. शैक्षणिक उत्कृष्टता आणि विद्यार्थी-केंद्रित अध्यापन याबाबतची त्यांची बांधिलकी त्यांना विद्यार्थ्यांमध्ये आणि सहकाऱ्यांमध्ये आदरणीय शिक्षक म्हणून ओळख मिळवून देते. अध्यापन कार्याबरोबरच ते मानसिक आरोग्य जनजागृती आणि मानसशास्त्रीय स्वास्थ्य वृद्धिंगत करण्यासाठी विविध संशोधन व समाजाभिमुख उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी असतात. मानसशास्त्र क्षेत्राच्या प्रगतीसाठी तसेच गुणवत्तापूर्ण मानसशास्त्रीय शिक्षण व संशोधनाला चालना देण्यासाठी त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. |
| <br>**डॉ. सिद्धार्थ सहादु घोंगडे**<br>**(सहसमन्वयक)** | **डॉ. सिद्धार्थ सहादु घोंगडे** हे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वाघीरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड येथे अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना उच्च शिक्षण क्षेत्रातील आठ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आहे. त्यांनी एम.ए., SET आणि पीएच.डी. (अर्थशास्त्र) या शैक्षणिक पात्रता संपादन केल्या आहेत. भारतीय अर्थव्यवस्था, बँकिंग व्यवस्था, वित्तीय प्रणाली आणि आरोग्याचे अर्थशास्त्र ही त्यांची प्रमुख संशोधनाची क्षेत्रे आहेत. त्यांनी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदांमध्ये संशोधन निबंध सादर व प्रकाशित केले असून त्यांच्या नावावर बँकिंग व वित्त विषयावरील चार पाठ्यपुस्तके प्रकाशित आहेत. अध्यापन, संशोधन आणि शैक्षणिक लेखनातील त्यांच्या योगदानामुळे ते अर्थशास्त्र क्षेत्रातील अभ्यासू व संशोधनाभिमुख शिक्षक म्हणून परिचित आहेत. |

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026


## Index


| Sr. No. | CONTENTS | Page No. |
|---|---|---|
| 1 | कृषी व औद्योगिक परिवर्तन: महाराष्ट्राच्या शाश्वत विकासातील शरद पवार यांची संस्थात्मक भूमिका<br>**प्रा. डॉ. प्रशांत अमृतकर, प्रा. नितीन लगड** | 1-5 |
| 2 | सार्वजनिक धोरणांच्या संदर्भात भटक्या-विमुक्त समाजाचे प्रश्न: एक समीक्षात्मक अभ्यास<br>**डॉ. दिपक बाबुराव उजागरे** | 6-8 |
| 3 | घनकचऱ्याचे पुन:चक्रीकरण (पुणे महानगरपालिका)<br>**डॉ. सुजाता शंकर निकम** | 9-12 |
| 4 | शाश्वत विकासात सार्वजनिक आरोग्याची भूमिका<br>**डॉ. सिध्दार्थ सहादु घोंगडे** | 13-18 |
| 5 | भारतातील शाश्वत शेती विकासातपिक विमा योजनेची भूमिका :एक सखोल अभ्यास.<br>**प्रा. सुनिता बाळू कोलते, डॉ. महादेव डोंगरे** | 19-22 |
| 6 | हवामान बदलाच्या काळात शाश्वत अन्न सुरक्षा: ग्रीन इकॉनॉमीची भूमिका<br>**डॉ. अर्चना गणेश मगर** | 23-27 |
| 7 | ग्रामीण भारताच्या शाश्वत आर्थिक विकासात कृत्रिम बुद्धीमतेचे योगदान<br>**समीर महादेव कुंभारकर** | 28-32 |
| 8 | शाश्वत विकासात हरित अर्थव्यवस्था योगदान<br>**डॉ. अनंत श्रीराम राठोड** | 33-36 |
| 9 | २०२२ ते २०२५ या कालखंडातील जालना जिल्ह्यातील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृह योजनांचा परिणाम: एक चिकित्सक अभ्यास<br>**राजकिरण रामकिसन लिहिणार, डॉ. संजीव लाटे** | 37-45 |
| 10 | ग्रीन इकॉनॉमी - शाश्वत विकास<br>**डॉ. वसुधा नंदनवार** | 46-51 |
| 11 | महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२५ : राजकीय पुनर्रचना, आणि तळागाळातील लोकशाही<br>**डॉ. प्रभाकर जगताप , धुमाळ तृप्ती दादासाहेब, रोहित रामदास काळे** | 52-56 |
| 12 | सेवा क्षेत्रातील तालुकानिहाय असमतोल आणि त्याची शाश्वत विकासातील भूमिका: विशेष संदर्भ- पुणे जिल्हा<br>**रचना दत्तात्रय कोळपे, प्रा. डॉ. संजीव संपतराव लाटे** | 57-62 |
| 13 | पुणे जिल्ह्यातील शाश्वत विकास:स्थिती, आव्हाने व उपाय<br>**दिपाली सुरेश इंगळे** | 63-67 |
| 14 | नवीकरणीय ऊर्जा आणि भारताची आर्थिक आत्मनिर्भरता : संधी, आव्हाने आणि धोरणात्मक दिशा<br>**प्रकाश पंढरीनाथ राजळे** | 68-72 |
| 15 | हरित अर्थव्यवस्था, शाश्वत विकासाचा मार्ग<br>**बोरावके संगिता शंकर** | 73-76 |
| 16 | सर्वसमावेशक विकासातील दरी कमी करणे<br>**महेश दत्तात्रय गावडे** | 77-79 |
| 17 | डोंगरी भागातील शेती एक शाश्वत आर्थिक विकासाचे स्त्रोत संदर्भ राजगड तालुका जिल्हा पुणे<br>**डॉ. सचिन गजानन घाडगे** | 80-85 |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026


| | | |
|---|---|---|
| **18** | महाराष्ट्राच्या राजकारणातील धनगर जमातीचे राजकीय नेतृत्व<br>**संदीप भिमराव कुऱ्हाडे** | **86-89** |
| **19** | लोकशाही शासनव्यवहार<br>**प्रा. राजेंद्र भोईवार, डॉ. भरत राठोड** | **90-94** |
| **20** | ग्रामीण विकासात आधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण संकल्पनांचा प्रभाव<br>**विश्वनाथ नारायण मरगजे** | **95-97** |
| **21** | हवामान बदल कमी करण्यासाठी धोरण रचना: वर्तनात्मक व अर्थशास्त्रीय दृष्टिकोन<br>**Dhanapune Sonal Vasantrao** | **98-100** |
| **22** | शाश्वत आर्थिक वाढ काळाची गरज<br>**डॉ. आर. पी. शिरसकर** | **101-102** |
| **23** | यवतमाळ व वाशीम जिल्ह्यातील बंजारा समाजातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर एक दृष्टिक्षेप<br>**निता श्रीराम राठोड** | **103-106** |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# कृषी व औद्योगिक परिवर्तन: महाराष्ट्राच्या शाश्वत विकासातील शरद पवार यांची संस्थात्मक भूमिका

**प्रा. डॉ. प्रशांत अमृतकर[1], प्रा. नितीन लगड[2]**
[1]संशोधक मार्गदर्शक, विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर (महाराष्ट्र)
[2]संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग संशोधन केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छ.संभाजीनगर (महाराष्ट्र)
**ईमेल:** nitinlagad77@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180401
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 1-5
April - 2026
**Submitted:** 09 Mar. 2026
**Revised:** 21 Mar. 2026
**Accepted:**08 Apr. 2026
**Published:**30 Apr. 2026

***गोषवारा :-***

*या संशोधनामध्ये शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या सामाजिक संस्था व त्यांनी नेतृत्व केलेल्या शासकीय संस्था यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. राज्यात राबविण्यात आलेली विविध धोरणे, योजना आणि सहकार क्षेत्राच्या प्रगतीमुळे साध्य झालेला महाराष्ट्राचा शाश्वत विकास हा सदर अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. कृषी क्षेत्रातील आधुनिकीकरण, फलोत्पादन क्रांती, सिंचन प्रकल्प आणि शेतकरी-केंद्रित धोरणे यामुळे महाराष्ट्रातील कृषी उत्पादन क्षमता व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. याचबरोबर सहकारी व खाजगी साखर कारखाने, दूध संघ आणि कृषी प्रक्रिया उद्योग यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात औद्योगिक विकासाला चालना मिळाली. माहिती तंत्रज्ञान पार्क, पुणे जिल्हा व सबंध महाराष्ट्रात वसविलेल्या औद्योगिक वसाहती आणि पायाभूत सुविधांच्या विकासामुळे रोजगारनिर्मितीला गती मिळाली आणि शहरीकरणाला चालना मिळाली. शेतीतील छुप्या बेरोजगारीचे प्रमाण कमी झाले. कृषी व उद्योग यांची सांगड घालून संतुलित विकासाचा "बारामती पॅटर्न" निर्माण करण्याचे श्रेय शरद पवारांना जाते. या संशोधनातून असे निष्कर्ष निघतात की, शरद पवार यांचे संस्थात्मक नेतृत्व, त्यांच्या दूरदृष्टी नेतृत्वातून निर्माण झालेली प्रभावी धोरणनिर्मिती आणि स्थानिक पातळीवरील जनतेचा उस्फूर्त आणि आश्वासक प्रतिसाद यामुळे महाराष्ट्राच्या शाश्वत विकासात लक्षणीय वृद्धी दिसून येते. शरद पवार यांच्या भूमिकेमुळे भारतातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात सर्वसमावेशक व दीर्घकालीन विकास साध्य झाल्याचे दिसते.*

***शोधशब्द :-*** *शरद पवार, शाश्वत विकास, संस्थात्मक भूमिका, कृषी परिवर्तन, सहकार चळवळ, औद्योगिक विकास, बारामती पॅटर्न, रोजगारनिर्मिती इत्यादी.*

## प्रास्ताविक :-

महाराष्ट्र हे भारतातील एक मोठे राज्य असून कृषी आणि उद्योग या दोन्ही क्षेत्रांत विलक्षण प्रगती साधली आहे. राज्याच्या आर्थिक, सामाजिक आणि प्रादेशिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्रांचा परस्परसंबंध अत्यंत महत्त्वाचा ठरत असतो. शाश्वत विकासाच्या दृष्टीने सदर दोन्ही क्षेत्रांमध्ये ठोस आणि दीर्घकालीन धोरणांची आवश्यकता होती. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी महाराष्ट्रात सहकार चळवळ, सिंचनव्यवस्था, कृषी उत्पादनावर आधारित उद्योग आणि उद्योगवाढीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण धोरणात्मक व संस्थात्मक योगदान दिले आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. प्रशांत अमृतकर संशोधक मार्गदर्शक, विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर (महाराष्ट्र)*

**How to cite this article:**
*अमृतकर, प्रशांत. & लगड, नितीन. (2026). कृषी व औद्योगिक परिवर्तन: महाराष्ट्राच्या शाश्वत विकासातील शरद पवार यांची संस्थात्मक भूमिका. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 1–5.* https://doi.org/10.5281/zenodo.21426876

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21426876

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली कृषी क्षेत्रात फलोत्पादन क्रांती, दुग्धव्यवसाय, साखर कारखानदारी इत्यादी संस्थांना चालना मिळाली. महाराष्ट्रातील सर्वच प्रादेशिक विभागात औद्योगिक क्षेत्रात आयटी पार्क, प्रक्रिया उद्योग आणि औद्योगिक वसाहती यांना प्रोत्साहन मिळाले. शरद पवार यांच्या या शाश्वत धोरणांमुळे कृषी व उद्योग यांचे परस्परसंबंध अधिक मजबूत झाले. साहजिकच ग्रामीण-शहरी विकासाचा आणि समतोल साधण्याचा एक चांगला प्रयत्न शरद पवार यांनी त्यांत केल्याच्या दिसते
या संशोधन पेपरमध्ये शरद पवार यांच्या संस्थात्मक भूमिकेचा अभ्यास करून महाराष्ट्रातील कृषी व औद्योगिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत त्यांच्या योगदानाचे विश्लेषण करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या परिवर्तनाचा महाराष्ट्राच्या कृषी आणि उद्योग क्षेत्रातीलशाश्वत विकासावर झालेला परिणाम देखील अभ्यासला जाणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1.शरद पवार यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील कृषी व औद्योगिक क्षेत्रात झालेल्या शाश्वत परिवर्तनाचा अभ्यास करणे.

2. महाराष्ट्राच्या शाश्वत विकासात कृषी आणि उद्योग क्षेत्राचे योगदान स्पष्ट करणे.

3.सहकार चळवळ, कृषी आणि औद्योगिक धोरणे यामध्ये शरद पवार यांच्या संस्थात्मक नेतृत्वाचे व भूमिकेचे विश्लेषण करणे.

4.बारामती पॅटर्न, कृषी प्रक्रिया, उद्योग आणि ग्रामीण विकासातील त्यांच्या धोरणात्मक निर्णयांमधून साध्य झालेल्या प्रगतीचा अभ्यास करणे.

5.महाराष्ट्रातील औद्योगिक विकास, रोजगार निर्मिती व त्यामुळे आलेली समृद्धी यांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :-**

या विषयावरील संशोधनासाठी गुणात्मक (Qualitative) आणि परिमाणात्मक (Quantitative) या दोन पद्धतींचा उपयोग केला आहे.

**चर्चात्मक भाग :-**

महाराष्ट्र आणि भारताच्या संसदीय राजकारणात आमदार, राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री, मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री म्हणून शरद पवार यांनी विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा या सभागृहाचे विरोधी पक्षनेते, लोकप्रिय अशा क्रिकेट, कबड्डी यासारख्या संघटनांचे अध्यक्षपद शरद पवार यांनी सांभाळले आणि या क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी काही निर्णय देखील घेतले. कोणताही राजकीय तथा सामाजिक परिवर्तनाच्या बाबतीत निर्णय घेताना समाजामध्ये विषमतेची भावना तयार होणार नाही, याची त्यांनी कायम काळजी घेतल्याचे दिसते. कोणतेही राजकीय आणि सामाजिक परिवर्तन सहजासहजी घडत नाही. काही निर्णय समाजाकडून सहजासहजी स्वीकारले जातात, परंतु काही निर्णयांच्या बाबतीत समाजाची आणि नेतृत्वाची देखील कसोटी लागते. या कसोटीस उतरणारे नेतृत्व हेच समाजाच्या प्रगतीला आधारभूत ठरत असते. महाराष्ट्राच्या एकंदरीत सामाजिक आणि आर्थिक प्रगतीत शरद पवार यांची भूमिका अत्यंत मोलाची राहिली आहे. त्यांनी विविध क्षेत्रात दिलेल्या योगदानांचा व त्याद्वारे महाराष्ट्रात झालेल्या शाश्वत विकासाच्या काही क्षेत्रांची चर्चा आपण या संशोधन पत्रिकेत करणार आहोत.

**सर्वांगीण शाश्वत विकासाचा बारामती पॅटर्न:-**

शरद पवार पाच दशकांच्या अविश्रांत मेहनतीमुळे केवळ महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण देशात ‘ बारामती पॅटर्नची ’ चर्चा आहे. बारामती पॅटर्नच्या या दीर्घकालीन प्रयत्नांमधून या तालुक्याचा आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात सर्वांगीण विकास झाला आहे. शरद पवार यांनी सत्तेचा उपयोग संपूर्णपणे लोकांसाठी केला. त्यांच्या काटेवाडी च्या शिवारात व शेतीत त्यांनी घेतलेले अनुभव ते विसरले नाहीत. दौंड, इंदापूर, वालचंदनगरच्या आठवडे बाजारातील घरच्या शेतातील भाजीपाला विकायचा त्यांचा अनुभव त्यांच्या कामी आला. 1967 च्या त्यांच्या पहिल्या आमदारकीच्या निवडणुकीत तर सर्वाधिक प्रचार हा आठवडे बाजारातूनच झाला. बारामती परिसरातील अनेक बाजार करी त्याची आजही आठवण सांगतात. तांदूळवाडी येथील पाझर तलावाच्या कामापासून बारामती पॅटर्न ची सुरुवात ही साधारणतः 1964 मध्ये झाली. ‘पाणी आडवा पाणी जिरवा’ हा विचार घेऊन त्यांनी दुष्काळी भागाचा कायापालट केला. बारामतीच्या दुष्काळी भागात जवळपास 300 पाझर तलावांची निर्मिती करून शरद पवार यांनी बारामती पॅटर्नचा पाया घातला. त्याचबरोबर बारामती परिसरातील कृषी क्षेत्राचा आधुनिक शास्त्रशुद्ध पद्धतीने विकास व्हावा यासाठी त्यांनी जेष्ठ बंधू व कृषी तज्ञ डॉक्टर आप्पासाहेब पवार यांच्या मदतीने 1971 मध्ये एग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टची स्थापना केली. कृषी क्षेत्राला सहाय्यभूत व्हावे यासाठी कुक्कुटपालन, ठिबकसिंचन, दुग्धव्यवसाय, मेंढीपादन आधी जोडधंदे व पूरक व्यवसायामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांना शास्त्रशुद्ध व आधुनिक पद्धतीची शेती करण्यासाठी या प्रतिष्ठांसाठी प्रवृत्त केले गेले. बारामती कृषी प्रतिष्ठान हे या देशातील अद्यावत असे आधुनिक शेतीचे केंद्र बनविले. पारंपारिक पद्धतीने शेती करून फारसे उत्पादन मिळत नाही, म्हणून नवीन तंत्र , आधुनिक ज्ञान, सुधारित बी बियाणे व खते यांचा सुयोग्य वापर करून शेतीत नव तंत्रज्ञान वापरले गेले पाहिजे याचा आग्रह त्यांनी धरला. शेतीमालावर प्रक्रिया उद्योग शेतकऱ्यांनी सुरू केले पाहिजेत यासाठी आग्रह धरला. दर्जेदार आणि कसदार शेतमालाची निर्मिती केली

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

तरच शेतकरी जगाच्या बाजारपेठा काबीज करू शकेल यासाठी जागृती केली. अनेक शेतकरी इंटरनेटचा वापर करून शेतीतील उत्पादन,किमती याबद्दल अभ्यास करीत आहेत.

एकाच कुटुंबातील सर्व माणसे शेतावरील भार ठरू शकतात हे जाणून शेतकऱ्यांनी केवळ शेतीवर अवलंबून न राहता शेतीपूरक व्यवसाय केले पाहिजेत, या भूमिकेतून शरद पवार यांनी बारामती तालुक्यात 'गाव तेथे दूध सोसायटी' स्थापन करायला प्रोत्साहन दिले. गाव तेथे दूध सोसायटी व घर तेथे संकरित गाय हा उपक्रम त्यांनी संपूर्ण बारामती तालुक्यात यशस्वीरित्या राबविला. त्यांच्या या निर्णयामुळे तालुक्यात ' धवलक्रांती ' झाली. शेतीमालाला योग्य तो भाव मिळत नाही, त्यासाठी शेतमालावर जर प्रक्रिया केली आणि मग उत्पादन करून विकले तर जास्तीची किंमत मिळते. यातून रोजगार निर्मिती होईल या हेतूने शरद पवारांनी 1975 मध्ये बोस्का नावाच्या इटालियन कंपनीच्या तांत्रिक सहकार्याने द्राक्षापासून मद्य (वाईन)तयार करण्याचा कारखाना (बारामती ग्रेप्स लिमिटेड) सुरू केला. या कारखान्यामुळे बारामती परिसरातल्या द्राक्ष शेतकऱ्यांना जास्त नफा मिळू लागला. बारामती तालुक्यात आपल्या हक्काचा कारखाना आल्यामुळे बाजारभावातील भावावर शेतकऱ्यांना अवलंबून राहण्याची वेळ आली नाही. या प्रक्रिया उद्योगामुळे त्या भागात रोजगार निर्मिती होऊन तरुणांना रोजगार निर्मितीचा चांगलाच फायदा झाला. शरद पवार यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या झालेला फळबाग लागवडीचा कार्यक्रम बारामती तालुक्यात Kमोठ्या प्रमाणात राबवला गेला व तो यशस्वी झाला. आज बारामती परिसरात फळांची फार मोठी रेलचेल दिसून येत आहे. फळउत्पादन कार्यक्रमामुळे बारामती परिसरातील शेतकरी संपन्न झाला असून त्याला किफायतशीर भाव मिळत आहे. या तालुक्यातील अनेक तरुणांनी फलोत्पादनावर प्रक्रिया करणारे उद्योग निर्माण केले असून त्यांना त्यातून खूप मोठा आर्थिक फायदा होत आहे. साहजिकच या परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आर्थिक संपन्नता आली आहे. लोकांच्या एकूण जीवनमानामध्ये बदल झाला असून सुखी आणि समृद्धी जीवनाकडे त्यांची वाटचाल सुरू आहे. बारामती मतदारसंघात माळेगाव, छत्रपती आणि सोमेश्वर हे तीनही सहकारी साखर कारखाने शरद पवार राजकारणात येण्याअगोदरच उभे राहिले आहेत मात्र शरद पवार यांच्या दूरदृष्टीचा व अनुभवाचा उपयोग या तीनही कारखान्यांनी वेळोवेळी करून घेतला आहे.

शरद पवार यांच्या या प्रयत्नांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या आयुष्यात दिलासा देण्याचे काम मोठ्या प्रमाणावर झाले. जवळपास 300 बाजार तलावांची कामे पूर्ण झाली. जिराईत भागातील जमिनी लागवडीखाली येण्यासाठी व पाझर तलावांमुळे उपलब्ध होणारे पाणी जमिनीत खेळण्यासाठी जमीन सपाटीकरणाची कामेही मोठ्या प्रमाणावर झाली. अशाप्रकारे पाझर तलाव व बंधाऱ्यांच्या या कामांमुळे बारामतीतील शेतकऱ्यांचे जीवन बदलून गेले.देशाचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी या कामाचे व तेथील विकासाचे वर्णन ' बारामती पॅटर्न 'असे केले आहे.

**औद्योगिक विकासातून महाराष्ट्राचा शाश्वत विकास:-**

यशवंतराव चव्हाण यांचे कृषी-औद्योगिक क्रांतीचे स्वप्न साकारतानाच राज्याचा चौफेर विकास व्हावा यासाठी शरद पवार यांनी सातत्याने भूमिका घेतल्याचे पाहायला मिळते. 1978 मध्ये ते पुरोगामी लोकशाही आघाडीचे (पुलोद)नेतृत्व करीत राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्या सरकारच्या काळात त्यांनी उद्योगवाढीला चालना मिळेल अशी निर्णय घेतले,परंतु आघाडी असल्याने काही अडचणी होत्या. 1988 मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून मुख्यमंत्रीपदाचे सूत्र हाती घेतली. ही तशी त्यांची स्वतंत्र कारकीर्द होती. महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबातील प्रत्येकाला शेती व्यवसाय सामावून घेऊ शकत नाही हे त्यांच्या ध्यानात आलेले होते. त्यामुळे त्यांनी उद्योगांच्या विकासाशिवाय पर्याय नाही, हे त्यांच्या भाषणात सुरुवातीपासून सांगितले. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे ते प्रथमपासूनच समर्थक होते. राज्यात पायाभूत सुविधा वाढविल्याशिवाय उद्योग वाढ शक्य नाही याची जाण त्यांना होती त्यामुळेच त्यांनी रस्तेबांधणी, वीजनिर्मिती यावर भर दिला. या प्रकल्पांसाठी जागतिक बँकेकडून वेळोवेळी मदत मिळवली. महाराष्ट्रातली संपूर्ण कारखानदारी मुंबईच्या भोवती केंद्रीत झाली होती.

मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिक या परिघाच्या बाहेर उद्योग जायला तयार नव्हते. कोल्हापूर येथील एका कार्यक्रमातील सत्कारप्रसंगी " हे सरकार येत्या दोन वर्षात महाराष्ट्राच्या सर्व तालुक्यात प्रत्येकी एक औद्योगिक वसाहत उभारल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, अशी ग्वाही त्यांनी त्यांच्या भाषणात दिली होती. 1988-89 पासून शरद पवार यांची दैनंदिन कार्यक्रमपत्रिका पाहिली तर प्रत्येक दिवशी एक तरी उद्योगपती किंवा शिष्टमंडळ त्यांना भेटलेले आढळतेच. 1993 मध्ये त्यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. जुलै 1994 मध्ये सिंगापूर येथे झालेल्या औद्योगिक आर्थिक विकास परिषदेत ते सहभागी झाले. तेथे त्यांनी परदेशी उद्योग राज्यात यावेत म्हणून प्रयत्न केले . महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य म्हणून कायम प्रथम स्थानावर राहावे, यासाठी त्यांची नेहमीच धडपड होती. शरद पवार यांचे विशेष योगदान असलेल्या औद्योगिक वसाहतींचे आकारमान आणि सद्य स्थितीतील रोजगार निर्मिती

| Sr No | MIDC नाव | क्षेत्र (एकर) | रोजगार निर्मिती |
|---|---|---|---|
| 1. | चाकण | 6000 | 15 लाख |
| 2. | रांजणगाव | 2285 | 1.5 लाख |
| 3. | हिंजवडी | 3200 | 5.0 लाख |
| 4. | तळेगाव | 2000 | 1.2 लाख |
| 5. | भोसरी | 1500 | 2.5 लाख |
| 6. | पिंपरी | 1000 | 6.0 लाख |
| 7. | बारामती | 1500 | 1.0 लाख |
| 8. | खराडी आयटी पार्क | 500 | 1.5 लाख |
| 9. | मगरपट्टा आयटी पार्क | 300 | 0.7 लाख |
| 10. | बुटीबोरी (नागपूर) | 1500 | 1.0 लाख |

**डेअरी उद्योगातील योगदान:-**

साखर उद्योगाप्रमाणेच महाराष्ट्रातील दुग्ध व्यवसायात भरभराटी येईल यासाठी शरद पवार यांनी प्रयत्न केले. अमूल, जिल्हा दूध उत्पादक सहकारी संस्था, तालुका दूध उत्पादक सहकारी संस्था आणि गावाच्या पातळीवरील स्थानिक दूध संस्थांना विविध योजना राबवून त्याद्वारे ताकद देण्याचे काम केले. मुळात शरद पवार यांच्या राजकारणाचा प्रवेश आणि वाटचाल महाराष्ट्राच्या सहकार चळवळीच्या सहभागातून सुरू झालेली आहे, त्यामुळे या क्षेत्रातल्या नेमक्या अडचणींची जाण त्यांना होती. वर्गीस कुरियन यांच्या मार्गदर्शनाने स्थापन केलेल्या राष्ट्रीय डेअरी विकास संस्थेच्या बळकटीसाठी शरद पवार यांनी कृषीमंत्री या भूमिकेतून प्रयत्न केले. वर्गीस कुरियन यांच्या नेतृत्वाखाली भारतामध्ये दुधाच्या उत्पादनामध्ये धवलक्रांती झाली. साहजिकच त्यामुळे संपूर्ण जगाच्या नजरा भारताच्या दुग्ध व्यवसायाकडे वळाल्या. जेव्हा शरद पवार यांनी 2004 मध्ये कृषी, अन्नधान्य, दुग्ध विभाग या खात्याची सूत्रे हाती घेतली, त्याच वर्षी भारताने दूध उत्पादनात संपूर्ण जगात मोठी क्रांती केली होती. त्या संपूर्ण प्रक्रियेला अधिक बळकटी देण्याचे काम शरद पवार यांनी केले.

1. शरद पवार यांनी दुधाच्या कायमस्वरूपी आणि दर्जेदार उत्पादनासाठी आधुनिक धोरणनिर्मिती केली.
2. सहकारी दूध उत्पादक संस्थासोबतच खाजगी क्षेत्रातल्या संस्थांना त्यांनी प्रोत्साहन दिले, आणि त्यांचा सहभाग नोंदवला.
3. दूध आणि दूग्धजन्य पदार्थांसारख्या नाशवंत मालाच्या निर्यातीसाठी त्यांनी विशेष सोयीसुविधा निर्माण केल्या. त्याचप्रमाणे शीतगृहे आणि प्रक्रिया केंद्रांची वाढ करण्यात आली.

शरद पवार यांच्या प्रयत्नांनी बारामती मध्ये डायनॅमिक्स डेअरी सुरू झाली. या कंपनीतून तयार होणारी चॉकलेट्स आशिया आणि आखातातल्या सर्व देशात पाठवले जातात. या प्रकल्पाचे संपूर्ण विस्तारीकरण झाल्यावर फेरेरो कंपनीचा बारामतीमधला प्लांट जगातला क्रमांक एकचा प्लांट होईल. विशेष म्हणजे आज या ठिकाणावरून सुप्रसिद्ध आणि नामवंत असलेल्या ब्रिटानिया कंपनीसाठी आवश्यक असलेले चीज इथेच उत्पादित होते. फ्रान्समधल्या अव्वल दर्जाच्या जगभर मान्यताप्राप्त डेनॉन दुधावर आधारित उत्पादने याच कंपनीत तयार होतात. आमच्या स्थानिक दूर उत्पादक संस्थांना इथल्या उत्पादनांचे मार्केटिंग करणे अवघड जाते म्हणून या सर्व उत्पादनाचे मार्केटिंग याच कंपनीत करतात आणि त्यांच्याच नावाने ही उत्पादने देश विदेशातील बाजारपेठांमध्ये वितरित होतात. परंतु या कंपन्यांनी उभारलेल्या या प्रकल्पांची क्षमता जरी मोठी असली तरी ती 100% वापरली जात नाही, हे लक्षात आल्यावर उर्वरित क्षमता फळांच्या प्रक्रियेसाठी वापरता येईल असे लक्षात आले. आज संपूर्ण हिंदुस्थानात फळांच्या नैसर्गिक रसांची विक्री करणाऱ्या ट्रॉपिकाना कंपनीचे सारे रस बारामतीमध्ये याच कंपनीत तयार होतात. अलीकडच्या काळामध्ये नंदन आणि सह्याद्री ॲग्रो प्रॉडक्ट या दोन युनिटमध्येच साधारणतः दररोज 15 लाख लिटर दुधाचे संकलन होते. आजच्या दुधाच्या दरांचा विचार केला तर साधारणतः वर्षाला काही हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या कुटुंबात येतात. त्यातही यातील बराच पैसा महिलांच्या हातामध्ये जातो. महिलांच्या हातामध्ये गेलेल्या पैशांचा विनियोग हा अधिक व्यवस्थित होतो असे त्यांचे निरीक्षण होते. मुलांचे शिक्षण आरोग्य इत्यादी तरतुदीसाठी या पैशांचा उपयोग होतो. कुटुंबाच्या दीर्घकालीन हिताचा विचार स्त्रीमध्ये उपजत असतो. स्त्रियांच्या हातामध्ये पैसा आला की त्यांची सामाजिक प्रतिष्ठा देखील उंचावते. महिला धोरण जाहीर झाल्यानंतर ज्या पद्धतीने महिलांचा राजकीय उदय झाला त्यावरून हा आत्मविश्वास त्यांना होता.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा विकास व त्याद्वारे ग्रामीण भागात संपन्नता :-**

सहकार क्षेत्रामुळे महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात आर्थिक,सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आले. सहकार चळवळीने महाराष्ट्राचा अक्षरशः चेहरामोहरा बदलून टाकला. सहकार क्षेत्रामुळे मराठी माणसाला आणि महाराष्ट्रातल्या सर्व क्षेत्रांना मोठी पत मिळाली. महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात सहकाराला चालना देणारे नेते होऊन गेले. सहकार क्षेत्रातील नेतृत्वामुळे, त्यांच्या दूरदृष्टीमुळे माळरानावर नंदनवन फुलून आले. साखर कारखानदारीमुळे सामान्य शेतकरी पुढे आला. त्याची आर्थिक स्थिती सुधारली. महाराष्ट्रात विशेषतः सहकार क्षेत्राच्या विकसित झालेल्या भागांमध्ये विविध शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या. अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यवस्थापन क्षेत्रात अनेक विद्यार्थी अभ्यास करून यशस्वी झाले. सहकार चळवळीमुळे सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, सोसायटी, साखर कारखाने, दुधसंघ, सूतगिरण्या, पाणीपुरवठा संस्था, मच्छिमार संस्था इत्यादी अशा अनेक संस्थांची निर्मिती झाली. महाराष्ट्रातील संपूर्ण राज्याचे नेतृत्व म्हणून शरद पवार यांनी महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यातल्या त्या त्या ठिकाणच्या सहकार संस्थांना राजकीय ताकद दिली. राज्य सरकारच्या वतीने मोठी आर्थिक मदत केली. सत्तेत नसताना देखील सरकारकडून आर्थिक संस्थांना मदत करण्यासाठी प्रसंगी सहमतीचे राजकारण केले. सर्वसामान्य शेतकऱ्याला आधार देणाऱ्या सहकारी संस्था वाढल्या पाहिजेत, त्या अधिकाधिक विकसित झाल्या पाहिजेत, यासाठी शरद पवार यांनी खूप प्रयत्न केले.

सहकार चळवळ निकोप आणि निर्दोष असावी आणि त्यातून विकेंद्रीत आर्थिक समानता प्राप्त व्हावी, यासाठी आवश्यक महत्त्वाचे निर्णय त्यांनी घेतले. शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी, महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती, राज्यातील सिंचन क्षमता या सर्व बाबींचा व्यवस्थित अभ्यास करून शेतकऱ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने त्यांनी अत्यंत महत्त्वाच्या पुरोगामी निर्णयांची अंमलबजावणी केली. शेतकऱ्यांची गेलेली पत परत मिळवून देण्यासाठी कर्ज सवलतीचा निर्णय असेल किंवा कापूस एका अधिकाराखाली शेतकऱ्यांना जादा भाव देणे यासारखे निर्णय त्यांनी घेतले. संकटात आलेल्या सहकारी साखर कारखान्याचा विस्तार त्यांनी केला. त्यासाठी आवश्यक ती आर्थिक मदत सरकारकडून करण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले. केवळ उसाच्या शेतीवर अवलंबून न राहता कृषी प्रक्रिया उद्योग नव्याने उभारले जावेत यासाठी धोरणात्मक निर्णय घेतले.

या संशोधनातून असे स्पष्ट होते की महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक विकासात शरद पवार यांची संस्थात्मक भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. त्यांनी सहकार, कृषी धोरणे, औद्योगिक पायाभूत सुविधा आणि शाश्वत विकास या सर्व क्षेत्रांमध्ये समन्वय साधून दीर्घकालीन परिणाम घडवून आणले.

**संशोधन पेपरचे निष्कर्ष :-**

1.शरद पवार यांनी सहकार चळवळीला चालना देऊन साखर कारखानदारी, दुग्धव्यवसाय आणि फलोत्पादन क्षेत्राचा विस्तार केला. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट झाली आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. बारामती पॅटर्नसारख्या मॉडेलमुळे स्थानिक विकासाचे प्रभावी उदाहरण निर्माण झाले.

2. आयटी पार्क, एमआयडीसी (MIDC) आणि शहरी औद्योगिक विकास प्रकल्पांद्वारे रोजगारनिर्मितीला मोठा हातभार लागला. पुणे, मुंबईसारख्या शहरांमध्ये उद्योगवाढीसाठी आवश्यक असलेली पायाभूत सुविधा निर्माण करण्यात त्यांची भूमिका निर्णायक ठरली.

3.कृषी आणि उद्योग यांच्यातील समन्वय साधण्याचा त्यांचा दृष्टिकोन शाश्वत विकासासाठी महत्त्वाचा ठरला. कृषीआधारित उद्योगांना प्रोत्साहन देऊन त्यांनी ग्रामीण-शहरी दरी कमी करण्याचा प्रयत्न केला.

4.काही मर्यादा देखील दिसून येतात. सहकारी संस्थांमध्ये राजकीय हस्तक्षेप, प्रादेशिक असमतोल आणि पर्यावरणीय परिणाम या बाबींचा शाश्वत विकासावर काही प्रमाणात नकारात्मक परिणाम झाला आहे.

एकूणच, शरद पवार यांचे नेतृत्व आणि संस्थात्मक हस्तक्षेप महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी ठरले असले, तरी भविष्यात शाश्वततेवर अधिक लक्ष केंद्रित करणे, पारदर्शकता वाढवणे आणि पर्यावरणीय संतुलन राखणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची-**

लोक माझे सांगाती – शरद पवार (राजकीय आत्मकथा)

स्पर्धा काळाशी: भाषणे व मुक्तसंवाद – संपादक: अरुण टिकेकर

चिंतनपर्व – सुधीर भोंगळे, सुज्ञान प्रकाशन, पुणे

लोकनेते शरदराव पवार – राम कांडगे, राजश्री प्रकाशन

शेतकऱ्यांचे शरद पवार – अशोक पाटील, शब्दालय प्रकाशन

'राष्ट्रवादी' मासिक – राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (NCP)

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# सार्वजनिक धोरणांच्या संदर्भात भटक्या-विमुक्त समाजाचे प्रश्न: एक समीक्षात्मक अभ्यास

**डॉ. दिपक बाबुराव उजागरे**
प्रा, राज्यशास्त्र विभाग, वाघीरे महाविद्यालय, सासवड, पुणे
**Email:** deepakujagare50@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180402
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 6-8
April - 2026

**Submitted:** 09 Mar. 2026
**Revised:** 21 Mar. 2026
**Accepted:**08 Apr 2026
**Published:**30 Apr. 2026

***सारांश***

*भटक्या आणि विमुक्त जमाती (Denotified, Nomadic and Semi-Nomadic Tribes - DNTs) या भारतीय सामाजिक संरचनेतील अत्यंत उपेक्षित आणि संरचनात्मक दृष्ट्या वंचित घटक आहेत. ब्रिटीश वसाहतकालीन धोरणांच्या परिणाम स्वरूप निर्माण झालेला सामाजिक कलंक, तसेच स्वातंत्र्योत्तर सार्वजनिक धोरणांतील अपुरेपणा, यांमुळे या समूहाचे मुख्य प्रवाहात समावेशन अद्यापही पूर्ण झालेले नाही.प्रस्तुत संशोधनात भटक्या-विमुक्त समाजाच्या विविध समस्यांचा सामाजिक बहिष्कार, उपेक्षा, आणि मानवी विकास या सैद्धांतिक चौकटींच्या आधारे अभ्यास करण्यात आला आहे.*

**प्रस्तावना :**

भारतीय समाजातील स्तरीकरणाची रचना ही ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रक्रियांमधून घडलेली आहे. भटक्या-विमुक्त समाज हा या प्रक्रियेतून सर्वाधिक वंचित राहिलेला घटक आहे. गुन्हेगारी जमाती कायदा १८७१ अंतर्गत या समाजांना "गुन्हेगार" म्हणून वर्गीकृत करण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक ओळखीवर कायमस्वरूपी नकारात्मक छाप पडली.स्वातंत्र्यानंतर या कायद्याचे उच्चाटन झाले असले, तरी सराईत गुन्हेगारी कायद्याच्या च्या माध्यमातून नियंत्रणात्मक दृष्टिकोन कायम राहिल्याचे दिसून येते. परिणामी, या समाजाचे सामाजिक समावेशन हा अद्यापही अपूर्ण असल्याचे जाणवते.

**संशोधन समस्या :**

भटक्या-विमुक्त समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध सार्वजनिक धोरणांची परिणामकारकता मर्यादित का राहते, आणि या धोरणांमध्ये कोणत्या संरचनात्मक कमतरता आहेत, हा या संशोधन लेखाचा मूळ हेतू आहे.

**संशोधन उद्दिष्टे :**

१. भटक्या-विमुक्त समाजाच्या संरचनात्मक विवंचनेचे विश्लेषण करणे.
२. सार्वजनिक धोरणांच्या स्वरूप व अंमलबजावणीचे समीक्षा करणे.
३. सैद्धांतिक चौकटीच्या आधारे समस्यांचे विश्लेषण करणे.
४. धोरणात्मक सुधारणा सुचवणे.

**सैद्धांतिक चौकट :**

**सामाजिक बहिष्कार**

सामाजिक बहिष्कार ही प्रक्रिया व्यक्ती किंवा समूहाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्कांपासून पासून दूर ठेवते.भटक्या-विमुक्त समाजाच्या बाबतीत ही प्रक्रिया ऐतिहासिकदृष्ट्या संस्थात्मक स्वरूपात कार्यरत राहिली आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21426949

**Address for correspondence:**
*डॉ.दिपक बाबुराव उजागरे राज्यशास्त्र विभाग, वाघीरे महाविद्यालय,सासवड,पुणे.*

**How to cite this article:**
*उजागरे, दिपक. बाबुराव. (2026). सार्वजनिक धोरणांच्या संदर्भात भटक्या-विमुक्त समाजाचे प्रश्न: एक समीक्षात्मक अभ्यास. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 6–8.*
*https://doi.org/10.5281/zenodo.21426949*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**सैद्धांतिक चौकट :**

**सामाजिक बहिष्कार**

सामाजिक बहिष्कार ही प्रक्रिया व्यक्ती किंवा समूहाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्कांपासून पासून दूर ठेवते.भटक्या-विमुक्त समाजाच्या बाबतीत ही प्रक्रिया ऐतिहासिकदृष्ट्या संस्थात्मक स्वरूपात कार्यरत राहिली आहे.

**मानवी विकास दृष्टिकोन :**

अमर्त्य सेन यांच्या मते 'विकास म्हणजे केवळ आर्थिक वृद्धी नव्हे, तर व्यक्तीच्या क्षमतेचा चा विस्तार होय. भटक्या समाजाच्या बाबतीत या क्षमतांचा विकास अपुरा राहिलेला आहे.

**पारंपारिक दृष्टिकोन :** ब्रिटीश वसाहतवादी काळातील धोरणांमुळे निर्माण केलेली सामाजिक रचना स्वातंत्र्यानंतरही कायम राहिली ,हा या दृष्टिकोनाचा मूळ गाभा आहे.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुत संशोधनासाठी गुणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला असून दुय्यम साधनांद्वारे माहिती जमा करण्यात आलेली आहे.यामध्ये प्रामुख्याने विविध लेख,पुस्तके ग्रंथ,सरकारी अहवाल,वृत्तपत्रे आणि मासिके यांचा समवेश करण्यात आलेला आहे.

**भटक्या विमुक्त समाजचे प्रश्न :**

**शैक्षणिक विवंचना**

भटक्या जीवनशैलीमुळे औपचारिक शिक्षण व्यवस्थेशी सुसंगतपणा निर्माण होत नाही.त्यामुळे शाळाबाह्य मुलांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.तसेच शिक्षणापासून या समाजातील मुले वंचित राहतात.सतत भटकंती असल्यामुळे त्यांच्या शैक्षणिक घटकाकडे दुर्लक्ष होते.

**आर्थिक अस्थिरता:**

सभोवतालच्या बदलत्या परिस्थितीमुळे पारंपारिक उदरनिर्वाहाच्या साधनावर परिणाम झालेला आहे.शिक्षणाअभावी आधुनिक कौशल्य नसल्याने केवळ शाररीक अंग मेहनतीचे काम करावे लागते.त्यामुळे आर्थिक समस्येला सामोरे जावे लागते.शिवाय बहुतांशी समाज बांधवांकडे शासकीय कागद पत्रे नसल्याने शासकीय योजनेपासून वंचित राहावे लागते. अस्थिर उत्पन्न स्रोत, अनौपचारिक क्षेत्रावर अवलंबित्व, आणि संसाधनांवर मर्यादित प्रवेश ही प्रमुख वैशिष्ट्ये यात आढळतात.

**सामाजिक कलंक आणि अस्मितेची लढाई :**

इतिहासातील"गुन्हेगार" हा ठपका असल्याने आजही काही प्रमाणात या समाजातील काही समाज घटकांना पूर्व इतिहासला सामोरे जावे लागते.त्यामुळे आधुनिक काळात सुद्धा आजही सामाजिक परस्परसंवादात अडथळा निर्माण करतो.त्यामुळे जर एखाद्या गावात किंवा शहरात काही अघटीत घटना घडल्यास या समाजातील काही घटकांना शासकीय अधिकाऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागते.आजही चौकशीला सामोरे जावे लागते.

**शासकीय दस्त अभाव :**

भटक्या विमुक्त समाजात देशातील वेगवेगळया राज्यात विभागल्यामुळे अनेक ठिकाणी वेगवेगळया नावाने ओळखला जातो.एकच जमात राज्यात वेगवेगळया नावाने ओळखले जाते.त्यामुळे शिक्षण,नोकरी,बढती,राजकीय प्रतिनिधित्व यापासून वंचित राहावे लागते.जन्म मृत्यू दाखला,रेशनकार्ड,आधारकार्ड,मतदारकार्ड ओळखपत्रांचा अभाव आणि प्रशासकीय प्रक्रियांतील गुंतागुंत यांमुळे राज्याच्या विविध कल्याणकारी योजनांपासून या समाज घटकांना वंचितता राहावे लागते.

**सार्वजनिक धोरणांचे समीक्षा :**

**संस्थात्मक प्रयत्न :**

देशातील भटक्या विमुक्त समाजाचा सर्वांगीण विकासासाठी विविध उपाय योजना आखणे आवश्यक आहे.त्यासाठी संस्थात्मक प्रयत्न होणे आवश्यक आहे.शासन आणि विविध बिगर शासकीय गट,सजग नागरिक यांच्या माध्यमातून त्यांची सामाजिक,आर्थिक,राजकीय,शौक्षणिक,सुधारणा घडवून आणणे शिवाय त्यांचे विविध केंद्राच्या आणि राज्यांच्या धोरणांद्वारे पुनर्वसन योजना आवश्यक आहे.

**धोरणात्मक मर्यादा** :

- या समाजातील स्थलांतरित जीवनशैलीचा विचार नसणे.
- निश्चित माहितीचा अभावामुळे त्यांच्यावर लक्ष केंद्रित करता येत नाही.

महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त जमातींचा विचार करता खालील मुद्दे प्रकर्षाने दिसून येतात:

- ग्रामीण आणि शहरी व अर्ध-शहरी भागांमध्ये असणारी अस्थिर वस्ती
- शिक्षणातील वाढते गळतीचे प्रमाण
- स्वयंसेवी संस्थांची महत्वाची भूमिका

भटक्या-विमुक्त समाजाच्या समस्यांचा विचार करताना केवळ आर्थिक उपाय पुरेसे नाहीत. तर सामाजिक ओळख, सांस्कृतिक स्वायत्तता, जातनिहाय जणगणना,आणि राजकीय प्रतिनिधित्व यांचा एकत्रित विचार आवश्यक आहे.

**सर्वांगीण कल्याणासाठी धोरणात्मक काही शिफारसी :**

**संदर्भाधारित धोरणे**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

या समाजाची स्थलांतरित जीवनशैली ध्यानात घेऊन लवचिक धोरणे विकसित करणे आवश्यक आहे.

**क्षमतावृद्धी**

या समाजाच्या शिक्षण, कौशल्य, आणि सामाजिक सक्षमीकरणावर भर देणे.

**प्रशासकीय सुधारणा**

- दस्तऐवजीकरण प्रक्रिया सुलभ करणे.
- स्थानिक स्तरावर समाजाचा सहभाग वाढवणे .

**माहितीचे संकलन**

प्रत्येक राज्यातील या भटक्या विमुक्त समाजाची अचूक आणि अद्ययावत माहिती गोळा करणे

**निष्कर्ष**

भटक्या-विमुक्त समाजाचे प्रश्न हे केवळ आर्थिक नाहीत, तर सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक आणि राजकीय स्वरूपाचे आहेत. सार्वजनिक धोरणे अधिक समावेशक, लवचिक आणि समुदाय-केंद्रित असणे आवश्यक आहे. अन्यथा, विकासाची प्रक्रिया अपूर्ण राहील.

**संदर्भ**

1. भारत सरकार (विविध रिपोर्ट)
2. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग (रिपोर्ट)
3. जाधव भीमराव “आत्मकथा काटेरी तारेच्या कुंपणाची”चंद्रकला प्रकाशन,पुणे.
4. भोसले नारायण,भटक्या विमुक्तांच्या इतिहासाची साधने,मैत्री प्रकाशन,पुणे.
5. जाधव बाळासो एम.भामटा सेटलमेंट,ग्लोरियस गोस्पल मिनिस्ट्रीज,बारामती पुणे.
6. माने लक्ष्मण, विमुक्तायन,मेहता प्रकाशन,पुणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# घनकचऱ्याचे पुन:चक्रीकरण (पुणे महानगरपालिका)

**डॉ. सुजाता शंकर निकम**
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघीरे कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय सासवड, पुणे
**Email:** ssnikam2@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180403
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 9-12
April - 2026

**Submitted:** 09 Mar. 2026
**Revised:** 21 Mar. 2026
**Accepted:**08 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***गोषवारा-***

*शहरीकरण आणि लोकसंख्येच्या वाढीमुळे शहरांमध्ये घनकचऱ्याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. पुणे शहरात दररोज मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. या संशोधनाचा उद्देश पुणे महानगरपालिकेच्या (PMC) घनकचरा व्यवस्थापन व पुनर्चक्रीकरण प्रक्रियेचा अभ्यास करणे हा आहे. या पेपरमध्ये कचऱ्याचे प्रकार, व्यवस्थापन प्रणाली, पुनर्चक्रीकरण पद्धती, समस्या आणि उपाययोजना यांचा सखोल अभ्यास केला आहे.शहरीकरण आणि लोकसंख्येच्या वाढीमुळे घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. या संशोधनाचा उद्देश पुणे महानगरपालिकेच्या कचरा व्यवस्थापन व पुनर्चक्रीकरण प्रक्रियेचा अभ्यास करणे आहे.*

***शब्दसंकेत-*** *घनकचरा, पुनर्वापर,पुणे महानगरपालिका, कचरा व्यवस्थापन, शाश्वतता*

**प्रस्तावना-**

घनकचरा व्यवस्थापन हे शहरांसाठी मोठे आव्हान आहे. पर्यावरण संरक्षणासाठी योग्य कचरा व्यवस्थापन आवश्यक आहे.घनकचरा व्यवस्थापन (Solid Waste Management) हे शहरी प्रशासनासाठी मोठे आव्हान बनले आहे. पर्यावरण संरक्षण, आरोग्य आणि शाश्वत विकासासाठी कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन अत्यंत आवश्यक आहे. पुणे हे महाराष्ट्रातील प्रमुख शहर असून येथे दररोज मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. अंदाजे 1500–1600 टन कचरा दररोज निर्माण होतो .

**उद्दिष्टे-**

1. पुणे महानगरपालिकेच्या कचरा व्यवस्थापन प्रणालीचा अभ्यास करणे.
2. पुनर्चक्रीकरण प्रक्रियेचे विश्लेषण करणे.
3. पुणे महानगरपालिकेच्या कचरा व्यवस्थापन प्रणाली विषयक सध्याच्या समस्या ओळखणे.
4. पुणे महानगरपालिकेच्या कचरा व्यवस्थापन प्रणाली विषयक सुधारणा उपाय सुचवणे.

**कचऱ्याचे प्रकार-**

ओला कचरा, कोरडा कचरा, जड कचरा पुण्यात खालील प्रकारचे कचरे निर्माण होतात:

| अ. क्र. | कचऱ्याचा प्रकार | टक्केवारी (%) |
|---|---|---|
| १ | ओला कचरा (Wet Waste) | 50% |
| २ | सुका कचरा (Dry Waste) | 30% |
| ३ | प्लास्टिक कचरा | 15% |
| ४ | ई-कचरा | 5% |

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. सुजाता शंकर निकम पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघीरे कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय सासवड, पुणे.*

**How to cite this article:**
*निकम, सुजाता. शंकर. (2026). घनकचऱ्याचे पुन:चक्रीकरण (पुणे महानगरपालिका). Journal of Research & Development, 18(4(XXII)), 9–12.* https://doi.org/10.5281/zenodo.21427021

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21427021

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026




| वर्ष | एकूण कचरा निर्मिती (TPD) | पुनश्चक्रीकरण (TPD) |
|---|---|---|
| 2019 | 2100 | 1200 |
| 2020 | 2200 | 1300 |
| 2021 | 2300 | 1450 |
| 2022 | 2400 | 1600 |
| 2023 | 2500 | 1750 |




**पुणे महानगरपालिकेची घनकचरा व्यवस्थापन प्रणाली**

- **घरोघरी जाऊन संकलन**

  पुणे महानगरपालिका द्वारे घराघरातून कचरा गोळा केला जातो. SWaCH Cooperative (कचरा वेचणाऱ्या कामगारांची संस्था) यांचा सहभाग आहे. काही भागात नागरिकांकडून शुल्क घेतले जाते.

- **विलगीकरण**

  कचऱ्याचे वर्गीकरण (ओला व कोरडा) अजूनही सर्व नागरिक वर्गीकरण करत नाहीत

- **वाहतूक**

  ट्रक्स आणि कंपॅक्टरद्वारे कचरा वाहतूक

**घनकचरा प्रक्रिया**

- कंपोस्ट खत
- गांडूळ खत
- बायोगॅस निर्मिती
- आरडीएफ (कचऱ्यापासून बनवलेले इंधन))

**पुण्यातील घनकचरा पुनर्वापर प्रक्रिया**

पुण्यात पुनर्चक्रीकरणासाठी खालील पद्धती वापरल्या जातात: प्लास्टिक, कागद, धातू पुनर्चक्रीकरण ओल्या कचऱ्यापासून खत तयार करणे कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती डेटानुसार, पुण्यातील कचऱ्याचे काही प्रमाण पुनर्चक्रीकरण केले जाते, परंतु सर्व कचरा प्रक्रिया होत नाही.

**SWACH सहकारी संस्थेची भूमिका**

कचरा वेचणाऱ्यांचा सहकारी संघ पुणे महानगरपालिका सोबत सार्वजनिक-खाजगी भागीदारी
घराघरातून कचरा संकलन पुनर्चक्रीकरणात मोठा वाटा

**कचरा पुनर्वापरमधील आव्हाने-**

- अपूर्ण वर्गीकरण- सर्व नागरिक कचरा वेगळा करत नाहीत.
- कचराभूमीची समस्या- उरळी देवाची येथे मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जातो.
- अपूर्ण प्रक्रिया- काही कचरा अजूनही शेतीत किंवा डंपिंग साइटवर टाकला जातो
- नियमांचे कमी पालन- दंड कमी आणि अंमलबजावणी कमकुवत

**सरकारी धोरणे आणि उपक्रम**

- स्वच्छ भारत अभियान
- घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६
- पुणे महानगरपालिका कचरा विलगीकरण अभियान
- घरगुती कंपोस्टिंगला प्रोत्साहन

**सूचना आणि शिफारसी**

1. प्रत्येक घरात कचरा वर्गीकरण अनिवार्य करणे
2. नागरिकांमध्ये जागरूकता वाढवणे
3.पुनर्चक्रीकरण प्रकल्प वाढवणे
4. कठोर दंड व्यवस्था लागू करणे
5. तंत्रज्ञानाचा वापर (स्मार्ट कचराकुंड्या, ट्रॅकिंग यंत्रणा)
6.शून्य कचरा संकल्पना लागू करणे

**निष्कर्ष**

पुणे महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनासाठी अनेक उपक्रम राबवले असले तरी अजूनही सुधारणा आवश्यक आहे. पुनर्चक्रीकरणाची प्रक्रिया मजबूत करून आणि नागरिकांचा सहभाग वाढवून शाश्वत शहर निर्माण करता येईल.

**संदर्भ साहित्य यादी**

1. Pune Municipal Corporation (PMC). Solid Waste Management Department Reports, Pune, विविध वर्षे.
2. Central Pollution Control Board (CPCB).Annual Report on Solid Waste Management in India, नवी दिल्ली.
3. Ministry of Environment, Forest and Climate Change (MoEFCC). Solid Waste Management Rules, 2016, भारत सरकार.
4. Government of Maharashtra. Maharashtra State Solid Waste Management Policy, मुंबई.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

5. Swachh Bharat Mission. Guidelines for Urban Solid Waste Management, भारत.
6. National Environmental Engineering Research Institute (NEERI). Urban Solid Waste Management Studies, नागपूर.
7. Environmental Studies. – विविध लेखक, शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी.
8. World Bank. What a Waste 2.0: A Global Snapshot of Solid Waste Management, 2018.
9. United Nations Environment Programme (UNEP). Waste Management Outlook Report.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# शाश्वत विकासात सार्वजनिक आरोग्याची भूमिका

**डॉ. सिध्दार्थ सहादु घोंगडे**
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघीरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सासवड, पुणे
**Email:** ghongadesid358@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180404
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 13-18
April- 2026
**Submitted:** 09 Mar. 2026
**Revised:** 21 Mar 2026
**Accepted:**08 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***गोषवारा-***

*सध्याच्या जागतिक आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय संदर्भात शाश्वत विकास साध्य करण्यासाठी सार्वजनिक आरोग्याची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. प्रस्तुत संशोधनामध्ये विविध देशांमधील आरोग्यावरील एकूण खर्च (Total Health Expenditure as % of GDP), आयुर्मान, मानव विकास निर्देशांक (HDI) आणि आरोग्यावरील स्वखर्च (Out-of-Pocket Expenditure) यांमधील परस्परसंबंधाचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासात संकल्पनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून World Bank, WHO आणि UNDP यांच्या 2023-24 च्या आकडेवारीवर आधारित विश्लेषण सादर केले आहे. तक्ते व आलेखांच्या आधारे विकसित, विकसनशील आणि कमी उत्पन्न असलेल्या देशांमधील आरोग्य गुंतवणुकीतील फरक आणि त्याचे परिणाम स्पष्ट करण्यात आले आहेत. अभ्यासातून असे दिसून येते की ज्या देशांमध्ये आरोग्यावरील एकूण खर्च जास्त आहे, त्या देशांमध्ये आयुर्मान अधिक, स्वखर्च कमी आणि मानव विकास निर्देशांक उच्च आहे. नॉर्डिक देश हे याचे उत्कृष्ट उदाहरण असून ते शाश्वत विकासासाठी आदर्श मॉडेल ठरतात. याउलट, भारतासह काही विकसनशील देशांमध्ये आरोग्यावरील खर्च कमी आणि स्वखर्चाचे प्रमाण जास्त असल्यामुळे आरोग्य सेवांमध्ये असमानता आढळते. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी सार्वजनिक आरोग्यावरील गुंतवणूक वाढविणे, स्वखर्च कमी करणे आणि आरोग्य व्यवस्थेची कार्यक्षमता सुधारणा करणे आवश्यक असल्याचे निष्कर्षातून स्पष्ट होते.*

**प्रस्तावना-**

शाश्वत विकास (Sustainable Development) ही संकल्पना केवळ आर्थिक वाढीपुरती मर्यादित नसून पर्यावरणीय संतुलन, सामाजिक समता आणि सार्वजनिक आरोग्य यांचा समन्वय साधणारी व्यापक प्रक्रिया आहे. संयुक्त राष्ट्रांनी जाहीर केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये (Sustainable Development Goals – SDGs) "Good Health and Well-being (SDG-3)" हे केंद्रस्थानी उद्दिष्ट मानले गेले असून, सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. जागतिक स्तरावर पाहता, आरोग्य क्षेत्रातील गुंतवणूक आणि आर्थिक विकास यांमध्ये घनिष्ठ संबंध आढळतो. अलीकडील आकडेवारीनुसार, विकसित देशांमध्ये आरोग्यावरील एकूण खर्च GDP च्या सुमारे 9 ते 11 टक्क्यांच्या दरम्यान असून, त्या देशांमध्ये आयुर्मान 80 वर्षांपेक्षा अधिक आहे. याउलट, विकसनशील आणि कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये हा खर्च तुलनेने कमी असून स्वत: च्या उत्पन्नातून आरोग्यावर करण्यात येणाऱ्या खर्चाचे प्रमाण जास्त आहे, ज्यामुळे सामाजिक व आर्थिक असमानता वाढते. भारताच्या संदर्भात, आरोग्यावरील एकूण खर्च सुमारे 3.3% GDP असून त्यामध्ये स्वखर्चाचे प्रमाण 48–50% इतके जास्त आहे. या सारख्या परिस्थितीमुळे आरोग्य सेवांमधील असमानता आणि सार्वजनिक गुंतवणुकीतील विषमता व मर्यादा दर्शविते. स्वीडन, नॉर्वे आणि डेन्मार्क यांसारख्या नॉर्डिक देशांमध्ये उच्च आरोग्य गुंतवणूक, कमी स्वखर्च आणि उच्च मानव विकास निर्देशांक आढळतो, ज्यामुळे ते शाश्वत विकासासाठी आदर्श मॉडेल ठरतात.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. सिध्दार्थ सहादु घोंगडे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघीरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सासवड, पुणे*

**How to cite this article:**
*घोंगडे, सिध्दार्थ सहादु. (2026). शाश्वत विकासात सार्वजनिक आरोग्याची भूमिका. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 13–18.* https://doi.org/10.5281/zenodo.21427143

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21427143

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

COVID-19 महामारीने सार्वजनिक आरोग्य आणि अर्थव्यवस्था यांमधील परस्परसंबंध अधिक स्पष्ट केला आहे. महामारीमुळे आरोग्य व्यवस्थेवरील ताण वाढला आणि आर्थिक क्रियाकलापांमध्ये मोठी घट झाली. या पार्श्वभूमीवर, सार्वजनिक आरोग्य हे केवळ सामाजिक गरज नसून आर्थिक स्थैर्य आणि दीर्घकालीन विकासासाठी आवश्यक असलेले महत्त्वपूर्ण घटक आहे, हे स्पष्ट झाले आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये विविध देशांमधील आरोग्यावरील एकूण खर्च, आयुर्मान, मानव विकास निर्देशांक आणि स्वखर्च यांमधील परस्परसंबंधाचा तुलनात्मक अभ्यास करून शाश्वत विकासात सार्वजनिक आरोग्याची भूमिका विश्लेषित करण्यात येणार आहे.

**शाश्वत विकासाची संकल्पना-**

शाश्वत विकास (Sustainable Development) ही संकल्पना प्रथम 1987 मध्ये World Commission on Environment and Development च्या अहवालात मांडण्यात आली. या अहवालानुसार, *"वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न होईल असा विकास"* म्हणजे शाश्वत विकास होय (WCED, 1987). ही व्याख्या आजही जागतिक स्तरावर मान्य असून दीर्घकालीन आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय संतुलनावर भर देते.

शाश्वत विकास ही बहुआयामी संकल्पना असून तीन प्रमुख स्तंभांवर आधारित आहे: (१) आर्थिक विकास, (२) सामाजिक समावेशन आणि (३) पर्यावरणीय संरक्षण. आर्थिक विकासामध्ये उत्पादनवाढ, रोजगार निर्मिती आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर यांचा समावेश होतो. सामाजिक समावेशनामध्ये गरीबी निर्मूलन, समान संधी आणि सामाजिक न्याय यांना महत्त्व दिले जाते. पर्यावरणीय संरक्षणामध्ये नैसर्गिक संसाधनांचे जतन, प्रदूषण नियंत्रण आणि हवामान बदलाचा सामना करणे यांचा समावेश होतो. संयुक्त राष्ट्रांनी सन २०१५ मध्ये जाहीर केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये (Sustainable Development Goals – SDGs) एकूण 17 उद्दिष्टांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये विशेषतः "Good Health and Well-being (SDG-3)" हे उद्दिष्ट सार्वजनिक आरोग्याला शाश्वत विकासाच्या केंद्रस्थानी ठेवते (UN, 2015). यावरून स्पष्ट होते की आरोग्य क्षेत्रातील सुधारणा केवळ सामाजिक कल्याणासाठी नसून आर्थिक प्रगतीसाठीही आवश्यक आहे. आर्थिक दृष्टिकोनातून पाहता, शाश्वत विकास ही संकल्पना पिढ्यांमधील न्याय्य समतोल (Inter-generational Equity) आणि संसाधनांचे कार्यक्षम वाटप (Efficient Resource Allocation) यांवर आधारित आहे. जागतिक बँकेच्या मते, नैसर्गिक आणि मानवी संसाधनांचा संतुलित वापर केल्यास दीर्घकालीन आर्थिक वाढ साध्य करता येते (World Bank, 2022).

आधुनिक अर्थशास्त्रात शाश्वत विकासाला हरित आर्थिक वाढ (Green Growth) आणि समावेशक विकास (Inclusive Development) या संकल्पनांशी जोडले जाते. हरित तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा आणि पर्यावरणपूरक धोरणांद्वारे आर्थिक विकास साधताना पर्यावरणीय हानी कमी करण्यावर भर दिला जातो, तर समावेशक विकासाद्वारे समाजातील सर्व घटकांना विकास प्रक्रियेत सहभागी केले जाते. सद्याच्या जागतिक परिस्थितीत, विशेषतः COVID-19 महामारीनंतर, सार्वजनिक आरोग्य हा शाश्वत विकासाचा एक प्रमुख घटक म्हणून उदयास आला आहे. आरोग्यदृष्ट्या सक्षम लोकसंख्या ही आर्थिक उत्पादकता वाढविण्यास, सामाजिक स्थैर्य राखण्यास आणि दीर्घकालीन विकास साध्य करण्यास महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे शाश्वत विकास ही केवळ पर्यावरणीय संकल्पना नसून ती आरोग्य, अर्थव्यवस्था आणि समाज यांचा समन्वित दृष्टिकोन (Integrated Approach) आहे.

**सार्वजनिक आरोग्याची संकल्पना-**

सार्वजनिक आरोग्य संकल्पना समाजातील सर्व व्यक्तींच्या आरोग्याचे संरक्षण, संवर्धन आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या संघटित प्रयत्नांशी संबंधित आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, "सार्वजनिक आरोग्य म्हणजे रोगांचे प्रतिबंध, आयुष्यवाढ आणि आरोग्य सुधारण्यासाठी समाजाच्या संघटित प्रयत्नांद्वारे केलेली प्रक्रिया" होय (WHO, 2022). ही व्याख्या सार्वजनिक आरोग्याच्या प्रतिबंधात्मक आणि प्रोत्साहनात्मक स्वरूपावर भर देते. सार्वजनिक आरोग्य ही केवळ वैद्यकीय उपचारांपुरती मर्यादित नसून ती व्यापक सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय घटकांवर आधारित आहे. आरोग्याचे निर्धारक पोषण, स्वच्छता, शिक्षण, उत्पन्न, निवास व्यवस्था आणि पर्यावरणीय परिस्थिती या घटकाचा सार्वजनिक आरोग्यावर थेट परिणाम होतो. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य ही बहुआयामी संकल्पना असून विविध क्षेत्रांच्या समन्वयातून कार्यान्वित होते. आर्थिक दृष्टिकोनातून, सार्वजनिक आरोग्य हे मानवी भांडवल वाढविण्याचे प्रभावी साधन मानले जाते. निरोगी लोकसंख्या ही अधिक उत्पादक, कार्यक्षम आणि नवोन्मेषक्षम असते, ज्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते. जागतिक बँकेच्या मते, आरोग्यावरील गुंतवणूक ही दीर्घकालीन आर्थिक वाढीसाठी आवश्यक घटक आहे. (World Bank, 2022). सार्वजनिक आरोग्याचा सामाजिक समतेशी (Social Equity) घनिष्ठ संबंध आहे. सर्व नागरिकांना समान आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्यास सामाजिक विषमता कमी होते आणि जीवनमान सुधारते. विशेषतः गरीब व वंचित घटकांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हे समावेशक विकासाचे महत्त्वपूर्ण अंग आहे. आधुनिक काळात, सार्वजनिक आरोग्याचा संबंध शाश्वत

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

विकास या संकल्पनेशी अधिक दृढ झाला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये (SDGs) “Good Health and Well-being (SDG-3)” हे उद्दिष्ट सार्वजनिक आरोग्याला केंद्रस्थानी ठेवते. यावरून स्पष्ट होते की आरोग्य सुधारणा ही आर्थिक विकास, सामाजिक समता आणि पर्यावरणीय संरक्षण यांसाठी आवश्यक आहे. तसेच COVID-19 महामारीने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. महामारीमुळे आरोग्य प्रणालीवरील ताण वाढला आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला. या अनुभवातून स्पष्ट झाले की प्रभावी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था केवळ सामाजिक गरज नसून ती आर्थिक स्थैर्य आणि शाश्वत विकासासाठी अत्यावश्यक आहे.

**शाश्वत विकासात सार्वजनिक आरोग्याची भूमिका-**

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य एक मूलभूत आणि अपरिहार्य घटक आहे. आर्थिक विकास, सामाजिक समता व पर्यावरणीय संतुलन या शाश्वत विकासाच्या तीनही स्तंभांशी सार्वजनिक आरोग्याचा थेट संबंध आढळतो. निरोगी लोकसंख्या ही केवळ सामाजिक कल्याणाची निदर्शक नसून ती आर्थिक उत्पादकता, मानवी भांडवल निर्मिती व दीर्घकालीन विकासाची आधारशिला आहे. आर्थिक दृष्टिकोनातून सार्वजनिक आरोग्यावरील गुंतवणूक उत्पादनक्षमता वाढविण्यास व कामगारांच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यास मदत करते. निरोगी कामगार अधिक कार्यक्षम, कमी अनुपस्थित आणि नवोन्मेषक्षम असतात, ज्यामुळे देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात (GDP) सकारात्मक वाढ होते. जागतिक बँकेच्या मतानुसार, आरोग्य क्षेत्रातील गुंतवणूक ही दीर्घकालीन आर्थिक विकासासाठी आवश्यक घटक आहे (World Bank, 2022). सामाजिक दृष्टिकोनातून, सार्वजनिक आरोग्य समावेशक विकासाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. सर्व नागरिकांना समान आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्यास सामाजिक विषमता कमी होऊन जीवनमान सुधारते. विशेषतः कमी उत्पन्न गटांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध झाल्यास त्यांचा आर्थिक सहभाग वाढतो आणि समाज अधिक समतोल बनतो. पर्यावरणीय दृष्टिकोनातून, स्वच्छ हवा, सुरक्षित पाणी आणि स्वच्छता या घटकांचा सार्वजनिक आरोग्यावर थेट परिणाम होतो. पर्यावरणीय प्रदूषणामुळे विविध आजारांचे प्रमाण वाढते, ज्यामुळे आरोग्य खर्चात वाढ होऊन संसाधनांवर अतिरिक्त ताण येतो. त्यामुळे पर्यावरण संरक्षण आणि सार्वजनिक आरोग्य यांचा समन्वय साधणे हे शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे. सार्वजनिक आरोग्याचा प्रभाव मानव विकास निर्देशांक (HDI), आयुर्मान आणि स्वखर्च आरोग्य खर्च यांसारख्या प्रमुख विकास निर्देशकांवर स्पष्टपणे दिसून येतो. ज्या देशांमध्ये आरोग्यावरील एकूण खर्च जास्त आहे त्या देशांमध्ये आयुर्मान अधिक, स्वखर्च कमी आणि मानव विकास निर्देशांक उच्च असल्याचे आढळते. याउलट, कमी आरोग्य खर्च असलेल्या देशांमध्ये आरोग्य सेवांमध्ये असमानता आणि आर्थिक ताण अधिक प्रमाणात दिसून येतो.

या पार्श्वभूमीवर, विविध देशांमधील आरोग्यावरील खर्च, आयुर्मान, मानव विकास निर्देशांक आणि स्वखर्च यांमधील संबंध अधिक स्पष्ट करण्यासाठी खालील तक्ता सादर केला आहे.

**तक्ता क्र.१**

**देशनिहाय सार्वजनिक आरोग्य खर्च व विकास निर्देशांक (HDI आधारित)**

| देश | विकास स्तर | आरोग्य खर्च (% GDP एकूण) | आयुर्मान (वर्षे) | HDI Rank (2023) | स्वखर्च आरोग्य खर्च (%) |
|---|---|---|---|---|---|
| **भारत** | विकसनशील | 3.3% | 72 | 134 | 48-50% |
| **स्वीडन** | विकसित | 10.9% | 83 | 7 | 15% |
| **नॉर्वे** | विकसित | 10.5% | 83 | 2 | 14% |
| **डेन्मार्क** | विकसित | 10.0% | 81–82 | 6 | 13% |
| **फिनलंड** | विकसित | 9.5% | 82 | 11 | 12% |
| **अमेरिका** | विकसित | 16–17% | 77 | 21 | 11% |
| **चीन** | विकसनशील | 5.4% | 78 | 75 | 35% |
| **ब्राझील** | विकसनशील | 9.6% | 75 | 89 | 25% |
| **बांगलादेश** | कमी उत्पन्न | 2.8% | 72 | 129 | 70% |
| **रवांडा (पूर्व आफ्रिका)”** | कमी उत्पन्न | 3.8% | 69 | 165 | 40% |

**स्रोत: 1. World Bank (2023–24): Health Expenditure (% GDP), Life Expectancy, 2. WHO Global Health Expenditure Database (2024), 3. UNDP Human Development Report (2023)**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

वरील तक्त्यामध्ये विविध देशातील आरोग्यावरील एकूण खर्च (Total Health Expenditure as % of GDP), आयुर्मान, मानव विकास निर्देशांक व स्वत:च्या उत्पन्नातून आरोग्यावर करण्यात येणाऱ्या खर्चामध्ये परस्परसंबंध दिसून येतो. तक्त्यात सर्व देशांसाठी एकसमान प्रकारची आकडेवारी वापरल्यामुळे तुलनात्मक विश्लेषण अधिक अचूक आणि विश्वासार्ह झाले आहे. विकसित देशांमध्ये विशेषतः स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क आणि फिनलंड आरोग्यावरील एकूण खर्च GDP च्या सुमारे ९ ते ११ टक्क्यांच्या दरम्यान आहे. या देशांमध्ये आयुर्मान ८० वर्षांपेक्षा जास्त असून स्वखर्च आरोग्य खर्च तुलनेने कमी (१२-१५%) आहे. तसेच, या देशांचा मानव विकास निर्देशांकातील स्थान अत्यंत चांगले आहे. यावरून उच्च आरोग्य गुंतवणूक आणि उच्च मानव विकास यांमध्ये सकारात्मक संबंध दिसून येतो. अमेरिका एक विशेष अपवाद म्हणून दिसून येतो, आरोग्यावरील एकुण खर्च सर्वाधिक (१६-१७%) असूनही आयुर्मान तुलनेने कमी (सुमारे 77 वर्षे) आहे. यावरून स्पष्ट होते की केवळ खर्च वाढविणे पुरेसे नसून आरोग्य व्यवस्थेची कार्यक्षमता आणि समतोल वितरण देखील महत्त्वाचे घटक आहेत.

विकसनशील देशांमध्ये, चीन आणि ब्राझील यांसारख्या देशांमध्ये मध्यम पातळीवरील आरोग्य खर्च (५-१०%) असून त्याचे सकारात्मक परिणाम आयुर्मान आणि HDI मध्ये दिसून येतात. विशेषतः चीनमध्ये आयुर्मान 78 वर्षांपर्यंत पोहोचले असून मानव विकास निर्देशांक मध्येही सुधारणा दिसून येत आहे. याउलट, भारत, बांगलादेश आणि रवांडा यांसारख्या देशांमध्ये आरोग्यावरील एकूण खर्च तुलनेने कमी आहे. भारतात हा खर्च 3.3% असून आरोग्यावरील स्वखर्च ४८-५०% इतका जास्त आहे, तर बांगलादेशमध्ये सुमारे ७०% पर्यंत आहे. यामुळे नागरिकांवर आर्थिक ताण वाढतो आणि आरोग्य सेवांमध्ये असमानता निर्माण होते. या देशांमध्ये आयुर्मान तुलनेने कमी असून मानव विकास निर्देशांक देखील खालच्या स्तरावर आहे. थोडक्यात वरील तक्त्यातील विश्लेषणावरून असे दिसून येते की आरोग्यावरील एकूण खर्च, आयुर्मान, मानव विकास निर्देशांक आणि स्वखर्च यांमध्ये परस्परसंबंध आहे. ज्या देशांमध्ये आरोग्यावरील खर्च जास्त आणि स्वखर्च कमी आहे, त्या देशांमध्ये मानव विकास उच्च असून शाश्वत विकासाची पातळी अधिक मजबूत आहे.

आलेख क्र.१

देशनिहाय सार्वजनिक आरोग्य खर्च व विकास निर्देशांक (HDI आधारित)




वरील आलेखामध्ये विविध देशांमधील आरोग्यावरील एकूण खर्च, आयुर्मान, मानव विकास निर्देशांक व आरोग्यावरील स्वखर्च यांमधील प्रवृत्ती स्पष्टपणे दिसून येते. आलेखाच्या निरीक्षणावरून असे दिसते की, विकसित देशांमध्ये आरोग्यावरील खर्च जास्त असताना आयुर्मानही उच्च पातळीवर आहे व स्वखर्च तुलनेने कमी आहे. याउलट, विकसनशील आणि कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये खर्च कमी आणि स्वखर्च जास्त असल्याची प्रवृत्ती दिसून येते. आलेखामध्ये अमेरिका हा एक अपवाद म्हणून दिसून येतो, जिथे आरोग्य खर्च अत्यंत जास्त असूनही आयुर्मान तुलनेने कमी आहे. यावरून खर्च आणि परिणाम यामधील थेट संबंध नेहमीच समान प्रमाणात नसतो, हे स्पष्ट होते. चीन आणि ब्राझील यांसारख्या देशांमध्ये मध्यम स्तरावरील खर्च आणि मध्यम स्तरावरील आरोग्य निर्देशक दिसून येतात, ज्यामुळे ते संक्रमण अवस्थेतील अर्थव्यवस्था असल्याचे दिसते. एकंदरीत, आलेखातून हे स्पष्ट होते की, आरोग्यावरील खर्च, आयुर्मान आणि मानव विकास यांमध्ये सकारात्मक प्रवृत्ती असून स्वखर्च जास्त असलेल्या देशांमध्ये विकासाची पातळी तुलनेने कमी आहे.

**भारताच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य व शाश्वत विकास-**

भारत वेगाने विकसित होणारा देश असला तरी सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अनेक संरचनात्मक आणि धोरणात्मक आव्हानांचा समाना करीत आहे. आर्थिक वाढीचा दर लक्षणीय असतानाही आरोग्य क्षेत्रातील गुंतवणूक तुलनेने मर्यादित असल्याचे दिसून येते. अलीकडील आकडेवारीनुसार, भारताचा आरोग्यावरील एकूण खर्च (Total Health Expenditure) हा GDP च्या सुमारे 3.3 टक्के असून, त्यातील सार्वजनिक खर्चाचा वाटा तुलनेने कमी आहे (World Bank, 2023–24). याउलट विकसित देशांमध्ये हा खर्च ९ ते ११ टक्क्यांच्या दरम्यान असल्यामुळे भारतात आरोग्य सेवांमध्ये असमानता अधिक दिसून येते. मर्यादित सार्वजनिक गुंतवणुकीमुळे ग्रामीण

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

आणि शहरी भागांमध्ये आरोग्याच्या सोई-सुविधेमध्ये लक्षणीय तफावत आढळते. भारत सरकारने या समस्येवर उपाय म्हणून विविध महत्त्वपूर्ण योजना राबविल्या आहेत. १) आयुष्मान भारत योजना. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरोग्य विमा संरक्षण देणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. २) स्वच्छ भारत अभियानद्वारे स्वच्छता व स्वच्छ पर्यावरणावर भर देण्यात आला असून संसर्गजन्य रोगांचे प्रमाण कमी करण्यास मदत झाली आहे. ३) राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि पोषण अभियान यांसारख्या उपक्रमांद्वारे मातृ-शिशु आरोग्य सुधारणा आणि कुपोषण निर्मूलनासाठी प्रयत्न सुरू आहेत.

भारतासमोरील प्रमुख आव्हानांमध्ये नागरिकांना आरोग्यावर स्वत:च्या उत्पन्नातून कराव्या लागणाऱ्या खर्चाचे प्रमाण अधिक आहे. स्व: खर्चामुळे आरोग्य सुविधांची असमान उपलब्धता व वाढते पर्यावरणीय प्रदूषण यांचा वाढीस मदत होतो. जगतील आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, वायू प्रदूषणामुळे भारतात विविध आजारांचे प्रमाण वाढत असून सार्वजनिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे (WHO, 2023). COVID-19 महामारीने भारताच्या आरोग्य व्यवस्थेतील मर्यादा अधोरेखित केल्या, परंतु त्याचवेळी डिजिटल आरोग्य सेवा, व्यापक लसीकरण मोहिमा आणि आरोग्य पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याची संधीही निर्माण केली. या पार्श्वभूमीवर, शाश्वत विकास साध्य करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात अधिक गुंतवणूक, धोरणात्मक समन्वय आणि कार्यक्षम अंमलबजावणी आवश्यक आहे. निरोगी लोकसंख्या दीर्घकालीन आर्थिक विकासाची मूलभूत अट असून, सार्वजनिक आरोग्यातील गुंतवणुकीत वाढ केल्यास भारताचे आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक विकास अधिक मजबूत होऊ शकतो.

**आव्हाने-**

भारतामध्ये सार्वजनिक आरोग्य आणि शाश्वत विकास साध्य करताना अनेक संरचनात्मक, आर्थिक आणि धोरणात्मक आव्हाने आढळतात.

**१. मर्यादित सार्वजनिक आरोग्य गुंतवणूक (Low Public Health Investment):** भारताचा आरोग्यावरील एकूण खर्च GDP च्या सुमारे 3.3% असून त्यामध्ये सार्वजनिक खर्चाचा वाटा तुलनेने कमी आहे. यामुळे आरोग्य पायाभूत सुविधा आणि सेवांच्या गुणवत्तेवर परिणाम होतो.

**२. अपुरी आरोग्य पायाभूत सुविधा (Inadequate Healthcare Infrastructure):** ग्रामीण भागात रुग्णालये, डॉक्टर आणि वैद्यकीय साधनसामग्रीची कमतरता असल्यामुळे आरोग्य सेवांचा दर्जा कमी राहतो.

**३. ग्रामीण-शहरी तफावत (Urban-Rural Disparity):** शहरी भागात उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध असताना ग्रामीण भागात मूलभूत सेवांचा तुटवडा दिसून येतो, ज्यामुळे सामाजिक असमानता वाढते.

**४. उच्च स्वखर्च आरोग्य खर्च (High Out-of-Pocket Expenditure):** भारतामध्ये सुमारे ४८-५०% आरोग्य खर्च व्यक्तींना स्वतःच्या खिशातून करावा लागतो, ज्यामुळे गरीब कुटुंबांवर आर्थिक ताण वाढतो.

**५. पर्यावरणीय प्रदूषण (Environmental Pollution):** वायू, पाणी आणि ध्वनी प्रदूषणामुळे सार्वजनिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो आणि रोगांचे प्रमाण वाढते.

**६. आरोग्य जनजागृतीचा अभाव (Lack of Public Health Awareness):** आरोग्यविषयक जागरूकतेच्या अभावामुळे कुपोषण आणि जीवनशैलीशी संबंधित आजार वाढत आहेत.

**उपाय व शिफारसी-**

वरील आव्हानांचा विचार करता, सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी आणि शाश्वत विकास साध्य करण्यासाठी पुढील उपाय सुचविता येतात:

**१. सार्वजनिक आरोग्य खर्चात वाढ करणे (Increase in Public Health Expenditure):** आरोग्य क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक वाढवून GDP मधील आरोग्य खर्चाचे प्रमाण वाढवणे आवश्यक आहे, ज्यामुळे पायाभूत सुविधा आणि सेवा सुधारतील.

**२. प्राथमिक आरोग्य सेवा मजबूत करणे (Strengthening Primary Healthcare):** ग्रामीण भागात आरोग्य केंद्रांची संख्या वाढवून दूरस्थ आरोग्य सेवाचा वापर करून सेवा सुलभ करणे आवश्यक आहे.

**३. स्वखर्च कमी करण्यासाठी उपाययोजना (Reducing Out-of-Pocket Expenditure):** आरोग्य विमा योजना, सार्वजनिक आरोग्य सेवा आणि औषध उपलब्धता वाढवून नागरिकांवरील आर्थिक ताण कमी करणे आवश्यक आहे.

**४. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांना प्राधान्य (Focus on Preventive Healthcare):** लसीकरण, स्वच्छता, पोषण आणि आरोग्य शिक्षणाद्वारे रोगांचे प्रमाण कमी करणे.

**५. पर्यावरण व आरोग्य धोरणांचा समन्वय (Integration of Environment and Health Policies):** प्रदूषण नियंत्रण, स्वच्छ ऊर्जा आणि कचरा व्यवस्थापनाद्वारे सार्वजनिक आरोग्य सुधारणा साध्य करणे.

**६. डिजिटल आरोग्य सेवा विकसित करणे (Development of Digital Health Services):** डेटा-आधारित धोरणे आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सद्वारे आरोग्य व्यवस्थेची कार्यक्षमता वाढवणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**सारांश-**

सदर संशोधनातून स्पष्ट होते की, सार्वजनिक आरोग्य आणि शाश्वत विकास यांमध्ये घनिष्ठ व परस्परपूरक संबंध आहे. आरोग्यावरील एकूण खर्च, आयुर्मान, मानव विकास निर्देशांक व आरोग्यावरील स्वखर्च यांसारख्या निर्देशकांच्या तुलनात्मक विश्लेषणातून असे दिसून येते की, ज्या देशांमध्ये आरोग्य क्षेत्रात अधिक गुंतवणूक केली जाते, त्या देशांमध्ये मानव विकासाची पातळी उच्च असून सामाजिक समता अधिक दृढ असते. नॉर्डिक देशांसारख्या विकसित अर्थव्यवस्थांमध्ये आरोग्यावरील उच्च खर्च, आरोग्यावरील स्वखर्च कमी आणि उच्च आयुर्मान यांचा सकारात्मक परिणाम स्पष्टपणे दिसून येतो. याउलट, भारतासह काही विकसनशील देशांमध्ये आरोग्यावरील खर्च तुलनेने कमी आणि आरोग्यावरील स्वखर्चाचे प्रमाण जास्त असल्यामुळे आरोग्य सेवांमध्ये असमानता निर्माण होऊन आर्थिक विषमता वाढते. परंतु भारताने मागील काही वर्षांत विविध आरोग्य धोरणे आणि योजनांद्वारे सुधारणा करण्याचे प्रयत्न केले आहेत. तरीही, शाश्वत विकास साध्य करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात अधिक गुंतवणूक, प्राथमिक आरोग्य सेवांचे बळकटीकरण, स्वखर्चात घट आणि पर्यावरणीय धोरणांचा प्रभावी समन्वय आवश्यक आहे. निरोगी लोकसंख्या ही आर्थिक प्रगतीची आधारशिला असून सार्वजनिक आरोग्याला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवणे शाश्वत आणि समावेशक विकासासाठी अत्यावश्यक आहे. त्यामुळे “आरोग्य हीच संपत्ती” ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविणे हीच भविष्यातील विकासाची दिशा ठरते.

**संदर्भसूची -**

1. World Bank. (2024). *World development indicators: Health expenditure (% of GDP) and life expectancy*. Washington, DC: World Bank.
2. World Health Organization. (2024). *Global health expenditure database*. Geneva: WHO.
3. World Health Organization. (2023). *Air pollution and health impacts*. Geneva: WHO.
4. United Nations. (2015). *Transforming our world: The 2030 agenda for sustainable development*. New York: United Nations.
5. United Nations Development Programme. (2023). *Human development report 2023/24*. New York: UNDP.
6. Government of India. (2023). *National Health Accounts estimates for India*. Ministry of Health and Family Welfare.
7. Government of India. (2022). *National Health Mission report*. Ministry of Health and Family Welfare.
8. Government of India. (2021). *Ayushman Bharat – Pradhan Mantri Jan Arogya Yojana (PM-JAY) report*. Ministry of Health and Family Welfare.
9. Government of India. (2020). *Swachh Bharat Mission report*. Ministry of Jal Shakti.
10. NITI Aayog. (2022). *Health index report*. Government of India.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# भारतातील शाश्वत शेती विकासात पिक विमा योजनेची भूमिका :एक सखोल अभ्यास.

**प्रा. सुनिता बाळू कोलते[1], डॉ. महादेव डोंगरे[2]**
[1]कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सासवड, पुणे
[2]मार्गदर्शक, प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, अमृतेश्वर महाविद्यालय विंझर, पुणे
ई.मेल.sunitakolte22@gamil.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180405
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 19-22
April- 2026
**Submitted:** 09 Mar. 2026
**Revised:** 21 Mar 2026
**Accepted:** 08 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***गोषवारा-***

*भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजही जवळपास ६८ टक्के लोकसंख्या शेती आणि शेतीसंबधित क्षेत्रात कार्यरत असल्याचे दिसून येते. त्यामुळे बहुसंख्य भारतीय हे शेतकरी असून त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन हे शेती आहे. भारतातील राष्ट्रीय उत्पनातील वाटा ही शेती क्षेत्राचा मोठा भाग आहे .एकूण रोजगारातील वाटा हि शेतीक्षेत्राचा मोठा वाटा आहे .त्यामुळे शेतीक्षेत्राकडे एक आर्थिक आणि सामाजिक विकास म्हणून बघण्याची गरज आहे, पण शेती क्षेत्र हे अनियमित आणि अनिश्चीत असा मान्सून पावसावर अवलंबून आहे त्यामुळे पिकाची शेतकऱ्यांना शाश्वती नसते पूर, दुष्काळ, कीड, बाजारभावातील चढ उतार, अपुरे उत्पन, कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी असुरक्षित समजतो. त्यामुळे शेतकरी आधुनिक, तांत्रिक, यांत्रिक असा नवीन योजनाचा अवलंब करायला घाबरतो अशा वेळेस शेतकऱ्यांना शाश्वत टिकाऊ शेतीची गरज आहे. शेतकऱ्यांना पिकासाठी एक सुरक्षित कवच गरज आहे. त्यासाठी केंद्र सरकारने केंद्र पुरस्कृत योजना म्हणून राष्ट्रीय कृषी विमा योजना १९९९ मध्ये सादर केली.पंतप्रधान पिक विमा योजना २०१६ पासून राबवली. त्यामुळे शेतकऱ्यांना या योजनेमुळे मोठे पिकांना एक आधार मिळाला आहे. हा संशोधन लेख भारतातील शाश्वत शेतीच्या विकासात पीक विमा योजनेची भूमिका तपासतो. हवामान बदल, अनियमित पर्जन्य, आणि वाढते उत्पादन खर्च यामुळे शेतीतील जोखीम वाढली आहे. अशा परिस्थितीत पीक विमा योजना शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देऊन शाश्वत शेती पद्धतींचा स्वीकार करण्यास प्रोत्साहन देते. विमा योजना आणि शाश्वत शेती यांचा परस्परपूरक संबंध आहे;. भारतीय शेती विविध नैसर्गिक आणि आर्थिक जोखमींनी ग्रस्त आहे. हवामान बदल, पर्जन्याचा अनियमितपणा, आणि उत्पादन खर्चात वाढ यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अस्थिर झाले आहे. या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती आणि पीक विमा योजना यांचे महत्त्व वाढले आहे. प्रस्तुत संशोधनात या दोन्ही घटकांचा परस्परसंबंध अभ्यासला आहे. निष्कर्षांनुसार, पीक विमा योजना शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा देऊन शाश्वत शेती पद्धतींचा स्वीकार वाढवते.*

## प्रस्तावना:

भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशाच्या GDP मध्ये कृषी क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा आहे. मात्र शेतीवर अवलंबून असलेली लोकसंख्या मोठी असतानाही, उत्पन्नात अस्थिरता आणि नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी संकटात सापडतात.शाश्वत शेती ही दीर्घकालीन उत्पादनक्षमता राखण्यावर भर देते, तर पीक विमा योजना शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण प्रदान करते. त्यामुळे या दोन्हींचा संयुक्त अभ्यास आवश्यक ठरतो. विकसित आणि विकसनशील देश मिळून जगातील जवळपास ६५ देश्यामध्ये वेगवेगळया स्वरुपात शेती विमा योजना अस्तित्वात आहे . अमेरिका,कॅनडा,स्पेन,जपान,चीन,भारत आणि ब्राझील हे त्यातील काही देश या सर्व देशात अजूनही व्यायसायिक शेती बनविण्यासाठी पिक विमा गरजेचे आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*सुनिता बाळू कोलते कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सासवड,पुणे*

**How to cite this article:**
*कोलते, सुनिता. बाळू. & डोंगरे, महादेव. (2026). भारतातील शाश्वत शेती विकासात पिक विमा योजनेची भूमिका: एक सखोल अभ्यास. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 19–22. https://doi.org/10.5281/zenodo.21427518*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21427518

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

मात्र या योजनाचा प्रत्यक्ष परिणाम किती होतो ,यामुळे शाश्वत शेती ला चालना मिळते का याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते .

**संशोधनाची गरज व महत्व :-**

१. शाश्वत शेती संकल्पनेचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक आहे .

२. पिक विमा योजना किती प्रभावी ठरते याचा अभ्यास करण्यासाठी महत्वपूर्ण आहे .

३. शेतकऱ्यांची जागरूकता व सहभाग वाढवण्यासाठी अभ्यास महत्त्वपूर्ण आहे .

४. शाश्वत शेती विकासात पिक विमा योजना आर्थिक आधार देते .

**अभ्यासाची उद्दिष्टे:-**

१.शाश्वत शेतीची संकल्पना स्पष्ट करणे .
२.पिक विमा योजनेचे स्वरूप समजावून घेणे .
३.शेतकऱ्यांवर होणारे आर्थिक सामाजिक परिणाम अभ्यासणे .
४.शाश्वत शेती विकासात पिक विम्याची भूमिका विश्लेषित करणे .

**गृहीत कृत्य**

१.पीक विमा योजना शाश्वत शेतीला प्रोत्साहन देते
२.पिक विमा योजनेचा शेतकऱ्यांचा आर्थिक स्थेर्यावर सकारात्मक परिणाम होतो.
३.पिक विमा योजनेमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक सामाजिक चांगला परिणाम होतो .
४.शाश्वत शेती आणि पिक विमा योजना शेतकरी कल्याणासाठी सक्रीय भूमिका बजावण्याची जबाबदारी देते .

**अभ्यासाची संशोधन पद्धती:-**

केंद्र सरकार पुरस्कृत कृषी विकासासाठी योजलेल्या अनेक योजनांपेकी'पिक विमा योजना 'या योजनासंदर्भात माहितीवजा पध्दतीचा लेख आहे .त्यासाठी केवळ व्दितीय तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे .जर्नल्स ,संदर्भ ग्रंथ आणि इंटरनेटचा वापर करून लेख तयार केला आहे. शाश्वत शेती आणि पिक विमा योजना (आकडेवारीसह माहिती ), विमा घेतलेले शेतकरी, विमा असलेले शेतकरी, विमा नसलेले शेतकरी, पिक विमा योजनेचे आकडे आणि त्याचे परिणाम सांख्यिकीय पद्धतीने मोजले जातात. उदाहरणार्थ, विमाक्षेत्र(लाख हेक्टर), विमा भरपाईचे आकडे, आणि योजनेचे अंमलबजावणीचे परिणाम.

**अभ्यास विषय :-**

भारत हा कृषिप्रधान देश आहे त्यामुळे भारताच्या राष्ट्रीय उत्पनात शेती क्षेत्राचा फार मोठा वाठा आहे ,त्यामुळे आजच्या आधुनिक तंत्रज्ञानात शेती हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. त्यामुळे शेतकरांच्या आर्थिक ,सामाजिक आणि शाश्वत टिकाऊ विकासासाठी त्यांना एक सुरक्षित कवच म्हणून पिक विमा योजनेची गरज आहे .याचाच एक भाग म्हणून केंद सरकारने 'पिक विमा योजना 'ही योजना कार्यान्वित केली आहे.या योजनेची आवश्यकता शाश्वत शेतीच्या विकासासाठी महत्त्व विचारात घेवून हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे .

**विषयाची मांडणी :**

या लेखाची मांडणी करताना शोधनिबंधाचे शीर्षक '**भारतातील शाश्वत शेती विकासातपिक विमा योजनेची भूमिका : एक सखोल अभ्यास .**' असे असून त्यात गोषवारा ,प्रस्तावना,अभ्यासाची उद्दिष्टे,संशोधन पद्धती,अभ्यास विषय आणि विषय विवेचनात पिक विमा योजनेची पार्श्वभूमी ,कार्यप्रणाली आणि योजनेची मार्गदर्शक तत्वे अथवा ठप्पे असा स्वरुपात मांडणी केली आहे .

**शाश्वत शेती संकल्पना** :- शाश्वत शेती म्हणजे अशी शेती पद्धत, ज्यामुळे जमिनीची सुपीकता, पर्यावरणाचा समतोल आणि नैसर्गिक संसाधने (पाणी, माती) यांचा ऱ्हास न करता दीर्घकाळापर्यंत अन्नधान्याचे उत्पादन घेता येते.

**पिक विमा योजना :-**

राजीव गांधी पंतप्रधान असताना केंद सरकारने १९८५ साली देशातील पहिली पीकविमा योजना सुरु केली त्यानंतर १९९९ साली एन .डी .ए सरकारने 'राष्ट्रीय कृषी विमा योजना 'लागू केली . या योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०१६ हि अंतिम मुदत होती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत " प्रधानमंत्री फसल बिमा योजना " या नवीन पिक विमा योजनेला मंजुरी देण्यात आली होती .केंद सरकारने १३ जानेवारी २०१६ ला प्रधानमंत्री पीक विमा योजनेस केंद्रीय मंत्री मंडळाने मंजुरी देण्यात आली .या योजनेत संपूर्ण राज्यामध्ये एकच विमा कंपनी असून इतर खाजगी विमा कंपन्या 'एग्रीकॅल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया ' शी सलग्न करण्यात येणार आहे .हा विमा उत्पनातील घट याबरोबरच पिक काढणी नंतर पिकांचे झालेले नुकसान ,तसेच चक्रीवादळे ,बिगरमोसमी पाऊस या आपत्ती पासून संरक्षण देणार आहे .

**शाश्वत शेती आणि पिक विमा योजना :(आकडेवारीसह माहिती )**

| अ.क्र. | वर्ष | विमाघेतलेलेशेतकरी (लाख ) | विमाक्षेत्र(लाख हेक्टर ) | भरपाई (रु . कोटी ) |
|---|---|---|---|---|
| १ | २०२०-२१ | ५५० | ४८० | ९०,००० |
| २ | २०२१-२२ | ६०० | ५०० | १,००,००० |
| ३ | २०२२-२३ | ६२० | ५२० | १,१०,००० |
| ४ | २०२३-२४ | ६५० | ५४० | १,२०,००० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की पिक विमा योजनेचा विस्तार वाढत आहे त्यामुळे शेतकर्यांना आर्थिक मदत मिळत आहे आणि पिक विमा योजना शाश्वत शेती साठी महत्वाची भूमिका बजावते .

**शाश्वत शेतीचे फायदे :-**

१.मातीची सुपीकता टिकते
२.पर्यावरण संरक्षण होते
३.उत्पादन खर्च कमी होतो

**पीक विमा योजनेचे फायदे :-**

१.नैसर्गिक आपत्तींमध्ये आर्थिक संरक्षण
२.शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढतो
३.गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन

तक्ता

| अ.क्र. | घटक | **विमा असलेले शेतकरी** | **विमा नसलेले शेतकरी** |
|---|---|---|---|
| १ | उत्पन्न स्थिरता | उच्च | कमी |
| २ | जोखीम सहनशक्ती | जास्त | कमी |
| ३ | शाश्वत पद्धती वापर | अधिक | कमी |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की पिक विमा योजनेचा लाभ घेतलेले शेतकऱ्यांची शेती विकास शाश्वत आहे

**निष्कर्ष :-**

या संशोधनातून असे दिसून येते की शाश्वत शेती आणि पीक विमा योजना या एकमेकांना पूरक आहेत. पीक विमा आर्थिक स्थैर्य प्रदान करतो, तर शाश्वत शेती दीर्घकालीन उत्पादनक्षमता सुनिश्चित करते. योग्य धोरणे आणि पारदर्शक अंमलबजावणी केल्यास भारतीय शेती अधिक मजबूत आणि टिकाऊ बनू शकते.

**शिफारसी :-**

१.पीक विमा प्रक्रियेचे डिजिटायझेशन
२.नुकसान भरपाई जलद देणे
३.शेतकऱ्यांना प्रशिक्षण व जागरूकता
४.शाश्वत शेतीसाठी अनुदान वाढवणे

**सारांश :-**

शाश्वत शेती ,कृषी ,पिक विमा योजना संबंधित विविध अहवाल, ग्रंथ, लेख, शोधनिबंध, प्रबंध, इत्यादी चा आढावा घेताना असे लक्षात येते की, बहुतेक लिखाणातूनपिक विमा योजना ,कृषी सेवासुविधा ची देशाच्या विकासातील शाश्वत विकासातील भूमिका ही अत्यंत महत्वाची असल्याचे दिसून येते.
ज्या देशात कृषी सेवा व सुविधा मोठ्या प्रमाणात पुरविल्या जातात त्या देशाच्या आर्थिक शाश्वत विकासात जलद गतीने विकास झाल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची:-**

1. जिल्हा सामाजिक आणि आर्थिक समालोचन -२०२० (जिल्हा –पुणे )
2. अर्थ व सांख्यिकी संचनालय नियोजन विभाग आर्थिक पाहणी (२०१९-२०)
3. डॉ.विजय काविमंडन २००८कृषी अर्थशास्त्र श्री .मंगेश प्रकाशन नागपूर . पान नं. २८५ ते २९७
4. डॉ.बी .डी .कुलकर्णी आणि डॉ .एस .व्ही .ढमढेरे २०११ आर्थिक विचार , डायमंड प्रकाशन , पुणे .पान .न .१४१ ते १९१
5. आगलावे प्रदीप जानेवारी 2000 संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.
6. पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन २०१८ जिल्हा सांख्यिकी कार्यालय अर्थ व सांख्यिकी संचालनालय. महाराष्ट्र शासन पुणे.
7. Dr.Chandrashekar Prasad (2012) Indian Economy A Performance Review- 1947-48 to 2010-11New Century Publication ,New Delhi India Volume P.P.1-36.
8. Ruddar Datt And K.P.M. Sundharam (2007) Indian Economy,S.Chand Publication ,New Delhi India Volume P.P. 461-497.
9. Pocket Book of agricultural statistics
10. इंटरनेट www. Crops insurance scheme ,**www.easysarkariyojana.com**
11. Government of India. (2020). *Agricultural Policies Report*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

12. FAO. (2019). *Sustainable Agriculture Study*
13. NABARD Reports (2021)
14. Government of India. (2016). *Pradhan Mantri Fasal Bima Yojana (PMFBY): Operational Guidelines*. Ministry of Agriculture and Farmers Welfare.
15. Government of India. (2020). *Agricultural Statistics at a Glance*. Ministry of Agriculture and Farmers Welfare.
16. NABARD. (2021). *Annual Report 2020–21*. National Bank for Agriculture and Rural Development.
17. FAO. (2019). *Sustainable Agriculture for Biodiversity*. Food and Agriculture Organization of the United Nations. .
18. Gulati, A., & Mishra, S. (2014). *Farm Income in India: Trends and Challenges*. Economic and Political Weekly, 49(50), 63–70.
19. Ministry of Agriculture & Farmers Welfare. (2018). *Report on Crop Insurance in India*. Government of India.
20. Reddy, A. A. (2015). *Crop Insurance in India: Performance and Challenges*. Agricultural Economics Research Review, 28(1), 1–10.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April- 2026

Original Article

# हवामान बदलाच्या काळात शाश्वत अन्न सुरक्षा: ग्रीन इकॉनॉमीची भूमिका

**डॉ. अर्चना गणेश मगर**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग), वाघीरे महाविद्यालय, सासवड, पुणे.
**Email:** archamagar24@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180406
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 23-27
April - 2026
**Submitted:** 09 Mar. 2026
**Revised:** 21 Mar 2026
**Accepted:** 08 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***सारांश (Abstract):***

*हवामान बदलामुळे वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान, दुष्काळ, अतिवृष्टी आणि जमिनीची घटती सुपीकता यांसारख्या समस्यांमुळे जागतिक अन्नसुरक्षेसमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा परिस्थितीत शाश्वत अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी हरित अर्थव्यवस्था (Green Economy) ही एक प्रभावी आणि पर्यावरणपूरक संकल्पना म्हणून उदयास आली आहे. प्रस्तुत संशोधनपत्रात हवामान बदलाचा अन्नसुरक्षेवर होणारा परिणाम आणि हरित अर्थव्यवस्थेच्या विविध धोरणांची भूमिका यांचा अभ्यास करण्यात आला आहे. सेंद्रिय शेती, जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, अक्षय ऊर्जेचा वापर आणि संसाधनांचा कार्यक्षम उपयोग यांसारख्या उपाययोजनांमुळे शेतीची लवचिकता वाढते, पर्यावरणीय समतोल राखला जातो आणि अन्न उत्पादनाची गुणवत्ता व उपलब्धता टिकवून ठेवता येते. संशोधनातून असे स्पष्ट होते की हरित अर्थव्यवस्था ही केवळ पर्यावरण संवर्धनाची संकल्पना नसून भविष्यातील शाश्वत अन्नसुरक्षेचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे हवामान बदलाच्या वाढत्या संकटांचा सामना करण्यासाठी हरित अर्थव्यवस्थेवर आधारित कृषी व आर्थिक धोरणांचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे.*

***मुख्यशब्द (Keywords):*** *हवामान बदल, शाश्वत अन्नसुरक्षा, हरित अर्थव्यवस्था, सेंद्रिय शेती, जलसंधारण, अक्षय ऊर्जा, कृषी लवचिकता, संसाधन कार्यक्षमता, पर्यावरणीय शाश्वतता, अन्न उत्पादन.*

## प्रस्तावना (Introduction):

२० व्या शतकातील औद्योगिक क्रांतीने प्रगती तर आणली, पण त्यासोबतच पर्यावरणाचे मोठे नुकसानही केले. आज २१ व्या शतकात त्याचे परिणाम आपण भोगत आहोत. अनिश्चित पाऊस, तापमानातील वाढ आणि जमिनीचा खालावलेला पोत यांमुळे जागतिक 'अन्न सुरक्षा' (Food Security) धोक्यात आली आहे. केवळ उत्पादन वाढवणे हा उद्देश न ठेवता, ते उत्पादन शाश्वत मार्गाने कसे मिळवता येईल, हा आजच्या काळातील सर्वात मोठा यक्षप्रश्न आहे. या पार्श्वभूमीवर 'ग्रीन इकॉनॉमी' किंवा 'हरित अर्थव्यवस्था' ही संकल्पना म्हणजे केवळ झाडे लावणे नव्हे. आर्थिक विकास साधताना निसर्गाचा समतोल राखणे म्हणजे हरित अर्थव्यवस्था होय. याचे मुख्य आधार खालीलप्रमाणे आहेत: एक प्रभावी पर्याय म्हणून समोर आली आहे. शेतीमध्ये रासायनिक खतांचा अतिवापर टाळून सेंद्रिय पद्धतीचा अवलंब करणे, पाण्याचे काटेकोर नियोजन करणे आणि सौर ऊर्जेसारख्या अक्षय साधनांचा वापर करणे हे या अर्थव्यवस्थेचे मुख्य स्तंभ आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात दुय्यम स्रोतांच्या आधारे, हवामान बदलाच्या या प्रतिकूल परिस्थितीत हरित अर्थव्यवस्थेची धोरणे कशा प्रकारे शाश्वत अन्न सुरक्षा प्रदान करू शकतात, याचा सविस्तर वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. वाढत्या लोकसंख्येला सकस अन्न पुरवण्यासाठी आता जुन्या पद्धती बदलणे आवश्यक आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. अर्चना गणेश मगर सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग), वाघीरे महाविद्यालय, सासवड, पुणे.*

**How to cite this article:**
*मगर, अर्चना. गणेश. (2026). हवामान बदलाच्या काळात शाश्वत अन्न सुरक्षा: ग्रीन इकॉनॉमीची भूमिका. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 23–27.* https://doi.org/10.5281/zenodo.21427601

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21427601
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April- 2026

जर आपल्याला अन्नाची उपलब्धता आणि गुणवत्ता टिकवून ठेवायची असेल, तर 'हरित अर्थव्यवस्थेचे मॉडेल' स्वीकारणे हाच एकमेव प्रभावी पर्याय उरला आहे. सध्याच्या काळात अनपेक्षित पाऊस, वाढते तापमान आणि वारंवार येणारी नैसर्गिक संकटे यामुळे जागतिक अन्न साखळी विस्कळीत झाली आहे. पारंपारिक शेती पद्धती केवळ पर्यावरणावर ताण आणत नाहीत, तर त्या भविष्यातील अन्नाची गरज भागवण्यासाठी अपुऱ्या ठरत आहेत. अशा परिस्थितीत, पर्यावरणाचे रक्षण करून आर्थिक विकास साधणारी 'ग्रीन इकॉनॉमी' हा एक प्रभावी उपाय म्हणून समोर येत आहे.

**शाश्वत अन्न सुरक्षेची व्याख्या**:

शाश्वत अन्नसुरक्षेची व्याख्या जागतिक स्तरावर अन्न आणि कृषी संघटना (**FAO**) आणि विविध तज्ञांनी दिलेल्या निकषांवर आधारित आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, केवळ आजची अन्नाची गरज भागवणे म्हणजे अन्नसुरक्षा नव्हे, तर भविष्यातील पिढ्यांच्या अन्नाच्या गरजांशी तडजोड न करता ही गरज पूर्ण करणे म्हणजे **शाश्वत अन्नसुरक्षा** होय. "जेव्हा सर्व व्यक्तींना, सर्व वेळी, सक्रिय आणि निरोगी जीवनासाठी त्यांच्या आहारातील गरजा आणि अन्नाची पसंती पूर्ण करणारे पुरेसे, सुरक्षित आणि पौष्टिक अन्न भौतिक आणि आर्थिकदृष्ट्या उपलब्ध असते, तेव्हा त्या स्थितीला अन्नसुरक्षा प्राप्त झाली असे म्हणतात."

**संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटना शाश्वत अन्न प्रणालीयांच्या मते,**

"शाश्वत अन्न प्रणाली (SFS) ही एक अशी अन्न प्रणाली आहे जी सर्वांना अन्न सुरक्षा आणि पोषण अशा प्रकारे पुरवते की, भावी पिढ्यांसाठी अन्न सुरक्षा आणि पोषण निर्माण करण्याचे आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय आधार धोक्यात येणार नाहीत."

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives):**

संशोधकाने सदर संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत;

1. हवामान बदलामुळे अन्न सुरक्षेवर निर्माण झालेल्या प्रमुख धोक्यांचे मूल्यमापन करणे.
2. ग्रीन इकॉनॉमीच्या धोरणांचा (उदा. सेंद्रिय शेती, जलसंधारण) अन्न सुरक्षेवर होणारा परिणाम तपासणे.

**साहित्याचा आढावा (Literature Review):**

१. डॉ. एम. एस. स्वामिनाथन (M. S. Swaminathan)

"डॉ. स्वामिनाथन (२००६) यांच्या मते, हवामान बदलाच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी रासायनिक शेतीऐवजी 'सदाबहार क्रांती'चा अवलंब करणे गरजेचे आहे. याच विचाराला पुष्टी देत UNEP (२०११) च्या अहवालात असे नमूद केले आहे की, हरित अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक ही केवळ पर्यावरणासाठीच नव्हे, तर जागतिक अन्न सुरक्षेसाठी एक अनिवार्य पाऊल आहे..."

२. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP)

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाच्या (UNEP, 2011) 'हरित अर्थव्यवस्थेकडे' (Towards a Green Economy) या अहवालात शेती क्षेत्रावर विशेष भर देण्यात आला आहे. या अहवालानुसार, केवळ पारंपारिक शेतीवर अवलंबून न राहता कृषी क्षेत्रात 'हरित गुंतवणूक' करणे ही काळाची गरज आहे. जर आपण सेंद्रिय शेती, जलसंधारण आणि आधुनिक हरित तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक केली, तर पुढील ४० वर्षांत जागतिक स्तरावर अन्नाचे उत्पादन सध्याच्या तुलनेत लक्षणीयरीत्या वाढू शकते. महत्त्वाचे म्हणजे, हा मार्ग अवलंबल्यास केवळ पर्यावरणाचे रक्षण होणार नाही, तर ग्रामीण भागातील गरिबी दूर होण्यासही मोठी मदत होईल.

३. जोहान रॉक्स्टॉर्म (Johan Rockström)

पृथ्वीच्या मर्यादा आणि सुरक्षित कार्यक्षेत्र (जोहान रॉक्स्टॉर्म संदर्भ): अन्न उत्पादनाचा विचार करताना आपण पर्यावरणाचे किती नुकसान करत आहोत, याचे विश्लेषण जोहान रॉक्स्टॉर्म (2009) यांनी त्यांच्या 'प्लॅनेटरी बाउंड्रीज' (Planetary Boundaries) या संकल्पनेत केले आहे. रॉक्स्टॉर्म यांच्या मते, सध्याची अन्न उत्पादन प्रक्रिया पृथ्वीच्या सहनशक्तीच्या मर्यादा ओलांडत आहे, ज्यामुळे निसर्गाचे चक्र बिघडत आहे. हरित अर्थव्यवस्था आपल्याला अशा मर्यादांचे उल्लंघन न करता एक 'सुरक्षित ऑपरेटिंग स्पेस' (Safe Operating Space) मिळवून देते. यामुळे हवामान बदलत असतानाही अन्न पुरवठ्यामध्ये स्थिरता राखणे शक्य होते.

**ग्रीन इकॉनॉमीची भूमिका:**

हवामान बदल आणि अन्न सुरक्षा यांच्यातील दुवा साधताना हरित अर्थव्यवस्था (Green Economy) केवळ एक 'पर्यावरणवादी संकल्पना' म्हणून न राहता, ती एक 'जगण्याची नवी पद्धत' म्हणून समोर येते. तिची भूमिका खालील प्रमुख पैलूंमध्ये विभागता येईल:

**१. कृषी क्षेत्राची लवचिकता वाढवणे (Enhancing Resilience):**

हवामान बदलामुळे येणारा दुष्काळ किंवा अतिवृष्टी यांचा सामना करण्यासाठी पारंपारिक शेती असमर्थ ठरत आहे. हरित अर्थव्यवस्था शेतीमध्ये 'क्लायमेट स्मार्ट' तंत्रज्ञानाचा वापर करते. सेंद्रिय कर्ब (Soil Carbon) वाढवण्यावर भर दिल्याने जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते, ज्यामुळे कमी पावसातही पिके तग धरू शकतात.

**२. संसाधनांची कार्यक्षमता (Resource Efficiency):**

टिम जॅक्सन यांच्या सिद्धांतानुसार, संसाधने मर्यादित आहेत. हरित अर्थव्यवस्था 'कमी निविष्ठांतून अधिक उत्पादन' (More from Less) घेण्याचे धोरण राबवते. रासायनिक खतांवरील खर्च कमी करून नैसर्गिक संसाधनांचा पुनर्वापर (Recycling) केल्यामुळे शेती किफायतशीर बनते.

**३. कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण (Mitigating Carbon Footprint):**

जागतिक तापमानाला कारणीभूत ठरणारे हरितगृह वायूंचे उत्सर्जन रोखण्यात हरित अर्थव्यवस्थेची भूमिका निर्णायक आहे. शेतीमध्ये सौर ऊर्जेचा वापर आणि मिथेन उत्सर्जनावर नियंत्रण आणणाऱ्या पद्धतींमुळे पर्यावरणाचे रक्षण होते, जे जोहान रॉक्स्टॉर्म यांनी सांगितलेल्या 'सुरक्षित मर्यादेत' राहण्यासाठी आवश्यक आहे.

**४. अन्न उपलब्धता आणि सुलभतेचा संगम:**

UNEP (२०११) च्या अहवालातील विश्लेषणानुसार, हरित गुंतवणूक केवळ उत्पादन वाढवत नाही, तर अन्नाची 'सुलभता' (Accessibility) वाढवते. स्थानिक उत्पादनाला प्राधान्य दिल्याने वाहतुकीचा खर्च वाचतो आणि अन्नधान्य सर्वसामान्यांना स्वस्त दरात उपलब्ध होते. हे गरिबी निर्मूलनासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**५. शाश्वत जीवनमानाची हमी:**

हरित अर्थव्यवस्थेमुळे जमिनीचा पोत सुधारतो, ज्यामुळे भविष्यातील पिढीसाठी सुपीक जमीन शिल्लक राहते. ही केवळ आजची गरज नसून, 'उद्याची' अन्न सुरक्षा निश्चित करण्याची हमी आहे.

**हवामान बदलामुळे अन्न सुरक्षेवर निर्माण झालेल्या प्रमुख धोक्यांचे मूल्यमापन**

हवामान बदल ही केवळ नैसर्गिक प्रक्रिया नसून ती अन्न उत्पादनाच्या स्थिरतेपुढील मोठी अडचण आहे. संशोधनाच्या दृष्टीने याचे धोके खालीलप्रमाणे आहेत:

1. जागतिक तापमानातील प्रत्येक वाढीमुळे मुख्य पिकांच्या (गहू, तांदूळ) उत्पादनात ५% ते १०% घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.
2. अतिवृष्टी आणि दीर्घकालीन दुष्काळ यांमुळे पिकांचे थेट नुकसान होते. यामुळे अन्नाची 'उपलब्धता' (Availability) अनिश्चित बनते.
3. वाढत्या उष्णतेमुळे जमिनीतील ओलावा कमी होतो आणि सूक्ष्मजीवांची संख्या घटते, ज्यामुळे जमीन नापीक होत आहे.

**ग्रीन इकॉनॉमीच्या धोरणांचा अन्न सुरक्षेवर होणारा परिणाम**

हरित अर्थव्यवस्थेची धोरणे ही अन्न सुरक्षेसाठी 'संरक्षक कवच' म्हणून काम करतात.

1. रासायनिक खतांचा वापर थांबवल्यामुळे जमिनीची 'पुनरुत्पादन क्षमता' वाढते. सेंद्रिय कर्ब वाढल्यामुळे जमीन अधिक सकस बनते, परिणामी अन्नाची 'गुणवत्ता' सुधारते.
2. ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या हरित तंत्रज्ञानामुळे पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा कार्यक्षम वापर होतो. यामुळे भूगर्भातील पाणी पातळी टिकून राहते, जी भविष्यातील अन्न सुरक्षेसाठी अनिवार्य आहे.
3. शेतीमध्ये सौर ऊर्जेचा वापर केल्यामुळे शेतकऱ्यांचे इंधनावरील अवलंबित्व कमी होते आणि उत्पादन खर्च स्थिर राहतो.

थोडक्यात सांगायचे तर, ग्रीन इकॉनॉमीची धोरणे ही **'आजच्या अन्नासाठी उद्याचा बळी'** न देणारी व्यवस्था निर्माण करतात. सुरुवातीची काही आव्हाने सोडली, तर हवामान बदलाच्या काळात अन्न सुरक्षा टिकवून ठेवण्यासाठी हरित अर्थव्यवस्था हा एकमेव शाश्वत मार्ग आहे. या संदर्भात धोरणकर्त्यांनी सेंद्रिय शेतीसाठी अनुदान, हरित तंत्रज्ञानाचा प्रसार आणि कार्बन क्रेडिट्स यांसारख्या साधनांचा वापर केल्यास अन्न सुरक्षा अधिक बळकट होईल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April- 2026

**शाश्वत शेती पद्धतींचे आर्थिक फायदे:**

1. सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीमध्ये बाहेरून विकत घ्याव्या लागणाऱ्या रासायनिक खतांची गरज नसते. यामुळे शेतकऱ्यांचा भांडवली खर्च कमी होतो. जमिनीचा पोत सुधारल्यामुळे उत्पादकता स्थिर राहते.
2. जागतिक बाजारपेठेत सेंद्रिय उत्पादनांना मोठी मागणी असून, त्यांना सामान्य पिकांपेक्षा जास्त भाव मिळतो. शाश्वत पद्धतीने पिकवलेल्या शेतमालाला बाजारात 20% ते 40% जास्त भाव मिळतो.
3. हरित अर्थव्यवस्थेमुळे शेती ही हवामान बदलाला 'लवचिक' बनते. पिकांचे नुकसान कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढते.
4. सेंद्रिय खतामुळे जमिनीत ओलावा टिकून रहाण्यास मदत होते, परिणामी सिंचनासाठी लागणारे पाणी आणि पाणी उपसण्यासाठी वीज खर्चात बचत होते.
5. सेंद्रिय मालाला परदेशातून मोठ्याप्रमाणात मागणी असते, ज्यामुळे परकीय चलन मिळण्यास मदत होते.

शाश्वत शेतीमुळे केवळ शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होत नसून तर शेतकरी वर्गाला कर्जाच्या दुष्ट चक्रातून बाहेर काढून आत्मनिर्भर बनवते.

**निष्कर्ष (Conclusion):**

अन्न सुरक्षा हा केवळ कृषी उत्पादनाचा विषय नसून तो मानवी अस्तित्वाचा प्रश्न आहे. हवामान बदलाच्या काळात पारंपारिक शेती पद्धती आणि जुनी आर्थिक मॉडेल्स अपयशी ठरत असल्याचे दिसून येते. यावर 'हरित अर्थव्यवस्था' हा एक ठोस आणि शाश्वत पर्याय आहे.

सेंद्रिय शेती, जलव्यवस्थापन, अक्षय ऊर्जेचा वापर आणि पर्यावरणाभिमुख धोरणांमुळे जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकवून ठेवता येते, जे शाश्वत अन्न सुरक्षेसाठी अनिवार्य आहे. एम. एस. स्वामिनाथन आणि जोहान रॉक्स्टॉर्म यांसारख्या संशोधकांनी मांडलेले विचार हेच अधोरेखित करतात की, जर आपल्याला भविष्यातील पिढीला अन्न टंचाईपासून वाचवायचे असेल, तर हरित अर्थव्यवस्थेचे मॉडेल स्वीकारणे ही आता निव्वळ निवड नसून ती 'काळाची गरज' बनली आहे. निसर्ग आणि आर्थिक प्रगती यांचा मेळ साधणारी हीच व्यवस्था खऱ्या अर्थाने शाश्वत भविष्य घडवू शकते.

संशोधनाअंती खालील महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढता येतात:

1. **शाश्वततेची अपरिहार्यता:** अनिश्चित पर्जन्यमान, जमिनीचा खालावलेला पोत आणि वाढते जागतिक तापमान यांमुळे पारंपरिक आर्थिक प्रतिमाने (Economic Models) अपयशी ठरत आहेत. अशा परिस्थितीत, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करून आर्थिक वृद्धी साधणारी **'हरित अर्थव्यवस्था'** (Green Economy) हाच एकमेव शाश्वत पर्याय उरला आहे.
2. **हरित धोरणांची परिणामकारकता:** सेंद्रिय शेती, सूक्ष्म सिंचन आणि सौर ऊर्जेचा कृषी क्षेत्रातील अवलंब यामुळे केवळ पर्यावरणाचे रक्षण होत नाही, तर शेतीमध्ये **'लवचिकता'** (Resilience) निर्माण होते. ही लवचिकता भविष्यातील नैसर्गिक आपत्तींच्या काळातही अन्नाची उपलब्धता आणि गुणवत्ता टिकवून ठेवण्यास सक्षम आहे.
3. **शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण:** हरित अर्थव्यवस्थेमुळे शेतकऱ्यांचा रासायनिक निविष्ठांवरील खर्च कमी होतो. जागतिक बाजारपेठेत सेंद्रिय उत्पादनांना मिळणारी वाढीव मागणी आणि किंमत (Premium Pricing) शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढून त्यांना खऱ्या अर्थाने **'आत्मनिर्भर'** बनवू शकते.
4. **भविष्यातील धोरणात्मक दिशा:** जोहान रॉक्स्टॉर्म यांनी मांडलेल्या **'प्लॅनेटरी बाउंड्रीज'** च्या चौकटीत राहून विकास साधणे ही आता केवळ एक निवड नसून ती **'काळाची गरज'** आहे. शाश्वत अन्नसुरक्षेसाठी धोरणकर्त्यांनी 'सदाबहार क्रांती'चा (Evergreen Revolution) विचार केंद्रस्थानी ठेवणे अनिवार्य आहे.

**समारोप :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून हवामान बदल, हरित अर्थव्यवस्था आणि अन्न सुरक्षा यांच्यातील अंतर्संबंधांचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे. या अभ्यासांती असे स्पष्ट होते की, २१ व्या शतकातील अनिश्चित पर्यावरणाशी जुळवून घेण्यासाठी आपल्याला आपल्या पारंपारिक आर्थिक आणि कृषी दृष्टिकोनात आमूलाग्र बदल करणे अनिवार्य आहे. थोडक्यात सांगायचे तर, 'हरित अर्थव्यवस्था' हे भविष्यातील शाश्वत अन्न सुरक्षेचे एक अभेद्य कवच आहे. जर आपण आज निसर्गाभिमुख धोरणे स्वीकारली, तरच आपण उद्याच्या पिढीला अन्नाच्या टंचाईपासून वाचवू शकतो. 'आर्थिक विकास' आणि 'पर्यावरण रक्षण' हे एकमेकांचे शत्रू नसून, ते एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि त्यांचा मेळ घालणे हीच आजच्या काळातील सर्वात मोठी 'काळाची गरज' आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April- 2026

**संदर्भ:**

1. शाश्वत अन्न प्रणाली संकल्पना आणि आराखडा_ (अहवाल). संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटना
2. **Swaminathan, M. S. (2006).** An evergreen revolution. *Nature*, 441(7090), 162-163.
3. **UNEP. (2011).** *Towards a green economy: Pathways to sustainable development and poverty eradication*. United Nations Environment Programme. www.unep.org/greeneconomy
4. **Rockström, J., Steffen, W., Noone, K., Persson, Å., Chapin, F. S., Lambin, E. F., ... & Foley, J. A. (2009).** A safe operating space for humanity. *Nature*, 461(7263), 472-475.
5. **Jackson, T. (2009).** *Prosperity without growth: Economics for a finite planet*. Earthscan.
6. **Swaminathan, M. S.** "An Evergreen Revolution." *Nature*, vol. 441, no. 7090, 2006, pp. 162-163.
7. **UNEP.** *Towards a Green Economy: Pathways to Sustainable Development and Poverty Eradication*. United Nations Environment Programme, 2011.
8. **Rockström, Johan, et al.** "A Safe Operating Space for Humanity." *Nature*, vol. 461, no. 7263, 2009, pp. 472-475.
9. **Jackson, Tim.** *Prosperity without Growth: Economics for a Finite Planet*. Earthscan, 2009.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# ग्रामीण भारताच्या शाश्वत आर्थिक विकासात कृत्रिम बुद्धीमतेचे योगदान

**समीर महादेव कुंभारकर**
संशोधक विद्यार्थी

**Manuscript ID:**
JRD -2026-180407
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 28-32
April- 2026
**Submitted:** 09 Mar. 2026
**Revised:** 21 Mar 2026
**Accepted:**08 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

**घोषवारा:**

*या संशोधनाच्या माध्यमातून ग्रामीण भारताच्या शाश्वत आर्थिक विकासात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) यांचे योगदान अभ्यासणे हा आहे. आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक अत्यंत प्रभावी आणि परिवर्तनकारी तंत्रज्ञान ठरत असून ते शेती, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि शासन या सर्व क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवत आहे. ग्रामीण भागातील पारंपरिक अडचणी जसे की माहितीचा अभाव, संसाधनांची कमतरता आणि सेवांपर्यंत मर्यादित पोहोच या समस्यांवर कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपाय प्रभावी ठरत आहेत. डेटा-आधारित विश्लेषण, मशीन लर्निंग आणि ऑटोमेशन यांच्या मदतीने निर्णय प्रक्रिया अधिक अचूक आणि कार्यक्षम बनते. यामुळे उत्पादनक्षमता वाढते, खर्च कमी होतो आणि ग्रामीण लोकांचे जीवनमान सुधारते. तसेच डिजिटल सेवा आणि तंत्रज्ञानामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळते.*

**मुख्यशब्द:** *कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), ग्रामीण भारत, शाश्वत आर्थिक विकास, स्मार्ट शेती, आरोग्य सेवा, डिजिटल शिक्षण, रोजगार निर्मिती, वित्तीय समावेशन, ई-गव्हर्नन्स, पर्यावरण संरक्षण.*

**प्रस्तावना:**

भारताच्या लोकसंख्येचा सर्वात मोठा हिस्सा हा ग्रामीण भारतामध्ये वास्तव करत आहे.देशातील मोठा लोकसंख्या वर्ग गावांमध्ये राहतो आणि शेती, पशुपालन व लघुउद्योगांवर अवलंबून आहे .२०११ च्या जनगणनेनुसार भारतातील सुमारे ८३.३ कोटी लोक ग्रामीण भागात राहत होते.[१] ग्रामीण लोकसंख्येचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे शेतीवर अवलंबित्व. भारतातील मोठा भाग कृषी उत्पादनावर आधारित आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था देशाच्या अन्नसुरक्षेचा मुख्य आधार मानली जाते.[२] ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा शहरांच्या तुलनेत कमी विकसित आहेत. त्यामुळे अनेक लोक रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतर करतात. हे स्थलांतर ग्रामीण आणि शहरी विकासातील असमतोल दाखवते. अलीकडील काळात डिजिटल इंडिया, ग्रामीण विकास योजना आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्रामीण भागात सकारात्मक बदल होत आहेत. इंटरनेट, मोबाईल आणि डिजिटल सेवा यामुळे ग्रामीण जीवनमान सुधारत आहे.[३]

**संशोधन पद्धती:**

संशोधनासाठी **द्वितीयक साधनसामग्रीचा (Secondary Data)** वापर करण्यात आलेला आहे. अभ्यास करताना विविध शैक्षणिक स्रोत, पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे, सरकारी अहवाल आणि इंटरनेटवरील विश्वसनीय माहितीचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.या संशोधनात विशेषतः **अर्थशास्त्रीय संकल्पना, सामाजिक अध्ययन, राजकीय विश्लेषण आणि तात्त्विक (theoretical) दृष्टिकोन** यांचा वापर करण्यात आला आहे. यामुळे विषयाचे बहुआयामी विश्लेषण करणे शक्य झाले आहे. आर्थिक व सामाजिक घटकांचा परस्परसंबंध समजून घेण्यासाठी अर्थशास्त्रीय विचारसरणीचा आधार घेण्यात आला आहे. तसेच, उपलब्ध कायदे, विशेषतः कामगार कायदे (Labour Laws) आणि ग्रामीण विकासाशी संबंधित धोरणे यांचा आढावा घेण्यात आला आहे.

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21427730
OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*समीर महादेव कुंभारकर संशोधक विद्यार्थी*

**How to cite this article:**
*कुंभारकर, समीर. महादेव. (2026). ग्रामीण भारताच्या शाश्वत आर्थिक विकासात कृत्रिम बुद्धीमतेचे योगदान. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 28–32.* https://doi.org/10.5281/zenodo.21427730

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील वास्तव परिस्थिती समजण्यास मदत झाली आहे.संशोधनासाठी विविध प्रकारच्या शैक्षणिक साधनांचा वापर करण्यात आला आहे, ज्यामध्ये शैक्षणिक पुस्तके,संशोधन लेख व जर्नल्स,सरकारी अहवाल, वृत्तपत्रातील विश्लेषणात्मक लेख, इंटरनेटवरील विश्वसनीय डेटाबेस आणि डिजिटल लायब्ररी समावेश आहे.

अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ग्रामीण विकास, रोजगार, कृषी उत्पादन आणि तंत्रज्ञानाचा वापर यांसारख्या संकल्पनांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या संकल्पनांच्या आधारे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बदलांचे विश्लेषण करण्यात आले आहे.या संशोधनात **गुणात्मक पद्धतीचा (Qualitative Approach)** अधिक वापर करण्यात आला आहे, कारण सामाजिक आणि आर्थिक बदलांचे विश्लेषण करण्यासाठी संख्यात्मक डेटा सोबतच विचारसरणी आणि धोरणांचे विश्लेषण महत्त्वाचे असते. या संशोधनात द्वितीयक माहिती स्रोतांचा व्यापक वापर करून ग्रामीण अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावाचा अभ्यास करण्यात आला आहे. अर्थशास्त्रीय, सामाजिक आणि तात्त्विक दृष्टिकोनातून विश्लेषण केल्यामुळे संशोधन अधिक विश्वसनीय आणि सर्वसमावेशक बनले आहे.

**संशोधनाचा उद्देश:**

१) कृत्रिम बुद्धिमतेचे ग्रामीण विकासातील योगदान अभ्यासने.
२) कृत्रिम बुद्धिमतेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत झालेले बदल याचा अभ्यास करणे.
३) ग्रामीण भागातील तंत्रज्ञान व सोयीसुविधा यांचा अभ्यास करणे.

**कृषी क्षेत्र**

ग्रामीण भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषी क्षेत्रावर आधारित आहे. भारतातील सुमारे निम्म्याहून अधिक लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे ग्रामीण आर्थिक विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी शेतीत तांत्रिक सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. अलीकडच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) ही शेती क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडवून आणणारी महत्त्वाची तंत्रज्ञान प्रणाली ठरली आहे.AI मुळे पारंपरिक शेती "डेटा-आधारित स्मार्ट शेती" मध्ये रूपांतरित होत आहे. पूर्वी शेतकरी अनुभवावर आधारित निर्णय घेत असत, परंतु आता AI हवामान, मातीची गुणवत्ता, पर्जन्यमान, तापमान, आर्द्रता आणि बाजारातील मागणी यांचा सखोल अभ्यास करून अचूक मार्गदर्शन करते.[४] चुकीच्या निर्णयांमुळे होणारे नुकसान कमी होते आणि उत्पादनक्षमता वाढते.स्मार्ट शेतीतील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे प्रिसिजन फार्मिंग (Precision Farming). AI सेन्सर्स आणि उपग्रह प्रतिमांच्या मदतीने शेतातील प्रत्येक भागाचे विश्लेषण करते. यामुळे कोणत्या भागात पाणी, खत किंवा कीटकनाशकांची गरज आहे हे अचूकपणे समजते. त्यामुळे संसाधनांचा अपव्यय टाळला जातो आणि खर्च कमी होतो.[५] पाणी व्यवस्थापन हा भारतातील शेतीसमोरील मोठा प्रश्न आहे. AI आधारित स्मार्ट सिंचन प्रणाली मातीतील आर्द्रता तपासून आवश्यक तेवढेच पाणी देते. त्यामुळे पाण्याची मोठी बचत होते आणि दुष्काळग्रस्त भागातही शेती शक्य होते.[६] AI आधारित यंत्रे (Robotics) शेतीतील श्रम कमी करतात. पेरणी, कापणी आणि तण काढणे यांसारखी कामे जलद आणि अचूक होतात. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि कार्यक्षमता वाढते.AI मुळे शेती अधिक शाश्वत बनते. नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर, रासायनिक खतांचा कमी वापर आणि पर्यावरण संरक्षण यामुळे ग्रामीण विकासाला गती मिळते.

**आरोग्य सेवा**

ग्रामीण भारतातील आरोग्य व्यवस्था ही अनेक दशकांपासून मोठ्या आव्हानांना सामोरे जात आहे. अपुरी रुग्णालये, डॉक्टरांची कमतरता, तांत्रिक साधनांचा अभाव आणि वेळेवर उपचार न मिळणे या समस्या ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचे प्रमुख अडथळे आहेत. या पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) आरोग्य क्षेत्रात एक क्रांतिकारी बदल घडवून आणत आहे.AI मुळे आरोग्य सेवा अधिक जलद, अचूक आणि सर्वसामान्य लोकांसाठी उपलब्ध होत आहे. विशेषतः ग्रामीण भागात जिथे तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आहे, तिथे AI आधारित टेलिमेडिसिन प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरते. या प्रणालीद्वारे रुग्ण मोबाइल किंवा संगणकाच्या माध्यमातून शहरातील किंवा तज्ज्ञ डॉक्टरांशी थेट संपर्क साधू शकतात. त्यामुळे प्रवासाचा खर्च, वेळ आणि रुग्णालयातील गर्दी कमी होते.[८] AI आधारित रोग निदान प्रणाली (AI Diagnostic Systems) ग्रामीण आरोग्य व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात. रुग्णाची लक्षणे, वैद्यकीय इतिहास आणि चाचणी अहवाल यांच्या आधारे AI प्राथमिक निदान करू शकते. यामुळे रोग लवकर ओळखला जातो आणि उपचार वेळेवर सुरू होतो. विशेषतः मधुमेह, हृदयविकार आणि कर्करोग यांसारख्या आजारांच्या प्राथमिक टप्प्यात निदान करणे शक्य होते.[९] AI चा एक अत्यंत महत्त्वाचा उपयोग म्हणजे मेडिकल इमेजिंग विश्लेषण. X-ray, MRI, CT Scan यांसारख्या चाचण्यांचे विश्लेषण AI अल्गोरिदमच्या मदतीने केले जाते. हे अल्गोरिदम अत्यंत सूक्ष्म बदल ओळखू शकतात जे मानवी डोळ्यांना दिसत नाहीत. त्यामुळे निदान अधिक अचूक होते आणि डॉक्टरांना योग्य निर्णय घेणे सोपे जाते. AI मुळे आरोग्य सेवांचा खर्च देखील कमी होतो. कारण लवकर निदान आणि योग्य उपचार यामुळे गंभीर आजार टाळता येतात. त्यामुळे हॉस्पिटलायझेशनचा खर्च कमी होतो आणि आरोग्य व्यवस्था अधिक कार्यक्षम बनते.ग्रामीण भागात AI आधारित आरोग्य सेवा राबवताना काही आव्हानेही आहेत.

**शिक्षण**

ग्रामीण भारतातील शिक्षण व्यवस्था अनेक संरचनात्मक आव्हानांनी ग्रस्त आहे. अपुरी शाळा, शिक्षकांची कमतरता, दर्जाहीन शैक्षणिक साधने आणि डिजिटल संसाधनांचा अभाव यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यात अडथळे निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) शिक्षण क्षेत्रात परिवर्तन घडवणारे महत्त्वाचे तंत्रज्ञान म्हणून उदयास आले आहे.AI मुळे शिक्षण अधिक वैयक्तिक (Personalized), सुलभ आणि प्रभावी बनत आहे. पारंपरिक शिक्षण पद्धतीत सर्व विद्यार्थ्यांना एकसारखे शिकवले जाते, परंतु प्रत्येक विद्यार्थ्याची समजण्याची क्षमता वेगळी असते. AI आधारित शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार अभ्यासक्रम, प्रश्न आणि सराव देतात. त्यामुळे विद्यार्थी आपल्या गतीने शिकू शकतो आणि समज वाढते.[१०] AI आधारित ई-लर्निंग प्लॅटफॉर्म ग्रामीण भागात शिक्षणाची क्रांती घडवत आहेत. मोबाइल आणि इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थी कुठूनही शिक्षण घेऊ शकतात. यामध्ये व्हिडिओ लेक्चर्स, इंटरॲक्टिव्ह क्विझ, आणि डिजिटल नोट्स उपलब्ध असतात. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण शहरापुरते मर्यादित न राहता ग्रामीण भागातही पोहोचते.AI आधारित भाषांतर तंत्रज्ञान (Translation Tools) ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. इंग्रजी किंवा इतर भाषांतील शैक्षणिक साहित्य स्थानिक भाषेत रूपांतरित केले जाते. त्यामुळे भाषेचा अडथळा दूर होतो आणि विद्यार्थी अधिक सहजपणे शिकू शकतात. AI मुळे शिक्षणाचा खर्च कमी होतो. डिजिटल शिक्षणामुळे पुस्तके, प्रवास आणि इतर खर्च कमी होतो. त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना देखील शिक्षण घेणे सोपे होते.AI आधारित शिक्षण प्रणालीसाठी इंटरनेट कनेक्टिव्हिटी, स्मार्टफोन आणि डिजिटल साक्षरता आवश्यक आहे. ग्रामीण भागात या सुविधा पूर्णपणे उपलब्ध नसल्यामुळे काही अडचणी निर्माण होतात. त्यामुळे सरकारने डिजिटल पायाभूत सुविधा वाढवणे आवश्यक आहे.

**रोजगार**

ग्रामीण भारतातील बेरोजगारी ही एक दीर्घकालीन सामाजिक-आर्थिक समस्या आहे. शेतीवर अतिअवलंबित्व, उद्योगधंद्यांचा अभाव, कौशल्य प्रशिक्षणाची कमतरता आणि शहरी-ग्रामीण विकासातील दरी यामुळे रोजगाराच्या संधी मर्यादित राहिल्या आहेत. ग्रामीण भागात AI आधारित डिजिटल सेवा केंद्रे (Digital Service Centers) मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करत आहेत. या केंद्रांमध्ये डेटा एन्ट्री, ऑनलाइन अर्ज भरणे, सरकारी सेवा, बँकिंग सेवा आणि ई-गव्हर्नन्स सेवा दिल्या जातात. यामुळे ग्रामीण युवकांना त्यांच्या गावातच रोजगार मिळतो.AI आधारित ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्स ग्रामीण उत्पादकांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजाराशी जोडतात. हस्तकला, कृषी उत्पादने, दुग्धव्यवसाय आणि स्थानिक उद्योग यांना ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध होते. यामुळे स्थानिक उत्पादनांची मागणी वाढते आणि नवीन व्यवसाय संधी निर्माण होतात.[११] AI मुळे "Gig Economy" ग्रामीण भागातही विस्तारत आहे. फ्रीलान्सिंग, डिजिटल मार्केटिंग, कंटेंट क्रिएशन आणि डेटा ॲनालिटिक्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये ग्रामीण युवक काम करू शकतात. यासाठी फक्त इंटरनेट आणि मूलभूत डिजिटल कौशल्य आवश्यक असते.कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ऑटोमेशन उद्योगांमध्ये उत्पादनक्षमता वाढवते. लघुउद्योग आणि सूक्ष्म उद्योग AI चा वापर करून उत्पादन प्रक्रिया सुधारतात. यामुळे त्यांचा व्यवसाय वाढतो आणि नवीन रोजगार निर्माण होतात.[१२]

AI आधारित ऑटोमेशनमुळे काही पारंपरिक कामे कमी होतात, परंतु त्याच वेळी उच्च कौशल्याधारित (High-skilled) रोजगार वाढतात. त्यामुळे रोजगाराचा दर्जा सुधारतो. कमी कौशल्याच्या कामांऐवजी अधिक तांत्रिक आणि ज्ञानाधारित कामे निर्माण होतात. डिजिटल साक्षरतेचा अभाव, इंटरनेट कनेक्टिव्हिटीची कमतरता आणि तांत्रिक प्रशिक्षणाची गरज ही प्रमुख अडचणी आहेत. या समस्या सोडवण्यासाठी सरकार, खासगी संस्था आणि शैक्षणिक संस्था यांचा संयुक्त प्रयत्न आवश्यक आहे.

**वित्तीय समावेशन**

ग्रामीण भारतातील आर्थिक विकासासाठी वित्तीय समावेशन (Financial Inclusion) ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. अनेक दशकांपासून ग्रामीण भागातील मोठा लोकसंख्या वर्ग बँकिंग, कर्ज, विमा आणि डिजिटल आर्थिक सेवांपासून वंचित राहिला आहे. यामागे प्रमुख कारणे म्हणजे बँक शाखांची कमतरता, आर्थिक साक्षरतेचा अभाव, तांत्रिक साधनांची अनुपलब्धता आणि विश्वासाचा अभाव. या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) एक प्रभावी साधन म्हणून पुढे येत आहे. AI मुळे वित्तीय सेवा अधिक सोप्या, जलद आणि सुरक्षित बनत आहेत. डिजिटल पेमेंट प्रणाली, मोबाइल बँकिंग आणि UPI सारख्या सेवांचा विस्तार ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर झाला आहे. AI या प्रणालींमध्ये व्यवहारांचे विश्लेषण करून फसवणूक (fraud detection) ओळखते आणि सुरक्षितता वाढवते. त्यामुळे ग्रामीण नागरिकांचा डिजिटल व्यवहारांवरील विश्वास वाढतो.[१३]

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

पिकांचे नुकसान, पर्जन्यमान आणि हवामान डेटा यांच्या आधारे नुकसान भरपाई स्वयंचलितपणे दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता मिळते.AI आधारित चॅटबॉट्स आणि डिजिटल सहाय्यक (Financial Chatbots) ग्राहकांना २४ तास बँकिंग सहाय्य देतात. ग्रामीण भागात जिथे बँक कर्मचारी किंवा शाखा उपलब्ध नसतात, तिथे हे चॅटबॉट्स खात्याची माहिती, व्यवहार स्थिती आणि आर्थिक सल्ला देतात. यामुळे बँकिंग सेवा अधिक सुलभ बनतात.AI मुळे आर्थिक फसवणूक (Fraud Detection) मोठ्या प्रमाणात कमी होते. मशीन लर्निंग प्रणाली संशयास्पद व्यवहार ओळखून त्वरित अलर्ट देते. त्यामुळे डिजिटल व्यवहार सुरक्षित होतात आणि लोकांचा विश्वास वाढतो.डिजिटल वित्तीय सेवांमुळे ग्रामीण भागात "कॅशलेस इकॉनॉमी" (Cashless Economy) वाढत आहे. लहान दुकाने, शेतकरी बाजार आणि स्थानिक व्यवसाय डिजिटल पेमेंट स्वीकारू लागले आहेत. वित्तीय समावेशनात काही आव्हाने आहेत. डिजिटल साक्षरतेचा अभाव, इंटरनेट कनेक्टिव्हिटीची कमतरता आणि सायबर सुरक्षेची भीती ही प्रमुख अडचणी आहेत. अनेक ग्रामीण नागरिकांना डिजिटल साधनांचा वापर कसा करायचा हे माहीत नसते. त्यामुळे प्रशिक्षण कार्यक्रमांची आवश्यकता आहे.

**शासन आणि सार्वजनिक सेवा**

ग्रामीण भारताच्या शाश्वत विकासासाठी प्रभावी शासन व्यवस्था (Good Governance) अत्यंत महत्त्वाची आहे. शासनाची कार्यक्षमता, पारदर्शकता आणि सेवा वितरणाची गती यावर ग्रामीण विकास मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो. पारंपरिक शासन व्यवस्थेत अनेक अडचणी दिसून येतात, जसे की कागदपत्रांची विलंब प्रक्रिया, भ्रष्टाचार, माहितीची कमतरता आणि सेवांचा ग्रामीण भागापर्यंत अपुरा पोहोच. या सर्व समस्यांवर कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) एक प्रभावी उपाय म्हणून उदयास आली आहे. AI मुळे शासन प्रणाली अधिक डिजिटल, पारदर्शक आणि कार्यक्षम बनत आहे. ई-गव्हर्नन्स (E-Governance) प्रणालीद्वारे सरकारी सेवा आता ऑनलाइन उपलब्ध होत आहेत. यामध्ये जमिनीच्या नोंदी, प्रमाणपत्रे, सबसिडी, कर भरणा आणि विविध शासकीय योजना यांचा समावेश आहे. AI या प्रणालींना अधिक स्मार्ट बनवते आणि नागरिकांना जलद सेवा पुरवते [१४]

ग्रामीण भागात जिथे प्रशासन कार्यालये दूर असतात, तिथे हे चॅटबॉट्स नागरिकांना मार्गदर्शन करतात. त्यामुळे माहितीचा अभाव कमी होतो.AI मुळे आपत्ती व्यवस्थापन (Disaster Management) देखील सुधारले आहे. पूर, दुष्काळ, चक्रीवादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींचा अंदाज AI च्या मदतीने लावता येतो. त्यामुळे सरकार वेळेवर मदत आणि बचावकार्य करू शकते.AI आधारित शासन प्रणालीसाठी काही आव्हाने देखील आहेत. डेटा गोपनीयता (Data Privacy), सायबर सुरक्षा आणि डिजिटल साक्षरतेचा अभाव ही प्रमुख समस्या आहेत. ग्रामीण भागात अनेक नागरिकांना डिजिटल प्रणालीचा वापर करण्याचे प्रशिक्षण नसते.

**पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास**

पर्यावरण संरक्षण हे शाश्वत विकासाचे मूलभूत आधारस्तंभ आहे. ग्रामीण भारतात शेती, जंगल, जलस्रोत आणि नैसर्गिक संसाधनांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबित्व असल्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र वाढते प्रदूषण, हवामान बदल, अनियंत्रित संसाधन वापर आणि औद्योगिकीकरण यामुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहेत. या पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) पर्यावरण संरक्षणात एक प्रभावी तंत्रज्ञान म्हणून उदयास आले आहे.AI च्या मदतीने हवामान बदलांचे अचूक निरीक्षण आणि अंदाज लावणे शक्य झाले आहे. उपग्रह प्रतिमा, हवामान सेन्सर्स आणि ऐतिहासिक डेटा यांच्या आधारे AI हवामानातील बदलांचा अभ्यास करते. यामुळे पर्जन्यमान, तापमान वाढ आणि दुष्काळ यांचा अंदाज लवकर मिळतो. अशा माहितीमुळे सरकार आणि शेतकरी योग्य निर्णय घेऊ शकतात.[१५] AI आधारित पर्यावरणीय मॉनिटरिंग सिस्टीम्स (Environmental Monitoring Systems) वायू आणि जलप्रदूषणाचे निरीक्षण करतात. शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातही प्रदूषण वाढत आहे. AI सेन्सर्स हवेत आणि पाण्यातील प्रदूषक घटक ओळखून त्वरित सूचना देतात. यामुळे पर्यावरणीय हानी कमी करता येते.[१६]

**निष्कर्ष:**

१) कृषी क्षेत्रासाठी एक क्रांतिकारी तंत्रज्ञान आहे. ते उत्पादन वाढवते, खर्च कमी करते आणि संसाधनांचा योग्य वापर सुनिश्चित करते.
२) कृत्रिम बुद्धिमत्ता ग्रामीण आरोग्य व्यवस्थेसाठी एक परिवर्तनकारी तंत्रज्ञान आहे. ते निदान सुधारते, उपचार जलद करते आणि आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवते.
३) शिक्षण क्षेत्रात एक क्रांतिकारी बदल घडवत आहे. ते शिक्षण अधिक समावेशक, सुलभ आणि वैयक्तिक बनवते. त्यामुळे ग्रामीण भारतातील शैक्षणिक गुणवत्ता सुधारते आणि शाश्वत विकासाला गती मिळते
४) ग्रामीण भारतात रोजगार निर्मितीसाठी एक शक्तिशाली साधन आहे. ते नवीन उद्योग, डिजिटल सेवा आणि कौशल्याधारित रोजगार निर्माण करते. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होते आणि शाश्वत विकास साध्य होतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

५) बँकिंग सेवा सुलभ करते, कर्ज उपलब्धता वाढवते, व्यवहार सुरक्षित करते आणि आर्थिक पारदर्शकता वाढवते. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक मजबूत आणि शाश्वत बनते.

६) कृत्रिम बुद्धिमत्ता शासन व्यवस्थेला अधिक पारदर्शक, जलद आणि प्रभावी बनवते. ते ग्रामीण भागात सरकारी सेवा पोहोचवणे सुलभ करते आणि भ्रष्टाचार कमी करते.

७) कृत्रिम बुद्धिमत्ता पर्यावरण संरक्षणासाठी अत्यंत प्रभावी साधन आहे. ते हवामान बदल, प्रदूषण, जलसंपदा व्यवस्थापन आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण यात मदत करते..

**संदर्भसूची :**

1. Census of India. (2011). *Primary census abstract*. Office of the Registrar General & Census Commissioner, India.
2. Ministry of Agriculture & Farmers Welfare. (2022). *Annual report 2021–22*. Government of India.
3. NITI Aayog. (2021). *Transforming rural India: Digital inclusion and growth*. Government of India.
4. NITI Aayog. (2021). Artificial intelligence in agriculture. Government of India.
5. Food and Agriculture Organization. (2020). Digital technologies in agriculture and rural areas. FAO.
6. World Bank. (2019). Harvesting prosperity: Technology and productivity growth in agriculture. World Bank Publications.
7. Ministry of Agriculture & Farmers Welfare. (2022). Annual report 2021–22. Government of India.
8. World Health Organization. (2021). *Artificial intelligence in health systems*. WHO Publications.
9. Lancet Digital Health. (2020). *AI applications in medical diagnostics*, 2(5), 20–30.
10. UNESCO. (2022). *Artificial intelligence in education: Challenges and opportunities*. UNESCO Publishing.
11. World Economic Forum. (2021). *the future of jobs report*. WEF.
12. NASSCOM. (2022). *Future of work in India*. National Association of Software and Service Companies.
13. Reserve Bank of India. (2022). *Digital financial services report*. RBI.
14. United Nations. (2022). *E-Government survey 2022*. United Nations Publications.
15. Intergovernmental Panel on Climate Change. (2022). *Climate change 2022: Mitigation of climate change*. IPCC.
16. United Nations Environment Programme. (2021). *AI for environmental sustainability*. UNEP.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April- 2026

Original Article

# शाश्वत विकासात हरित अर्थव्यवस्था योगदान

**डॉ. अनंत श्रीराम राठोड**
सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय, अकोला
**ईमेल**: acprathod0808@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180408
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 33-36
April- 2026
**Submitted:** 09 Mar. 2026
**Revised:**21 Mar.2026
**Accepted:**08 Apr. 2026
**Published:**30 Apr. 2026

***सारांश***

*हरित अर्थव्यवस्था ही आर्थिक विकास आणि पर्यावरणीय शाश्वतता यांचा समतोल साधणारी एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. हवामान बदल, नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास आणि वाढते प्रदूषण यांसारख्या जागतिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर हरित अर्थव्यवस्थेचे महत्त्व अधिक वाढले आहे. प्रस्तुत लेखामध्ये हरित अर्थव्यवस्थेची संकल्पना, तिचे आधारस्तंभ, फायदे आणि तिच्यासमोरील प्रमुख आव्हाने यांचा अभ्यास करण्यात आला आहे. ऊर्जा कार्यक्षमता, कमी-कार्बन विकास, दारिद्र्य निर्मूलन, न्याय व सुशासन आणि सामाजिक कल्याण हे हरित अर्थव्यवस्थेचे प्रमुख आधारस्तंभ मानले जातात. हरित अर्थव्यवस्थेमुळे शाश्वत विकास, रोजगारनिर्मिती, संसाधनांचे कार्यक्षम व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनास चालना मिळते. तथापि, कार्बन उत्सर्जन, जागतिक तापमानवाढ, कार्बन फूटप्रिंट आणि आर्थिक गुंतवणुकीची आवश्यकता यांसारखी आव्हानेही तिच्यासमोर आहेत. निष्कर्षतः, हरित ऊर्जा, शाश्वत उपभोग आणि पर्यावरणपूरक धोरणांचा अवलंब करून शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हरित अर्थव्यवस्था प्रभावी माध्यम ठरू शकते.*

***मुख्यशब्द :*** *हरित अर्थव्यवस्था, शाश्वत विकास, हरित ऊर्जा, कमी-कार्बन विकास, ऊर्जा कार्यक्षमता, पर्यावरण संरक्षण, कार्बन उत्सर्जन, हवामान बदल, दारिद्र्य निर्मूलन, नवीकरणीय ऊर्जा.*

## प्रस्तावना

हरित अर्थव्यवस्थाह ही आर्थिक वाढ आणि पर्यावरणीय शाश्वतता यांच्यात समन्वय साधण्याच्या उद्देशाने एक परिवर्तनात्मक दृष्टिकोन आहे. कार्बन उत्सर्जन कमी करणे, ऊर्जा आणि संसाधनांची कार्यक्षमता वाढवणे, जैवविविधता आणि परिसंस्थेच्या सेवांचा ऱ्हास रोखणे या बाबींवर भर दिला जातो. हरित अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी आर्थिक क्रियाकलप आणि शाश्वत विकास हे असू शकतात. ज्यामुळे नवनिर्मितीला चालना मिळते आणि मानव व पृथ्वी या दोघांनाही फायदा होईल अशा पद्धतींना प्रोत्साहन मिळते. संयुक्त राष्ट्रांनी परिभाषित केल्यानुसार, शाश्वत विकास म्हणजे भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमानातील गरजा पूर्ण करणे होय. म्हणजेच प्रामुख्याने आर्थिक वाढ, सामाजिक समावेशन आणि पर्यावरण संरक्षण या तीन आयामांमध्ये अभ्यास केला जातो. शाश्वत विकास साधण्यासाठी एका व्यापक दृष्टिकोनाची आवश्यकता असते, जो या आयामांमध्ये संतुलन साधतो आणि हे सुनिश्चित करतो की एका क्षेत्रातील प्रगती दुसऱ्या क्षेत्राच्या खर्चावर होणार नाही.शाश्वत विकासासाठी हरित अर्थव्यवस्थेकडे होणारे संक्रमण होणे महत्त्वाचे आहे. या संक्रमणामध्ये हरित गुंतवणूक, शाश्वत पायाभूत सुविधा आणि हरित रोजगाराच्या निर्मितीला प्रोत्साहन देणारी धोरणे व पद्धती अवलंबणे गरजेचे आहे. विशेषतः उपेक्षित समुदायांना संधी देणाऱ्या सर्वसमावेशक अर्थव्यवस्थेला चालना देणे आणि हरित विकासाचे फायदे समानतेने वाटले जातील याची खात्री करणे यांचाही समावेश आहे. आंतरराष्ट्रीय संस्था, सरकारे आणि व्यवसाय हरित अर्थव्यवस्थेला पुढे नेण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावता

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. अनंत श्रीराम राठोड सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय, अकोला*

**How to cite this article:**
*राठोड, अनंत. श्रीराम. (2026). शाश्वत विकासात हरित अर्थव्यवस्था योगदान. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 33–36.* https://doi.org/10.5281/zenodo.21427847

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21427847

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April- 2026

शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देणारी, हरित तंत्रज्ञानातील संशोधन आणि नवोपक्रमांना पाठिंबा देणारी, तसेच पर्यावरणीय समस्यांवर जागतिक सहकार्य वाढवणारी धोरणे तयार करण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे. अधिक शाश्वत जीवनशैली आणि उपभोग पद्धतींकडे होणारा बदल घडवून आणण्यासाठी जनजागृती आणि शिक्षण देखील महत्त्वपूर्ण आहेत. हरित अर्थव्यवस्था हा एका शाश्वत भविष्याकडे जाणारा मार्ग आहे, जिथे आर्थिक समृद्धी आणि पर्यावरण संवर्धन सोबत चालतात. हा दृष्टिकोन स्वीकारून, आपण हवामान बदल, संसाधनांचा ऱ्हास आणि सामाजिक विषमता यांसारख्या गंभीर आव्हानांना सामोरे जाऊ शकतो आणि अखेरीस वर्तमान व भावी पिढ्यांसाठी एक संतुलित आणि लवचिक जग निर्माण करू शकतो. जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये हरित अर्थव्यवस्था हा एक चर्चेचा आणि महत्त्वाचा विषय बनला आहे. हरित अर्थव्यवस्था आणि आपल्या दैनंदिन जीवनावर तिचा काय परिणाम होईल, याबद्दल उत्सुकता आणि अटकळ दोन्ही व्यक्त केली जात आहेत. व्यापक स्तरावर विचार केल्यास हरित अर्थव्यवस्था जगभरात अधिक समृद्धी निर्माण करण्यासाठीच्या कार्यप्रणालींचा समावेश करण्याचा प्रयत्न करते.

**हरित अर्थव्यवस्था म्हणजे काय? :**

हरित अर्थव्यवस्था ही सध्या सर्वप्रथम पर्यावरण अर्थशास्त्रज्ञांनी १९८९ मध्ये यूके सरकारसाठी तयार केलेल्या ब्ल्यूप्रिंट ग्रीन इकॉनॉमी या अहवालात मांडली होती. हरित अर्थव्यवस्थेच्या व्याख्येवर अजूनही विचारवंतांमध्ये मतभेद सुरू आहेत, परंतु या संकल्पनेबद्दल एक सर्वमान्य समज निर्माण झाली आहे. तो म्हणजे मूलभूत स्तरावर हरित अर्थव्यवस्था ही एक अशी संकल्पना आहे, जी आपल्याला आधार देणाऱ्या नैसर्गिक प्रणालींचे जतन करत समृद्धी वाढवते.

अलिकडच्या वर्षांत पर्यावरणीय संकट आणि हवामान बदलाविषयी जागरूकता वाढल्यामुळे, जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये पर्यावरणाबद्दल अधिक काळजी घेण्याची गरज आहे, असा एक युक्तिवाद जोर धरत आहे. भविष्यात देश, कंपन्या, समुदाय आणि व्यक्ती कोणत्या प्रकारची शाश्वत कृती करतील हे ठरवण्यासाठी हरित अर्थव्यवस्थेवरील चर्चा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हरित अर्थव्यवस्थेचे विविध फायदे आहेत, परंतु त्यात काही आव्हानेही आहेत, ज्यामुळे अर्थव्यवस्थांमध्ये दीर्घकालीन बदल घडवून आणण्यात ती किती प्रभावी ठरू शकते यावर परिणाम होतो. हरित अर्थव्यवस्था ही अर्थव्यवस्थांना अधिक शाश्वत आणि कमी-कार्बन उत्सर्जन करणाऱ्या बनण्यास प्रोत्साहित करते. यामुळे हे सुनिश्चित होते की, नैसर्गिक संपत्ती आपल्या निरंतर कल्याणासाठी संसाधने आणि पर्यावरणीय सेवा पुरवत राहील.

**हरित अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभ :**

हरित अर्थव्यवस्थेचे पाच आधारस्तंभ एक मूर्त चौकट प्रदान करतात. जी मानव-निसर्ग केंद्रित प्रतिमानावर आधारित आहेत. समाजाला मूल्य प्रदान करण्यासाठी संसाधनांचा वापर कसा करता येईल यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी अर्थव्यवस्थेबद्दल दीर्घकालीन दृष्टिकोन आवश्यक असतो. संसाधनांची कार्यक्षमता आणि पर्याप्तता वाढवण्याच्या मार्गांवर भविष्यातील लोकांसाठी संपत्ती, लवचिकता आणि कल्याण यांना चालना मिळू शकते. कल्याणातील गुंतवणुकीपासून ते शाश्वत पद्धतींपर्यंत, हरित अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये सर्वसमावेशक आणि भेदभावरहित असतात. ज्यामध्ये कल्याण, **न्याय आणि सुशासन, ऊर्जा-कार्यक्षमता**

**कल्याण :**

ऊर्जा आणि पर्यावरण क्षेत्रातील मोठ्या गुंतवणुकीमुळे हजारो नवीन रोजगार निर्माण होतील. स्वच्छ ऊर्जेवर केंद्रित असलेले लक्ष आणि वाढती संपत्ती, या सर्वांमुळे नैसर्गिक, मानवी आणि सामाजिक भांडवलाच्या विस्ताराला चालना मिळते. परिणामी, यामुळे हरित कंपन्या आणि संस्थांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. याव्यतिरिक्त, क्षेत्रीय उपक्रमांमुळे सर्व लोकांच्या समृद्धीसाठी प्रशिक्षण, शाश्वत पायाभूत सुविधा आणि शिक्षणाची क्षमता निर्माण होईल.

**न्याय आणि सुशासन :**

हरित अर्थव्यवस्था आणि तिचे आर्थिक व सामाजिक फायदे हे परिणामांद्वारे समर्थित आहेत. यशस्वी हरित अर्थव्यवस्था साकारण्यासाठी, संस्थांनी विविध क्षेत्रांमध्ये आणि स्थानिक उद्योगांमध्ये विज्ञान व आर्थिक ज्ञानाचा उपयोग करून आंतरविद्याशाखीय बनणे आवश्यक आहे. समुदायांच्या विविध पैलूंचा समावेश करून, हरित अर्थव्यवस्था समाजाच्या हिताची सेवा करणारी एक आर्थिक प्रणाली तयार करेल. समान मानके आणि कार्यपद्धती कायम ठेवत स्थानिक अर्थव्यवस्थांना प्रोत्साहन देऊन हे साध्य करता येते.

**ऊर्जा-कार्यक्षमता :**

ऊर्जेची उपलब्धता हे एका जागतिक आव्हानाशी जोडलेले आहे, ज्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. याचा संबंध सामाजिक विकास आणि गरिबी निर्मूलन, हवामान बदल आणि अन्न सुरक्षा यांच्याशी आहे. संयुक्त राष्ट्रांसारख्या अनेक संस्था आहेत, ज्यांनी ऊर्जा-कार्यक्षम प्रणाली आणि उत्पादने तयार करण्यात मोठी गुंतवणूक केली आहे.

**कमी-कार्बन विकास :**

कमी कार्बन विकासाची संकल्पना विकासाला प्राधान्य देणारा दृष्टिकोन स्वीकारते, जी विकास नियोजनाचा पुनर्विचार करते आणि संरचनात्मक उपाय सुचवते. यामध्ये कमी उत्सर्जन असलेल्या पर्यायी पायाभूत सुविधा आणि भौगोलिक नियोजनाचा समावेश होतो.

**दारिद्र्य निर्मूलन :**

हरित अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनामध्ये, जगभरातील गरिबीची पातळी कमी करणे हा एक महत्त्वाचा घटक असेल. विकसनशील देशांमधील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या बाबतीत हेच घडले आहे. मादागास्करसारख्या देशांमध्ये, शेतकऱ्यांना कमी

पर्यावरणीय परिणाम करणाऱ्या, परंतु अधिक उत्पादनक्षम आणि उत्तम बाजारपेठ उपलब्ध करून देणाऱ्या पद्धतींचा अवलंब करण्यास सक्षम करण्यासाठी केलेली गुंतवणूक प्रभावी ठरली आहे. उत्पन्नाच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देऊन, हरित अर्थव्यवस्था गरिबी कमी करण्यासाठी योगदान देऊ शकते.

**हरित अर्थव्यवस्थेचे फायदे :**

**ऊर्जा कार्यक्षमता**

ऊर्जा कार्यक्षमतेमुळे प्रकाश आणि उष्णता यांसारख्या सेवा पुरवण्यासाठी लागणाऱ्या ऊर्जेचे प्रमाण कमी होते. ऊर्जा सेवांचा खर्च कमी झाल्यामुळे कुटुंबे, व्यवसाय आणि सरकार यांच्यासाठी संसाधने उपलब्ध होतात. तसेच, यामुळे स्वस्त आणि हरित ऊर्जेमध्ये अधिक संसाधने गुंतवणे शक्य होते. उदाहरणार्थ, सौर पॅनेलचा वापर करणे हा पर्यावरणावर सकारात्मक परिणाम साधत हरित ऊर्जा निर्माण करण्याचा एक उत्तम मार्ग आहे.

**शाश्वतता :**

शाश्वतता हे एक असे क्षेत्र आहे, ज्यात अधिकाधिक व्यवसाय गुंतवणूक करत आहेत. शाश्वत विकासामुळे जीडीपी वाढू शकतो आणि त्याच वेळी निसर्गाचे जतन व संरक्षणही होऊ शकते. शाश्वत वस्तूंमुळे एखाद्या वस्तूची उपयुक्तता वाढते आणि त्याचबरोबर ग्राहक पर्यावरणपूरक ब्रँडला पाठिंबा देऊन पर्यावरणासाठी सकारात्मक योगदान देऊ शकतात.

**कचरा कमी करणे :**

कचरा कमी करणे ही एक तुलनेने सोपी पण तितकीच आवश्यक गोष्ट आहे. जिथे शक्य असेल तिथे, व्यवसायांनी मोठ्या प्रमाणात उत्पादने खरेदी करून कचरा कमी करता येतो. याव्यतिरिक्त, व्यक्ती कचरा कमी करण्यासाठी पुनर्वापर करण्यायोग्य पिशव्या आणि डबे वापरू शकतात. प्लॅस्टिक आणि कागदासारख्या साहित्याच्या पुनर्वापराचे प्रमाण वाढवल्याने अखेरीस उत्पादनातील कचरा कमी होण्यास आणि प्रदूषण कमी होण्यास मदत होऊ शकते.

**हरित अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने :**

**कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन :**

२०२१ मध्ये जागतिक ऊर्जा-संबंधित कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन ६ टक्क्यांनी वाढून ३६.३ अब्ज टन झाले. आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या (IEA) विश्लेषणानुसार, ही आतापर्यंतची सर्वोच्च पातळी आहे. कोविड-१९ मधून सावरत असलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेचा आणि त्या विकासासाठी कोळशावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहण्याचा हा परिणाम होता. जरी $CO_2$ च्या सांद्रतेतील दीर्घकालीन वाढ मानवनिर्मित कृतींमुळे होत असली तरी, या वाढीच्या दरावर निसर्गाचाही प्रभाव असतो. हे वनस्पती आणि महासागर यांसारख्या नैसर्गिक कार्बन शोषकांच्या क्षमतेतील फरकांमुळे घडते.

**जागतिक तापमानवाढ :**

हरित अर्थव्यवस्थेमधील एक महत्त्वाचा विषय म्हणजे जागतिक तापमानवाढ आणि पृथ्वीवर होणारा तिचा परिणाम. काही वर्षांपासून जागतिक तापमानवाढीचा सामना करणे अवघड ठरत आहे. २०१५ मध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन १.५ अंशांपर्यंत कमी करण्याच्या अंतिम उद्दिष्टाने पॅरिस करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती. जागतिक हवामान संघटनेनुसार ५ वर्षांत पृथ्वीचे तापमान १.५ अंशांचा टप्पा गाठण्याची शक्यता आहे.

**कार्बन फूटप्रिंट :**

कार्बन फूटप्रिंट म्हणजे हरितगृह वायूंचे एकूण प्रमाण. हे व्यक्तीच्या जीवनशैलीवर आणि दररोजच्या क्रियाकलापांवर अवलंबून असते. एखाद्या व्यक्तीच्या वर्तनाचा जागतिक तापमानवाढीवर काय परिणाम होतो, हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

**आर्थिक आव्हाने :**

हरित अर्थव्यवस्था राबवण्यामधील एक प्रमुख आव्हान म्हणजे आर्थिक पैलू पारंपरिक उद्योगांकडून हरित उद्योगाकडे वळण्यासाठी अनेकदा नवीन तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता असते. विकसनशील देशांसाठी मर्यादित आर्थिक संसाधनामुळे हा एक मोठा अडथळा ठरू शकतो. पारंपरिक उद्योगांमध्ये अल्पकालीन नोकऱ्या कमी होऊ शकतात यामुळे आर्थिक ताण निर्माण होईल.

**निष्कर्ष :**

वैयक्तिक कार्बन फूटप्रिंट कमी करण्यासाठी जीवनशैलीत बदल करणे आवश्यक असते. उदाहरणार्थ गाडी चालवण्याऐवजी सार्वजनिक वाहतुकीचा किंवा प्रदूषण कमी करतील अशा वाहतुकीचा कामावर जाण्याचा निर्णय घेणे. याव्यतिरिक्त वनस्पतीजन्य पदार्थ आणि कमी प्राणीजन्य पदार्थ खाण्याचा पर्याय निवडल्यास हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी होण्यास मदत होऊ शकते. कारण सध्याच्या शेती पद्धती आणि अन्नासाठी पशुधनमुळे मिथेन वायूची निर्मिती होते.

जागतिक नवीकरणीय ऊर्जेचे स्वरूप वेगाने बदलत आहे. हरित ऊर्जा हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करते, ऊर्जा पुरवठ्यात विविधता आणते आणि अस्थिर व अनिश्चित जीवाश्म इंधन बाजारांवरील अवलंबित्व कमी करते. यामुळे शाश्वत विकासासाठी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April- 2026

होण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका निभावते. सध्याच्या परिस्थितीत सरकारे ऊर्जा संकटावर व्यवहार्य उपाय शोधण्याचा आणि जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. जगभरात हरित ऊर्जा स्रोतांमध्ये रस आणि त्यांना मिळणारा पाठिंबा वाढत आहे. युरोपियन युनियनच्या सदस्य राष्ट्रांनी व्यापक तटस्थतेच्या उद्दिष्टासाठी वचनबद्धता दर्शवली आहे. त्यानुसार, नवीकरणीय स्रोतांकडून मिळणाऱ्या ऊर्जेचा एकूण वाटा (२०३० पर्यंत) ५५% पर्यंत वाढवण्याचे आणि २०५० पर्यंत तटस्थतेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी २०३० पर्यंत निव्वळ हरितगृह वायू उत्सर्जन किमान ५५% ने कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्याच्या दीर्घकालीन प्रयत्नांसाठी हरित ऊर्जा स्रोत आवश्यक आहेत आणि ते ऊर्जा सुरक्षा व उपलब्धता सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. हरित ऊर्जांच्या विकासाद्वारे ऊर्जा क्षेत्राला बळकट करण्याचे प्रत्येक देशाचे प्रयत्न भू-राजकीय धोके आणि समाजावरील अवाजवी बाह्य खर्च कमी करतील. हरित ऊर्जांचा मोठ्या प्रमाणावर वापर शाश्वत विकासाला हातभार लावेल. चीन, अमेरिका, नॉर्वे आणि आइसलँड यांसारख्या जगभरातील इतर देशांनी मिळवलेल्या निष्कर्षांचाही विचार केला गेला. आंतरराष्ट्रीय संस्थांनी विकसित केलेले अभ्यास आणि शाश्वत विकासाचा उपाय म्हणून हरित ऊर्जा विकसित करण्यासाठी विविध राज्यांनी स्वीकारलेले करार व राजकीय वचनबद्धता यांचे विश्लेषण करते. हरित ऊर्जा आणि त्या शाश्वत विकासाला कसे हातभार लावू शकतात.

२०१९ मध्ये जागतिक स्तरावर, अणुऊर्जा आणि नवीकरणीय ऊर्जा (सौर, पवन, जलविद्युत, जैवऊर्जा, भूऔष्णिक आणि लाटा व भरती-ओहोटी) यांसारख्या कमी-कार्बन ऊर्जा स्रोतांचा प्राथमिक ऊर्जेमध्ये १५.७% वाटा होता, तर २०२१ मध्ये युरोपियन युनियनच्या २७ देशांसाठी नवीकरणीय स्रोतांपासून मिळणाऱ्या ऊर्जेचा वाटा २२% पर्यंत पोहोचला. आंतरराष्ट्रीय आकडेवारीनुसार अनेक देशांमधील ९०% पेक्षा जास्त सरकारे प्रदूषणाची पातळी कमी करण्याच्या उद्देशाने, हरित ऊर्जा स्रोतांचा कार्यक्षमतेने उपयोग करण्यासाठी आणि शाश्वत आर्थिक व सामाजिक विकासाचे नवीन प्रारूप तयार करण्यासाठी गुंतवणूक करत आहेत.जीवाश्म इंधनाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करा आणि हवामान बदलाचा प्रभाव मर्यादित करणे गर्जेचे आहेत.

**संदर्भ :**

1. शाश्वत विकासाचे ध्येय, निराली प्रकाशन पुणे २०२५.
2. https://cleartax.in/s/sustainable-development-in-india
3. https://www.greeneconomycoalition.org/news
4. https://greenly.earth/en-gb/blog/company

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# २०२२ ते २०२५ या कालखंडातील जालना जिल्ह्यातील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृह योजनांचा परिणाम: एक चिकित्सक अभ्यास

राजकिरण रामकिसन लिहिणार[1], डॉ. संजीव लाटे[2]
[1]संशोधक, प्राचार्य अमृतेश्वर महाविद्यालय विंझर जिल्हा पुणे, अनंतराव थोपटे महाविद्यालय भोर जिल्हा पुणे
[2]मार्गदर्शक, प्राचार्य अमृतेश्वर महाविद्यालय विंझर जिल्हा पुणे, अनंतराव थोपटे महाविद्यालय भोर जिल्हा पुणे

**Manuscript ID**:
JRD -2026-180409
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 37-45
April - 2026
**Submitted:** 09 Mar. 2026
**Revised:** 21 Mar 2026
**Accepted:** 08 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***सारांश***

*सदर संशोधनाचा मुख्य उद्देश जालना जिल्ह्यातील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय विभागाकडून चालविण्यात येणाऱ्या वसतिगृह योजनांचा त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. या अभ्यासात २०२२ ते २०२५ या कालावधीत वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनुभव, उपलब्ध सुविधा आणि त्यांचा उपयोग यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. प्राथमिक माहिती संकलनासाठी मुलाखत पद्धतीचा वापर करण्यात आला असून एकूण ३० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. तसेच दुय्यम स्रोताची मदत घेऊन जालना जिल्ह्यातील एकूण वसतिगृह, प्रवेश क्षमता तसेच राज्यातील एकूण वसतिगृह मिळणाऱ्या सोयी सुविधा याचाही अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यासातून असे दिसून आले की वसतिगृह सुविधा विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपयुक्त ठरत आहेत. विशेषतः निवास व भोजन या मूलभूत सुविधा समाधानकारक असल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग्य वातावरण मिळते. ३० पैकी २७ विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक प्रगती समाधानकारक असल्याचे सांगितले असून, यावरून वसतिगृहांचा शिक्षणावर सकारात्मक परिणाम स्पष्ट होतो. तसेच वाचनकक्ष, वर्तमानपत्रे व मासिके या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्यामध्ये अधिक सुधारणा करण्याची गरज आहे. तथापि, काही पूरक सुविधांमध्ये कमतरता आढळून आली आहे. संगणक व इंटरनेट सुविधा अपुऱ्या असल्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणात अडचणी येतात. क्रीडांगण व व्यायामशाळा या सुविधाही पुरेशा नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासावर परिणाम होत आहे. याशिवाय निर्वाह भत्त्याबाबत काही विद्यार्थ्यांनी असमाधान व्यक्त केले आहे. जालना जिल्ह्याच्या दृष्टीने पाहता, वसतिगृहांची मागणी मोठ्या प्रमाणावर असून काही तालुक्यांत वसतिगृहांची कमतरता दिसून येते, विशेषतः मुलींसाठी सुविधा वाढविण्याची गरज आहे. एकूणच वसतिगृह योजना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सातत्य व प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण आहेत. मात्र त्यांची परिणामकारकता वाढविण्यासाठी डिजिटल सुविधा, क्रीडा सुविधा आणि व्यवस्थापनामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास अधिक प्रभावीपणे साध्य होऊ शकतो.*

***मुख्यशब्द (Keywords):*** *अनुसूचित जाती विद्यार्थी, सामाजिक न्याय विभाग, शासकीय वसतिगृह योजना, शैक्षणिक प्रगती, जालना जिल्हा, शैक्षणिक समावेशन, सामाजिक न्याय, वसतिगृह सुविधा, उच्च शिक्षण, विद्यार्थी कल्याण.*

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*राजकिरण रामकिसन लिहिणार संशोधक, प्राचार्य अमृतेश्वर महाविद्यालय विंझर जिल्हा पुणे, अनंतराव थोपटे महाविद्यालय भोर जिल्हा पुणे*

**How to cite this article:**
*लिहिणार, राजकिरण. रामकिसन. & लाटे, संजीव. (2026). २०२२ ते २०२५ या कालखंडातील जालना जिल्ह्यातील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृह योजनांचा परिणाम: एक चिकित्सक अभ्यास. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 37–45.*
*https://doi.org/10.5281/zenodo.21428001*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21428001
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**प्रस्तावना**

भारतीय समाजरचनेत ऐतिहासिकदृष्ट्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक असमानता आढळून येते. विशेषतः अनुसूचित जाती (SC) घटकांना अनेक पिढ्यांपासून वंचिततेचा सामना करावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटनेने समानतेचा, सामाजिक न्यायाचा आणि संधींच्या समतेचा मूलभूत सिद्धांत स्वीकारला आहे. भारतीय राज्यघटनेतील विविध तरतुदी दुर्बल घटकांच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण आधार प्रदान करतात. कलम 15(4) राज्याला सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी विशेष उपाययोजना करण्याचा अधिकार देते. त्याचप्रमाणे कलम 21A अंतर्गत शिक्षणाचा हक्क हा मूलभूत अधिकार म्हणून मान्य करण्यात आला असून 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकाला विनामूल्य व सक्तीचे शिक्षण देणे हे राज्याचे कर्तव्य आहे. याशिवाय, मार्गदर्शक तत्त्वांतील कलम 46 राज्याला अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे निर्देश देते.

या घटनात्मक तरतुदींनुसार शासनाने विविध शैक्षणिक व कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. त्यामध्ये सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणारी वसतिगृह योजना विशेष महत्त्वाची आहे. या योजनेंतर्गत अनुसूचित जाती विद्यार्थ्यांना निवास, भोजन, पाणी, वीज आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात, ज्यामुळे त्यांना शिक्षणासाठी अनुकूल वातावरण प्राप्त होते. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीची बौद्धिक, सामाजिक व आर्थिक उन्नती साध्य होते. तथापि, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व ग्रामीण पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. विशेषतः उच्च शिक्षणासाठी शहरांमध्ये स्थलांतर करताना निवासाची समस्या मोठ्या प्रमाणात आहे. या संदर्भात COVID-19 pandemic या जागतिक संकटामुळे शिक्षण क्षेत्रात मोठे बदल झाले. शाळा व महाविद्यालये बंद राहणे, ऑनलाइन शिक्षणाचा वाढता वापर आणि डिजिटल साधनांची आवश्यकता यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेवर परिणाम झाला. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना डिजिटल साधनांचा अभाव, इंटरनेट कनेक्टिव्हिटीची समस्या आणि अभ्यासासाठी योग्य वातावरण नसल्यामुळे अधिक अडचणींचा सामना करावा लागला.

COVID-19 नंतरचा कालखंड विशेषतः २०२२ पासून शिक्षण व्यवस्थेच्या पुनर्बांधणीचा काळ मानला जातो. या कालावधीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील सातत्य, शैक्षणिक प्रगती आणि सुविधा यांचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक ठरते. अशा परिस्थितीत वसतिगृह योजना विद्यार्थ्यांना स्थिर आणि शैक्षणिकदृष्ट्या अनुकूल वातावरण उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. जालना जिल्हा हा प्रामुख्याने ग्रामीण स्वरूपाचा असून येथे अनुसूचित जातींची २,७२,२६६ (१३.९०%)लोकसंख्या आहे. आर्थिक व शैक्षणिक मर्यादांमुळे अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शहरांकडे वळावे लागते. अशा परिस्थितीत वसतिगृह सुविधा त्यांच्या शिक्षणाच्या सातत्यासाठी अत्यंत आवश्यक ठरतात.

प्रस्तुत संशोधनात 2022 ते 2025 या कालखंडातील सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृह योजनांचा जालना जिल्ह्यातील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर झालेला परिणाम तपासण्यात आला आहे. यासाठी जालना शहरातील संत रामदास मुलांचे शासकीय वसतिगृह आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह यांचा आधार घेण्यात आला आहे.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती ,अनुभव आणि उपलब्ध सुविधांच्या आधारे या योजनांची परिणामकारकता विश्लेषित करण्यात आली आहे. तसेच अंमलबजावणीतील अडचणी व सुधारणा आवश्यक असलेल्या बाबींचाही सखोल अभ्यास करण्यात आला आहे. अशा प्रकारे, प्रस्तुत संशोधन सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृह योजनांचे वास्तव स्वरूप स्पष्ट करण्याचा तसेच त्यांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शन देण्याचा प्रयत्न करते.

**पूर्वसंशोधनाचा आढावा (Review of Literature)**

शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन यांचा परस्पर संबंध विविध विद्वानांच्या अभ्यासांमधून स्पष्टपणे अधोरेखित झाला आहे. B. R. Ambedkar (1936) यांनी शिक्षणाला सामाजिक उन्नतीचे प्रभावी साधन मानले असून वंचित घटकांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मते शिक्षण हे सामाजिक विषमता कमी करण्यासाठी आणि समानतेच्या संधी निर्माण करण्यासाठी मूलभूत घटक आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**M. N. Srinivas (1966)** यांच्या मते शिक्षणामुळे सामाजिक गतिशीलता (social mobility) वाढते आणि मागासवर्गीय घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदत होते. शिक्षण हे सामाजिक स्तरांमधील अंतर कमी करण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

**Amartya Sen (1999)** यांनी मांडलेल्या 'Capability Approach' मध्ये शिक्षण हे मानवी विकासाचे मूलभूत साधन असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते शिक्षणामुळे व्यक्तीच्या क्षमतांचा विकास होऊन सामाजिक आणि आर्थिक प्रगती साध्य होते. पुढे Jean Drèze आणि Amartya Sen (2002) यांनी वंचित घटकांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे अधोरेखित केले आहे.

**Sukhadeo Thorat (2009)** यांनी अनुसूचित जाती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर सामाजिक व आर्थिक अडथळयांचा प्रभाव अभ्यासला असून, सहाय्यक शैक्षणिक सुविधा—जसे वसतिगृह, शिष्यवृत्ती व शैक्षणिक समर्थन—या विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरतात, असे नमूद केले आहे.

**J.B. G. Tilak (2015)** यांनी Economic and Political Weekly मध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासानुसार भारतातील उच्च शिक्षणात सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना अजूनही मर्यादित संधी उपलब्ध आहेत. शैक्षणिक सुविधांतील असमानता ही विद्यार्थ्यांच्या प्रगतीतील एक महत्त्वाची अडचण असल्याचे या अभ्यासात नमूद केले आहे. त्यामुळे वसतिगृह, शिष्यवृत्ती आणि इतर सहाय्यक योजना या शैक्षणिक समावेशनासाठी अत्यावश्यक ठरतात.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृह योजनांवर आधारित मूल्यमापन अभ्यासानुसार, वसतिगृह सुविधा अनुसूचित जाती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना देतात. विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या शिक्षणातील सातत्य वाढते तसेच शैक्षणिक कामगिरीत सुधारणा होते. तथापि, काही वसतिगृहांमध्ये अन्नाची गुणवत्ता, पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापनातील त्रुटी यांसारख्या समस्या देखील आढळतात.

### गृहितके (Hypotheses)

#### मुख्य गृहितक (Main Hypothesis)

सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृह योजनांचा जालना जिल्ह्यातील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर सकारात्मक परिणाम होतो.

#### उप-गृहितके

1. वसतिगृहातील सुविधा (निवास, भोजन, अभ्यास व्यवस्था) चांगल्या असल्यास विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी सुधारते.
2. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती वसतिगृहाबाहेरील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असते.
3. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वसतिगृह योजनांचा अधिक फायदा होतो.
4. वसतिगृह योजनांच्या अंमलबजावणीत असलेल्या त्रुटी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर नकारात्मक परिणाम करतात.

### उद्दिष्टे (Objectives)

1. जालना जिल्ह्यातील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृह योजनांचा अभ्यास करणे.
2. २०२२ ते २०२५ या कालखंडात वसतिगृह योजनांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर झालेला परिणाम तपासणे.
3. वसतिगृहातील उपलब्ध सुविधा (निवास, भोजन, अभ्यास व्यवस्था इ.) यांचे मूल्यांकन करणे.
4. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीत झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे.
5. वसतिगृह योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी व मर्यादा ओळखणे.
6. वसतिगृह योजनांच्या परिणामकारकतेत सुधारणा करण्यासाठी आवश्यक उपाय सुचवणे.

### संशोधन पद्धती (Research Methodology)

प्रस्तुत अभ्यासात जालना जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर वसतिगृह योजनेच्या प्रभावाचा अभ्यास करण्यासाठी खालील पद्धतीचा वापर केला आहे:

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**संशोधनाचे स्वरूप:** हे संशोधन 'वर्णनात्मक' (Descriptive) स्वरूपाचे असून यात प्रत्यक्ष स्थितीचे विश्लेषण केले आहे.

**माहितीचे स्रोत:**

1. प्राथमिक स्रोत: विद्यार्थ्यांकडून 'प्रश्नावली' (Questionnaire) द्वारे प्रत्यक्ष माहिती संकलित केली.
2. दुय्यम स्रोत: महाराष्ट्र शासनाचे *वार्षिक अहवाल, सामाजिक न्याय विभागाचे संकेतस्थळ आणि संदर्भ पुस्तकांचा वापर केला.

नमुना निवड (Sampling): अभ्यासासाठी एकूण १५० विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थ्यांची (२०%) सहेतुक नमुना निवड (Purposive Sampling) पद्धतीने निवड केली आहे.

संशोधन साधन: माहिती गोळा करण्यासाठी एक 'संरचित प्रश्नावली' तयार करून विद्यार्थ्यां कडून नोंद घेतली.

माहितीचे विश्लेषण: प्राप्त माहितीचे कोष्टकीकरण (Tabulation) करून टक्केवारीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**माहितीचे विश्लेषण (Data analysis)**

स्वातंत्र्य पूर्व काळापासून महाराष्ट्र मधे शिक्षणाची गंगा कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सुरू केली. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स education society ची स्थापना करून वंचीत समूहा पर्यंत शिक्षण पोहोचवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी 1950 ला औरंगाबाद (छत्रपती संभाजी नगर ) येथे नागसेन वनात मिलिंद कॉलेज च्या प्रांगणात वसतिगृह सुरू केले होते.

**तक्ता ६.१: वर्षनिहाय झालेली शासकीय वसतिगृहांची स्थापना**

| अनु.क्र | वर्ष | स्थापना झालेल्या वसतिगृहांची संख्या |
|---|---|---|
| १ | १९२२–१९६० | ४ |
| २ | १९६१–१९७० | १६ |
| ३ | १९७१–१९८० | ५३ |
| ४ | १९८१–१९९० | ७३ |
| ५ | १९९१–२००० | ८६ |
| ६ | २००१–२०१० | ६४ |
| ७ | २०११–२०१४ | ८१ |
| ८ | २०१५–२०१७ | ४५ |
| ९ | माहिती उपलब्ध नाही | १५ |
| | एकूण | ४३७ |

**स्रोत: सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग कार्यालय, पुणे येथून शासकीय व अनुदानित वसतिगृहांची यादी उपलब्ध झाली आहे.**

विश्लेषण

दिलेल्या तक्त्यानुसार शासकीय वसतिगृहांच्या स्थापनेचा प्रवास टप्प्याटप्प्याने बदलताना दिसतो. प्रत्येक कालखंडाचा विचार केल्यास पुढील मुद्दे स्पष्ट होतात:

१) प्रारंभिक टप्पा (१९२२–१९७०)

या कालावधीत वसतिगृहांची स्थापना अत्यंत कमी प्रमाणात झाली (४ ते १६). यामागे शिक्षणाबाबत जागरूकतेचा अभाव, मर्यादित शासकीय सुविधा आणि सामाजिक मर्यादा ही कारणे असू शकतात. त्यामुळे हा टप्पा मंद वाढीचा कालखंड मानला जातो.

२) विस्ताराचा टप्पा (१९७१–२०००) या काळात वसतिगृहांच्या संख्येत लक्षणीय वाढ दिसते: १९७१–१९८०: ५३,१९८१–१९९०: ७३ ,१९९१–२०००: ८६ (सर्वाधिक) हा कालखंड सर्वाधिक प्रगतीचा टप्पा आहे. यावेळी सामाजिक न्याय, शिक्षणाचा प्रसार आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या योजना वाढल्या. त्यामुळे वसतिगृहांची गरज ओळखून मोठ्या प्रमाणात स्थापना करण्यात आली.

३) स्थिरतेचा टप्पा (२००१–२०१४)

या कालखंडात:

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

२००१–२०१०: ६४ ,२०११–२०१४: ८१ संख्या चांगली असली तरी वाढीचा वेग आधीपेक्षा कमी आहे. यातून असे दिसते की योजना स्थिर झाली आणि आधीच निर्माण झालेल्या सुविधांचा वापर वाढवण्यावर भर दिला गेला.

४) घट दर्शवणारा टप्पा (२०१५–२०१७)

या काळात संख्या ४५ वर येते, म्हणजेच घट दिसून येते.

यामागे निधीची मर्यादा, धोरणांमध्ये बदल किंवा नवीन प्रकल्पांवर कमी भर ही कारणे असू शकतात.

५) अपूर्ण माहिती

१५ वसतिगृहांची माहिती उपलब्ध नाही, त्यामुळे एकूण विश्लेषण करताना थोडी मर्यादा येते.

**एकूण निष्कर्ष**

1. वसतिगृहांची वाढ सुरुवातीला मंद होती.
2. १९७० नंतर ती झपाट्याने वाढली आणि १९९१–२००० हा सुवर्णकाल ठरला.
3. २००० नंतर वाढ स्थिर झाली.
4. अलीकडच्या काळात थोडी घट दिसते.

यावरून असे स्पष्ट होते की शासकीय धोरणे, सामाजिक जागरूकता आणि शैक्षणिक गरज यांचा वसतिगृहांच्या स्थापनेवर थेट परिणाम होतो.

अनुसूचित जातीतील मुले व मुली यांच्याकरीता शासकीय वसतिगृहे स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच इतर वसतिगृह सध्या राज्यात सुरू आहेत.

**तक्ता ६.२**

| अनु. क्र | विभाग | अनुसूचित जातींची लोकसंख्या | शासकीय वसतिगृहे | एकूण वसतिगृहे |
|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ६.२६ | ४० | १६१ |
| २ | पुणे | १२.८४ | ९१ | ५०३ |
| ३ | नाशिक | ९.११ | ५३ | ५४३ |
| ४ | औरंगाबाद | १५.९१ | १११ | ७९१ |
| ५ | अमरावती | १६.८७ | ७३ | ३५५ |
| ६ | नागपूर | १६.२८ | ६९ | ४६७ |
| | एकूण | ११.८७ | ४३७ | २७६३ |

**स्रोत:सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग कार्यालय, पुणे यांच्याकडून मिळालेल्या यादीनुसार शासकीय व अनुदानित वसतिगृहांची संख्या https://mahasdb.maharashtra.gov.in**

तक्ता ६.२ सारांश

1. महाराष्ट्रातील विविध विभागांमध्ये अनुसूचित जातींच्या लोकसंख्येनुसार वसतिगृहांची विभागणी करण्यात आली आहे.
2. औरंगाबाद (१५.९१%) आणि अमरावती (१६.८७%) या विभागांमध्ये SC लोकसंख्या जास्त आहे.
3. एकूण वसतिगृहे सर्वाधिक औरंगाबाद (७९१) येथे आहेत.
4. पुणे विभागात (५०३) आणि नागपूर (४६७) मध्येही वसतिगृहांची संख्या लक्षणीय आहे.
5. कोकण + मुंबई (६.२६%) येथे लोकसंख्या कमी असल्याने वसतिगृहेही तुलनेने कमी (१६१) आहेत.
6. एकूण ४३७ शासकीय व २७६३ एकूण वसतिगृहे राज्यात उपलब्ध आहेत.

**निष्कर्ष:**

SC लोकसंख्या जास्त असलेल्या विभागांमध्ये वसतिगृहांची संख्या जास्त दिसते, म्हणजेच योजना काही प्रमाणात लोकसंख्येनुसार राबवली गेली आहे.

जालना शहरातील वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांची माहिती

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

तक्ता ६ .३ मधे जिल्ह्यातील एकूण शासकीय व अनुदानित वसतिगृहाची यादी दिली आहे.
त्यावरून आपल्याला जिल्ह्यातील वसतिगृहाची स्थिती समजते.

**जिल्हा: जालना**

**तक्ता ६.३ (२०२४-२५)**

| | | मंजूर शासकीय वसतिगृहे | | | कार्यरत वसतिगृहे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | तालुका | शासकीय | अनुदानित | एकूण | शासकीय | अनुदानित | एकूण |
| १ | भोकरदन | २ | २ | ४ | २ | २ | ४ |
| २ | जाफराबाद | ० | १ | १ | ० | १ | १ |
| ३ | जालना | ३ | १४ | १७ | ३ | १४ | १७ |
| ४ | बदनापूर | १ | ० | १ | १ | ० | १ |
| ५ | अंबड | २ | ४ | ६ | २ | ४ | ६ |
| ६ | घनसावंगी | १ | ० | १ | १ | ० | १ |
| ७ | परतूर | ० | ३ | ३ | ० | ३ | ३ |
| ८ | मंठा | १ | ३ | ४ | १ | ३ | ४ |
| | एकूण | १० | २७ | ३७ | १० | २७ | ३७ |

**स्रोत: सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, जालना; जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.**

६.३ तक्ताचे विश्लेषण**

1. सर्वाधिक वसतिगृहे: जालना तालुक्यात सर्वाधिक म्हणजेच १७ वसतिगृहे (शासकीय + अनुदानित) कार्यरत आहेत.
2. शासकीय उपस्थिती: जिल्ह्यामध्ये एकूण १० शासकीय वसतिगृहे असून ती सर्वच्या सर्व पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत.
3. अनुदानित सहभाग: ग्रामीण भागात शिक्षणाची सोय व्हावी यासाठी अनुदानित वसतिगृहांचा वाटा मोठा असून जिल्ह्यात एकूण २७ अशी वसतिगृहे आहेत.
4. लोकसंख्या संदर्भ: जिल्ह्याच्या एकूण १९,५८,४८३ लोकसंख्येपैकी १३.९% (२,७२,२६६) अनुसूचित जातीची लोकसंख्या लक्षात घेता, ही वसतिगृहे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

जालना जिल्ह्यातील एकूण जिल्ह्यातील एकूण वसतिगृह प्रवेश क्षमता व दिलेले प्रवेश हे खालील तक्ता १.४ मध्ये दिले आहेत.

**तक्ता**

| | | त्यांमधील प्रवेश क्षमता | | | | | | संदर्भ कालावधीत दिलेले प्रवेश | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय | | अनुदानित | | एकूण | | शासकीय | | अनुदानित | | एकूण | |
| अ. क्र | तालुका | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| (१) | (२) | (९) | (१०) | ११ | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) |
| १ | भोकरदन | ७५ | १०० | २४ | २४ | ९९ | १२४ | ७५ | ९० | २४ | २४ | ९९ | ११४ |
| २ | जाफ्राबाद | ० | ० | ० | २४ | ० | २४ | ० | ० | ० | २४ | ० | २४ |
| ३ | जालना | १५० | ८० | २८० | १५५ | ४३० | २३५ | १५० | ७७ | २८० | १५५ | ४३० | २३२ |
| ४ | बदनापूर | १०० | ० | ० | ० | १०० | ० | १०० | ० | ० | ० | १०० | ० |
| ५ | अंबड | ७५ | ७५ | ११० | २४ | १८५ | ९९ | ७५ | ७५ | ११० | २४ | १८५ | ९९ |
| ६ | घनसावंगी | १०० | ० | ० | ० | १०० | ० | १०० | ० | ० | ० | १०० | ० |
| ७ | परतूर | ० | ० | १२० | ० | १२० | ० | ० | ० | १२० | ० | १२० | ० |
| ८ | मंठा | ० | १०० | १६४ | ० | १६४ | १०० | ० | ९८ | १६४ | ० | १६४ | ९८ |
| | एकूण | ५०० | ३५५ | ६९८ | २२७ | ११९८ | ५८२ | ५०० | ३४० | ६९८ | २२७ | ११९८ | ५६७ |

**स्रोत : सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, जालना; जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.**

दिलेल्या आकडेवारीवरून जालना जिल्ह्यातील मागासवर्गीय वसतिगृहांची स्थिती, प्रवेश क्षमता आणि प्रत्यक्ष झालेली प्रवेश प्रक्रिया यांचे सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

**१. एकूण प्रवेश क्षमता आणि विद्यार्थी संख्या**

जालना जिल्ह्यात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये मुला-मुलींच्या वसतिगृहांची एकूण स्थिती खालीलप्रमाणे दिसते:

1. एकूण क्षमता: जिल्ह्यात मुलांसाठी १,१९८ आणि मुलींसाठी ५८२ अशा एकूण १,७८० जागा मंजूर आहेत.
2. प्रत्यक्ष प्रवेश: एकूण १,७८० जागांपैकी १,७६५ जागांवर प्रवेश झाले आहेत (१,१९८ मुले आणि ५६७ मुली).
3. निष्कर्ष:मुलांच्या सर्व जागा (१००%) भरल्या आहेत, तर मुलींच्या जागांवर किरकोळ (सुमारे १५ जागा) रिक्त पदे आहेत.

**२. शासकीय विरुद्ध अनुदानित वसतिगृहे**

जिल्ह्यात शासकीय आणि खाजगी (अनुदानित) संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या वसतिगृहांचे वितरण असमान आहे:

| प्रकार | मुलांची क्षमता | मुलींची क्षमता | एकूण क्षमता |
|---|---|---|---|
| शासकीय | ५०० | ३५५ | ८५५ |
| अनुदानित | ६९८ | २२७ | ९२५ |

विशेष बाब: मुलांच्या बाबतीत अनुदानित वसतिगृहांचा वाटा मोठा आहे, तर मुलींच्या बाबतीत शासकीय वसतिगृहे अधिक क्षमता पुरवत आहेत.

**३. तालुकावार विश्लेषण**

1. जालना तालुका (सर्वाधिक क्षमता): जालना शहरात जिल्ह्याची सर्वाधिक शैक्षणिक सोय आहे. येथे एकूण ६६५ जागा (मुले+मुली) असून त्यातील ४३० जागा फक्त मुलांच्या अनुदानित वसतिगृहांमध्ये आहेत.
2. जाफ्राबाद (कमी सुविधा): जाफ्राबाद तालुक्यात केवळ २४ मुलींसाठी अनुदानित वसतिगृहाची सोय आहे. येथे मुलांसाठी एकही शासकीय किंवा अनुदानित वसतिगृह उपलब्ध नाही, ही चिंतेची बाब आहे.
3. बदनापूर आणि घनसावंगी: या तालुक्यांत केवळ मुलांची (शासकीय १००-१०० जागा) सोय असून मुलींसाठी एकही वसतिगृह नाही.
4. परतूर: या तालुक्यात केवळ मुलांसाठी (१२० जागा) अनुदानित सोय आहे, शासकीय किंवा मुलींसाठी कोणतीही सोय उपलब्ध नाही.
5. मंठा: मंठा तालुक्यात मुलींसाठी १०० जागांचे शासकीय वसतिगृह आहे, पण मुलांसाठी केवळ अनुदानित सोय उपलब्ध आहे.

**४. लिंगनिहाय तफावत (Gender Gap)**

तक्त्यानुसार जिल्ह्यात मुलांच्या तुलनेत मुलींच्या वसतिगृहांची संख्या खूपच कमी आहे:

मुलांसाठी एकूण जागा: १,१९८

मुलींसाठी एकूण जागा: ५८२निष्कर्ष: मुलांच्या तुलनेत मुलींना निवासाच्या निम्म्याच संधी उपलब्ध आहेत. विशेषतः बदनापूर, घनसावंगी आणि परतूर या तीन तालुक्यांत मुलींच्या निवासाची कोणतीही सोय (शासकीय वा अनुदानित) नसल्याचे दिसून येते.

**जालना जिल्ह्याच्या दृष्टीने निष्कर्ष व शिफारशी**

1. क्षमतेचा पूर्ण वापर: जिल्ह्यामध्ये वसतिगृहांच्या क्षमतेचा ९९% वापर होत आहे, याचा अर्थ विद्यार्थी या सुविधेचा मोठा लाभ घेत आहेत.
2. अधिक सोयींची गरज: जाफ्राबाद, बदनापूर आणि घनसावंगी यांसारख्या तालुक्यांत मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी नवीन वसतिगृहे सुरू करण्याची गरज आहे.
3. शासकीय विस्तार: अनेक तालुक्यांत (उदा. जाफ्राबाद, परतूर, मंठा) मुलांसाठी शासकीय वसतिगृहे नाहीत, तिथे ती सुरू केल्यास मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार सुविधा मिळू शकतील.

हे विश्लेषण दर्शवते की जालना जिल्ह्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था बऱ्यापैकी असली, तरी तालुकावार असमतोल आणि मुलींच्या निवासाची कमतरता  हे दोन मुख्य विषय धोरणात्मक बदलासाठी महत्त्वाचे आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**जालना शहरातील निवडक वसतिगृहाचे विश्लेषण**

जालना शहरातील संत रामदास मुलांचे शासकीय वसतिगृह आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह सामाजिक न्याय विभागाकडून चालवले जाते या वसतिगृहाची प्रवेश क्षमता प्रत्येकी ७५ विद्यार्थी आहे.. दोन्ही वसतिगृह मिळून १५० विद्यार्थी तेथे प्रवेशित आहेत.. २०२२ ते २०२५ या कालावधीत शिक्षण घेतलेल्या ३० विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. त्या आधारवर आपण खालील तक्ता तयार केला आहे. व त्या आधारावर निष्कर्ष आणि शिफारशी दिल्या आहेत.

सामाजिक न्याय विभागाच्या या योजनेत विद्यार्थ्यांना खालील लाभ मिळतात:

१. मोफत राहणे, जेवण, कपडे, शैक्षणिक आणि इतर सुविधा
२. शालेय मुलांसाठी २ गणवेश
३. शैक्षणिक पुस्तके व साहित्य
४. वैद्यकीय व तांत्रिक शाखेच्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार लागणारे शैक्षणिक संच – स्टेथोस्कोप, एप्रन, बॉयलर सूट, आणि कला अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना रंग पेटी, चित्र काढण्यासाठी फळा, ब्रश, कॅनव्हास, इत्यादी.
५. दर महिन्याला रोजच्या खर्चासाठी :

1. विभागीय स्तरावरील वसतिगृह विद्यार्थी रु. १५००/-
2. जिल्हास्तरीय वसतिगृह विद्यार्थी रु. १३००/-
3. तालुकास्तरीय वसतिगृह विद्यार्थी रु.१०००/-

**तक्ता:**

**वसतिगृहातील सोयी सुविधा बाबत विद्यार्थ्यांचे समाधान स्तर नमुना 30 विद्यार्थी**

| क्र | घटक सुविधा | समाधानकारक विद्यार्थी | असमाधानकारक विद्यार्थी | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | वाचन कक्ष | 20 | 10 | 30 |
| 2 | व्यायाम शाळा | 12 | 18 | 30 |
| 3 | भोजन निवास | 20 | 10 | 30 |
| 4 | निर्वाह भत्ता | 23 | 7 | 30 |
| 5 | क्रीडांगण | 15 | 15 | 30 |
| 6 | वृत्तपत्रे व मासिके | 20 | 10 | 30 |
| 7 | संगणक व इंटरनेट सुविधा | 7 | 23 | 30 |
| 8 | शैक्षणिक प्रगती | 27 | 3 | 30 |
| 9 | निवास व्यवस्था | 26 | 4 | 30 |

**निष्कर्ष**

१) जालना शहरातील संत रामदास व डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलांच्या वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मुलाखतींवर आधारित या अभ्यासातून वसतिगृहांचा शैक्षणिक प्रगतीवर सकारात्मक परिणाम होत असल्याचे स्पष्ट दिसून येते. एकूण ३० पैकी २७ विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक प्रगती समाधानकारक असल्याचे नमूद केले आहे.

२) निवास व भोजन या मूलभूत सुविधांबाबत विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगला आहे. बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या सुविधा समाधानकारक असल्याचे सांगितले असून, त्यामुळे त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण होऊन शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते.

३) निर्वाह भत्त्याबाबत विद्यार्थ्यांची मते मिश्र स्वरूपाची आहेत. काही विद्यार्थ्यांना भत्ता अपुरा वाटतो, तर काहींनी तो वेळेवर मिळत नसल्याची समस्या मांडली आहे.

४) वाचनकक्ष, मासिके व वर्तमानपत्रे या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या पूर्णपणे पुरेशा नाहीत. काही विद्यार्थ्यांनी सुधारणा आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

५) क्रीडांगण व व्यायामशाळा या सुविधा अपुऱ्या असल्याचे बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सांगितले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासावर मर्यादा येत आहेत.

६) संगणक प्रयोगशाळा व इंटरनेट सुविधा या बाबतीतही कमतरता दिसून येते. आधुनिक शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या या सुविधा अपुऱ्या असल्यामुळे विद्यार्थ्यांना अडचणी येतात.

७) एकूणच वसतिगृहांनी शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यात यश मिळवले असले तरी पूरक व आधुनिक सुविधांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

## ८. शिफारशी

१) वसतिगृहांमध्ये संगणक व इंटरनेट सुविधा मजबूत करणे आवश्यक आहे. अद्ययावत संगणक व स्थिर इंटरनेट उपलब्ध करून दिल्यास विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची संधी मिळेल.

२) क्रीडांगण व व्यायामशाळा या सुविधा विकसित करून विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाला चालना देणे आवश्यक आहे.

३) निर्वाह भत्त्याची रक्कम वाढवून तो नियमित व वेळेवर देण्याची व्यवस्था करावी, जेणेकरून विद्यार्थ्यांचा आर्थिक ताण कमी होईल.

४) वाचनकक्ष अधिक सुसज्ज करून त्यामध्ये विविध संदर्भ पुस्तके, मासिके व वर्तमानपत्रे उपलब्ध करून द्यावीत.

५) भोजनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी नियमित तपासणी व पोषणमूल्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

६) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन, करिअर काउन्सेलिंग व व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम आयोजित करावेत.

७) वसतिगृह व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांकडून नियमित अभिप्राय घेऊन त्यानुसार आवश्यक सुधारणा कराव्यात.

## ९.संदर्भ सूची (References)


1. Ambedkar, B. R. (1936). Annihilation of Caste.
2. Sen, Amartya. (1999). Development as Freedom. Oxford University Press.
3. Jadhav, V. L. Demographical Features of Jalna District: A Geographical Analysis.
4. Tilak, J. B. G. (2015). How Exclusive is Higher Education in India? Economic and Political Weekly.
5. Drèze, Jean & Sen, Amartya. (2002). India: Development and Participation. Oxford University Press.
6. Srinivas, M. N. (1966). Social Change in Modern India. University of California Press.
7. Thorat, Sukhadeo. (2009). Dalits in India: Search for a Common Destiny. Sage Publications.
8. अर्थ व सांख्यिकी संचालनालय. (2025). जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन: जिल्हा – जालना. महाराष्ट्र शासन.
9. महाराष्ट्र शासन... सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृह योजनांवर आधारित मूल्यमापन अभ्यास.२०१९


## संकेतस्थळे (Webliography)


1. Maharashtra State Statistical Data Bank. उपलब्ध: https://mahasdb.maharashtra.gov.in
2. Official Website of Jalna District. उपलब्ध: https://jalna.gov.in
3. Social Justice and Special Assistance Department. उपलब्ध: https://sjsa.maharashtra.gov.in
4. Directorate of Economics and Statistics (DES). उपलब्ध: dir.des@maharashtra.gov.in

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# ग्रीन इकॉनॉमी - शाश्वत विकास

**डॉ. वसुधा नंदनवार**
अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट ता. मुळशी पुणे

**Manuscript ID:**
JRD -2026-180410
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 46-51
April - 2026
**Submitted:** 09 Mar. 2026
**Revised:** 21 Mar 2026
**Accepted:** 08 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***सारांश***

*हरित अर्थव्यवस्था (Green Economy) ही अशी आर्थिक व्यवस्था आहे जी पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर, सामाजिक समावेशन आणि शाश्वत विकास यांवर आधारित आहे. पारंपरिक अर्थव्यवस्थेच्या तुलनेत हरित अर्थव्यवस्था कमी कार्बन उत्सर्जन, नवीकरणीय ऊर्जेचा वापर, कचरा व्यवस्थापन, जलसंधारण आणि जैवविविधतेचे संरक्षण यांना प्राधान्य देते. प्रस्तुत लेखात हरित अर्थव्यवस्थेची संकल्पना, वैशिष्ट्ये, हरित जीडीपीची गणना, तिची तत्त्वे, भारतातील सद्यस्थिती आणि शाश्वत विकासातील भूमिका यांचा अभ्यास करण्यात आला आहे. भारताने नवीकरणीय ऊर्जा, हरित हायड्रोजन, पीएम-कुसुम योजना आणि हवामान बदलावरील राष्ट्रीय कृती योजना यांसारख्या उपक्रमांद्वारे हरित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल सुरू केली आहे. तथापि, जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व, मोठ्या गुंतवणुकीची गरज, पायाभूत सुविधांतील मर्यादा आणि भूसंपादन यांसारखी आव्हाने अद्याप कायम आहेत. हरित अर्थव्यवस्था रोजगारनिर्मिती, पर्यावरणीय संतुलन, सामाजिक समानता आणि दीर्घकालीन आर्थिक विकासाला चालना देणारी प्रभावी संकल्पना असून ती शाश्वत विकास साध्य करण्यासाठी अत्यावश्यक ठरते.*

***मुख्यशब्द :*** *हरित अर्थव्यवस्था, शाश्वत विकास, हरित जीडीपी, नवीकरणीय ऊर्जा, पर्यावरण संरक्षण, कार्बन उत्सर्जन, संसाधन कार्यक्षमता, हरित रोजगार, हवामान बदल, भारताची हरित अर्थव्यवस्था.*

## प्रस्तावना

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून वेगवान औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि नैसर्गिक संसाधनांचा वाढता वापर यामुळे पर्यावरणीय ऱ्हास, हवामान बदल, जैवविविधतेचा नाश आणि प्रदूषण यांसारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यातील संतुलन राखणे ही आजच्या काळातील सर्वात मोठी गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर 'हरित अर्थव्यवस्था' (Green Economy) ही संकल्पना उदयास आली. हरित अर्थव्यवस्था ही अशी आर्थिक व्यवस्था आहे जी कमी कार्बन उत्सर्जन, संसाधनांची कार्यक्षमता आणि सामाजिक समावेशकता यांवर आधारित असते. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP) यांच्या मते, हरित अर्थव्यवस्था मानवी कल्याण आणि सामाजिक समानता वाढविण्यास मदत करते तसेच पर्यावरणीय जोखीम आणि पर्यावरणीय ऱ्हास कमी करते. या संकल्पनेचा मुख्य उद्देश आर्थिक विकास साधताना नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे आणि भावी पिढ्यांच्या गरजा लक्षात घेऊन शाश्वत विकासाला चालना देणे हा आहे. आज जगभरातील अनेक देशांनी हरित विकासाचा मार्ग स्वीकारला असून नवीकरणीय ऊर्जा, स्वच्छ तंत्रज्ञान, हरित वाहतूक, कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत शेती यांसारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक सुरू केली आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. वसुधा नंदनवार अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट ता. मुळशी पुणे.*

**How to cite this article:**
*नंदनवार, वसुधा. (2026). ग्रीन इकॉनॉमी - शाश्वत विकास. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 46–51.* https://doi.org/10.5281/zenodo.21428193

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21428193

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

तथापि, वाढती ऊर्जा मागणी, जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व, आर्थिक गुंतवणुकीची आवश्यकता आणि पायाभूत सुविधांतील मर्यादा यांसारखी अनेक आव्हाने अजूनही कायम आहेत. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये हरित अर्थव्यवस्थेची संकल्पना, तिची वैशिष्ट्ये, हरित जीडीपी, भारतातील हरित अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती, सरकारी उपक्रम तसेच शाश्वत विकासाच्या दृष्टीने तिचे महत्त्व आणि आव्हाने यांचा अभ्यास करण्यात आला आहे. हरित अर्थव्यवस्था ही केवळ पर्यावरण संरक्षणाची संकल्पना नसून आर्थिक प्रगती, सामाजिक न्याय आणि पर्यावरणीय संतुलन यांचा समन्वय साधणारा शाश्वत विकासाचा प्रभावी मार्ग आहे.

**ग्रीन इकॉनॉमी (हरित अर्थव्यवस्था) म्हणजे** अशी आर्थिक प्रणाली, जी पर्यावरणाचे संरक्षण करताना आणि नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर करून मानवी कल्याण आणि सामाजिक समानता सुधारण्याचे उद्दिष्ट ठेवते, ही संकल्पना कमी कार्बन उत्सर्जन (low carbon), संसाधन कार्यक्षमता आणि सामाजिक समावेशावर भर देते, ज्यामुळे प्रदूषण कमी होऊन शाश्वत विकास साधला जातो.'Green Economy' चा मराठीत अर्थ 'हरित अर्थव्यवस्था' ही एक अशी आर्थिक व्यवस्था आहे जी पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्यासोबतच मानवी कल्याण आणि सामाजिक समानता वाढवण्यावर भर देते. सोप्या भाषेत सांगायचे तर, पर्यावरणाचे नुकसान न करता प्रगती करणे म्हणजे 'हरित अर्थव्यवस्था' होय. पर्यावरणीय जोखीम कमी करणे,प्रदूषण आणि कार्बन उत्सर्जन कमी करून निसर्गाचा ऱ्हास थांबवणे.

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP) च्या व्याख्येनुसार, हरित अर्थव्यवस्था म्हणजे अशी व्यवस्था जी कमी कार्बन उत्सर्जन करणारी, संसाधनांचा कार्यक्षम वापर करणारी आणि सामाजिकदृष्ट्या सर्वसमावेशक असते.

नैसर्गिक संसाधनांची कार्यक्षमता - ऊर्जा, पाणी आणि इतर नैसर्गिक साधनसंपत्तीचा कमीत कमी आणि योग्य वापर करणे.

**उद्दिष्टे :**

१ हरित अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे.
२ हरित जीडीपीची गणना पद्धत.
३ हरित अर्थव्यवस्था पारंपरिक अर्थव्यवस्थेपेक्षा कशी वेगळी आहे? या अभ्यास करणे.
४ हरित अर्थव्यवस्थे पुढील आव्हाने.

**संशोधन पद्धत:**

हरित अर्थव्यवस्थाचा अभ्यास करतांना प्रमुखयाने दुय्यम साधनांचा वापर केला आहे याध्ये पुस्तके , लेख आणि ऑनलाइन पेपर इ.

**हरित अर्थव्यवस्थेची मुख्य वैशिष्ट्ये:**

1. पर्यावरण संरक्षण म्हणजे प्रदूषण कमी करणे आणि जैवविविधतेचे रक्षण करणे.
2. कमी कार्बन उत्सर्जन करून कोळसा किंवा तेलाऐवजी सौर, पवन यांसारख्या नूतनीकरणयोग्य ऊर्जेचा वापर करणे.
3. साधन कार्यक्षमता योग्य प्रमाणात वापर करणे, साधनांचा (पाणी, खनिज, इ.) पुनर्वापर (Recycle/Reuse) वाढवणे आणि कचरा कमी करणे.
4. शाश्वत विकासात वाढ करुण सामाजिक समानता राखून आर्थिक विकास साधणे.

**हरित अर्थव्यवस्थेची उदाहरणे:**

1. नवीकरणीय ऊर्जा - सौर पॅनेल आणि पवनचक्कीचा वापर.
2. हरित वाहतूक - इलेक्ट्रिक वाहने आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था.
3. सेंद्रिय शेती - रासायनिक खतांचा वापर टाळून नैसर्गिक शेती.
4. कचरा व्यवस्थापन - पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती

**हरित जीडीपी सूत्र**

हरित जीडीपीची गणना करण्याचे सूत्र हे पर्यावरणीय आणि आर्थिक घटकांना एकत्रित करते, ज्यामुळे शाश्वत विकासाचे मूल्यांकन करण्यासाठी एक व्यापक चौकट उपलब्ध होते. ही पद्धत आर्थिक वाढीच्या पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांचा विचार करून त्यावर एक संतुलित दृष्टिकोन प्रदान करते.

**हरित जीडीपी = जीडीपी – (पी१ – एमसी१) डीएनआर – (पी२ – एमसी२) डीआर – व्ही डीएस**

पी१ : अनवीकरणीय संसाधनांची किंमत, पी२ : नवीकरणीय संसाधनांची किंमत
एमसी१:अनवीकरणीय संसाधनांचा सीमांत खर्च, एमसी२:नवीकरणीय संसाधनांचा सीमांत खर्च,
डीएनआर : अनवीकरणीय संसाधनांच्या साठ्यात बदल,
डीआर: नवीकरणीय संसाधनांच्या साठ्यात बदल,
व्ही: प्रदूषण कमी करण्याचा सीमांत खर्च, डीः प्रदूषण साठा, एस मधील बदल

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**शाश्वत विकास** (Sustainable Development): भविष्यातील पिढ्यांच्या गरजा लक्षात घेऊन आजचा आर्थिक विकास साधणे.

**हरित अर्थव्यवस्थेचे प्रमुख घटक**

हरित अर्थव्यवस्थेचे ६ मुख्य आधारस्तंभ आहेत

1. अक्षय ऊर्जा (Renewable Energy): सौर आणि पवन ऊर्जेचा वापर.
2. हरित इमारती (Green Buildings): पर्यावरणास पूरक बांधकाम.
3. स्वच्छ वाहतूक (Clean Transport): इलेक्ट्रिक वाहने आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर.
4. जल व्यवस्थापन (Water Management): पाण्याचा पुनर्वापर आणि बचत.
5. कचरा व्यवस्थापन / चक्रीय अर्थव्यवस्था (Waste Management): कचरा कमी करणे आणि 'रीसायकल' करणे.
6. जमीन व्यवस्थापन / सेंद्रिय शेती (Land Management): शाश्वत शेती आणि वनीकरण.

थोडक्यात, हरित अर्थव्यवस्था म्हणजे "निसर्गाचा समतोल राखून केलेला विकास" होय.

**हरित अर्थव्यवस्था पारंपरिक अर्थव्यवस्थेपेक्षा कशी वेगळी आहे?**

पारंपारिक मॉडेलच्या विपरीत, जे प्रामुख्याने जीडीपीवर लक्ष केंद्रित करतात आणि संसाधनांचा ऱ्हास व प्रदूषणास कारणीभूत ठरतात, हरित अर्थव्यवस्था शाश्वतता, पर्यावरणावरील परिणाम कमी करणे आणि आर्थिक, पर्यावरणीय व सामाजिक घटकांचे एकत्रीकरण यावर लक्ष केंद्रित करते.

या दोन्हींमधील फरक खालीलप्रमाणे आहे.

| पैलू | हरित अर्थव्यवस्था | पारंपारिक अर्थव्यवस्था |
|---|---|---|
| संसाधनांचा वापर | नैसर्गिक संसाधनांच्या शाश्वत वापरावर आणि संवर्धनावर भर दिला जातो. | यामुळे अनेकदा संसाधनांचे अतिशोषण आणि ऱ्हास होतो |
| आर्थिक वाढ | शाश्वत पद्धती आणि तंत्रज्ञानातील गुंतवणुकीमुळे विकासाला चालना मिळते. | औद्योगिक विस्तार आणि संसाधनांचे उत्खनन यांद्वारे अनेकदा विकास साधला जातो |
| सामाजिक समता | सामाजिक समावेशन आणि समानतेवर लक्ष केंद्रित करून, लाभांचे सर्वांना समान वाटप सुनिश्चित करते. | न्याय्य वितरणापेक्षा नफ्याला प्राधान्य देऊन सामाजिक विषमता वाढवू शकते |
| कचरा व्यवस्थापन | कचरा कमी करणे, पुनर्वापर आणि चक्रीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनाचे समर्थक. | बहुतेकदा 'घे-बनव-टाक' या रेषीय मॉडेलचे अनुसरण केले जाते, ज्यामुळे कचऱ्याचे प्रमाण मोठे होते |
| गुंतवणुकीवर लक्ष केंद्रित करणे | शाश्वत पद्धती, ऊर्जा कार्यक्षमता आणि नवीकरणीय ऊर्जा स्रोतांच्या वापरामध्ये गुंतवणुकीला प्रोत्साहन देते. | गुंतवणूक अनेकदा जीवाश्म इंधन आणि जास्त उत्सर्जन करणाऱ्या पारंपरिक उद्योगांना अनुकूल असते. |

हरित अर्थव्यवस्था म्हणजे शाश्वत विकासाच्या दिशेने टाकलेले पाऊल, जे आर्थिक वाढ, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक समानता यांच्यात संतुलन साधते. कमी कार्बन उत्सर्जन आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर ही तिची वैशिष्ट्ये असून, ती हरित गुंतवणूक, धोरणात्मक सुधारणा आणि शाश्वत पद्धतींद्वारे सर्वसमावेशक विकासाला प्रोत्साहन देते. पारंपरिक अर्थव्यवस्थांच्या विपरीत, ही अर्थव्यवस्था नवीकरणीय ऊर्जा आणि चक्रीय प्रारूपांसारख्या पर्यावरणपूरक उपक्रमांना प्राधान्य देते.

भारताचे हरित अर्थव्यवस्थेकडे होणारे संक्रमण, विशेषतः नवीकरणीय ऊर्जेच्या क्षेत्रात, आशादायक दिसत असले तरी, जीवाश्म इंधनावरील प्रचंड अवलंबित्व आणि पायाभूत सुविधांमधील अडथळे हे मोठे अडथळे आहेत.

**हरित अर्थव्यवस्थेची तत्त्वे**

हरित अर्थव्यवस्था सामायिक समृद्धी, निष्पक्षता आणि संसाधनांच्या संवर्धनावर भर देते, शाश्वत विकासात थेट योगदान देते आणि क्षेत्र-विशिष्ट उपक्रमांद्वारे देशांना त्यांची शाश्वत विकास उद्दिष्टे (SDG) साध्य करण्यास मदत करते.

1. **कल्याणाचे तत्व :** हरित अर्थव्यवस्था मानवी, सामाजिक, भौतिक आणि नैसर्गिक भांडवलावर लक्ष केंद्रित करून सामायिक समृद्धी निर्माण करते, आणि हरित रोजगार व उपजीविका प्रदान करण्यासाठी शाश्वत प्रणाली, पायाभूत सुविधा आणि शिक्षणामध्ये गुंतवणूक करते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

2. **न्यायाचे तत्व :** ते सर्व पिढ्यांमध्ये समानता सुनिश्चित करते, समान संधींना प्रोत्साहन देते, महिला सक्षमीकरणास समर्थन देते आणि लहान उद्योग व दुर्बळ गटांसाठी सामाजिक न्यायाला चालना देते.
3. **ग्रहीय सीमांचे तत्व :** हरित अर्थव्यवस्था संसाधनांचा ऱ्हास रोखण्यासाठी आणि शाश्वत उपजीविकेला आधार देण्यासाठी खबरदारीच्या तत्त्वाचे पालन करून जैवविविधता आणि नैसर्गिक प्रणालींचे संरक्षण व पुनर्संचयन करते.
4. **कार्यक्षमता आणि पर्याप्ततेचे तत्व :** हे शाश्वत उपभोग आणि उत्पादनास, संसाधनांच्या संवर्धनास, कमी-कार्बन मॉडेलचा अवलंब करण्यास, आणि खर्चाला पर्यावरणीय व सामाजिक कल्याणाशी संरेखित करण्यास प्रोत्साहन देते.
5. **सुशासनाचे तत्व :** हरित अर्थव्यवस्था ही समाज आणि शाश्वतता या दोन्हींच्या सेवेसाठी पारदर्शकता, सार्वजनिक सहभाग आणि निर्णयप्रक्रियेला प्रोत्साहन देणाऱ्या उत्तरदायी, आंतरविद्याशाखीय संस्थांवर अवलंबून असते.

**भारताची हरित अर्थव्यवस्थाची स्थिती**

भारत महत्त्वाकांक्षी योजना आणि कामगिरीसह हरित अर्थव्यवस्थेच्या दिशेने स्थिरपणे प्रगती करत आहे. भारताची हरित अर्थव्यवस्था २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्स आणि २०७० पर्यंत १५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज असून, आर्थिक वर्ष २०२८ पर्यंत ७.२९ दशलक्ष आणि २०४७ पर्यंत ३५ दशलक्ष हरित रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे.

भारताची नवीकरणीय ऊर्जा क्षमता २२०.१० गिगावॅटपर्यंत वाढली असून, त्यात एका वर्षात विक्रमी २९.५२ गिगावॅटची भर पडली आहे. यापैकी २३.८३ गिगावॅट केवळ सौर ऊर्जेतून मिळाले आहे.देशाने आपल्या 'पंचामृत' हवामानविषयक वचनबद्धतेनुसार, २०३० पर्यंत ५०० गिगावॅट जीवाश्म-इंधन-विरहित क्षमता साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.क्रमवारीत किंचित घसरण झाली असली तरी, भारताने २०२५ च्या हवामान बदल कामगिरी निर्देशांकात (CCPI) १० वे स्थान मिळवून हवामान कृतीमध्ये जगातील आघाडीच्या राष्ट्रांपैकी एक म्हणून आपला दर्जा कायम राखला आहे.मात्र, २०२४ च्या पर्यावरण कामगिरी निर्देशांकात (EPI) भारताचा १७६ वा क्रमांक हा गंभीर वायू प्रदूषण (हवेच्या गुणवत्तेत १७७ वा क्रमांक), कोळशावरील उच्च अवलंबित्व आणि जैवविविधतेच्या प्रयत्नांमधील पिछाडी दर्शवतो. नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक आणि २०७० पर्यंत निव्वळ-शून्य उत्सर्जनाचे उद्दिष्ट प्रगतीचे संकेत देत असले तरी, कोळसा हा एक प्रमुख ऊर्जा स्रोत असून तो हरितगृह वायू उत्सर्जन आणि हवेची गुणवत्ता खालावण्यास कारणीभूत ठरतो.भारताने हवामान बदलावरील राष्ट्रीय कृती योजना आणि सौर पीव्ही मॉड्यूलसाठी उत्पादन संलग्न प्रोत्साहन (पीएलआय) योजना यांसारखे अनेक उपक्रम सुरू केले आहेत.हा देश इंडो-जर्मन टास्क फोर्स आणि इंटरनॅशनल पार्टनरशिप फॉर हायड्रोजन अँड फ्युएल सेल्स इन द इकॉनॉमी (IPHE) यांसारख्या आंतरराष्ट्रीय सहकार्यांचा देखील एक भाग आहे.

**हरित अर्थव्यवस्था साध्य करण्याच्या दिशेने प्रयत्न :**

हरित अर्थव्यवस्थेकडे प्रभावीपणे संक्रमण करण्यासाठी, आर्थिक पुनर्रचना, संसाधनांची कार्यक्षमता आणि शाश्वत विकास यांसारख्या विविध दृष्टिकोनांचा समावेश असलेले एक व्यापक धोरण अत्यावश्यक आहे त्या दृष्टीने भारतात प्रयत्न चालू आहे.

1. **हरित आर्थिक विकास:** हरित आर्थिक विकासाच्या धोरणांचा अवलंब करण्यामध्ये पर्यावरणीय परिणाम सुधारणाऱ्या व्यवसायांना पाठिंबा देणे, पारंपरिक आर्थिक वाढीमध्ये शाश्वततेचे एकत्रीकरण करणे आणि स्वच्छ तंत्रज्ञान व नवीकरणीय संसाधनांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन देणे यांचा समावेश होतो.
2. **संसाधन कार्यक्षमता वापर आणि हरित साधनांची खरेदी:** संसाधन कार्यक्षमता वाढवणे आणि हरित खरेदी धोरणांची अंमलबजावणी केल्याने कार्यान्वयन खर्च कमी होण्यास, पर्यावरणावरील परिणाम कमी होण्यास आणि समुदाय व व्यवसायांमध्ये ऊर्जा-कार्यक्षम उत्पादने व सेवांची मागणी वाढण्यास मदत होते.
3. **स्थानिक उत्पादन आणि वापर:** स्थानिक उत्पादन आणि वापराला प्रोत्साहन दिल्याने प्रादेशिक आत्मनिर्भरता वाढते, उच्च-गुणवत्तेच्या रोजगाराच्या संधी निर्माण होतात आणि दूरवर मालाच्या वाहतुकीमुळे होणारा पर्यावरणावरील परिणाम कमी होतो.
4. **कचरा व्यवस्थापन:** प्रभावी कचरा व्यवस्थापन, जसे की आक्रमक पुनर्वापर आणि शून्य कचरा उपक्रम, राबवल्याने विल्हेवाटीचा खर्च कमी होतो, हरित रोजगार निर्माण होतात आणि कचऱ्याचे मौल्यवान संसाधने किंवा ऊर्जेमध्ये रूपांतर होते.
5. **हरित पायाभूत सुविधा:** सुज्ञपणे जमिनीचा वापर आणि क्षेत्रनियोजनाचे निर्णय घेऊन हरित पायाभूत सुविधा विकसित केल्याने पर्यावरणाचा दर्जा सुधारतो, शाश्वत आर्थिक घडामोडींना पाठिंबा मिळतो आणि रहिवाशांचे एकूण जीवनमान उंचावते.

**सरकारने सुरू केलेले हरित अर्थव्यवस्था उपक्रम**

भारताने शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी, कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि स्वच्छ ऊर्जेकडे संक्रमण करण्यासाठी अनेक हरित अर्थव्यवस्था उपक्रम सुरू केले आहेत, जे पर्यावरण संरक्षण आणि हवामान कृती उद्दिष्टांप्रति असलेली त्याची वचनबद्धता दर्शवते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

1. राष्ट्रीय हरित हायड्रोजन अभियान: २०२३ मध्ये सुरू झालेल्या या अभियानाचे उद्दिष्ट २०३० पर्यंत ५ दशलक्ष मेट्रिक टन वार्षिक उत्पादन करून, ८ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक आकर्षित करून आणि ६ लाख रोजगार निर्माण करून भारताला हरित हायड्रोजनचे जागतिक केंद्र बनवणे आहे.
2. हवामान बदलावरील राष्ट्रीय कृती योजना: हवामान बदलावरील राष्ट्रीय कृती योजनेत (NAPCC) उत्सर्जन कपात आणि स्वच्छ ऊर्जेला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित करणारी राष्ट्रीय सौर मोहीम, शाश्वत निवासस्थानावरील राष्ट्रीय मोहीम आणि ऊर्जा कार्यक्षमतेवरील राष्ट्रीय मोहीम यांसारख्या मोहिमांचा समावेश आहे.
3. पीएम-कुसुम योजना: २०१९ मध्ये सुरू झालेली पीएम-कुसुम योजना, नवीन आणि विद्यमान सौरऊर्जेवर चालणाऱ्या सिंचन पंपांना अनुदान देऊन कृषी क्षेत्रात सौरऊर्जेला प्रोत्साहन देते. या योजनेचा उद्देश ४९ लाख कृषी पंपांचे सौरऊर्जेत रूपांतर करणे आणि शेतकऱ्यांचे जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करणे हा आहे.
4. ग्रीन ग्रिड्स इनिशिएटिव्ह – एक सूर्य, एक जग, एक ग्रिड: भारताने प्रस्तावित केलेला आणि २०२१ मध्ये COP26 मध्ये सुरू केलेला हा उपक्रम, जागतिक सौर ऊर्जा ग्रिड्सना एकमेकांशी जोडण्याचा, सीमापार नवीकरणीय ऊर्जेची देवाणघेवाण सुलभ करण्याचा आणि ऊर्जा सुरक्षा वाढवण्याचा प्रयत्न करतो.
5. ग्रीन क्रेडिट कार्यक्रम: ऑक्टोबर २०२३ मध्ये सुरू करण्यात आलेला हा बाजार-आधारित उपक्रम, हस्तांतरणीय ग्रीन क्रेडिट्स देऊन व्यक्ती आणि संस्थांना वृक्षारोपणासारख्या ऐच्छिक पर्यावरणीय कृती करण्यासाठी प्रोत्साहित करतो.

**हरित अर्थव्यवस्थेवरील कृतीसाठी भागीदारी (PAGE)**

1. हरित अर्थव्यवस्थेवरील कृतीसाठीची भागीदारी ही आर्थिक धोरणनिर्मितीमध्ये शाश्वततेचे एकत्रीकरण करण्यावर लक्ष केंद्रित करते. शाश्वत विकासाला चालना देणे, रोजगार निर्माण करणे, गरिबी आणि असमानता कमी करणे, तसेच पर्यावरणीय लवचिकता वाढवणे यांसाठी देशांना त्यांच्या आर्थिक धोरणांना नव्याने आकार देण्यास ही संस्था साहाय्य करते.
2. रिओ+२० घोषणेला प्रतिसाद म्हणून २०१३ मध्ये सुरू करण्यात आलेली PAGE संस्था, समन्वित तांत्रिक सहाय्य आणि क्षमता-बांधणी प्रदान करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या (UN) पाच संस्थांचे—UNEP, ILO, UNDP, UNIDO, आणि UNITAR—विशेषज्ञता एकत्र आणते .
3. PAGE, समावेशक, शाश्वत आर्थिक वाढ आणि सन्मानजनक कामाला प्रोत्साहन देऊन, शाश्वत विकासासाठीच्या २०३० अजेंड्याला, विशेषतः SDG ८ ला, समर्थन देते.
4. ही भागीदारी संयुक्त राष्ट्रांच्या प्रयत्नांमध्ये समन्वय साधते आणि देशांना हरित अर्थव्यवस्था धोरणे प्रभावीपणे राबविण्यात मदत करण्यासाठी सर्वांगीण पाठिंबा देते.

**हरित अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने**

1. लक्षणीय प्रगती आणि महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे असूनही, भारताच्या हरित अर्थव्यवस्थेकडे होणाऱ्या संक्रमणासमोर अनेक आव्हाने आहेत. ही आव्हाने बहुआयामी असून ती ऊर्जा, कृषी, उद्योग आणि वित्त यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये उद्भवतात.
2. जीवाश्म इंधनावरील प्रचंड अवलंबित्व: भारत आपल्या ऊर्जेच्या गरजांसाठी जीवाश्म इंधनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे, आणि एकूण वीज निर्मितीमध्ये कोळशाचा वाटा ७०% पेक्षा जास्त आहे. नवीकरणीय ऊर्जेमध्ये लक्षणीय वाढ होऊनही, नजीकच्या भविष्यात जीवाश्म इंधनाचा वाटा लक्षणीय राहण्याची शक्यता आहे.
3. मोठ्या गुंतवणुकीची गरज: कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी, भारताला 'लाइन-ऑफ-साइट' परिस्थितीनुसार २०५० पर्यंत अंदाजे ७.२ ट्रिलियन डॉलर्स आणि 'ॲक्सलरेटेड' परिस्थितीनुसार अतिरिक्त ४.९ ट्रिलियन डॉलर्सच्या हरित गुंतवणुकीची आवश्यकता भासू शकते.
4. पायाभूत सुविधांमधील अडथळे: नवीकरणीय ऊर्जा सामावून घेण्यासाठी भारताच्या विद्यमान पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा करण्याची गरज आहे. विशेषतः, दुर्गम ठिकाणांहून नवीकरणीय ऊर्जा एकत्रित करण्यासाठी वीज पारेषण पायाभूत सुविधांचा विस्तार करणे आवश्यक आहे.
5. आधुनिक ग्रीड पायाभूत सुविधांच्या अभावामुळे हरित ऊर्जेच्या प्रयत्नांना खीळ बसू शकते आणि अकार्यक्षमता निर्माण होऊ शकते.
6. भूसंपादन: नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांसाठी, विशेषतः सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी, भूसंपादन करणे हे एक मोठे आव्हान आहे. दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये आणि जमिनीच्या वापरासाठी स्पर्धात्मक मागण्या असलेल्या प्रदेशांमध्ये ही समस्या अधिक तीव्र आहे.

7. अवलंबित्व: भारत अजूनही आपल्या प्राथमिक ऊर्जेच्या गरजांपैकी ४०% पेक्षा जास्त ऊर्जा आयात करतो, ज्याचे वार्षिक मूल्य ९० अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त आहे. संशोधन आणि विकास (R&D) मध्ये, विशेषतः नवीकरणीय ऊर्जेसाठीच्या साठवणूक उपायांमध्ये अधिक गुंतवणुकीची गरज आहे.

**निष्कर्ष :**

भारताचे हरित अर्थव्यवस्थेकडे होणारे संक्रमण हे शाश्वत विकासासाठी अत्यावश्यक असून, त्यामुळे पर्यावरणदृष्ट्या जबाबदार धोरणे आणि गुंतवणुकीच्या माध्यमातून रोजगार निर्मिती, हवामान बदलांना तोंड देण्याची क्षमता, स्वच्छ तंत्रज्ञानाचा विस्तार आणि दीर्घकालीन आर्थिक वाढीसाठी प्रचंड संधी उपलब्ध होतात.

1. रोजगार निर्मिती: जागतिक आर्थिक मंचाच्या अंदाजानुसार, भारताच्या निव्वळ-शून्य अर्थव्यवस्थेकडे होणाऱ्या संक्रमणामुळे ५ कोटी रोजगार निर्माण होऊ शकतात आणि अर्थव्यवस्थेत १५ ट्रिलियन डॉलर्सचे योगदान मिळू शकते.
2. आर्थिक वाढ आणि नवोपक्रम: हरित अर्थव्यवस्थेकडे संक्रमण केल्याने कमी-कार्बन तंत्रज्ञान आणि पद्धतींना प्रोत्साहन मिळते, ज्यामुळे विविध क्षेत्रांमध्ये नवोपक्रम आणि नवीन व्यावसायिक संधी निर्माण होतात आणि शाश्वत आर्थिक वाढीस चालना मिळते.
3. पर्यावरणीय जोखीम कमी करणे: हरित आर्थिक पद्धतींचा अवलंब केल्याने पर्यावरणीय जोखीम आणि संसाधनांची कमतरता लक्षणीयरीत्या कमी होते, ज्यामुळे भावी पिढ्यांसाठी दीर्घकालीन पर्यावरणीय संतुलन आणि शाश्वतता सुनिश्चित होते.
4. सामाजिक समावेशन आणि समानता: हरित अर्थव्यवस्था सर्वसमावेशक वाढीवर भर देते, शाश्वत विकासाचे फायदे समानतेने वाटले जातील याची खात्री करते, त्याद्वारे असमानता कमी करते आणि सामाजिक कल्याणाला चालना देते.
5. शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगतता: हरित अर्थव्यवस्था धोरणांची अंमलबजावणी ही जागतिक शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत आहे , विशेषतः स्वच्छ ऊर्जा, शाश्वत शहरे आणि हवामान कृती यांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या उद्दिष्टांशी, ज्यामुळे विकासासाठी एका समग्र दृष्टिकोनाला चालना मिळते.

आशाप्रकारे भारतात हरित अर्थव्यवस्थेवर लक्ष केंद्रित करून पर्यावरण पूरक साधानांचा वापर करून आर्थिक विकास साधने आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी पर्यावरण पूरक वातावरण निर्माण करून देशाचा आणि जगाच्या शाश्वत विकासाला प्रोत्साहन देऊ.

**संदर्भ ग्रंथ :**

1. आर्थि नियाजन आणि विकास – निराळी पुब्लिकटीओण ,लेखक डॉ. र. के. दातिर ,जी. जे. लोमटे ,आर. एम. चितांनीमणी
2. https://vajiramandravi.com/upsc-exam/green-gdp/
3. https://www.unep.org/regions/asia-and-pacific/regional-initiatives/supporting-resource-efficiency/green-economy
4. https://www.orfonline.org/marathi/expert-speak/green-taxonomies-a-tool-with-underutilised-potential0

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२५ : राजकीय पुनर्रचना, आणि तळागाळातील लोकशाही

**डॉ. प्रभाकर जगताप [1], धुमाळ तृप्ती दादासाहेब [2], रोहित रामदास काळे [3]**
[1](लेखक), सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, एच.आर.एम. महाविद्यालय, राजगुरुनगर (खेड)
[2, 3](सहलेखक) संशोधन विद्वान, राज्यशास्त्र विभाग
**ईमेल:** prabhat044@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180411
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 52-56
April - 2026
**Submitted:** 11 Mar. 2026
**Revised:** 25 Mar 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

*सारांश (Abstract)*

*महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २०२५ मधील निवडणुका या राज्यातील राजकीय पुनर्रचनेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेल्या आहेत. पहिल्या टप्प्यात २४६ नगरपालिका व ४२ नगरपंचायतींसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान पार पडले. पारंपरिकरीत्या सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांच्यातच खरी लढत अपेक्षित असताना, प्रत्यक्षात सत्ताधारी घटकांतीलच अंतर्गत स्पर्धा अधिक ठळकपणे दिसून आलेली आपल्याला पाहायला मिळते. विशेषतः भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गट यांच्यातील थेट संघर्षामुळे विरोधी पक्षांचे अस्तित्व अनेक ठिकाणी नाममात्र उरल्याचे चित्र निर्माण झालेले आहे. या निवडणुकांमध्ये तळागाळातील कार्यकर्त्यांची भूमिका निर्णायक ठरलेली असली, तरीही राजकीय पक्षांनी नातेसंबंधांवर आधारित उमेदवारांना प्राधान्य देत आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. राज्य निवडणूक आयोग आणि प्रशासनाने निवडणुका पारदर्शक व निःपक्षपणे पार पाडण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. तरीसुद्धा काही ठिकाणी पैशांचे वाटप, दबाव तंत्रे व स्थानिक वाद यांसारख्या घटनांनी निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण केलेले आहे. तरीसुद्धा, एकूणच मतदान प्रक्रिया शांततापूर्ण व लोकसहभागाने परिपूर्ण राहिल्याचे आपल्याला दिसून येते. समाजमाध्यमे व न्यायव्यवस्था यांनी निवडणूक प्रक्रियेला अधिक पारदर्शकता व उत्तरदायित्व प्रदान करण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.*

***महत्वाचे शब्द:*** *स्थानिक स्वराज्य संस्था ,राजकीय पुनर्रचना, तळागाळातील लोकशाही, महायुती व महाविकास आघाडी प्रक्रिया व पारदर्शकता, राज्य निवडणूक आयोग*

## प्रस्तावना

भारतीय लोकशाही व्यवस्थेत स्थानिक स्वराज्य संस्था या शासन व्यवस्थेचा पाया मानल्या जातात. ग्रामपातळीपासून शहरपातळीपर्यंत लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून शासनाची अंमलबजावणी करण्यासाठी या संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडतात. महाराष्ट्र राज्यात नगरपालिका, नगरपंचायती, महानगरपालिका व पंचायत राज संस्था यांद्वारे स्थानिक प्रशासन चालवले जाते. २०२५ मधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या केवळ सत्ता संघर्षापुरत्या मर्यादित राहिलेल्या नसून राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांचे प्रतिबिंब ठरलेल्या आहेत. विशेषतः सत्ताधारी पक्षांतील गटबाजी, अंतर्गत स्पर्धा आणि राजकीय पुनर्रचनेची प्रक्रिया या निवडणुकांमधून आपल्याला स्पष्टपणे दिसून आलेली आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. प्रभाकर जगताप लेखक, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, एच.आर.एम. महाविद्यालय, राजगुरुनगर (खेड)*

**How to cite this article:**
*प्रभाकर जगताप, धुमाळ, तृप्ती. दादासाहेब. & काळे, रोहित. रामदास. (2026). महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२५: राजकीय पुनर्रचना, आणि तळागाळातील लोकशाही. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 52–56. https://doi.org/10.5281/zenodo.21428351*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21428351
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

यामुळे पारंपरिक द्विपक्षीय लढतीऐवजी बहुकोनी संघर्षाचे स्वरूप निर्माण झालेले होते. तळागाळातील लोकशाही बळकट करण्यासाठी या निवडणुकांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे आपल्याला जाणवते .त्यामुळेच स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळते, तसेच नागरिकांचा त्यामुळे थेट सहभाग वाढण्यास मदत होते. तरी सुद्धा राजकीय हस्तक्षेप, नातेसंबंधांवर आधारित उमेदवारी व निवडणूक प्रक्रियेतील अनियमितता यांसारख्या आव्हानांमुळे लोकशाहीच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित झालेले आपल्याला पाहायला मिळते.

**साहित्य समीक्षा:-**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा अभ्यास करताना भारतीय लोकशाहीतील विकेंद्रीकरण, पंचायत राज व्यवस्था आणि राज्यस्तरीय राजकारणातील बदलत्या प्रवाहांचा सैद्धांतिक व अनुभवाधारित संदर्भ महत्त्वाचा ठरतो. उपलब्ध साहित्याच्या आधारे या संशोधनाच्या विषयाशी संबंधित विविध पैलू पुढीलप्रमाणे मांडता येतात.प्रथम, स्थानिक स्वराज्य व्यवस्थेची संकल्पना व रचना स्पष्ट करताना S. R. Maheshwari (2003) यांनी भारतातील स्थानिक प्रशासनाची ऐतिहासिक व संस्थात्मक मांडणी केली आहे. त्यांच्या मते, स्थानिक संस्था या केवळ प्रशासकीय घटक नसून लोकशाहीच्या सुदृढीकरणाचे प्रमुख साधन आहेत. त्याचप्रमाणे Granville Austin (1999) यांनी भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत विकेंद्रीकरणाचे महत्त्व अधोरेखित करताना स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीच्या “cornerstone” म्हणून वर्णिल्या आहेत.

द्वितीय, पंचायत राज व्यवस्थेच्या कार्यप्रणाली व स्थितीचा अभ्यास करताना George Mathew (2000) तसेच Mathew आणि Nair (1995) यांनी विविध राज्यांतील पंचायत राज संस्थांच्या अंमलबजावणीतील असमानता, सहभागात्मक लोकशाही (Participatory Democracy) आणि स्थानिक सत्ताकारणातील सामाजिक घटकांचा प्रभाव यांचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांच्या निष्कर्षांनुसार, स्थानिक पातळीवरील लोकसहभाग हा लोकशाहीच्या गुणवत्तेला थेट प्रभावित करतो; तथापि, राजकीय हस्तक्षेप व प्रशासकीय मर्यादा यामुळे अपेक्षित परिणाम साध्य होत नाहीत.

तृतीय, विकेंद्रीकरण व स्थानिक शासनाच्या व्यापक चौकटीचा विचार करताना T. R. Raghunandan (2013) यांनी भारतीय अनुभवाचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, संस्थात्मक विकेंद्रीकरण झाले असले तरी वास्तविक सत्तेचे हस्तांतरण (Devolution of Power) अपूर्ण राहिले आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यक्षमता मर्यादित होते.

महाराष्ट्राच्या संदर्भात उपलब्ध साहित्य विशेषतः उपयुक्त ठरते. S. Goswami (2010) यांनी महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य व्यवस्थेची रचना, कार्ये व आव्हाने यांचा अभ्यास करताना प्रशासनिक आणि राजकीय घटकांमधील परस्परसंबंध स्पष्ट केले आहेत. त्याचप्रमाणे B. Mujumdar (2005) यांनी महाराष्ट्रातील राजकारणातील संरचनात्मक बदल, सत्तासंघर्ष व सामाजिक समीकरणांचे विश्लेषण केले आहे, जे स्थानिक निवडणुकांच्या परिणामांच्या अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण पार्श्वभूमी प्रदान करते.आधुनिक राजकीय प्रक्रियांच्या संदर्भात Suhas Palshikar आणि Rajeshwari Deshpande (2014) यांनी महाराष्ट्रातील समकालीन राजकारणातील बहुपक्षीय स्पर्धा, आघाडी राजकारण (Coalition Politics) आणि मतदारांच्या वर्तनातील बदल यांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, पारंपरिक द्विपक्षीय स्पर्धेऐवजी बहुकोनी राजकीय स्पर्धा ही नव्या राजकीय वास्तवाची ओळख बनली आहे, जे २०२५ च्या स्थानिक निवडणुकांच्या विश्लेषणाशी सुसंगत दिसून येते.

स्थानिक पातळीवरील पंचायत राज व्यवस्थेतील आव्हानांचा अभ्यास करताना S. V. Kadam (2012) यांनी महाराष्ट्रातील पंचायत राज संस्थांमधील प्रशासकीय अडचणी, आर्थिक मर्यादा व राजकीय हस्तक्षेप यांचा सविस्तर ऊहापोह केला आहे. त्यांच्या निष्कर्षांनुसार, तळागाळातील लोकशाही बळकट करण्यासाठी संस्थात्मक सुधारणा आवश्यक आहेत.शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात R. Ghotkar (2016) यांनी नगरपालिका प्रशासनाचा अभ्यास करताना शहरी शासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सेवा वितरणातील अडचणी यांवर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या मते, शहरीकरणाच्या वाढत्या प्रक्रियेमुळे स्थानिक संस्थांवर ताण वाढत असून त्यासाठी सक्षम धोरणांची गरज आहे.वरील सर्व साहित्याचा एकत्रित विचार करता काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे समोर येतात. एक म्हणजे, स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अत्यावश्यक असल्या तरी त्यांची कार्यक्षमता राजकीय हस्तक्षेप, गटबाजी आणि संसाधनांच्या अभावामुळे मर्यादित राहते. दुसरे म्हणजे, राज्यस्तरीय राजकीय बदलांचा थेट परिणाम स्थानिक निवडणुकांवर होत असून मतदारांचे वर्तन अधिक व्यक्तिनिष्ठ व परिस्थितीनिष्ठ होत आहे. तिसरे म्हणजे, सहभागात्मक लोकशाहीचा आदर्श अजूनही पूर्णत्वास गेलेला नाही.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

तथापि, विद्यमान साहित्यामध्ये २०२५ मधील महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील "सत्ताधारी पक्षांतील अंतर्गत स्पर्धा", "पक्षफुटीचा तळागाळातील परिणाम" आणि "समकालीन राजकीय पुनर्रचना" या विशिष्ट घटकांचा सखोल अभ्यास मर्यादित प्रमाणात आढळतो. त्यामुळे प्रस्तुत संशोधन हे या उणिवा भरून काढण्याचा प्रयत्न करत असून, तळागाळातील लोकशाहीच्या बदलत्या स्वरूपाचे अद्ययावत विश्लेषण करण्यास हातभार लावते.

**संशोधन उद्दिष्टे**

या संशोधनाचा मुख्य हेतू महाराष्ट्रातील २०२५ च्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे सखोल विश्लेषण करणे हा आहे. त्याअंतर्गत पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत:

1. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील राजकीय पुनर्रचनेचा अभ्यास करणे.
2. सत्ताधारी पक्षांतील अंतर्गत स्पर्धा व तिचा निवडणूकीच्या परिणामांवर होणाऱ्या प्रभावाचे विश्लेषण करणे.
3. तळागाळातील लोकशाही प्रक्रियेत कार्यकर्त्यांची भूमिका व त्यांच्या सहभागाचे मूल्यमापन करणे.
4. निवडणूक प्रक्रियेत प्रशासन, राज्य निवडणूक आयोग व न्यायव्यवस्थेची भूमिका तपासणे.
5. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता, प्रलोभने व दबाव तंत्रे यांचा परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पद्धतशास्त्र**

या संशोधनासाठी गुणात्मक व परिमाणात्मक या दोन्ही पद्धतींचा वापर करण्यात आलेला आहे.

१.माहिती संकलन

प्राथमिक माहिती

निवडणूक प्रक्रियेत सहभागी कार्यकर्ते, उमेदवार व मतदार यांच्या मुलाखती क्षेत्रीय निरीक्षण

द्वितीयक माहिती

राज्य निवडणूक आयोगाचे अहवाल, वृत्तपत्रे, संशोधन लेख व शासकीय दस्तऐवज, समाजमाध्यमांवरील विश्लेषण

२.नमुना निवड: उद्देशपूर्ण नमुना निवड पद्धतीचा वापर करून विविध नगरपालिका व नगरपंचायतींची निवड करण्यात आली.

३.डेटा विश्लेषण-गुणात्मक माहितीचे विषयानुसार वर्गीकरण, परिमाणात्मक माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण

४.मर्यादा: सर्व क्षेत्रांचा समावेश करणे शक्य नसल्याने काही निष्कर्ष मर्यादित क्षेत्रापुरते लागू राहू शकतात

काही माहिती अप्रत्यक्ष स्रोतांवर आधारित असल्याने अचूकतेची मर्यादा

संशोधन पद्धतशास्त्र-या संशोधनासाठी गुणात्मक व परिमाणात्मक या दोन्ही पद्धतींचा वापर करण्यात आलेला आहे.

**तळागाळातील लोकशाहीचे महत्त्व**

१.तळागाळातील लोकशाही ही भारतीय लोकशाही व्यवस्थेची मूलभूत शक्ती मानली जाते. कारण स्थानिक स्वराज्य संस्था नागरिकांना शासन प्रक्रियेत थेट सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात महत्वाची भूमिका बजावतात. या संस्थांमुळे लोकप्रतिनिधित्व अधिक व्यापक व समावेशक होते. त्यामुळे विविध सामाजिक घटकांना राजकारणात प्रवेश करण्याची संधी मिळते.

२.मतदारांच्याप्रती उत्तरदायित्व वाढते. स्थानिक पातळीवरील प्रतिनिधी हे थेट जनतेसमोर उत्तरदायी असल्याकारणामुळे प्रशासन अधिक पारदर्शक राहते.

३.विकासाभिमुख धोरणे स्थानिक गरजांनुसार आखली जातात. नगरपालिकांद्वारे पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते इत्यादी मूलभूत सेवा प्रभावीपणे पुरवल्या जातात.

४. तळागाळातील लोकशाही ही राजकीय नेतृत्वाची शाळा म्हणून कार्य करण्यात महत्वाची भूमिका बजावते. अनेक मोठे नेते स्थानिक पातळीवरूनच उदयास आल्याचे आपल्याला पाहायला मिळते.

सद्यस्थितीत राजकीय हस्तक्षेप, आर्थिक मर्यादा व गटबाजी यांमुळे लोकशाहीच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे आपल्याला प्रकर्षाने जाणवते. तरीसुद्धा आपली लोकशाही धीरोदात्तपणे प्रत्येक संकटावर मात करून ताठ मानेने उभी आहे. कारण तिची पाळेमुळे खोलवर जनमानसात रुजलेली आपल्याला पाहायला मिळते.

**पक्षफुटीचा तळागाळातील लोकशाहीवर होणारा परिणाम**

महाराष्ट्रातील अलीकडील राजकीय घडामोडींमध्ये पक्षफुटी हा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरलेला आहे. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटींमुळे स्थानिक पातळीवरील राजकारणावर पुढीलप्रमाणे परिणाम झाल्याचे आपल्याला दिसून येते.

1. मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे . एकाच पक्षाचे वेगवेगळे गट निर्माण झाल्यामुळे मतदारांसाठी ओळख निश्चित करणे कठीण झालेले आहे.
2. विचारधारात्मक कमकुवतपणा दिसून आलेला आहे . सत्तेसाठी विविध विचारधारांचे पक्ष एकत्र येत असल्यामुळे राजकीय मूल्यांमध्ये अस्पष्टता निर्माण झाल्याची जाणवते.
3. स्थानिक पातळीवरील गटबाजी वाढलेली आहे. यामुळे प्रशासनातील स्थैर्य कमी झाल्याचे व विकासकामांवर परिणाम झाल्याचे दिसून येते.
4. लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास कमी होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे . मतदारांचा विश्वास डळमळीत होणे हे लोकशाहीसाठी धोकादायक ठरू शकते. काही अभ्यासकांच्या मते, या प्रक्रियेमुळे मतदार अधिक जागरूक होऊन व्यक्तिनिष्ठ व स्थानिक मुद्द्यांवर आधारित मतदान करण्याकडे वळतात. लोकशाहीची वाटचाल खडतर परिस्थितीतून जरी होत असली तरी लोकशाहीला पुन्हा पालवी नक्कीच फुटेल. आणि यातुन तिचा अजून प्रगल्भतेकडे वाटचाल करण्याचा प्रवास अविरत सुरू राहील.

**निवडणूक निकालांची कारणमीमांसा**

महाराष्ट्रातील २०२५ च्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल हे पारंपरिक राजकीय समीकरणांपेक्षा वेगळे व बहुआयामी स्वरूपाचे आपल्याला दिसून येतात. यामागील प्रमुख कारणांमध्ये पुढील बाबींचा आपल्याला समावेश करता येईल.

१. राज्यातील राजकीय पुनर्रचना ही सर्वात महत्त्वाची बाब आपल्याला यात जाणवते. २०१९ नंतर निर्माण झालेल्या नव्या आघाड्या, त्यानंतरच्या फुटी व सत्तांतरामुळे मतदारांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे मतदारांनी पक्षनिष्ठेपेक्षा स्थानिक उमेदवार, त्यांची सामाजिक प्रतिमा व व्यक्तिगत संपर्क यांना अधिक महत्त्व दिल्याचे आपल्याला यात जाणवते.

२. सत्ताधारी पक्षांतील अंतर्गत स्पर्धा हा एक निर्णायक घटक आपल्याला यात दिसून येतो. भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गट यांच्यातील स्थानिक पातळीवरील संघर्षामुळे निवडणूक बहुकोनी झाली. परिणामी, विरोधी पक्षांना अपेक्षित संधी न मिळता सत्ताधारी गटांतीलच स्पर्धा अधिक ठळक झालेली आपल्याला पाहायला मिळाली.

३.नातेसंबंधांवर आधारित उमेदवारी ही प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर आपल्याला दिसून आलेली आहे . स्थानिक पातळीवर राजकीय घराणेशाहीचा प्रभाव वाढल्यामुळे कार्यकर्त्यांच्या संधी मर्यादित झाल्याचे आपल्याला प्रकर्षाने जाणवले. त्यामुळे तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये अन्याय झाल्याची भावना निर्माण झालेली आपल्याला पाहायला मिळाली.

४.ओबीसी आरक्षण व न्यायालयीन हस्तक्षेप यामुळे मतदारसंघांच्या रचनेत बदल झालेला आहे. त्यामुळे सामाजिक समीकरणांवर त्याचा थेट परिणाम झाल्याचे आपल्याला जाणवते.

५.समाजमाध्यमांचा प्रभाव व स्थानिक प्रचारतंत्रातील बदल यामुळे मतदारांच्या निर्णयप्रक्रियेत नव्या घटकांची भर पडलेली असल्याचे आपल्याला दिसून येते.

**संदर्भ सूची:-**

1. Maheshwari, S. R. (2003). Local government in India. Laxmi Narain Agarwal Publishers.
2. Mathew, G. (Ed.). (2000). Status of Panchayati Raj in the states of India. Institute of Social Sciences.
3. Austin, G. (1999). The Indian constitution: Cornerstone of a nation. Oxford University Press.
4. Goswami, S. (2010). Local self-government in Maharashtra. Sudarshan Publications.
5. Mujumdar, B. (2005). Politics of Maharashtra: Structure and change. Granthali.
6. Palshikar, S., & Deshpande, R. (2014). Contemporary politics in Maharashtra. Sage Publications.
7. Kadam, S. V. (2012). Panchayati Raj in Maharashtra: Issues and challenges. Shivaji University Press.
8. Ghotkar, R. (2016). Municipal administration in Maharashtra: A study of urban local bodies. Prabodhan Publications.

9. Mathew, G., & Nair, T. K. (1995). Participatory democracy and Panchayati Raj in India. Indian Social Institute.
10. Raghunandan, T. R. (2013). Decentralisation and local governments: The Indian experience. Orient Blackswan.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# सेवा क्षेत्रातील तालुकानिहाय असमतोल आणि त्याची शाश्वत विकासातील भूमिका: विशेष संदर्भ- पुणे जिल्हा

**रचना दत्तात्रय कोळपे[1], प्रा. डॉ. संजीव संपतराव लाटे [2]**
[1]संशोधक विद्यार्थी, राजगड ज्ञानपीठ, अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर
[2]प्राचार्य, अमृतेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, विंझर

**Manuscript ID**:
JRD -2026-180412
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 57-62
April - 2026
**Submitted:** 11 Mar. 2026
**Revised:** 25 Mar 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***गोषवारा:***

*महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि सेवा-आधारित अर्थव्यवस्थेत पुणे जिल्ह्याचे स्थान अत्यंत मोलाचे आहे. पुणे जिल्हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा औद्योगिक व सेवा केंद्र म्हणून ओळखला जातो. शिक्षण, माहिती तंत्रज्ञान, पर्यटन, वित्त, आरोग्य, वाहतूक व व्यापार यांसारख्या सेवा क्षेत्रांनी या जिल्ह्याच्या आर्थिक विकासात मोलाचा वाटा उचलला आहे. माहिती तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण, आणि पर्यटन यांसारख्या सेवांमुळे जिल्ह्याचा वेगाने आर्थिक विकास झाला असला तरी, सर्व तालुक्यांमध्ये ही प्रगती समान दराने झालेली नाही. भौगोलिक परिस्थिती आणि पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेतील फरकामुळे सेवा क्षेत्राच्या उत्पादकतेत मोठी तफावत दिसून येते. हवेली, पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड यांसारख्या शहरी भागांत वित्तीय व तांत्रिक सेवांचा उत्तम विकास झाला आहे. याउलट भोर, वेल्हे, मावळ आणि जुन्नर यांसारख्या तालुक्यांमध्ये मानवी भांडवल व पायाभूत सुविधांच्या अभावामुळे विकासाचा वेग मंदावला आहे. हा असमतोल दूर करण्यासाठी आणि सेवा क्षेत्राचा सर्वसमावेशक व शाश्वत विकास साधण्यासाठी ग्रामीण भागात कौशल्य विकास, उद्योजकता प्रोत्साहन आणि डिजिटल सुविधांवर भर देणे अत्यंत गरजेचे आहे*

***संकेतशब्द:*** *पुणे जिल्हा, शाश्वत विकास, तालुकानिहाय असमतोल, सेवा क्षेत्र असंतुलन, उत्पादकता, प्रादेशिक विकास, रोजगार निर्मिती, ग्रामीण-शहरी असमानता, आर्थिक विकास, सामाजिक विकास, पायाभूत सुविधा.*

## प्रस्तावना:

महाराष्ट्र राज्यातील आर्थिक विकासामध्ये सेवा क्षेत्राचा वाटा दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः पुणे जिल्हा हा माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य, वित्तीय सेवा, पर्यटन आणि वाहतूक क्षेत्रातील प्रगतीमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा जिल्हा बनला आहे. शाश्वत विकास (Sustainable Development) साधण्यासाठी केवळ आर्थिक गुंतवणूक पुरेशी नसते, तर त्यासाठी मजबूत 'संस्थात्मक पाया' (Institutional Framework) आवश्यक असतो. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, बँकिंग आणि सूक्ष्म वित्तसंस्था यांसारख्या सेवा देणाऱ्या संस्थांचा विकास झाल्याने स्थानिक अर्थव्यवस्थेत सुधारणा होते. तरीही, या विकासात एकसमानता नसल्याचे दिसून येते; काही तालुक्यांमध्ये सेवा क्षेत्राचा वाटा जिल्ह्याच्या जीडीपी मध्ये ६० टक्क्यांहून अधिक आहे, तर काही ठिकाणी तो २० टक्क्यांच्या आसपास आहे. तथापि, जिल्ह्यातील सर्व तालुके या प्रगतीत समानरीत्या सहभागी झालेले नाहीत. काही तालुके सेवा क्षेत्रात अत्यंत प्रगत आहेत, तर काही मागास आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*रचना दत्तात्रय कोळपे संशोधक विद्यार्थी, राजगड ज्ञानपीठ, अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर*

**How to cite this article:**
*कोळपे, रचना. दत्तात्रय. & लाटे, संजीव. संपतराव. (2026). सेवा क्षेत्रातील तालुकानिहाय असमतोल आणि त्याची शाश्वत विकासातील भूमिका: विशेष संदर्भ- पुणे जिल्हा. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 57–62. https://doi.org/10.5281/zenodo.21436545*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21436545

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासात पुणे जिल्ह्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. पुणे हे राज्यातील आणि देशातील सेवा क्षेत्राचे एक प्रमुख केंद्र मानले जाते. माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, बँकिंग, वित्तीय सेवा, आरोग्य, पर्यटन, वाहतूक, दळणवळण, विमा, किरकोळ व्यापार आणि सार्वजनिक प्रशासन या विविध सेवा क्षेत्रांनी पुणे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे. सेवा क्षेत्र हे केवळ शहरी भागापुरते मर्यादित न राहता ग्रामीण भागातही रोजगार आणि उत्पन्ननिर्मितीचे एक प्रभावी साधन बनले आहे. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, बँकिंग, वाहतूक, ग्रामीण पर्यटन आणि सूक्ष्म वित्तसंस्था यांसारख्या सेवा क्षेत्रांचा विकास झाल्याने तालुक्यांतील स्थानिक अर्थव्यवस्थेत सुधारणा झाली आहे. तथापि, या विकासात एकसमानता नसल्याचे दिसून येते. काही तालुक्यांमध्ये सेवा क्षेत्राचा वाटा जिल्ह्याच्या जीडीपी मध्ये ६० टक्क्यांहून अधिक आहे, तर काही ठिकाणी तो २० टक्क्यांच्या आसपास आहे. प्रत्येक तालुक्यातील सेवा क्षेत्राची उत्पादकता तपासण्यासाठी रोजगार निर्मिती, उत्पन्न पातळी, सेवा उद्योगांची संख्या, गुंतवणूक, तंत्रज्ञानाचा वापर, शैक्षणिक पातळी, पायाभूत सुविधा आणि शासनाच्या योजनांचा प्रभाव या घटकांचा विचार केला पाहिजे. सेवा क्षेत्राची उत्पादकता हे केवळ आर्थिक वृद्धीचे निर्देशक नसून, मानवी विकासाचा आणि जीवनमानातील सुधाराचा द्योतक आहे.

पुणे जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये सेवा क्षेत्राच्या विकासाचे स्वरूप भिन्न आहे. **पुणे शहर**, **पिंपरी-चिंचवड** आणि **हवेली** हे तालुके माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य, वित्तीय सेवा आणि रिअल इस्टेट या क्षेत्रांमध्ये सर्वाधिक प्रगत आहेत. येथे शिक्षित आणि तांत्रिक मनुष्यबळाची उपलब्धता, उत्कृष्ट पायाभूत सुविधा, दळणवळणाचे जाळे आणि बाजारपेठेचा विस्तार या घटकांमुळे सेवा क्षेत्राची उत्पादकता उच्च आहे. दुसरीकडे **बारामती**, **दौंड**, **इंदापूर**, **शिरूर**, **खेड** आणि इतर ग्रामीण तालुक्यांमध्ये सेवा क्षेत्र तुलनेने मर्यादित असून तेथे प्रामुख्याने कृषीपूरक व स्थानिक सेवा कार्यरत आहेत. तालुकानिहाय सेवा क्षेत्राच्या विकासातील असमानता कमी करून संतुलित आणि समावेशक आर्थिक विकास साधण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविणे हा या अभ्यासाचा महत्त्वाचा हेतू आहे.

अशा प्रकारचा तुलनात्मक अभ्यास केवळ आकडेवारीचा विश्लेषण न राहता, सामाजिक व आर्थिक प्रगतीचे परिमाण समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरतो. त्यामुळे “पुणे जिल्ह्याच्या शाश्वत विकासामध्ये सेवा क्षेत्राची भूमिका: एक विश्लेषणात्मक अभ्यास” हा जिल्ह्याच्या एकूण शाश्वत विकासाचे आणि सेवा क्षेत्राच्या प्रगतीचे वास्तव चित्र उभे करण्यास सहाय्यक ठरेल.

**संदर्भ साहित्याचा आढावा:**

१) जे. एस. इंगळे (२०१२): यांच्या मते, भारतातील प्रादेशिक असमानता ही विकासातील मोठी अडचण आहे. सरकारी अंदाजपत्रकाद्वारे मागासलेल्या राज्यांसाठी आणि जिल्ह्यांसाठी योग्य आर्थिक तरतूद केल्यास हा असमतोल बऱ्याच अंशी दूर करता येऊ शकतो.

२) एस. आर. केशव (२०१४): यांनी परकीय गुंतवणुकीतील (FDI) असमानतेवर प्रकाश टाकला आहे. प्रगत पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळ असलेल्या ठराविक राज्यांमध्येच बहुतांश गुंतवणूक केंद्रित होते. मागास राज्यांनी प्रशासकीय पारदर्शकता आणि सवलती दिल्यास हा प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत होईल.

**३) चौधरी आणि खाचणे (२०१४):** यांनी महाराष्ट्रातील विकासाच्या असमतोलावर उपाय सुचवले आहेत. ग्रामीण भागात उद्योगांचे विकेंद्रीकरण करणे, सिंचन व आरोग्य सुविधा समान प्रमाणात उपलब्ध करून देणे आणि मागास भागांसाठी विशेष आर्थिक नियोजन करणे या बाबींवर त्यांनी भर दिला आहे.

**४) बच्छव सोनवणे (२००९):** यांच्या अभ्यासानुसार, 'विशेष आर्थिक क्षेत्रांच्या' (SEZ) निर्मितीमुळे प्रादेशिक असमतोल कमी होण्याऐवजी तो अधिकच वाढण्याची शक्यता आहे. कारण उद्योजक आधीच प्रगत असलेल्या राज्यांना पसंती देतात, ज्यामुळे देशांतर्गत आर्थिक आणि सामाजिक विषमता अधिक गडद होते.

**संशोधन पद्धती:**

सदरील शोधनिबंधासाठी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यामधून एकूण चौदा तालुक्यांची निवड करण्यात आली असून यामध्ये बारामती, इंदापूर, शिरूर, पुरंदर, हवेली, पुणे शहर, दौंड, जुन्नर, खेड, आंबेगाव, मावळ, मुळशी, भोर, वेल्हा यांचा समावेश करण्यात आला आहे. संशोधनातील नमुना निवडीसाठी द्वितीय स्त्रोतांचा वापर केला आहे.

तथ्य संकलनाचे स्त्रोत:

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

अ] व्दितीय/ दुय्यम स्त्रोत : प्रबंध, नियतकालिके, संदर्भ पुस्तके, शासकीय अहवाल, शोधनिबंध इत्यादी.

**उद्दिष्टे:**

१. पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय सेवा क्षेत्रातील असमतोलाचा अभ्यास करणे.

२. पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय सेवा क्षेत्रातील असमतोलाच्या कारणांचा अभ्यास करणे.

३. पुणे जिल्ह्यातील सेवा क्षेत्रातील विकसित तालुक्यांचा अभ्यास करणे.

**गृहीतकृत्य:**

१. पुणे जिल्ह्यातील दुर्गम भागातील तालुके सेवा क्षेत्राच्या दृष्टीने मागास आहेत.

२. पायाभूत सुविधांच्या अभावामुळे दुर्गम भागातील तालुके सेवा क्षेत्राच्या दृष्टीने मागास आहेत.

**संशोधनाचे महत्व:**

पुणे जिल्हा हा महाराष्ट्रातील एक प्रमुख आर्थिक, शैक्षणिक आणि औद्योगिक केंद्र आहे. या जिल्ह्यात शहरी आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विषमता आढळते. विशेषतः सेवा क्षेत्रातील (शिक्षण, आरोग्य, बँकिंग, पर्यटन, माहिती व तंत्रज्ञान इ.) विकास तालुकानिहाय असमतोल दिसून येतो. हा असमतोल जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला मोठी आव्हाने निर्माण करतो. या संशोधन पेपरमध्ये पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील सेवा क्षेत्रातील असमतोलाचे विश्लेषण केले आहे. याद्वारे पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय सेवा क्षेत्रातील असमानता स्पष्ट होईल. कोणता तालुका सेवा क्षेत्रातील कोणत्या घटकात अधिक प्रगत आहे आणि कुठे कमी आहे, हे लक्षात येईल. त्यामुळे शासन, उद्योग विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना संतुलित विकासासाठी धोरण ठरविण्यास मदत होईल. तसेच ग्रामीण भागात सेवा क्षेत्राचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक दिशा मिळेल. त्यामुळे या संशोधनाचा उद्देश म्हणजे तालुकानिहाय सेवा क्षेत्रातील उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास करून, त्यातील फरकांची कारणमीमांसा करणे व विकासासाठी धोरणात्मक सूचना देणे हा आहे

**स्पष्टीकरण व समस्या सूत्रण:**

पुणे जिल्ह्यात १३ तालुके व पुणे शहर असे विभाजन आहे. यातील मावळ, मुळशी, भोर, वेल्हा, खेड, आंबेगाव, जुन्नर या तालुक्यात सह्याद्रीच्या पायथ्याच्या प्रदेशाचा समावेश होतो. त्यामुळे या तालुक्यातील काही भाग दुर्गम डोंगरांचा आहे तसेच शिरूर, हवेली, बारामती, इंदापूर, पुरंदर दौंड व पुणे शहर या तालुक्यातील भाग हा सपाट अशा पठारी प्रदेशात आहे. पुणे जिल्ह्यात पशुधन व दुग्ध उत्पादनाचा विकास देखील मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. तसेच येथे कृषी संलग्न सेवा व उद्योग देखील मोठ्या प्रमाणावर आहे. पुणे जिल्ह्यातील सेवा क्षेत्रातील असमतोल हा केवळ आर्थिक प्रश्न नसून, सामाजिक न्याय आणि संतुलित विकासाचा मुद्दा आहे. जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांमध्ये समान विकास होण्यासाठी शासन, नागरी संस्था आणि स्थानिक समुदाय यांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील सेवा क्षेत्राचा विकास झाल्यास पुणे जिल्हा खऱ्या अर्थाने 'समृद्ध महाराष्ट्राचे प्रतीक' बनू शकेल.

तक्ता क्र. १: तालुकानिहाय सामाजिक/सार्वजनिक सेवांची उपलब्धता.

सदरील तक्त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय सेवाक्षेत्र दर्शविले आहेत.

संदर्भ वर्ष: २०२३-२४

| अ. क्र | तालुके | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | सामाजिक/सार्वजनिक सेवा | | | | पर्यटन | गोदमांची संख्या | प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विद्युतीकरण झालेल्या गावांची संख्या | आरोग्यसेवा सुविधा असलेली गावे | कृषीउत्पन्न बाजार समिती संख्या | बारमाही रस्ते असलेली गावांची संख्या | | | |
| १ | बारामती | ३२ | ११६ | ११६ | १ | १११ | २ | २ | १०७ |
| २ | इंदापूर | ३० | १४२ | १४२ | १ | १४५ | १ | ३ | ११५ |
| ३ | शिरूर | २८ | ११९ | ११५ | १ | ११९ | ७ | ५ | ९३ |
| ४ | पुरंधर | १३ | १०७ | १०७ | ० | १०७ | २ | २ | ९२ |
| ५ | हवेली | ४४ | ८७ | ११८ | - | ८६ | ५ | ५ | १०० |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | दौंड | ३० | १०२ | १०२ | १ | १०२ | - | ५ | ० |
| ७ | जुन्नर | २० | १८२ | १८१ | १ | १८४ | ३ | २ | १४२ |
| ८ | खेड | १२ | १९५ | १८५ | १ | १९४ | ७ | १ | ९३ |
| ९ | आंबेगाव | १८ | १४८ | १४३ | १ | १४२ | २ | १ | १०४ |
| १० | मावळ | १२ | १८९ | १८१ | १ | १८० | ७ | २ | १३९ |
| ११ | मुळशी | १२ | १७३ | १४३ | ० | १४१ | २ | २ | ९६ |
| १२ | भोर | ११ | २०६ | १९४ | १ | १९४ | २ | १ | २०० |
| १३ | वेल्हा | ८ | ५२ | १२४ | - | १२४ | ३ | १ | ७० |
| १४ | पुणे शहर | १९ | १ | १ | १ | ० | ८ | ० | ० |
| एकूण | | २९५ | १८१९ | १८५२ | ११ | १८२९ | ४८ | २८ | १४४१ |

(स्रोत : जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, पुणे)

वरील तक्ता क्र: १ मध्ये पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय सेवाक्षेत्र दर्शविले आहेत. यानुसार सामाजिक/सार्वजनिक सेवांचा विचार केला असता पुणे जिल्ह्यामध्ये तालुकानिहाय सेवा क्षेत्राचे बँक सेवा, सामाजिक सेवांची उपलब्धता, पर्यटन सेवा, गोदमांची संख्या, प्राथमिक कृषी पतपुरवठा अशा गटामध्ये वर्गीकरण केले आहे. वरील तक्तामध्ये दर्शविल्या प्रमाणे सन २०२३-२४ मध्ये सेवाक्षेत्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा विचार केला असता पुणे जिल्ह्यात एकूण २९५ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका असून यामध्ये सर्वाधिक बँका बारामती ३२, इंदापूर ३०, हवेली ४४, दौंड ३० या तालुक्यामध्ये असून खेड १२, मावळ १२, मुळशी १२, वेल्हा ०८ तर भोर मध्ये ११ इतक्या कमी प्रमाणात बँक सेवा उपलब्ध आहेत. याचबरोबर यामध्ये विद्युतीकरण झालेली एकूण गावांची संख्या १८१९ इतकी आहे. यामध्ये सर्वाधिक विद्युतीकरण झालेली गावे जुन्नर १८२, खेड १९५, मावळ १७९, भोर २०६, मुळशी १७३ या तालुक्यामध्ये आहेत तर हवेली ८७, वेल्हा ५२, पुणे शहर ०१ या तालुक्यांमध्ये सर्वाधिक कमी गावे आढळतात. पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय आरोग्यविषयक सेवा सुविधांच्या उपलब्धतेचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, सर्वाधिक सुविधा असणारी गावे भोर १९४, जुन्नर १८१, खेड १८५, मावळ १८१, इंदापूर १४२, आंबेगाव १४३ या तालुक्यांमध्ये आहेत तर शिरूर ११५, पुरंदर १०७, दौंड १०२, या तालुक्यांमध्ये कमी सुविधा असणारी गावे आढळून येतात. पुणे जिल्हयामधील एकूण १२ तालुक्यामध्ये कृषीउत्पन्न बाजार समिती असल्याचे दिसून येते. बारमाही रस्ते असलेली गावे लक्षात घेतली असता सर्वाधिक गावे जुन्नर १८४, खेड १९४, भोर १९४, मावळ १८०,इंदापूर १४५, आंबेगाव १४२ या तालुक्यांमध्ये दिसून येतात तर हवेली ८६, वेल्हा १२४, बारामती १११, पुरंदर १०७ या तालुक्यांमध्ये सर्वाधिक कमी गावांची संख्या आढळून येते. पर्यटन दृष्ट्या शिरूर ०७, खेड ०७, मावळ ०७, पुणे शहर ०८ या तालुक्यामध्ये सर्वाधिक पर्यटनक्षेत्र उपलब्ध असल्याचे दिसून येते. गोदमांच्या संख्येचा विचार केला असता शिरूर ०५, दौंड ०५, इंदापूर ०३ ही तालुके प्रगत असल्याचे दिसून येते तर भोर ०१, वेल्हा ०१, आंबेगाव ०१, खेड ०१ ही तालुके तुलनात्मकदृष्ट्या अप्रगत असल्याचे दिसून येते.

सेवाक्षेत्राच्या विकासातील आणखी एक महत्वाचा घटक म्हणजे उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल. या घटकाचा अभ्यास करण्यासाठी कृषीसाठी आवश्यक पतपुरवठा करणाऱ्या संस्थांचा विचार केला पाहिजे या संस्थां संख्येचा विचार केला असता सर्वाधिक प्रमाण इंदापूर ११५, जुन्नर १४२, मावळ १३९, भोर २०० या तालुक्यांमध्ये आढळून येते तर शिरूर ९३, पुरंदर ९२, मुळशी ९६, वेल्हा ७० या तालुक्यांमध्ये प्राथमिक कृषी पतपुरवठा करणाऱ्या संस्था कमी प्रमाणात दिसून येतात.

तक्ता क्र. २: तालुकानिहाय पायाभूत सेवासुविधांची उपलब्धता.

सदरील तक्त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय सेवाक्षेत्र दर्शविले आहेत.

संदर्भ वर्ष: २०२३-२४

| अ. क्र | तालुके | प्राथमिक कृषी सहकारी संस्था संख्या | एकूण शाळांची संख्या | | | साक्षरतेचे प्रमाण (%) | जिल्हा प्राथमिक पणन संस्था संख्या | वर्गीकृत बँकांचा शाखा/ कार्यालयाची संख्या | पोस्टाची सुविधा असलेल्या गावांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्राथमिक शाळांची संख्या | माध्यमिक शाळांची संख्या | उच्च माध्यमिक शाळांची संख्या | | | | |
| १ | बारामती | १९४ | ११७ | ८६ | ०५ | ८२.२७ | ३९ | ८४ | ५७ |
| २ | इंदापूर | २५१ | १४३ | १०३ | ०४ | ८१.५३ | ७० | ६८ | ५० |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | शिरूर | १२८ | १०९ | ९९ | ०७ | ८२.३७ | २१ | ८३ | ५६ |
| ४ | पुरंधर | ९५ | १०८ | ७९ | ०१ | ८२.५५ | २१ | ३६ | ५३ |
| ५ | हवेली | १३५ | ११२ | २६९ | २० | ८८.१८ | ०६ | ३१२ | ५५ |
| ६ | दौंड | १२४ | १०२ | ८७ | ०१ | ७९.०९ | १७ | ६५ | ५२ |
| ७ | जुन्नर | ७७ | १७३ | ९८ | ०७ | ८३.०८ | २० | ६८ | ७२ |
| ८ | खेड | १०४ | १८२ | ९९ | १० | ८०.७७ | ०५ | ८६ | ६३ |
| ९ | आंबेगव | ५९ | १३३ | ५७ | ०३ | ८२.९४ | ०३ | ४१ | ४१ |
| १० | मावळ | ५६ | १६८ | १०४ | ०८ | ८२.३८ | ०८ | ७९ | ४४ |
| ११ | मुळशी | ४६ | १३७ | ७७ | ०१ | ७८.३४ | ०१ | ९२ | ४० |
| १२ | भोर | ७५ | १८९ | ५१ | ०१ | ८१.४२ | ०१ | ३० | ७२ |
| १३ | वेल्हा | २४ | १०७ | ११ | ०१ | ७५.९६ | ०१ | १५ | १४ |
| १४ | पुणे शहर | - | ० | ७६२ | ९२ | ८९.०७ | ९२ | ९९२ | ०९ |
| एकूण | | १३६८ | १७८० | | १५९ | - | ३०५ | २०५१ | ६७८ |

(स्रोत : जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, पुणे)

वरील तक्ता क्र: २ मध्ये पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय सेवाक्षेत्र दर्शविले आहेत यानुसार पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय सेवा क्षेत्राचा अभ्यास करत असताना उपलब्ध पायाभूत सेवासुविधांचा अभ्यास कारण आवश्यक ठरते. यामध्ये प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य, बँका, पोस्ट सुविधा,रस्ते, वाहतूक, दळणवळण इत्यादी घटकांचा विचार कारण आवश्यक ठरते. वरील तक्तामध्ये दर्शविल्या प्रमाणे सन २०२३-२४ मध्ये सेवाक्षेत्रातील प्राथमिक कृषी सहकारी संस्था संख्या घटकाचा विचार केला असता सर्वाधिक संख्या इंदापूर २५१, बारामती १९४, हवेली १३५, शिरूर १२८ या तालुक्यांमध्ये आढळते तर वेल्हा २४, भोर ७५, मुळशी ४६, मावळ ५६, आंबेगाव ५९ या तालुक्यांमध्ये कमी संख्या आढळून येतात. याचबरोबर शिक्षण क्षेत्राचा विचार केला असता तालुकानिहाय एकूण शाळा (प्राथमिक, माध्यमिक, उच्च-माध्यमिक) इंदापूर २५०, हवेली ४०१, जुन्नर २७८, खेड २९१, मावळ २८० तर पुणे शहर ८५४ इतक्या असून ही तालुके शैक्षणिकदृष्ट्या प्रगत असल्याचे दिसून येते तर पुरंदर १८८, दौंड १९०, आंबेगाव १९३, वेल्हे ११९ ही तालुके शैक्षणिकदृष्ट्या अप्रगत असल्याचे दिसून येते. शिक्षण क्षेत्राचा विकास झाला असता साक्षरतेचे प्रमाणात वाढ होताना दिसून येते याच साक्षरतेच्या प्रमानामध्ये हवेली ८८.१८%, जुन्नर ८३.०८%, पुणे शहर ८९.०७% ही तालुके प्रगत असल्याचे आढळते तर इतर तालुके तुलनेने अप्रगत असल्याचे आढळते.

वरील तक्ता क्र. २ मध्ये पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय उपलब्ध असलेल्या जिल्हा प्राथमिक पणन संस्थांची संख्या, वर्गीकृत बँकांची कार्यालय संख्या तसेच पोस्टाची सुविधा असलेल्या गावांची संख्या दर्शवली आहे. यामध्ये जिल्हा प्राथमिक पणन संस्थांची संख्या विचारात घेतली असता सर्वाधिक संख्या बारामती ३९, इंदापूर ७० या तालुक्यांमध्ये आढळून येते तर आंबेगाव ०३, मावळ ०२, मुळशी ०२, भोर ०५, वेल्हा ०४ या तालुक्यांमध्ये कमी संख्या आढळून येते. याचबरोबर वर्गीकृत बँकांची कार्यालय संख्या यांचा विचार केला असता सर्वाधिक कार्यालये हवेली ३१२, तर पुणे शहर ९९२ या तालुक्यांमध्ये आहेत तर उर्वरित तालुक्यांमध्ये तुलनेने कमी संख्या बघायला मिळते. तसेच याचबरोबर पोस्टाची सुविधा आसलेल्या गावांची संख्या लक्षात घेत सर्वाधिक गावे खेड ६३, भोर ७२, बारामती ५७, शिरूर ५६, हवेली ५५, जुन्नर ७२ या तालुक्यांमध्ये आहेत तर वेल्हा ०९, पुणे शहर ०७ या तालुक्यांमध्ये तुलनेने कमी असल्याचे दिसून येते.

पुणे जिल्ह्यातील सेवा क्षेत्राच्या सखोल विश्लेषणानंतर असे स्पष्ट होते की, विकासाचे केंद्रीकरण ठराविक ठिकाणीच झाले आहे. पुणे शहर, हवेली, बारामती, इंदापूर आणि जुन्नर या तालुक्यांमध्ये प्राथमिक कृषी पतसंस्था, मध्यवर्ती बँका आणि शैक्षणिक संस्थांचे जाळे अतिशय मजबूत असल्यामुळे हे तालुके सेवा क्षेत्रात आघाडीवर आहेत. दुसरीकडे, वेल्हा, भोर, मुळशी आणि मावळ यांसारख्या भौगोलिकदृष्ट्या दुर्गम तालुक्यांमध्ये पायाभूत व सामाजिक सुविधांची वानवा आहे. योग्य संस्थात्मक आणि सार्वजनिक सेवांच्या अभावामुळे हे तालुके शाश्वत विकासाच्या आणि सेवा क्षेत्राच्या प्रगतीच्या शर्यतीत खूपच मागे पडले आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**संदर्भसुची:**

1. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन. (२०२३). महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल २०२३.
2. इंगळे, जे. एस. (२०१२). अंदाजपत्रक: आर्थिक व सामाजिक विकासाचे साधन. योजना.
3. चौधरी, दी., व खाचणे, अ. (२०१४). महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल. अर्थसंवाद.
4. जिल्हा प्रशासन, पुणे. (२०२४). जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, पुणे २०२३-२४.
5. Department of Agriculture, Cooperation & Farmers Welfare. (n.d.). NeGP Agriculture empowering farmer (Agricultural mission mode project). Ministry of Agriculture & Farmers Welfare.
6. Directorate of Census Operations Maharashtra. (n.d.). District census handbook Pune: Village and town wise primary census abstract (PCA).
7. Government of Maharashtra. (n.d.). Agriculture census.
8. Harari, Y. N. (2014). Sapiens: A brief history of humankind.
9. Indian Council of Agricultural Research (ICAR). (2020). Annual report: 2019-2020.
10. Kothari, C. R. (1999). Research methodology: Methods and techniques (2nd ed.). Wiley Eastern Ltd.
11. Ministry of Agriculture & Farmers Welfare. (n.d.). Pocket book of agricultural statistics.
12. National Bank for Agriculture and Rural Development (NABARD). (n.d.). Agriculture development in Maharashtra: Problems and prospects.
13. Pune District Administration. (n.d.). Comprehensive District Agriculture Plan (CDAP): District-Pune.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# पुणे जिल्ह्यातील शाश्वत विकास:स्थिती, आव्हाने व उपाय

**दिपाली सुरेश इंगळे**
वाघीरे महाविद्यालय सासवड, ता. पुरंदर जि. पुणे

**Manuscript ID:**
JRD -2026-180413
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 63-67
April - 2026
**Submitted:** 11 Mar. 2026
**Revised:** 25 Mar 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***सारांश***

*शाश्वत विकास (Sustainable Development) ही संकल्पना आर्थिक प्रगती, सामाजिक समता आणि पर्यावरणीय संरक्षण यांचा समतोल साधण्यावर आधारित आहे. महाराष्ट्रातील पुणे जिल्हा हा औद्योगिक, शैक्षणिक व नागरीकरणाच्या दृष्टीने अग्रगण्य असूनही शाश्वत विकासाच्या बाबतीत अनेक आव्हानांना सामोरे जात आहे. या संशोधन पेपरमध्ये पुणे जिल्ह्यातील शाश्वत विकासाची सध्यस्थिती, प्रमुख समस्या आणि त्यावर उपाययोजना यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.या संशोधन पेपरमध्ये पुणे जिल्ह्यातील शाश्वत विकासाची सध्यस्थिती, प्रमुख आव्हाने आणि उपाययोजना यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द :*** *शाश्वत विकास, पुणे जिल्हा, पर्यावरण संरक्षण , आर्थिक विकास , सामाजिक विकास , शहरीकरण , जलसंकट, कचरा व्यवस्थापन , नवीकरणीय ऊर्जा, ग्रामीण-शहरी विषमता, हरित विकास, शाश्वत नियोजन.*

## प्रस्तावना

शाश्वत विकास ही संकल्पना १९८७ च्या Brundtland Commission च्या अहवालातून पुढे आली. “सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न करता विकास करणे” हा त्याचा गाभा आहे. पुणे जिल्हा हा महाराष्ट्रातील सर्वात जलद गतीने विकसित होणारा जिल्हा आहे. औद्योगिकीकरण, आयटी क्षेत्र, शिक्षण संस्था आणि शहरी विस्तार यामुळे विकास झाला असला तरी पर्यावरणीय व सामाजिक समस्या वाढल्या आहेत.शाश्वत विकास ही संकल्पना आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय संतुलनावर आधारित आहे. पुणे जिल्हा वेगाने विकसित होत असून अनेक समस्या निर्माण होत आहेत.

पुणे जिल्ह्याचा परिचय

1. राज्य: महाराष्ट्र
2. मुख्यालय: पुणे
3. लोकसंख्या: ~94 लाख (जनगणना 2011 नुसार)
4. प्रमुख क्षेत्रे: उद्योग, आयटी, शिक्षण, शेती
5. प्रमुख नद्या: मुळा, मुठा, भीमा

### शाश्वत विकासाची सध्यस्थिती

#### आर्थिक विकास

1. पुणे जिल्हा औद्योगिकदृष्ट्या प्रगत आहे (MIDC क्षेत्र – चाकण, रांजणगाव)
2. आयटी हब म्हणून ओळख (हिंजवडी IT पार्क)
3. सेवा क्षेत्रात मोठी वाढ
4. सकारात्मक बाबी

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*दिपाली सुरेश वाघीरे महाविद्यालय सासवड, ता. पुरंदर जि. पुणे*

**How to cite this article:**
*इंगळे, दिपाली. सुरेश. (2026). पुणे जिल्ह्यातील शाश्वत विकास:स्थिती, आव्हाने व उपाय. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 63–67. https://doi.org/10.5281/zenodo.21436595*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21436595
OPEN ACCESS

5. रोजगार निर्मिती
6. गुंतवणूक वाढ

**मर्यादा:**

1. ग्रामीण-शहरी विषमता
2. अनियोजित शहरीकरण

पुणे जिल्हा हा भारतातील प्रमुख औद्योगिक केंदापैकी एक आहे.हिंजवडी,चाकण, रांजणगाव याठिकाणी आयटी , ऑटोमोबाईल, शिक्षण आणि सेवा क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे.त्यामुळे रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत.

**सामाजिक विकास**

1. उच्च साक्षरता दर
2. शिक्षण व आरोग्य सुविधा चांगल्या

**समस्या:**

1. झोपडपट्ट्यांची वाढ
2. स्थलांतरित लोकसंख्येचा ताण
3. ग्रामीण भागात मूलभूत सुविधांची कमतरता

शिक्षणाच्या क्षेत्रात पुणे अग्रगण्य आहे. अनेक विद्यापीठे, महाविद्यालये आणि संशोधन संस्था येथे आहेत. आरोग्य सेवा देखील तुलनेने चांगली आहे. मात्र ग्रामीण भागात अजूनही मूलभूत सुविधांची कमतरता आहे.शहरी आणि ग्रामीण भागात विकासाचा असमतोल दिसून येतो. झोपडपट्ट्या, बेरोजगारी आणि गरिबी ही मोठी आव्हाने आहेत.

**पर्यावरणीय स्थिती**

1. हवेचे प्रदूषण वाढले
2. जलप्रदूषण (मुळा-मुठा नदी)
3. हरित क्षेत्र कमी होत आहे

**गंभीर मुद्दे:**

कचरा व्यवस्थापन समस्या
भूजल पातळी घट
जैवविविधतेवर परिणाम

वाहनांची वाढ आणि औद्योगिक उत्सर्जनामुळे हवा प्रदूषण वाढले आहे. मुळा- मुठा नदीचे प्रदूषण ही गंभीर समस्या आहे. वाढत्या बांधकामामुळे हरित क्षेत्र कमी होत आहे.वाढत्या नागरीकरणामुळे हवा, पाणी आणि माती प्रदूषणाच्या समस्या वाढल्या आहेत. नदीप्रदूषण, वृक्षतोड आणि कचरा व्यवस्थापन ही मोठी आव्हाने आहेत.

शाश्वत विकासातील प्रमुख आव्हाने

**अनियंत्रित शहरीकरण**

1. शहराचा वेगाने विस्तार
2. वाहतूक कोंडी
3. पायाभूत सुविधांवर ताण

वेगाने होणारे शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि लोकसंख्येत होणारी वाढ यामुळे पायाभूत सुविधांवर तावण येऊन विकासात अडथळे निर्माण होतात.तसेच वाहनांची वाढती लोकसंख्या वाहतूक कोंडी व कार्बन उत्सर्जन वाढवते त्यामुळे प्रदूषण वाढते.

**पर्यावरणीय ऱ्हास**

1. औद्योगिक प्रदूषण
2. नदी प्रदूषण
3. वृक्षतोड

औद्योकिकरणामध्ये वाढ झाल्याने कारखान्यामधून निघणारे धूर व रसायने,झाडांची मोठ्या प्रमाणावर होणारी तोड,नदी व पाणी प्रदूषण यामुळे मानव व प्राण्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतात. जैवविविधता कमी होते, हवामानात बदल होतो आणि नैसर्गिक आपत्तीचे प्रमाण वाढते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**जलसंकट**

1. पाण्याचा असमतोल वापर
2. शेती व उद्योगांमध्ये जास्त वापर

अजूनही शेती पारंपरिक पद्धतीने केली जाते,त्यामुळे पाणी मोठ्या प्रमाणात वाया जाते. उसासारख्या पिकांना जास्त पाणी लागते, ठीबकसिंचानाचा कमी वापर केला जातो भूजलाचा अती वापर केला जातो त्यामुळे भूजल पातळी कमी होते.तसेच उद्योगक्षेत्रातही उत्पादन प्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणात वापर केला जातो परंतु सांडपाण्याचा अजूनही हवा तेवढा पुनर्वापर केला जात नाही.पाण्याचा दोन्ही क्षेत्रात अतिरिक्त वापर केल्याने पाण्याची टंचाई निर्माण होते.

**सामाजिक असमानता**

1. ग्रामीण-शहरी अंतर
2. उत्पन्न विषमता

**तुलनात्मक माहिती**

| घटक | शहरी पुणे | ग्रामीण पुणे | निरीक्षण |
|---|---|---|---|
| उत्पन्न | जास्त | मध्यम | असमानता दिसते |
| पाणी उपलब्धता | मध्यम | कमी | ग्रामीण भागात टंचाई |
| प्रदूषण | जास्त | कमी | औद्योगिक प्रभाव |
| रोजगार | सेवा/IT | शेती | क्षेत्रीय असमतोल |

वरील चार्ट वरून असे दिसून येते की,शहरात रोजगाराच्या संधी जास्त असल्याने उत्पन्न वाढले,पण ग्रामीण भाग मागे राहतो.त्यामुळे आर्थिक असमानता निर्माण होते. शहरात पाणीपुरवठा व्यवस्थित आहे, पण ग्रामीण भागात पावसावर अवलंबित्व असल्याने टंचाई अधिक जाणवते. शहरीकरण आणि औद्योगिकीकणामुळे शहरात हवा आणि पाणी प्रदूषण वाढले, तर ग्रामीण भाग अजूनही तुलनेने स्वच्छ आहे. शहरात विविध क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध असल्याने रोजगार जास्त आहे, पण ग्रामीण भागात मर्यादित संधी आहेत.

**कचरा व्यवस्थापन**

1. प्लास्टिक कचरा वाढ
2. पुनर्वापर (recycling) कमी

सध्या प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणावरील केला जातो, उदा.पिशव्या, बाटल्या, पॅकेजिंग इ. ऑनलाईन डिलिव्हरी आणि पॅकिंग साहित्यात वाढ झाली आहे.प्लास्टिक वेगळं न केल्यामुळें माती व पाण्याचे प्रदूषण होत आहे. ड्रेनेज ब्लॉक होतात, रिसायकलिंग कमी होते, जनावरांना व पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे.

शाश्वत विकासासाठी उपाययोजना

**नियोजनबद्ध शहरी विकास**

1. स्मार्ट सिटी संकल्पना राबविणे
2. सार्वजनिक वाहतूक वाढविणे

पुणे जिल्ह्यात शाश्वत विकासासाठी स्मार्ट सिटी संकल्पना राबवणे, सार्वजनिक वाहतुक म्हणजेच मेट्रो बस आणि सायकल ट्रॅक वाढवणे अशाप्रकारे पर्यावरण पूरक व नियोजनबध्द शाश्वत विकास आवश्यक आहे. नियोजित शहरी विकासामुळे नागरिकांचे जीवनमान सुधारेल आणि भविष्यातील समस्यांवर नियंत्रण मिळवता येईल.

**पर्यावरण संरक्षण**

1. वृक्षारोपण मोहिमा
2. प्रदूषण नियंत्रण कडक करणे
3. नदी स्वच्छता प्रकल्प

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

पुणे जिल्ह्यात शाश्वत विकासासाठी अधिक झाडे लावून हरित पट्टा वाढवणे,कचरा नदीत टाकण्यावर कडक कारवाई करणे,पर्यावरण शिक्षण व जनजागृती आवश्यक आहे.

**जल व्यवस्थापन**

1. रेनवॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य करणे
2. पाणी पुनर्वापर तंत्रज्ञान
3. ठिबक सिंचन आणि सूक्ष्म सिंचन पद्धती वापरणे

पाणी वाचवणे आणि भूजल वाढवणे यामुळे ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागातील पाणी समस्या कमी होईल.

**ग्रामीण विकास**

1. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती
2. पायाभूत सुविधा सुधारणा

ग्रामीण भागात शाश्वत विकसासाठी पाणी,शेती,रोजगार आणि पर्यावरण या घटकांवर एकात्रित करणे आवश्यक आहे.रस्ते,वीज, पाणीपुरवठा तसेच आरोग्य व शिक्षण सुविधा वाढवल्यास , दुग्धव्यवसाय कुक्कुटपालन हस्तकला लघुउद्योग इ.व्यवसाय विकसित करणे. कौशल्य प्रशिक्षण देणे त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास साधला जाईल व आर्थिक सामाजिक आणि पर्यावरणीय समतोल राखला जाईल.

**कचरा व्यवस्थापन सुधारणा**

1. घनकचरा वर्गीकरण
2. पुनर्वापर व पुनर्चक्रण वाढविणे

कचरा व्यवस्थापन सुविधा पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. वर्गीकरणामुळे पुनर्वापर आणि प्रक्रिया सोपी होते.प्रदूषण कमी होऊन संसाधनांचा योग्य वापर होतो.

**नवीकरणीय ऊर्जा**

1. सौर ऊर्जा वापर वाढविणे
2. हरित ऊर्जा प्रकल्प

आजच्या काळात वाढते प्रदूषण आणि इंधनाची कमतरता लक्षात घेता नवीकरणीय ऊर्जा अत्यंत महत्वाची आहे. Ministry of new and Renewable Energy ही संस्था या क्षेत्रात महत्वाचे काम करते.नवीकरणीय ऊर्जा ही शाश्वत विकासासाठी अत्यावश्यक आहे.तिचा वापर वाढवल्यास पर्यावरण संरक्षण आणि ऊर्जा सुरक्षितता दोन्ही साध्य होतील.

**शासनाच्या उपक्रमांची भूमिका**

1. स्मार्ट सिटी प्रकल्प
2. स्वच्छ भारत अभियान
3. अमृत योजना (AMRUT)
4. जलयुक्त शिवार अभियान

पुणे जिल्ह्यात शाश्वत विकास साधण्यासाठी शासनाचे विविध उपक्रम महत्वाची भूमिका बजावत आहेत. पर्यावरण संरक्षण,जलसंधारण शाश्वत शेती आणि. आधुनिक शहरी विकास यांच्या समन्वयातूनच दीर्घकालीन विकास शक्य होतो.

शाश्वत नियोजन, जल व्यवस्थापन, हरित ऊर्जा वापर, आणि कचरा व्यवस्थापन सुधारणा आवश्यक आहेत.

**निष्कर्ष**

पुणे जिल्हा हा आर्थिकदृष्ट्या प्रगत असूनही शाश्वत विकासाच्या दृष्टीने अनेक आव्हानांना सामोरे जात आहे. पर्यावरणीय ऱ्हास, जलसंकट आणि सामाजिक विषमता यामुळे दीर्घकालीन विकासावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शासन, उद्योग आणि नागरिक यांनी एकत्रितपणे शाश्वत विकासासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.पुणे जिल्ह्याचा विकास शाश्वत करण्यासाठी सर्व घटकांचा समन्वय आवश्यक आहे.

**संदर्भ**

1. महाराष्ट्र आर्थिक सर्वेक्षण
2. पुणे महानगरपालिका अहवाल
3. NITI Aayog – SDG Index Report
4. UN Sustainable Development Goals (SDGs)
5. Census of India 2011
6. Government of Maharashtra. (2023). Economic Survey.
7. NITI Aayog. (2022). SDG Index.
8. United Nations. (2015). SDGs.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# नवीकरणीय ऊर्जा आणि भारताची आर्थिक आत्मनिर्भरता : संधी, आव्हाने आणि धोरणात्मक दिशा

**प्रकाश पंढरीनाथ राजळे**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, दौंड तालुका कला व वाणिज्य महाविद्यालय दौंड ता. दौंड जि. पुणे
**ईमेल :** prakashrajale732@gmail.Com

**Manuscript ID:**
JRD -2026-180414
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 68-72
April - 2026
**Submitted:** 11 Mar. 2026
**Revised:** 25 Mar 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***सारांश***

*ऊर्जा हा कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा मूलभूत घटक मानला जातो. औद्योगिकीकरण, नागरीकरण, तांत्रिक विकास आणि वाढती लोकसंख्या यामुळे ऊर्जा मागणी सातत्याने वाढत आहे. भारत हा जगातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक देश असून भारतातील ऊर्जा मागणी गेल्या दोन दशकांत मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. आज भारताला आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ८५ टक्के तेल आयात करावे लागते वायु आणि दगडी कोळसा बाबतीतही ऊर्जा पुरवठयातील अवलंबित्व वाढत आहे, व ही परावलंबित्वची स्थिती देशाच्या अर्थव्यवस्थेला जागतिक बाजाराच्या दयेवर ठेवते याची प्रचिती जागतिक युद्धजन्य परिस्थितीत आपणास येते. या वाढत्या ऊर्जा मागणीची पूर्तता करण्यासाठी भारत प्रामुख्याने पारंपरिक ऊर्जा स्रोतांवर अवलंबून आहे. कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू हे भारतातील प्रमुख ऊर्जा स्रोत आहेत. परंतु या स्रोतांचे दोन प्रमुख मर्यादा आहेत. प्रथम, हे स्रोत मर्यादित आहेत आणि दुसरे म्हणजे ते पर्यावरणाला मोठ्या प्रमाणावर हानिकारक आहेत.*

*भारत हा जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा आयात करणाऱ्या देशांपैकी एक आहे. विशेषतः कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू यांच्या आयातीवर भारताचे मोठ्या प्रमाणावर अवलंबित्व आहे. या आयातीमुळे भारताच्या परकीय चलन साठ्यावर मोठा ताण येतो आणि व्यापार तूट वाढते. त्यामुळे भारतासाठी ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भरता साध्य करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर नवीकरणीय ऊर्जा हा भारतासाठी आर्थिक आत्मनिर्भरतेकडे जाण्याचा प्रभावी मार्ग ठरतो. नवीकरणीय ऊर्जा म्हणजे नैसर्गिकरित्या पुनर्निर्मित होणारे ऊर्जा स्रोत. यामध्ये सौर ऊर्जा, वारा ऊर्जा, जल ऊर्जा, बायोमास ऊर्जा आणि जिओथर्मल ऊर्जा यांचा समावेश होतो. भारतामध्ये या सर्व ऊर्जा स्रोतांची मोठ्या प्रमाणावर क्षमता उपलब्ध आहे. त्यामुळे नवीकरणीय ऊर्जा क्षेत्राचा विकास भारताच्या आर्थिक आत्मनिर्भरतेसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या संशोधन निबंधामध्ये भारतातील नवीकरणीय ऊर्जा क्षेत्राचा विकास, आर्थिक आत्मनिर्भरतेमधील भूमिका, रोजगार निर्मिती, ऊर्जा सुरक्षा, पर्यावरण संरक्षण, धोरणात्मक उपाय आणि भविष्यातील दिशा यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे.*

***महत्वाचे शब्द :*** *नवीकरणीय ऊर्जा, आर्थिक आत्मनिर्भरता, ऊर्जा सुरक्षा, हरित अर्थव्यवस्था, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, भारत*

## प्रस्तावना

ऊर्जा हा आधुनिक अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास ऊर्जा उपलब्धतेवर अवलंबून असतो. उद्योग, शेती, वाहतूक, शिक्षण, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान आणि सेवा क्षेत्रासाठी ऊर्जा अत्यावश्यक आहे. भारत हा वेगाने विकसित होणारा देश असल्यामुळे ऊर्जा मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. भारतामध्ये औद्योगिकीकरण आणि नागरीकरण झपाट्याने वाढत आहे.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रकाश पंढरीनाथ राजळे सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, दौंड तालुका कला व वाणिज्य महाविद्यालय दौंड ता. दौंड जि. पुणे*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21436729

**How to cite this article:**
*राजळे, प्रकाश. पंढरीनाथ. (2026). नवीकरणीय ऊर्जा आणि भारताची आर्थिक आत्मनिर्भरता : संधी, आव्हाने आणि धोरणात्मक दिशा. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 68–72.*
*https://doi.org/10.5281/zenodo.21436729*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढत आहे. यामुळे ऊर्जा वापर वाढत आहे. तसेच जीवनशैलीतील बदलांमुळे ऊर्जा वापरात वाढ झाली आहे. एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वाहतूक साधने यांचा वापर वाढल्यामुळे ऊर्जा मागणी वाढत आहे.

भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा ऊर्जा वापरणारा देश आहे. भविष्यात भारताची ऊर्जा मागणी आणखी वाढणार आहे. या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी पारंपरिक ऊर्जा स्रोतांवर अवलंबून राहणे दीर्घकालीन दृष्ट्या योग्य नाही. कारण पारंपरिक ऊर्जा स्रोत मर्यादित आहेत आणि पर्यावरणावर त्याचा विपरीत परिणाम होतो.

भारत मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करतो. यामुळे देशाच्या परकीय चलनावर ताण येतो. त्यामुळे ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भरता मिळवणे आवश्यक आहे. नवीकरणीय ऊर्जा हा भारतासाठी दीर्घकालीन आणि टिकाऊ उपाय आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. भारतातील नवीकरणीय ऊर्जा क्षेत्राचा विकास अभ्यासणे
2. आर्थिक आत्मनिर्भरतेमध्ये नवीकरणीय ऊर्जेची भूमिका स्पष्ट करणे
3. ऊर्जा आयात कमी करण्यामध्ये नवीकरणीय ऊर्जेचे योगदान अभ्यासणे
4. रोजगार निर्मितीमध्ये नवीकरणीय ऊर्जेची भूमिका विश्लेषण करणे
5. नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील आव्हाने ओळखणे

**संशोधन पद्धती**

या संशोधनासाठी दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला आहे. विविध सरकारी अहवाल, संशोधन पेपर, आर्थिक सर्वेक्षण, आंतरराष्ट्रीय संस्था अहवाल आणि संबंधित साहित्याचा अभ्यास करून माहिती संकलित करण्यात आली आहे. या संशोधनात विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**नवीकरणीय ऊर्जा : संकल्पना आणि प्रकार**

ऊर्जा म्हणजे काम करण्याची क्षमता. ऊर्जा विविध स्वरूपात उपलब्ध असते. उष्णता ऊर्जा, विद्युत ऊर्जा, यांत्रिक ऊर्जा, रासायनिक ऊर्जा आणि अणुऊर्जा यांचा समावेश होतो. आर्थिक विकासासाठी ऊर्जा अत्यंत आवश्यक आहे. उद्योग, शेती, वाहतूक आणि सेवा क्षेत्रासाठी ऊर्जा आवश्यक असते.

**ऊर्जेचे प्रकार**

ऊर्जा प्रामुख्याने दोन प्रकारांमध्ये विभागली जाते  पारंपरिक ऊर्जा आणि नवीकरणीय ऊर्जा. आर्थिक विकास, औद्योगिक प्रगती आणि सामाजिक विकासासाठी या दोन्ही प्रकारांच्या ऊर्जेचे महत्त्व आहे. मात्र पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी नवीकरणीय ऊर्जा अधिक उपयुक्त ठरत आहे.

**पारंपरिक ऊर्जा स्रोत**

**औष्णिक  ऊर्जा**

कोळसा हा भारतातील सर्वात मोठा ऊर्जा स्रोत आहे. भारतातील बहुतांश वीज निर्मिती कोळशावर आधारित आहे. कोळसा स्वस्त आणि सहज उपलब्ध असल्यामुळे उद्योग क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वापरला जातो. भारतात झारखंड, ओडिशा, छत्तीसगड आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कोळसा उपलब्ध आहे.

मात्र कोळसा वापरामुळे कार्बन उत्सर्जन वाढते. त्यामुळे वायू प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय समस्या निर्माण होतात. त्यामुळे दीर्घकालीन दृष्टीने कोळसा ऊर्जा मर्यादित आहे. म्हणूनच भारताला पर्यायी ऊर्जेच्या स्रोतांचा विकास करणे आवश्यक आहे.

**पेट्रोलियम ऊर्जा**

पेट्रोलियम हा वाहतूक आणि उद्योग क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा ऊर्जा स्रोत आहे. भारत मोठ्या प्रमाणात पेट्रोलियम आयात करतो. त्यामुळे परकीय चलन खर्च वाढतो. जागतिक बाजारात तेलाच्या किंमती वाढल्यास भारताच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. पेट्रोलियम वापरामुळे पर्यावरण प्रदूषण वाढते. त्यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडते. त्यामुळे पेट्रोलियमच्या वापरावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**नैसर्गिक वायू**

नैसर्गिक वायू हा तुलनेने स्वच्छ ऊर्जा स्रोत आहे. उद्योग, खत निर्मिती आणि वीज निर्मितीमध्ये नैसर्गिक वायूचा वापर होतो. भारतात नैसर्गिक वायूचे उत्पादन मर्यादित आहे. त्यामुळे आयात वाढते.

**नवीकरणीय ऊर्जा प्रकार**

**सौर ऊर्जा**

सौर ऊर्जा ही सूर्यापासून मिळणारी स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जा आहे. भारत भौगोलिकदृष्ट्या सौर ऊर्जा निर्मितीसाठी अत्यंत अनुकूल देश मानला जातो. भारतात वर्षातील सुमारे 300 पेक्षा जास्त दिवस सूर्यप्रकाश उपलब्ध असतो. त्यामुळे सौर ऊर्जा निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. विशेषतः राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये सौर ऊर्जा निर्मितीची मोठी क्षमता आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

सौर ऊर्जा निर्मितीचे दोन प्रमुख प्रकार आहेत. पहिले म्हणजे फोटोव्होल्टेइक प्रणाली आणि दुसरे म्हणजे सौर तापीय प्रणाली. फोटोव्होल्टेइक प्रणालीमध्ये सूर्यप्रकाशाचा वापर करून थेट वीज निर्माण केली जाते. ही प्रणाली घरगुती वापरासाठी अत्यंत उपयुक्त आहे. सौर तापीय प्रणालीमध्ये सूर्याच्या उष्णतेचा वापर करून वीज निर्माण केली जाते. मोठ्या प्रकल्पांसाठी ही प्रणाली अधिक उपयुक्त आहे. सौर ऊर्जा विकासामुळे भारताच्या आर्थिक विकासाला चालना मिळते. सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होते. सौर पॅनेल उत्पादन, स्थापना, देखभाल आणि वितरण या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण होतात. ग्रामीण भागात सौर ऊर्जा वापरामुळे आर्थिक विकासाला गती मिळते. सौर पंपामुळे शेती उत्पादन वाढते. ग्रामीण भागात वीज उपलब्ध झाल्यामुळे उद्योगांना चालना मिळते

सौर ऊर्जा भारताच्या आर्थिक आत्मनिर्भरतेसाठी महत्त्वाची ठरते. भारत पेट्रोलियम आणि कोळशावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. सौर ऊर्जा वापर वाढल्यास आयात खर्च कमी होतो. परकीय चलन बचत होते. त्यामुळे भारताची आर्थिक स्थिती मजबूत होते. भारत सरकारने सौर ऊर्जा विकासासाठी राष्ट्रीय सौर मिशन सुरू केले आहे. या योजनेअंतर्गत सौर ऊर्जा उत्पादन वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. भारताने 2030 पर्यंत नवीकरणीय ऊर्जा क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्टामध्ये सौर ऊर्जेचा मोठा वाटा आहे.

**पवन ऊर्जा**

पवन ऊर्जा ही वाऱ्याच्या शक्तीचा वापर करून निर्माण केली जाणारी स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जा आहे. पवन ऊर्जेचा वापर प्राचीन काळापासून होत आहे. पूर्वी पवनचक्कीच्या माध्यमातून पाणी उचलणे, धान्य दळणे यासाठी पवन ऊर्जेचा वापर केला जात होता. आधुनिक काळात पवन टर्बाईनच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती केली जाते.

भारतामध्ये पवन ऊर्जा निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात क्षमता उपलब्ध आहे. विशेषतः तामिळनाडू, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक आणि राजस्थान या राज्यांमध्ये पवन ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प मोठ्या प्रमाणात उभारण्यात आले आहेत. भारत जगातील पवन ऊर्जा निर्मिती करणाऱ्या प्रमुख देशांमध्ये समाविष्ट आहे. पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी तुलनेने कमी वेळ लागतो आणि पर्यावरणीय प्रदूषण होत नाही. पवन ऊर्जा भारताच्या आर्थिक आत्मनिर्भरतेसाठी महत्त्वाची ठरते. पवन ऊर्जा निर्मितीमुळे कोळसा आणि पेट्रोलियमवरील अवलंबित्व कमी होते. त्यामुळे आयात खर्च कमी होतो. पवन ऊर्जा प्रकल्पांमुळे स्थानिक स्तरावर रोजगार निर्मिती होते. पवन टर्बाईन उत्पादन, स्थापना, देखभाल आणि वाहतूक या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण होतात.

पवन ऊर्जा विकासामुळे ग्रामीण भागाचा विकास होतो. पवन ऊर्जा प्रकल्प प्रामुख्याने ग्रामीण आणि किनारी भागात उभारले जातात. त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळतो. पायाभूत सुविधा विकसित होतात. रस्ते, वीज आणि इतर सुविधा उपलब्ध होतात. भारत सरकारने पवन ऊर्जा विकासासाठी विविध योजना राबविल्या आहेत. सरकारने खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे पवन ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक वाढली आहे. भविष्यात पवन ऊर्जा भारताच्या ऊर्जा क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावेल.

**जल ऊर्जा**

जल ऊर्जा ही पाण्याच्या प्रवाहाचा वापर करून निर्माण केली जाणारी महत्त्वाची नवीकरणीय ऊर्जा आहे. जल ऊर्जा प्रामुख्याने धरणे, जलविद्युत प्रकल्प आणि नदी प्रवाह यांद्वारे निर्माण केली जाते. जल ऊर्जा ही दीर्घकालीन आणि स्थिर ऊर्जा स्रोत मानली जाते. भारतात हिमालयीन नद्या आणि मोठ्या धरणांमुळे जल ऊर्जा निर्मितीसाठी मोठी क्षमता उपलब्ध आहे. भारतामध्ये भाकरा नांगल, टिहरी, सरदार सरोवर, कोयना आणि नागार्जुन सागर हे प्रमुख जलविद्युत प्रकल्प आहेत. या प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती होते. जल ऊर्जा निर्मितीमुळे वीज उत्पादनाबरोबरच सिंचन सुविधा वाढतात. शेती उत्पादन वाढते. ग्रामीण भागाचा विकास होतो. जल ऊर्जा भारताच्या आर्थिक आत्मनिर्भरतेसाठी महत्त्वाची आहे. जल ऊर्जा निर्मितीसाठी इंधनाची आवश्यकता नसते. त्यामुळे उत्पादन खर्च कमी असतो. दीर्घकालीन दृष्टीने जल ऊर्जा फायदेशीर ठरते. जल ऊर्जा प्रकल्पांमुळे रोजगार निर्मिती होते. स्थानिक उद्योगांना चालना मिळते. मात्र जल ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवल लागते. तसेच विस्थापनाची समस्या निर्माण होते. पर्यावरणीय परिणाम देखील होऊ शकतात. त्यामुळे जल ऊर्जा प्रकल्प उभारताना पर्यावरणीय संतुलन राखणे आवश्यक आहे.

**जैवऊर्जा**

जैवऊर्जा ही सेंद्रिय पदार्थांपासून निर्माण केली जाणारी नवीकरणीय ऊर्जा आहे. शेती अवशेष, प्राण्यांचे शेण, जैविक कचरा, अन्न प्रक्रिया उद्योगातील कचरा आणि वनस्पती अवशेष यांपासून जैवऊर्जा तयार केली जाते. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे जैवऊर्जा निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहे. ग्रामीण भागात जैवऊर्जा हा ऊर्जा गरजांचा महत्त्वाचा स्रोत ठरू शकतो.

जैवऊर्जेचे प्रमुख प्रकार म्हणजे बायोगॅस, बायोमास ऊर्जा आणि जैवइंधन. बायोगॅस प्रामुख्याने गोवऱ्या, शेण आणि जैविक कचऱ्यापासून तयार केला जातो. ग्रामीण भागात बायोगॅसचा वापर स्वयंपाकासाठी आणि प्रकाशासाठी केला जातो. यामुळे इंधन खर्च कमी होतो. तसेच जंगलतोड कमी होते. बायोमास ऊर्जेमध्ये शेती अवशेष जाळून किंवा प्रक्रिया करून ऊर्जा निर्माण केली जाते. जैवइंधनात इथेनॉल आणि बायोडिझेल यांचा समावेश होतो. जैवऊर्जा ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देते. शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळते. शेती अवशेषांचा वापर करून ऊर्जा निर्माण केली जाते. त्यामुळे कचऱ्याचे व्यवस्थापन होते. पर्यावरणीय प्रदूषण कमी होते. जैवऊर्जा निर्मितीमुळे स्थानिक स्तरावर रोजगार निर्मिती होते. जैवऊर्जा भारताच्या आर्थिक आत्मनिर्भरतेसाठी महत्त्वाची आहे. पेट्रोलियम आयात कमी करण्यासाठी जैवइंधनाचा वापर वाढविणे आवश्यक आहे. भारत सरकारने इथेनॉल मिश्रण धोरण राबविले आहे. या धोरणामुळे पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण वाढविण्यात आले आहे. त्यामुळे आयात खर्च कमी होतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**भू-तापीय ऊर्जा**

भू-तापीय ऊर्जा ही पृथ्वीच्या आत असलेल्या उष्णतेपासून निर्माण केली जाणारी नवीकरणीय ऊर्जा आहे. पृथ्वीच्या आतील भागात मोठ्या प्रमाणात उष्णता साठवलेली असते. या उष्णतेचा वापर करून वीज निर्मिती करता येते. भू-तापीय ऊर्जा हा सातत्याने उपलब्ध असणारा ऊर्जा स्रोत आहे. या ऊर्जेवर हवामानाचा फारसा परिणाम होत नाही. त्यामुळे भू-तापीय ऊर्जा स्थिर ऊर्जा स्रोत मानली जाते. भारतामध्ये हिमालयीन भागात भू-तापीय ऊर्जा निर्मितीसाठी संधी उपलब्ध आहे. लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या भागात भू-तापीय ऊर्जा प्रकल्प उभारण्याची क्षमता आहे. या भागांमध्ये गरम पाण्याचे झरे आढळतात. या झऱ्यांचा वापर करून ऊर्जा निर्माण करता येते. भू-तापीय ऊर्जा पर्यावरणपूरक आहे. या ऊर्जेमुळे प्रदूषण होत नाही. दीर्घकालीन दृष्टीने भू-तापीय ऊर्जा फायदेशीर ठरते. मात्र या प्रकल्पांसाठी प्रारंभी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आवश्यक असते. तसेच तांत्रिक ज्ञान आवश्यक असते.

**महासागर ऊर्जा**

महासागर ऊर्जा ही समुद्रातील लाटा, भरती-ओहोटी आणि समुद्रातील तापमानातील फरक यांचा वापर करून निर्माण केली जाणारी ऊर्जा आहे. भारताला मोठा समुद्रकिनारा लाभला आहे. त्यामुळे महासागर ऊर्जा निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहे. विशेषतः गुजरात, महाराष्ट्र आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये महासागर ऊर्जा निर्मितीसाठी क्षमता आहे. महासागर ऊर्जा हा स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जा स्रोत आहे. भविष्यात महासागर ऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावू शकते. मात्र या ऊर्जेसाठी तांत्रिक आव्हाने आहेत. मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आवश्यक आहे. तरीही दीर्घकालीन दृष्टीने महासागर ऊर्जा भारतासाठी फायदेशीर ठरू शकते.

**भारतातील नवीकरणीय ऊर्जा विकास**

भारताने नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. भारत सरकारने विविध धोरणे आणि योजना राबवून नवीकरणीय ऊर्जा विकासाला प्रोत्साहन दिले आहे. भारताने 2030 पर्यंत मोठ्या प्रमाणात नवीकरणीय ऊर्जा क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.
भारत जगातील प्रमुख सौर ऊर्जा उत्पादक देशांमध्ये समाविष्ट आहे. तसेच पवन ऊर्जा क्षेत्रातही भारताने मोठी प्रगती केली आहे. नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक वाढत आहे. खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढत आहे.
नवीकरणीय ऊर्जा विकासामुळे भारताची ऊर्जा सुरक्षा मजबूत होते. आयात खर्च कमी होतो. रोजगार निर्मिती होते. उद्योग विकासाला चालना मिळते.

**नवीकरणीय ऊर्जा आणि भारताची आर्थिक आत्मनिर्भरता**

नवीकरणीय ऊर्जा भारताच्या आर्थिक आत्मनिर्भरतेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भारत मोठ्या प्रमाणात पेट्रोलियम आयात करतो. यामुळे परकीय चलन खर्च वाढतो. नवीकरणीय ऊर्जा वापर वाढल्यास आयात कमी होते.
नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात नवीन उद्योग निर्माण होतात. सौर पॅनेल उत्पादन, पवन टर्बाईन उत्पादन आणि ऊर्जा उपकरण उत्पादन या क्षेत्रांमध्ये उद्योग विकसित होतात. यामुळे रोजगार निर्मिती होते. ग्रामीण भागात नवीकरणीय ऊर्जा वापरामुळे आर्थिक विकास होतो. सौर पंपामुळे शेती उत्पादन वाढते. ग्रामीण उद्योगांना चालना मिळते.

**सरकारी धोरणे आणि उपक्रम**

भारत सरकारने नवीकरणीय ऊर्जा विकासासाठी विविध योजना राबविल्या आहेत. राष्ट्रीय सौर मिशन, पीएम कुसुम योजना, आत्मनिर्भर भारत अभियान, हरित ऊर्जा योजना, पवन ऊर्जा धोरण, जैवऊर्जा धोरण या प्रमुख योजना आहेत.
सरकारने खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले आहे. कर सवलती, अनुदान आणि आर्थिक सहाय्य दिले जाते.

**आव्हाने व समस्या**

नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असल्या तरी त्याच्या विकासामध्ये अनेक संरचनात्मक, तांत्रिक, आर्थिक आणि सामाजिक आव्हाने दिसून येतात. या आव्हानांचे योग्य व्यवस्थापन केल्याशिवाय भारताला ऊर्जा आत्मनिर्भरतेचे उद्दिष्ट साध्य करणे कठीण होऊ शकते.

**उच्च प्रारंभिक गुंतवणूक खर्च**

नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी सुरुवातीला मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवावे लागते. उदाहरणार्थ, सौर ऊर्जा प्रकल्पासाठी सौर पॅनेल, इन्व्हर्टर, बॅटरी, ट्रान्समिशन लाईन यासाठी मोठा खर्च करावा लागतो. पवन ऊर्जा प्रकल्पासाठी पवन टर्बाईन, मोठी जमीन आणि पायाभूत सुविधा आवश्यक असतात. लहान उद्योग आणि ग्रामीण भागातील गुंतवणूकदारांसाठी हा खर्च अडथळा ठरतो.

**ऊर्जा साठवण तंत्रज्ञानाची मर्यादा**

सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा या हवामानावर अवलंबून असतात. सूर्यप्रकाश नसताना किंवा वारा कमी असताना वीज निर्मिती कमी होते. त्यामुळे ऊर्जा साठवण तंत्रज्ञान विकसित करणे आवश्यक आहे. बॅटरी तंत्रज्ञान अजूनही महाग आहे. त्यामुळे ऊर्जा साठवण प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे.

**पायाभूत सुविधांची कमतरता**

ग्रामीण भागात वीज वितरण व्यवस्था मजबूत नाही. नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारले तरी त्याचे वितरण योग्य पद्धतीने होत नाही. ट्रान्समिशन लाईन आणि सबस्टेशन यांची कमतरता आहे. त्यामुळे प्रकल्पाचा पूर्ण लाभ मिळत नाही.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**जमीन संपादन समस्या**

मोठ्या सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात जमीन आवश्यक असते. जमीन संपादन करताना स्थानिक लोकांचा विरोध होतो. शेती जमीन वापरल्यास कृषी उत्पादनावर परिणाम होऊ शकतो.

**तांत्रिक कौशल्याची कमतरता**

नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता आहे. तांत्रिक ज्ञानाची कमतरता असल्यामुळे प्रकल्पांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नाही.

**धोरणात्मक अनिश्चितता**

सरकारी धोरणे वेळोवेळी बदलत राहतात. यामुळे गुंतवणूकदारांमध्ये अनिश्चितता निर्माण होते. दीर्घकालीन धोरण नसल्यास गुंतवणूक कमी होते.

**पर्यावरणीय आणि सामाजिक समस्या**

मोठे जलविद्युत प्रकल्प उभारल्यास विस्थापनाची समस्या निर्माण होते. पवन ऊर्जा प्रकल्पांमुळे पक्ष्यांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पर्यावरणीय संतुलन राखणे आवश्यक आहे.

**उपाय आणि धोरणात्मक दिशा**

नवीकरणीय ऊर्जा विकासासाठी योग्य धोरणे आणि उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. खालील उपाय महत्त्वाचे ठरू शकतात:

**सरकारी प्रोत्साहन आणि अनुदान**

सरकारने नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांसाठी आर्थिक अनुदान द्यावे. कर सवलती आणि कर्ज सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. ग्रामीण भागातील प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन दिले पाहिजे.

**संशोधन आणि विकासावर भर**

ऊर्जा साठवण तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी संशोधन वाढविणे आवश्यक आहे. सौर पॅनेल कार्यक्षमता वाढविण्यासाठी संशोधन करणे आवश्यक आहे.

**सार्वजनिक-खाजगी भागीदारी**

सरकार आणि खाजगी क्षेत्राने संयुक्तपणे प्रकल्प उभारावेत. यामुळे गुंतवणूक वाढेल आणि प्रकल्पांची अंमलबजावणी जलद होईल.

**कौशल्य विकास कार्यक्रम**

नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे आवश्यक आहे. तांत्रिक शिक्षण संस्थांमध्ये ऊर्जा अभ्यासक्रम सुरू करावेत.

**ग्रामीण भागातील विकास**

ग्रामीण भागात सौर पंप, बायोगॅस आणि सौर ऊर्जा प्रकल्प उभारावेत. यामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळेल.

**दीर्घकालीन ऊर्जा धोरण**

नवीकरणीय ऊर्जा विकासासाठी 20-30 वर्षांचे दीर्घकालीन धोरण तयार करणे आवश्यक आहे.

**स्थानिक उत्पादन वाढविणे.**

सौर पॅनेल आणि पवन टर्बाईन उत्पादन भारतात वाढविणे आवश्यक आहे. यामुळे आयात कमी होईल.

**निष्कर्ष**

नवीकरणीय ऊर्जा भारताच्या आर्थिक आत्मनिर्भरतेसाठी अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. भारतामध्ये सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जल ऊर्जा, जैवऊर्जा, भू-तापीय ऊर्जा आणि महासागर ऊर्जा यांची मोठी क्षमता आहे. या ऊर्जेचा योग्य वापर केल्यास भारत ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबी बनू शकतो.

नवीकरणीय ऊर्जा विकासामुळे आयात खर्च कमी होतो. परकीय चलन बचत होते. रोजगार निर्मिती होते. ग्रामीण भागाचा विकास होतो. उद्योगांना चालना मिळते. पर्यावरणीय संतुलन राखले जाते.

भारत सरकारने विविध योजना राबवून नवीकरणीय ऊर्जा विकासाला प्रोत्साहन दिले आहे. भविष्यात भारत नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात जागतिक नेतृत्व करू शकतो.

**संदर्भ**

1. नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार
2. आर्थिक सर्वेक्षण, भारत सरकार
3. ऊर्जा धोरण अहवाल, भारत सरकार
4. NITI Aayog ऊर्जा अहवाल
5. International Energy Agency Report
6. World Bank Renewable Energy Report
7. भारत ऊर्जा सांख्यिकी अहवाल
8. विविध संशोधन लेख आणि जर्नल

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# हरित अर्थव्यवस्था, शाश्वत विकासाचा मार्ग

**बोरावके संगिता शंकर**
वाघीरे महाविद्यालय सासवड

**Manuscript ID:**
JRD -2026-180415
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 73-76
April - 2026

**Submitted:** 11 Mar. 2026
**Revised:** 25 Mar 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***गोषवारा –***

*हरित अर्थव्यवस्था (green economy) आणि शाश्वत विकास (Sustanable Development) या संकल्पना आजच्या जगात विकासाच्या चर्चेत अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या आहेत .हरित अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास यांचा परस्पर संबंध अतूट आहे .हरित अर्थव्यवस्था ही शाश्वत विकास साध्य कारण्यासाठी एक प्रभावी मार्ग मानला जातो उदा. स्वच्छ ऊर्जा हरित तंत्रज्ञान कचरा व्यवस्थापन आणि जलसंधारण यासारख्या योजना शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांना पूरक ठरतात. तथापि या संकल्पनेच्या अंमलबजावणी बाबत अनेक आव्हाने आहेत विशेषता एक असंशील देशांमध्ये विकास आणि पर्यावरण यामधील संत राखणे कठीण ठरते हरित अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास हा एकमेकांना पूरक असून दीर्घकालीन समृद्धी आणि पर्यावरणीय संतुलनासाठी अत्यावश्यक आहे यासाठी सरकार उद्योग आणि समाज यांना एकत्रित प्रयत्न करणं गरजेचं आहे.*

***मुख्यशब्द:*** *हरित अर्थव्यवस्था, शाश्वत विकास, नवीकरणीय ऊर्जा, हरित तंत्रज्ञान, हवामान बदल, पर्यावरण संरक्षण, कचरा व्यवस्थापन, शाश्वत शेती, हरित वाहतूक, कार्बन उत्सर्जन, नैसर्गिक संसाधने, हरित रोजगार, जैवविविधता संवर्धन, स्वच्छ ऊर्जा, पर्यावरणीय संतुलन.*

**प्रस्तावना-**

हरित अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास हे आधुनिक जागतिक अत्यंत महत्त्वाचे आणि चर्चेचे विषय बनले आहेत औद्योगीकरण नागरिकरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या अतिवापरामुळे पर्यावरणावर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला आहे या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे संरक्षण करत आर्थिक प्रगती साधने आवश्यक ठरते हरित अर्थव्यवस्था ही संकल्पना पर्यावरण पूरक तंत्रज्ञान सहसाधनांचा कार्यक्षम वापर आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर भर देते. तर शाश्वत विकास भविष्यातील पिढ्यांच्या गरजा लक्षात घेऊन वर्तमान काळातील विकास साधण्याचा मार्ग दाखवते .त्यामुळे दोन्ही संकल्पना एकमेकांशी निगडित असून मानवी आणि नैसर्गिक संतुलन राखण्यासाठी आवश्यक आहेत हवामानात बदल प्रदूषण आणि नैसर्गिक साधनांचा ऱ्हास आणि पर्यावरण समतोल ढासळणे या जागतिक समस्येमुळे पारंपारिक अर्थव्यवस्था linear economy मर्यादा स्पष्ट झाले आहेत green economy ही संकल्पना एक आशेचा किरण म्हणून उभी राहिली आहे हरित अर्थव्यवस्था म्हणजे अशी आर्थिक व्याख्या जी मानवी कल्याण आणि सामाजिक समता सुधारणे तसेच पर्यावरणीय जोखीम आणि पर्यावरणीय दुर्मिळता लक्षणीय रित्या कमी करते आणि देशाचा शाश्वत विकासाचा मार्ग मोकळा होतो

**हरित अर्थव्यवस्थेचे मुख्य घटक-**

1. नवीकरणीय ऊर्जा(Renewable Energy)-कोळसा आणि तेल ऐवजी सौर पवन/वारा आणि जलविद्युत ऊर्जेचा बायोगॅस यांसारख्या नैसर्गिक स्रोतांपासून मिळणारी ऊर्जा कधीही न संपणारी आहे आणि त्यामुळे पर्यावरण पूरक ऊर्जेचा वापर करता येतो हे स्रोत कोळसा किंवा तेलासारखे मर्यादित नसतात त्यामुळे प्रदूषण होत नाही

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*बोरावके संगिता शंकर वाघीरे महाविद्यालय सासवड*

**How to cite this article:**
*बोरावके, संगिता. शंकर. (2026). हरित अर्थव्यवस्था, शाश्वत विकासाचा मार्ग. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 73–76.* https://doi.org/10.5281/zenodo.21436773

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21436773
OPEN ACCESS

2. हरित वाहतूक(green transport) इलेक्ट्रॉनिक वाहने(EVS) आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे अशी वाहतूक व्यवस्था जी पर्यावरणाचे नुकसान न करता कमीत कमी प्रदूषण करून आणि शाश्वत ऊर्जा स्रोतांचा वापर करून व्यक्ती किंवा वस्तूंची ने आन करणे होय याला शाश्वत वाहतूक असेही म्हणतात.
3. शाश्वत शेती (Sustainable Agriculture) सेंद्रिय शेती, जलसंधारण आणि जैविक विविधतेचे जतन करणे. शाश्वत शेतीत पर्यावरण संतुलनाला जास्त महत्त्व दिले जाते म्हणून तिला पर्यावरणीय शेती असेही म्हणतात शाश्वत शेतीसाठी अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी सेंद्रिय पदार्थ वापरतात 25 Aug 2025-शाश्वत शेतीचा उद्देश आरोग्य/पर्यावरणाला हानी पोहोचवू नये म्हणून निरोगी आणि उच्च दर्जाचे अन्न तयार करणे आहे .
4. कचरा व्यवस्थापन (waste Management)-कचरा कमी करा पुन्हा वापरा पुनर्वापर करा(Reduce,Reuse Recycle) या तत्त्वाचा अवलंब करणे कचरा व्यवस्थापन ही पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि राहणीमान सुधारण्यासाठीची अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे प्रत्येकाला स्वतःचे घर स्वच्छ असावे असे वाटते पण आपला भारत देश स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे याची जाणीव सर्वांना झाली

**हरित अर्थव्यवस्थेची गरज (Need for Green Economy)**

1. हवामान बदलाचा सामना -जागतिक तापमान वाढ 1.5 C ( एक पॉईंट पाच अंश सेल्सिअस) च्या खाली ठेवण्यासाठी म्हणजेच वाढते जागतिक तापमान व हवामान बदलाचे धोके कमी करण्यासाठी तसेच कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी हरित अर्थव्यवस्था महत्त्वाची आहे
2. नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण-पाणी खनिजे आणि जंगले यांचा अतिवापर रोखण्यासाठी हरित अर्थव्यवस्था अशी प्रणाली आहे जी पर्यावरणाचे संरक्षण करण्यासोबतच शाश्वत विकास साध्य करते. यामध्ये नैसर्गिक संसाधनांचा वापर अत्यंत जबाबदारीने आणि कार्यक्षमतेने केला जातो नैसर्गिक संसाधने(Natural Resources)-हरित अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ आहे
3. रोजगाराची निर्मिती-हरित तंत्रज्ञान, ऊर्जा कार्यक्षमता आणि पुनर्विकरणीय क्षेत्रात नवीन नोकऱ्या निर्माण आहेत. पर्यावरणाचे रक्षण करून कमीत कमी कार्बन उत्सर्जित करणारे आणि नैसर्गिक शाश्वत वापर करणारे आर्थिक प्रारूपे होय, त्यामुळे या अर्थव्यवस्थेत रोजगार निर्मितीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत त्यांना ग्रीन जॉब्स(lGreen Jobs) म्हटले जाते. उदा. मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम Maharashtra 20 Dec2014 राज्यातील इच्छुक युवक युवतींना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणारी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना
4. भारतासाठी हरित अर्थव्यवस्था(Green Economy for India)-भारत सरकार पंचमीत उद्दिष्टांद्वारे 2017 पर्यंत नेट झिरो(Net Zero) उत्सर्जन करण्याचे लक्ष ठेवले आहे सौर ऊर्जा(National Solar Mission) आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देणारी FAME योजना हे हरित अर्थव्यवस्थेकडील महत्त्वाचे पाऊल आहे

**हरित अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास संकल्पना –**

या आधुनिक विकासाच्या दोन महत्त्वाच्या संकल्पना आहेत पर्यावरणीय संकटे हवामान बदल आणि संसाधनांची कमतरता यामुळे या संकल्पनांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. हरित अर्थव्यवस्था म्हणजे अशी अर्थव्यवस्था जी पर्यावरणाचा समतोल राखून विकास साधते .या संकल्पनेत नैसर्गिक साधनांचा योग्य वापर व कार्यक्षम वापर प्रदूषण कमी करणे कार्बन उत्सर्जन घटवणे आणि नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे यावर भर दिला जातो यात प्राथमिक घटक सौर ऊर्जेचा वापर कचरा व्यवस्थापन जैविक विविधतेचे संरक्षण इत्यादी होय. शाश्वत विकास या संकल्पनेनुसार वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होऊ नये असा विकास म्हणजे शाश्वत विकास होय. याचे तीन मुख्य स्तंभ-आर्थिक विकास सामाजिक समता व पर्यावरण हे आहेत दोन्ही संकल्पनांचा संबंध हरित अर्थव्यवस्था हा शास्वत विकास साध्य करण्याचा मार्ग आहे .पर्यावरण पूरक तंत्रज्ञान स्वच्छ ऊर्जा आणि संशोधनाचे संवर्धन यामुळे दीर्घकालीन विकास साधता येतो.

**हरित अर्थव्वस्था आणि शाश्वत विकास भूमिका –**

हरित अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास हे आधुनिक काळातील अत्यंत महत्त्वाचे आणि परस्परक पूरक संकल्पना आहेत. पर्यावरणाचे रक्षण करत आर्थिक प्रगती साधने हा याचा मुख्य उद्देश आहे. जी नैसर्गिक साधन संपत्तीचा विवेकी वापर करते. प्रदूषण कमी करते आणि पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम मर्यादित ठेवते यात नवीनी करणीय ऊर्जा(उदा सौर वारा) स्वच्छ तंत्रज्ञान कार्यक्षमता आणि जैवविविधतेचे संरक्षण यांना प्राधान्य दिले जाते. शाश्वत विकास ही संकल्पना 1987 मध्ये world commission on environment and development ( बृट लँड आयोग) यांनी मांडली त्यानुसार सध्याच्या पिढीच्या गरजा भागवताना भविष्यातील पिढ्यांवर परिणाम होणार नाही. असा विकास म्हणजे शाश्वत विकास होय. आजच्या घडीला हवामान बदल प्रदूषण जंगलतोड आणि संसाधनांची घट ही खंडेरावाने आहेत या समस्यांवर मात करण्यासाठी हरित अर्थव्यवस्था हा प्रभावी मार्ग ठरतो तसेच शाश्वत विकास उद्दिष्ट या दिशेने जागतिक पातळीवरील महत्त्वाची पावले आहेत यामुळे हरित अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास हे केवळ पर्यावरण पूरक नसून दीर्घकालीन आर्थिक स्थैर्यआणि समृद्ध जगासाठी या संकल्पनांची अंमलबजावणी अत्यंत गरजेचे आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**हरित अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास महत्व –**

हरितार्थ व्यवस्था आणि शाश्वत विकास यांचे महत्त्व आजच्या काळात अत्यंत वाढलेले आहे कारण ते पर्यावरणाचे संरक्षण करताना आर्थिक आणि सामाजिक प्रगती साधण्याचा संतुलित मार्ग दर्शकतात. सर्वप्रथम पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने ते अत्यंत आवश्यक आहे मध्यप्रदेश हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांची घट या समस्या गंभीर होत आहे अरे त्या अर्थव्यवस्थेमुळे प्रदूषण कमी होऊन पर्यावरणाचा समतोल राखला जातो. तसेच आर्थिक विकासाला दीर्घकालीन स्थैर्य मिळते .पारंपारिक पद्धती ऐवजी स्वच्छ ऊर्जा हरित तंत्रज्ञान आणि संशोधनाचा कार्यक्षम वापर केल्यास अर्थव्यवस्था अधिक टिकाऊ बनते त्यामुळे रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होतात तसेच सामाजिक समता साधण्यास मदत होते शाश्वत विकासामुळे सर्व घटकांना समान संधी मिळणे आणि गरिबी कमी करण्यास मदत होते जीवनमान सुधारण्यास याचा मोठा हातभार लागतो

**आव्हाने –**

हरत अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास साध्य करताना अनेक प्रकारचे आव्हाने समोर येतात. पारंपारिक औद्योगिक पद्धतीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थांना हरी तंत्रज्ञानाकडे वळवणे खर्चिक आणि कठीण ठरते अनेक विकसनशील देशांमध्ये आर्थिक मर्यादा तांत्रिक साधनसंपत्तीच्या अभाव असल्यामुळे पर्यावरण पूरक उपाययोजना अमलात आणणे आव्हानात्मक ठरते. तसेच लोकसंख्येची वाढ आणि वाढत्या गरजा यामुळे नैसर्गिक संसाधनांवर ताण येतो ऊर्जा पाणी आणि अन्न याची वाढती मागणी असल्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे कठीण बनते तसेच जनजागृतीचा अभाव आणि लोकांमध्ये पर्यावरणाबद्दलची कमी संवेदनशीलता हे देखील एक मोठी अडचण आहे विकसित आणि विकसनशील देशातील आर्थिक विषमता यामुळे समान पातळीवर उपाययोजना राबवणे कठीण आहे या सर्व आव्हानांवर मात करण्यासाठी प्रभावी धोरणे जनजागृती तांत्रिक नव संकल्पना आणि जागतिक सहकार्य अत्यंत आवश्यक आहे

**उपाय व शिफारशी -**

i) सरकारने पर्यावरणीय पूरक धोरणे तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी कार्बन व सर्जनावर नियंत्रण ठेवण्यासाठी क** नियम लागू करणे हरित कर व प्रोत्साहन योजना राबवणे

ii) अक्षय ऊर्जा वापर वाढवणे सौर पवन जल आणि जैव ऊर्जा यांचा अधिक वापर पारंपारिक इंधनावर कोळसा पेट्रोल अवलंबित व कमी करणे ग्रामीण भागात सौर ऊर्जा प्रकल्प वाढवणे

iii) कचरा व्यवस्थापन सुधारणा (Reduce Reuse Recycle3R) तत्वाचा वापर आणि प्रचार. प्लास्टिक वापरावर निर्बंध आणि पर्यायी पदार्थाचा वापर शाश्वत शेती सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन पाण्याचा कार्यक्षम वापर रासायनिक खतांचा कमी वापर

iv) शहरी नियोजन (urban planning) हरित इमारती (green building.) विकसित करणे सार्वजनिक वाहतूक सुधारणा खाजगी वाहनांचा वापर कमी करणे

v) जनजागृती प्रशिक्षण-शाळा महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षण नागरिकांमध्ये जीवनशैलीचा प्रचार सामाजिक माध्यमाद्वारे जागृती

vi) उद्योग क्षेत्रातील सुधारणा -उद्योजकांनी स्वच्छ उत्पादन तंत्रज्ञान (क्लीन Technology) वापरणे. ऊर्जा कार्यक्रम यंत्रणा वापरणे प्रदूषण नियंत्रणासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे

vii) आंतरराष्ट्रीय सहकार्य - विकसित व विकसनशील देशांमध्ये तंत्रज्ञान व निधीची देवाणघेवाण.

जागतिक पर्यावरण करारांचे पालन हवामान बदलावर सामाईक उपाय योजना

**सारांश –**

हरित अर्थव्यवस्था ही अशी आर्थिक प्रणाली आहे जी पर्यावरणाचे संरक्षण नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि सामाजिक समता यांना प्राधान्य देते शाश्वत विकासाचा उद्देश वर्तमान पिढीच्या गरजांवर परिणाम होऊ न देणे हा आहे. या दोन्ही संकल्पना परस्परपूरक असून पर्यावरणातील संतुलन राखत आर्थिक प्रगती साधण्यावर भर देतात हरित ऊर्जा प्रदूषण नियंत्रण कचरा व्यवस्थापन आणि जैवविविधतेचे संवर्धन यासारख्या उपाययोजना यामध्ये महत्त्वाच्या ठरतात.

**संदर्भ सूची-**

1. Ministry of Environment Forest &Climate change (2023) Green Indian Mission progress Report
2. Union Budget 2025-26) Company Servey Chapter on Sustainable Development & Climate Change'
3. Bhamra Anshul (2018) Indian Green economy Barometer
4. Bholane K.P. (2013) A policy shift from economics growth to Green growth to green growth wheel special reference to India
5. Tygro V. (2017) Green economy in India possibilities & challenges
6. Krishna.N.R. (2022) A green economy India's Sustainable development.
7. Babu George (2022) progress in green economics
8. world Bank Inclusive Green Growth Report
9. सरकार आर्थिक संरक्षण पर्यावरण व हरित अर्थव्यवस्था विभाग
10. देशपांडे पर्यावरण आणि शाश्वत विकास पुणे विद्यापीठ प्रकाशन
11. जोशी सर पर्यावरण शास्त्र आणि शाश्वत विकास पुणे विद्यापीठ प्रकाशन

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

12. पाटील रख 'पर्यावरण संवर्धन आणि समाज कोल्हापूर' साई प्रकाश
13. योजना /मासिक(मराठी आवृत्ती) हरित अर्थव्यवस्था विषयक विशेषांक
14. तसेच डॉक्टर एल बी घोलप यांचे पर्यावरणाचे अर्थशास्त्र या पुस्तकाचा देखील उपयोग होतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# सर्वसमावेशक विकासातील दरी कमी करणे

**महेश दत्तात्रय गावडे**
शरदचंद्रजी पवार महाविद्यालय जेजुरी

**Manuscript ID**:
JRD -2026-180416
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 77-79
April - 2026
**Submitted:** 11 Mar. 2026
**Revised:** 25 Mar 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***गोषवारा:***

*सर्वसमावेशक विकास हा एक असा दृष्टिकोन आहे जो विकास आणि वाढीच्या प्रक्रियेत समाजातील सर्व घटकांच्या समान सहभागावर भर देत असतो, विशेषतः उपेक्षित आणि असुरक्षित लोकसंख्येवर लक्ष केंद्रित करतो. वाढत्या जागतिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर, सर्वसमावेशक विकास हा प्रत्येकाला सामान संधी, संसाधने आणि सेवांची उपलब्धता सुनिश्चित करणारी धोरणे व कार्यपद्धती विकसित करून सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक आणि प्रादेशिक दरी कमी करण्याचा प्रयत्न करतो. हा शोधनिबंध सर्वसमावेशक विकासाच्या बहुआयामी स्वरूपाचा शोध घेतो, आणि सर्वसमावेशक आर्थिक वाढ, सामाजिक संरक्षण प्रणाली, सहभागी शासनप्रणाली आणि पर्यावरणीय शाश्वतता हे घटक एकत्रितपणे विषमता कशी कमी करू शकतात व समाज्याच्या सर्वांगीण कल्याणाला कसे चालना देऊ शकतात, याचे परीक्षण करतो आहे. सर्वसमावेशकतेचे पायाभूत आधारस्तंभ म्हणून शिक्षण, आरोग्यसेवा, डिजिटल उपलब्धता आणि लैंगिक समानता यांच्या भूमिकेकडे विशेष लक्ष दिले आहे.हा शोधनिबंध विकसनशील आणि विकसित दोन्ही देशांमधील अभ्यास-प्रकरणांचे (केस स्टडीज) विश्लेषण करतो, आणि सर्वसमावेशक धोरणांच्या अंमलबजावणीतील सर्वोत्तम कार्यपद्धती व आव्हाने निश्चित करतो. हा शोधनिबंध यावर जोर देतो की, आर्थिक वाढ हा विकासाचा एक महत्त्वाचा घटक असला तरी, त्याच्या लाभांचे समान वितरण सुनिश्चित करणाऱ्या यंत्रणांशिवाय तो स्वतःच परिपूर्ण नाही. सर्वसमावेशक विकासासाठी वरून खाली येणाऱ्या (टॉप-डाउन) मॉडेलमधून समुदाय-चालित दृष्टिकोनात बदल करणे आवश्यक आहे, जे स्थानिक घटकांना सशक्त करतात आणि अल्प-प्रतिनिधित्व असलेल्या गटांमध्ये कर्तृत्वक्षमता वाढवतात. याव्यतिरिक्त, हा अभ्यास जागतिकीकरण आणि तांत्रिक बदलांच्या परिणामांकडे लक्ष वेदतो. धोरणात्मक शिफारसींमध्ये संस्थात्मक क्षमता बळकट करणे, मानवी भांडवलामध्ये गुंतवणूक करणे आणि शाश्वत विकास उद्दिष्टांशी (SDGs) सुसंगत अशा सर्वसमावेशक धोरणात्मक चौकटी तयार करणे यांचा समावेश यामधे आहे. या शोधनिबंधाचा निष्कर्ष असा आहे की, सर्वसमावेशक विकासाद्वारे विषमतेतील दरी कमी करणे ही केवळ एक नैतिक गरज नाही, तर सामाजिक सुसंवाद, आर्थिक लवचिकता आणि दीर्घकालीन शाश्वतता प्राप्त करण्यासाठी एक व्यावहारिक धोरण देखील महत्त्वाचे आहे. विकास नियोजन आणि अंमलबजावणीच्या केंद्रस्थानी सर्वसमावेशकतेला ठेवून, समाज आपल्या विविध लोकसंख्येची पूर्ण क्षमता वापरू शकतात आणि अधिक न्याय्य व समान भविष्य घडवू शकतात.*

***मुख्य शब्द:*** *सर्वसमावेशक विकास, सामाजिक समानता, उपेक्षितता, धोरणात्मक हस्तक्षेप, शाश्वत विकास*

## प्रस्तावना

विकासाची तुलना दीर्घकाळापासून आर्थिक वाढीशी केली जात आहे, ही वाढ मुख्येत्वे स्थुल देशांतर्गत उत्पादनाद्वारे (GDP) आणि इतर आर्थिक निर्देशांकांद्वारे मोजली जाते. परंतु, अशा मोजमापांमध्ये संपत्तीच्या वितरणातील विषमता, सामाजिक समावेशकता आणि मानवी कल्याण या बाबींकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. सर्वसमावेशक विकासाच्या आधारे या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. तो आर्थिक प्रगतीची सांगड सामाजिक समानतेशी घालतो आणि विकासाचे फायदे समाजातील सर्व घटकांपर्यंत कसे पोहोचतील याची खात्री देतो.

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.21436854

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*महेश दत्तात्रय गावडे शरदचंद्रजी पवार महाविद्यालय जेजुरी*

**How to cite this article:**
*गावडे, महेश. दत्तात्रय (2026). सर्वसमावेशक विकासातील दरी कमी करणे. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 77–79.* https://doi.org/10.5281/zenodo.21436854

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

हा शोधनिबंध सर्वसमावेशक विकासाच्या विविध घटकांचा सखोल आभास करतो आणि अधिक न्याय्य व शाश्वत भविष्य घडवण्यात त्याचे असलेले महत्त्व अधोरेखित करतो.

**सर्वसमावेशक विकासाची संकल्पनात्मक चौकट**

सर्वसमावेशक विकास म्हणजे एक समग्र दृष्टिकोन आहे. हा दृष्टिकोन आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय घटकांची सांगड घालतो, जेणेकरून विकासाचे फायदे प्रत्येक व्यक्तीपर्यंत कसे पोहोचतील याकडे लक्ष्य देतो. विशेषतः अशा व्यक्ती सामाजिक-आर्थिक, भौगोलिक किंवा सांस्कृतिक घटकांमुळे अनेकदा विकासाच्या प्रवाहाबाहेर राहिलेल्या आहेत आशा व्यक्तींकडे लक्ष देतो. यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो:

1. संधींच्या उपलब्धतेमध्ये समानता
2. निर्णय प्रक्रियेत सहभाग
3. विषमतेत घट
4. वंचित समुदायांचे सक्षमीकरण

सर्वसमावेशक विकासाची मुळे मूलतः मानवाधिकारामध्ये रुजलेली आहेत. हा दृष्टिकोन प्रत्येक व्यक्तीचे अंगभूत मूल्य मान्य करतो आणि विकास प्रक्रियेत त्यांच्या सक्रिय सहभागाचा पुरस्कार करतो.

**विकास प्रतिमानांमधील सद्यस्थितीतील त्रुटी**

धोरणात्मक वचनबद्धता असूनही, सर्वसमावेशक विकास साध्य करण्याच्या मार्गात आजही काही महत्त्वपूर्ण त्रुटी किंवा उणिवा कायम दिसून येतात.

1. **आर्थिक विषमता:** संपत्तीचे केंद्रीकरण वाढतच चालले आहे. समाजातील सर्वात श्रीमंत घटकांना विकासातून मिळणाऱ्या लाभांचा disproportionate (प्रमाणाबाहेर) मोठा हिस्सा मिळत आहे.
2. **सामाजिक बहिष्करण:** अल्पसंख्याक गट, महिला, दिव्यांग व्यक्ती आणि ग्रामीण भागातील लोक यांना सहभागाच्या बाबतीत अनेकदा संस्थात्मक किंवा व्यवस्थेतील अडथळ्यांचा सामना करावा लागतो आहे.
3. **धोरण अंमलबजावणीतील त्रुटी:** अगदी चांगल्या उद्देशाने तयार केलेली धोरणेही अनेकदा कमकुवत संस्थात्मक संरचना, राजकीय इच्छाशक्तीचा अभाव किंवा संसाधनांच्या अयोग्य वाटपामुळे अपयशी ठरतात.
4. **डिजिटल दरी:** तांत्रिक प्रगती सर्वांसाठी समान रीतीने उपलब्ध झालेली नाही, यामुळे काही विशिष्ट गट विकासाच्या प्रवाहातून आणखीच बाजूला फेकले गेले आहेत.

**समावेशक विकासाचे विविध आयाम**

समावेशक विकासामध्ये अनेक महत्त्वाच्या आयामांचा समावेश होतो.

1. **आर्थिक समावेशकता:** सर्वांसाठी आर्थिक संसाधने, रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी समान रीतीने उपलब्ध करून देणे.
2. **सामाजिक समावेशकता:** शिक्षण, आरोग्यसेवा आणि शासन-प्रशासन यांसारख्या सामाजिक प्रक्रियांमध्ये सर्व व्यक्तींच्या सहभागाला प्रोत्साहन देणे.
3. राजकीय समावेशकता: सहभागी शासन पद्धती, सत्तेचे विकेंद्रीकरण आणि उत्तरदायित्व यंत्रणांच्या माध्यमातून नागरिकांचे सक्षमीकरण करणे.
4. **पर्यावरणीय समावेशकता:** शाश्वतता आणि हवामान, न्यायाची सांगड घालणे, जेणेकरून पर्यावरणीय धोरणे आखताना असुरक्षित किंवा संवेदनशील समुदायांच्या हिताचाही विचार केला जाईल.

**तफावत भरून काढण्यासाठीची रणनीती**

1. **धोरणात्मक सुधारणा:** लाभ पासून वगळले जाणे (exclusion) आणि असमानता यांच्या मूळ कारणांवर उपाय करणाऱ्या सर्वसमावेशक धोरणांची आखणी करणे.
2. **क्षमता बांधणी:** उपेक्षित गटांचे कौशल्य आणि क्षमता वाढवणे, जेणेकरून विकास प्रक्रियेत त्यांचा सहभाग सहज होईल.
3. **सर्वसमावेशक प्रशासन:** निर्णय प्रक्रियेत सहभाग आणि समुदाय सहभागासाठी मंच (platforms) निर्माण करणे.
4. **समावेशासाठी तंत्रज्ञान:** माहिती, सेवा आणि बाजारपेठांपर्यंतची पोहोच सुधारण्यासाठी डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करणे.
5. **सार्वजनिक-खाजगी भागीदारी:** संसाधने आणि तज्ज्ञता (expertise) एकत्रित करण्यासाठी सरकार, खाजगी क्षेत्र आणि नागरी समाज यांच्यातील सहकार्याला प्रोत्साहन देणे.

**अभ्यास प्रकरणे (Case Studies) आणि सर्वोत्तम कार्यपद्धती**

1. **भारताची MGNREGA:** 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा' (MGNREGA) हा उपजीविकेची सुरक्षा प्रदान करण्यात आणि ग्रामीण समुदायांचे सक्षमीकरण करण्यात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

2. **ब्राझीलचा 'बोल्सा फमिलिया' कार्यक्रम:** अती-संवेदनशील लोकसमूहांना लक्ष्य करणाऱ्या या 'अटी-आधारित रोख हस्तांतरण' (conditional cash transfer) कार्यक्रमाने गरिबी आणि असमानता लक्षणीयरीत्या कमी केली आहे.
3. **रवांडाची लैंगिक समावेशक धोरणे:** घटनात्मक सुधारणा आणि सर्वसमावेशक प्रशासनाच्या माध्यमातून, रवांडा लैंगिक समानतेच्या क्षेत्रात एक अग्रणी देश बनला आहे.

**सर्वसमावेशक विकास साध्य करण्यातील आव्हाने**

1. **संस्थात्मक जडत्व:** बदलाला होणारा विरोध आणि सखोल रुजलेली सत्ता-समीकरणे अनेकदा सुधारणांच्या प्रयत्नांमध्ये अडथळा निर्माण करतात.
2. **संसाधनांची मर्यादा:** मर्यादित आर्थिक आणि मानवी संसाधनांमुळे सर्वसमावेशक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत अडथळे येण्याची जास्त शक्यता असते.
3. **सांस्कृतिक अडथळे:** पारंपारिक रूढी आणि सामाजिक दृष्टिकोन विशिष्ट गटांच्या सहभागावर मर्यादा घालतात.
4. **देखरेख आणि मूल्यमापन:** ठोस आकडेवारी आणि अभिप्राय (feedback) यंत्रणांच्या अभावामुळे धोरणांची परिणामकारकता स्पष्टपणे समजणे कठीण होते.

**निष्कर्ष**

सर्वसमावेशक विकास ही केवळ एक नैतिक गरजच नाही, तर शाश्वत वाढ आणि सामाजिक सलोखा साध्य करण्यासाठीची एक व्यावहारिक आवश्यकता आहे. ही तफावत भरून काढण्यासाठी सर्व भागधारकांकडून सरकार, नागरी समाज, खाजगी क्षेत्र आणि समुदाय एकजूट होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, जेणेकरून असे वातावरण निर्माण होईल ज्यामुळे प्रत्येक व्यक्तीची प्रगती होऊ शकेल. आर्थिक अस्थिरतेपासून ते हवामान बदलापर्यंतच्या गुंतागुंतीच्या आव्हानांशी जग जेव्हा तोंड देत आहे, अशा वेळी सर्वसमावेशक विकास हा लवचिकता, समानता आणि सामायिक समृद्धीकडे नेणारा एक मार्ग ठरतो.

**संदर्भ**

1. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP). मानवी विकास अहवाल (2021).
2. जागतिक बँक. Inclusion Matters: The Foundation for Shared Prosperity (2020).
3. भारत सरकार. आर्थिक सर्वेक्षण (2022).
5. रॉल्स, जे. न्यायाचा सिद्धांत(1971).
6. डॉ. सतपाल. Inclusive Development: Bridging The Gap(2025)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# डोंगरी भागातील शेती एक शाश्वत आर्थिक विकासाचे स्त्रोत संदर्भ राजगड तालुका जिल्हा पुणे

**डॉ. सचिन गजानन घाडगे**
सहाय्यक प्राध्यपक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शंकरराव भेलके महाविध्यालय नसरापूर

**Manuscript ID:**
JRD -2026-180417
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 80-85
April- 2026
**Submitted:** 11 Mar. 2026
**Revised:** 25 Mar 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***सारांश***

*पुणे जिल्ह्यातील राजगड तालुक्यातील सिंगापूर, मोहरी, एकलगाव आणि घिसर या डोंगरी गावांमधील शेतीच्या माध्यमातून होणाऱ्या शाश्वत आर्थिक विकासाचा अभ्यास या संशोधनात करण्यात आला आहे. डोंगरी भागातील शेती ही पर्यावरणपूरक, पारंपरिक आणि कमी खर्चिक असल्याचे आढळून आले. भात, नाचणी, वरई यांसारख्या पिकांसह पशुपालन हा महत्त्वाचा जोडधंदा असून स्थानिक लोकांच्या उपजीविकेचा प्रमुख आधार आहे. शेतीमध्ये रासायनिक खतांचा वापर न करता सेंद्रिय खतांचा वापर केला जातो, त्यामुळे पर्यावरणीय संतुलन राखले जाते. पर्यटनाच्या वाढत्या संधींमुळे स्थानिकांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले आहे. तथापि, रब्बी हंगामात रोजगाराच्या शोधार्थ स्थलांतराची समस्या दिसून येते. संशोधनातून डोंगरी भागातील शेती ही शाश्वत विकासासाठी महत्त्वपूर्ण आर्थिक स्त्रोत असून तिच्या संवर्धनासाठी शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे स्पष्ट होते.*

***मुख्य शब्द:*** *डोंगरी शेती, शाश्वत विकास, पर्यावरणपूरक शेती, राजगड तालुका, पशुपालन, ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यटन, स्थलांतर, सेंद्रिय शेती, पश्चिम घाट.*

## प्रस्तावना :

महाराष्ट्रातील पश्चिम घाट हा वन्यजीव आणि वनस्पतींनी समृद्ध असल्यामुळे त्याला जैविक हॉटस्पॉट म्हणून घोषित करण्यात आले आहे. यास अनुसरून पुणे जिल्ह्यातील राजगड तालुक्यातील डोंगरी भागातील सिंगापूर मोहरी एकलगाव आणिकिसरी या गावातील लोकांची शेती एक शासक विकासाचे स्त्रोत म्हणून अभ्यासण्यात आले आहे. आती दुर्गम भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या गावांची सामाजिक आर्थिक सांस्कृतिक आणि यास अनुसरून पर्यावरण पोषक शेती आणि यामधून अर्थार्जण या बाबींवर दृष्टीक्षेप टाकण्यात आलेला आहे नैसर्गिक आपत्ती रोजगारासाठी स्थलांतर इत्यादी समस्यांचा या संशोधनामध्ये आढावा घेण्यात आलेला आहे सदर संशोधनामधून डोंगरी भागातील शेती ही पर्यावरण पूरक कशाप्रकारे आहे आणि यामधून एक स्थिर उत्पन्नाचे स्त्रोत म्हणून शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन याची कारण मी माणसा करण्यात आलेली आहे.

## साहित्य पुनरावलोकन :

केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्याकडून वेळोवेळी डोंगरी भागाच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी घटित करण्यात आलेल्या विविध समित्या लक्षात घेतल्या आहेत.

1. केंद्र सरकारने पाचव्या पंचवार्षिक योजनेत 1974- 1975 डोंगराळ क्षेत्र (Hilly Are Development Programme) विकास कार्यक्रम विकसित केला.

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने राज्यातील डोंगराळ भागाच्या विकासासाठी राज्यस्तरीय कार्यक्रम तयार करणे करता एक विशेष समितीची नियुक्ती केली.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. सचिन गजानन घाडगे सहाय्यक प्राध्यपक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शंकरराव भेलके महाविध्यालय नसरापूर*

**How to cite this article:**
*घाडगे, सचिन. गजानन. (2026). डोंगरी भागातील शेती एक शाश्वत आर्थिक विकासाचे स्त्रोत संदर्भ राजगड तालुका जिल्हा पुणे. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 80–85.*
*https://doi.org/10.5281/zenodo.21436939*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.21436939

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

या कार्यक्रमाची अंमलबजावणी 1992 1993 या आर्थिक वर्षात झाली.

2. माधव गाडगीळ समिती: पश्चिम घाट पर्यावरण तज्ञ समितीची स्थापना केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने चार मार्च 2010 रोजी केली.

**कस्तुरी रंगात समिती अहवाल :**

18 ऑक्टोंबर 2013 डॉक्टर के.कस्तुरीरंगण यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पश्चिम महाराष्ट्राच्या विकासासंदर्भात तयार केलेल्या प्रस्तावाला मंजुरी दिली वन्यजीव संरक्षण कायदा 1972 भारतीय वन कायदा 1927 आणि वनसंवर्धन कायदा 1980 यासारख्या कायद्यानुसार कडक संरक्षणाच्या अधीन असलेले सर्व घटक राज्याच्या मालकीची आहेत. पुणे जिल्ह्यातील डोंगरी भागातील शाश्वत आर्थिक विकासाचे स्रोत स्थिती: पुणे जिल्ह्यातील डोंगरी भागात शेती हे उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. या भागात प्रामुख्याने सह्याद्रीच्या रांगांमधील भोर भिल्हे मुळशी मावळ खेड आणि आंबेगाव या तालुक्यांचा समावेश होतो. पुणे जिल्ह्याच्या डोंगरी भागातील प्रमुख कृषी स्रोत आणि पिके लक्षात घेता भात शेती हे मुख्य पीक आहे. नाचणी आणि वरई डोंगरी भागात जमिनीच्या उतारावर आणि हलक्या जमिनीत नाचणी आणि वरई सारखी पौष्टिक भरडधान्य घेतली. डोंगर आणि कमी उत्पादक जमिनीत आंबा, काजू आणि काही भागात डोंगरातच आढळणाऱ्या करवंदासारख्या फळांचा अर्थार्जनासाठी स्रोत म्हणून पाहिले जाते. पशुपालन, शेती बरोबर सोबतच दुग्ध व्यवसाय हा मोठा जोडधंदा आहे. डोंगरी भागात मुक्त संचार करणाऱ्या जनावरांमुळे दुग्धोत्पादन चांगल्या प्रमाणात होते. वनशेती डोंगर भागात औषधी वनस्पती आणि झाडांची लागवड देखील केली जाते. डोंगरी भागातील शेतीची वैशिष्ट्ये लक्षात अभ्यासात लागवडीसाठी आणली जाणारी कमी जमीन. उताराचे प्रमाण जास्त आहे, हवामानाचा अंदाज घेऊन शेती शेती ही पारंपारिक पद्धतीने केली जाते.

**डोंगर रांगा आणि पर्यटन:**

पुणे जिल्ह्यातील राजगड तालुक्यामध्ये प्रामुख्याने किल्ले तोरणा, किल्ले राजगड आणि किल्ले लिंगाणाऐतिहासिक घटनांचे साक्षीदार आहेत. पर्यटनाच्या दृष्टीने गिर्यारोहण प्रेमींसाठी येथील वातावरण आल्हादायक आहे. या कारणास्तव पर्यटक या ठिकाणी आकर्षिली जातात. याभागामध्ये पर्यटनाच्या माध्यमातून या गावान्माढेल कुटुंबाना आर्थिक लाभ होत आहोत.

**संशोधनाची व्याप्ती आणि महत्त्व:**

सदर संशोधनामधून डोंगरी भागातील मानवी जीवन आणि त्याच्या सामाजिक आणि आर्थिक सांस्कृतिक, ऐतिहासिक इत्यादी घटकांमधून व्याप्ती मांडण्यात आलेली आहे. सदर मानवाचे सामाजिक जीवन आणि त्यांची आर्थिक जडणघडण आणि पर्यावरण या अनुषंगाने शाश्वत विकास कशाप्रकारे साधला जात आहे या दृष्टीने महत्त्व मांडले आहे.

**संशोधनाची समस्या:**

डोंगरी शेती ही मर्यादित प्रमाणात केली जाते. शाश्वत विकासाचे जरी स्रोत असले तरी ही निसर्गावर अवलंबून आहे.

**संशोधनाचे गृहीतक:** डोंगरी भागातील शेती ही शाश्वत शेती असून पर्यावरणास पूरक अशी शेती आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. डोंगरी भागातील शेतीची उत्पादकता अभ्यासणे.
2. डोंगरी भागातील शेती मधील रोजगार संधी अभ्यासणे.
3. डोंगरी भागातील शेतीमधून झालेले स्थलातर अभ्यासणे.
4. डोंगरी भागातील शेतीजोड व्यवसाय अभ्यासणे.

**नमुना निवड:**

सदर संशोधनामध्ये नमुना निवड करताना राजगड तालुक्यातील सिंगापूर, मोहरी, एकलगाव आणि घिसर या गावांची सहेतुक प्रोबॅलिटी नमुना निवडीनुसार कोटा पद्धतीनुसार 5 % निवड करण्यात आलेली आहे.

कोष्टक क्रमांक 01

| गावांची नावे | गावातील एकूण घरांची संख्या | गावातील एकूण लोकसंख्या | एकूण कुटुंबापैकी निवडलेले कुटुंबे | वैयक्तिक नमुना निवड |
|---|---|---|---|---|
| घिसर | 104 | 239 | 10 | 12 |
| एकलगाव | 10 | 59 | 10 | 03 |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सिंगापूर | 16 | 101 | 05 | 06 |
| मोहरी | 08 | 36 | 05 | 05 |

स्त्रोत : प्रश्नावली

**माहिती संकलन :**

माहिती संकलनासाठी प्राथमिक स्त्रोतामध्ये मुलाखत आणि प्रश्नावलीचा वापर करण्यात आलेला आहे.

**द्वितीय स्त्रोतामध्ये :**

Census 2011 Rport ,केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचे अहवालांचा संदर्भ घेण्यात आलेला आहे.

**माहितीचे विश्लेषण आणि पृथकरण**

2011 च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार राजगड तालुक्यामध्ये एकूण 130 गावे आहेत. यामधील डोंगरी भागात असलेली एकूण 04 गावे संशोधनासाठी निवडली आहेत.

**गावांची भौगोलिक क्षेत्र आणि लोकसंख्या, इतर माहिती**

**1. घिसर:**

गावाची एकूण लोकसंख्या 239 आहे यामध्ये महिलांचे प्रमाण 252 आणि लिंग गुणोत्तर 95 आहे. भौगोलिक क्षेत्र 11127 हेक्टर / 11.12 किलोमीटर स्केअर(Km2) आहे. एकूण लोकसंख्येपैकी 281 कामामध्ये व्यस्त आहे यामध्ये महिलांचे प्रमाण 130 तर पुरुषांचे प्रमाण 151 आहे. साक्षरता 54. 79% यामध्ये पुरुषांचे प्रमाण 67.19% तर स्त्रियांचे प्रमाण 43.72% आहे. एसी आणि एसटीची अनुक्रमे लोकसंख्या सहा आणि एक आहे.

**2. एकलगाव** :

गावाची लोकसंख्या 59 आहे. भौगोलिक क्षेत्र 319/3.19 km2 हेक्टर आहे. स्त्रियांचे प्रमाण ते 30 तर पुरुषांचे प्रमाण 76 आहे लिंग गुणोत्तर प्रमाण 79 आहे. साक्षरतेचे प्रमाण 47.42% आहे. यामध्ये पुरुष साक्षरता 45.45% तर स्त्री साक्षरता 50 टक्के आहे गावामध्ये एकूण कामगारांची संख्या 27 यामध्ये पुरुष 15 तर स्त्रिया 12 आहेत. एस. सी. आणि एस.टी. यांची लोकसंख्या 0 आहे

**3. सिंगापूर :**

गावाचे भौगोलिक क्षेत्रफळ 347 हेक्टर / 3.47 किलोमीटर स्क्वेअर आहे. गावामध्ये महिलांचे प्रमाण 56 तर पुरुषांचे प्रमाण 45 आहे. लिंग गुणोत्तर प्रमाण 56 आहे. गावाच्या एकूण लोकसंख्या पैकी 47 काम करणारी लोकसंख्या आहे. साक्षरतेचा एकूण दर 64.20% यामध्ये पुरुष साक्षरता 62.86% तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण 65.22% आहे.

**4.मोहरी :**

गावाचे क्षेत्रफळ 468 हेक्टर्स / 4.68 किलोमीटर स्क्वेअर आहे महिलांचे प्रमाण 16 तर पुरुषांचे प्रमाण 10 आहे. स्त्री पुरुष गुणोत्तर 62 आहे. गावातील साक्षरतेचा दर 33.33% आहे यापैकी पुरुष साक्षरता प्रमाण 44% तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण 26.67% आहे. गावात कामकरी लोकसंख्या एकूण 17 आहे.

कोष्टक क्रमांक 02

पीक रचना आणि एकूण उत्पन्न

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

| | डोंगरी शेतीमधील हंगामात घेतली जाणारी पिके | | शेती जोड व्यवसाय | दोन्ही हंगामा मधील एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| | खरीप | रब्बी | | |
| . घिसर: | भात, नाचणी, वरई | करवंद | पशुपालन | 50,000 to 70000 /family |
| एकलगाव | भात, नाचणी, वरई | करवंद | पशुपालन | 40000 to 50000/family |
| सिंगापूर | भात, नाचणी, वरई | करवंद | पशुपालन | 40000 to 60000/family |
| मोहरी | भात, नाचणी, वरई | करवंद | पशुपालन | 40000 to 60000/family |

स्त्रोत : प्रश्नावली

खरीप हंगामामध्ये पावसाचे प्रमाण अधिक असल्याने भात, नाचणी आणि वरी ही डोंगराच्या उतारावर केली जाणारी शेती आहे. या शेतीसाठी मानवी श्रमाचा मोठ्या प्रमाणामध्ये वापर केला जातो. लोकसंख्येचे प्रमाण पाहता शेती करीत असताना मजुरीचे प्रमाण अत्यल्प आहे. हा हंगाम पावसाचा असल्याने या हंगामामध्ये कुटुंबातील सदस्य आणि इतर कुटुंबातील सदस्य एकमेकांच्या साह्याने कोणताही मोबदला न घेता शेती करीत आहेत. आपापसामधील आपुलकी प्रेम जिव्हाळा हा आज देखील या ग्रामीण भागामध्ये दिसून येत आहे. डोंगर शेती ही मुख्यत्वे अगदी डोंगराच्या उंच भागामध्ये कमी अधिक उतारा केली जात आहे. पाण्याचा निचरा होण्यासाठी साचेबद्ध पद्धतीने पिकांची लागवड केली जाते. यामध्ये कोणतेही यंत्राचा वापर केला जात नाही. वैशिष्ट्य म्हणजे पिकाच्या लागवडीपासून काढणीपर्यंत मानवी श्रमाचाच वापर केला जातो. मळणीसाठी मात्र खळे करून बैलांच्या साह्याने किंवा काढून झालेले भात सडनी पद्धतीने घेतले जाते. अर्थातच पर्यावरणास पूरक अशी डोंगरी भागातील पीक रचना असल्यामुळे कमी जागेमध्ये उत्पन्न मिळत आहे.रब्बी हंगाम कोरडा जातो. या हंगामामध्ये कुटुंबातील तरुण सदस्यांचे स्थलातर रोजगारासाठी होते.

**संस्कृती:**

या गावांमध्ये संस्कृती पारंपारिक पद्धतीने केले जाणारे सण यात्रा अगदी साध्या पद्धतीने केले जातात.

या गावातील लोकांच्या घराचे रचना या निसर्गाला अनुसरूनच आहेत.गावामध्ये पारंपारिकरित्या सण जत्रा साध्या पद्धतीने साजरी केले जातात.

**पर्यावरण पूरक शेती :**

शेतीमध्ये कोणत्याही प्रकारचे रासायनिक खत वापरले जात नाही. पशुपालनापासून मिळालेल्या खतांचाच वापर शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी केला जातो.शेणखत, गांडूळ खत. लेंडी खत इ.

**परसबाग :** प्रत्येक घराच्या अवतीभोवती परसबाग तयार करण्यात आलेली आहे. यामध्ये वांगी टोमॅटो, मिरची आणि इतर भाज्यांचे कुटुंबाच्या उदरनिर्वासाठी उत्पादन घेतले जाते.

**पर्यावरण पूरक शेती आणि इतर घटक**

कोष्टक क्र. ०३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे शेतीजोड व्यवसायामध्ये निवड केलेल्या गावातील कुटुंबे पशुपालन करीत असल्याचे दिसून येते.

कोष्टक क्रमांक 03

शेती आधारित उद्योग आणि पर्यटन

| शेती जोड व्यवसाय | घरातील सदस्यांचे स्थलांतराचे कारण | शेतीमधील उत्पादनापासून समाधानी आहात का | इंधनासाठी कशाचा वापर करता? | पर्यटनाला अनुसरून एखादा व्यवसाय | पर्यटनामधून आपणास आर्थिक लाभ होतात का |
|---|---|---|---|---|---|
| पशुपालन, दुग्ध व्यवसाय | हंगामी रोजगारासाठी | समाधानी आहे | लाकूड | पर्यटकांची जेवणाची आणि राहण्याची व्यवस्था | होय |

स्त्रोत : प्रश्नावली

**निष्कर्ष :**

1. डोंगरी भागामध्ये निवडलेल्या गावाचे लोकसंख्या विरळ आहे. साक्षरता प्रमाण कमी आहे.
2. डोंगरी भागातील शेती हे पर्यावरणाला अनुकूल असल्यचे सादर संशोधनामधून दिसून आले.
3. शेतीच्या उत्पादनाचा खर्च कमी आहे.कारण शेती पारंपारिक पद्धतीने किली जाते.
4. निवड केलेल्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न समाधानकारक आहे. यामधून कुटुंबाची अन्नाधान्यची गरज भागात असल्यची दिसत आहे.
5. लोकासंखेचे स्थलांतर हे रबी हंगामामध्ये रोज्गारानीमित्ता होत आहे.
6. पर्यटनामधून पर्यटकांना जेवणं आणि निवासाची सोय केली जाते. यामधून कुटुंबाना अर्थाजन होत आहे.
7. सामाजिक आणि सांस्कृतिक घटकाचा अभ्यास करता एतिहासिक पार्श्वभूमी महत्वाची ठरते.

**शिफारशी :**

1. डोंगराळ क्षेत्र (Hilly Area Development Programme) विकास कार्यक्रमांतर्गत हे क्षेत्र अलिप्त राहिले असल्यचे दिसून येते.
2. केंद्र आणि राज्य सरकारच्या समितेचे अहवाल आणि शिफारशी प्रत्यक्षात उतरल्या नाहीत. या संशोधनामधून
3. स्थानिक प्रशानाणे योग्यढकल धखल घेणे आवश्य आहे.
4. पर्यावारंचा शाश्वत विकास करण्यासाठी या भागाचे महत्व अभ्यासता स्मतोलीत आहे.

**प्रश्नावली**

1. गावाचे नाव काय आहे ?
2. उत्तरदातेचे नाव काय आहे ?
3. घरातील एकूण सदस्य संख्या किती आहे ?
4. 4. स्त्री पुरुषांचे प्रमाण किती आहे? स्त्री, पुरुष
5. 5. शैक्षणिक अहर्ता काय आहे?प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक,
6. डोंगरी शेतीमधील खरीप आणि रब्बी हंगामात घेतली जाणारी पिके?
7. दोन्ही हंगामा मधील एकूण उत्पन्न किती आहे?
8. शेती जोड व्यवसाय केला जातो का? असल्यास कोणता?
9. शेतीच्या पाण्याचे स्त्रोत कोणते आहेत? विहीर कुंपण मालिका इतर
10. घरातील सदस्यांचे स्थलांतर झाले आहे का?
11. स्थलांतराचे कारण काय आहे?
12. डोंगरी भागातील शेतीमध्ये घेतलेली जाणारी पिके कोणती आहेत?
13. शेती पारंपारिक पद्धतीने केली जाते का?
14. नैसर्गिक पर्यावरणाचा शेतीच्या उत्पादनावर परिणाम होतो का?
15. शेतीमधील उत्पादनापासून समाधानी आहात का? होय/ नाही.
16. पर्यटनाला चालना मिळत आहे का?
17. पर्यटनामधून आपणास आर्थिक लाभ होतात का?
18. पर्यटनाला अनुसरून एखादा व्यवसाय केला जात आहे का?
19. दळणवळण व्यवस्था आहे का?
20. विज सातत्य पूर्ण आहे का?
21. दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन व्यवसायातून उत्पन्न मिळते का? होय नाही
22. आपण करीत असलेल्या डोंगरी शेती मधून पर्यावरणास आणि पोचत आहे का?
23. इंधनासाठी कशाचा वापर करता?

**संदर्भ सूची**

Wbsite (https://www.google.com/search?q=Census+2011+Rpeort&oq=Census+2011+Rpeort+&gs_lcrp=EgZjaHJvbWUyBggAEEUYOTIJCAEQABgNGIAEMgkIAhAA)
2.chromeextension://efaidnbmnnnibpcajpcglclefindmkaj/https://sansad.in/getFile/loksabhaquestions/annex/1711/AU4358.pdf?source=pqals

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

3.chrome-4.extension://efaidnbmnnnibpcajpcglclefindmkaj/https://www.cppr.in/wp-content/uploads/2013/03/Gadgil-report.pdf
Report of the Western Ghats Ecology Expert Panel Part I
Youtube
https://www.youtube.com/watch?v=OU26apNxG08
https://youtu.be/0QmIC74u_jM
https://youtu.be/sShxOEA64ss

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# महाराष्ट्राच्या राजकारणातील धनगर जमातीचे राजकीय नेतृत्व

**संदीप भिमराव कुऱ्हाडे**
संशोधक, राज्यशास्त्र विभाग, पीपल्स महाविद्यालय नांदेड
**Email:** sandipkurhade29@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180418
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 86-89
April- 2026
**Submitted:** 11 Mar. 2026
**Revised:** 25 Mar 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

*सारांश*

*महाराष्ट्राच्या राजकारणात जातीवाद आणि नेतृत्व यांचा परस्परसंबंध ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय प्रक्रियांमधून विकसित झाला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ आणि दलित चळवळींनी सामाजिक जागृती घडवून आणली व विविध जातीसमूहांना राजकीय सहभागासाठी प्रेरित केले. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर मराठा-कुणबी समाजाचे नेतृत्व राज्याच्या राजकारणात प्रभावी ठरले. विशेषतः यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षात मराठा नेतृत्वाचे वर्चस्व प्रस्थापित झाले, तसेच विविध जातीसमूहांना सत्तेत सहभागी करून बहुजनवादी राजकारणाची संकल्पना विकसित झाली. सामाजिक, आर्थिक आणि वैचारिक घटकांच्या आधारावर काँग्रेसचे दीर्घकालीन वर्चस्व टिकून राहिले. मराठा नेतृत्वाने बहुजन समाजातील इतर घटकांना राजकारणात स्थान दिले असले तरी नेतृत्वाचे केंद्रस्थान स्वतःकडे राखले. प्रस्तुत लेखात महाराष्ट्राच्या राजकारणातील जातीवादाची भूमिका, मराठा नेतृत्वाचा उदय, बहुजनवादी राजकारणाची संकल्पना आणि विविध जातीसमूहांच्या राजकीय सहभागाचे विश्लेषण करण्यात आले आहे.*

***मुख्यशब्द:*** *महाराष्ट्राचे राजकारण, जातीवाद, मराठा नेतृत्व, यशवंतराव चव्हाण, बहुजन समाज, काँग्रेस वर्चस्व, ब्राह्मणेतर चळवळ, सत्यशोधक चळवळ, दलित चळवळ, सामाजिक-राजकीय परिवर्तन.*

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्राच्या राजकारणात जातीवादाची भूमिका किंवा महाराष्ट्रातील जातीचे राजकीय करण कसे झाले. जात हा घटक महाराष्ट्राच्या राजकारणात कसा उदयास आला यासंबंधी विवेचन करताना दोन मुख्य मुद्दे महत्त्वाचे वाटतात एक म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणात 1960 नंतर मराठा जातीचे वर्चस्व प्रस्थापित झाले स्वातंत्र्यापूर्वी महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाची सत्ता ब्राह्मणाकडे होती. अगदी शाहू प्रणित ब्राह्मणेत्तर चळवळ देखील मराठा वर्चस्व महाराष्ट्रात प्रस्थापित करू शकली नाही. पुढे केशवराव जेधे व यशवंतराव चव्हाण यांनी मराठा नेतृत्व विकसित केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळी नंतर दि भाषिक महाराष्ट्र राज्यांचे आणि नंतर स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय नेतृत्वाखाली मराठा सत्ता प्रस्थापित झाली. परिणामात महाराष्ट्रातील काँग्रेसवर मराठा नेतृत्व धुरीतत्व प्रस्थापित करू शकले. महाराष्ट्राच्या राजकारणात मराठेत्तर जाती कशा प्रवेशित झाल्या हा एक मुद्दा आहे. महाराष्ट्राचे राजकारण श्री यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली विकसित होत होते. परंतु अनेक प्रस्थापित मराठा नेतृत्वांनी श्री शंकरराव चव्हाण यांचे नेतृत्व मान्य नव्हते. म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मराठा नेतृत्वात फूट पडून केंद्रीय काँग्रेसकडे झुकणारे इंदिरा निष्ठ मराठा नेतृत्व व दुसरा यशवंतराव चव्हाण यांना मानणारा गट अशी दुफळी निर्माण झाली.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*संदीप भिमराव कुऱ्हाडे संशोधक, राज्यशास्त्र विभाग, पीपल्स महाविद्यालय नांदेड*

**How to cite this article:**
*कुऱ्हाडे, संदीप. भिमराव. (2026). महाराष्ट्राच्या राजकारणातील धनगर जमातीचे राजकीय नेतृत्व. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 86–89.* https://doi.org/10.5281/zenodo.21437019

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21437019
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

यशवंतराव चव्हाण प्रणित राजकीय नेतृत्वांनी मराठेत्तर जातींना स्थानिक व प्रादेशिक राजकारणात सामावून घेतले. सत्तेत वाटा दिला परंतु धुरीणतत्व स्वतःकडे ठेवले. याचा परिणाम मराठेत्तर जातीसमूहात जातिभान निर्माण होऊ लागले. राजकारणाचा स्पर्श झाला प्रत्येक राजकीय पक्ष मोठ्या संख्येच्या जात समूहाला व त्यातील नेतृत्वाला सत्ता कारणासाठी जवळ करू लागला. या दोन्ही मुद्द्यांची परिणीती म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणात जात आणि जातिवाद प्रविष्ट झाल्याचे आढळते.

१ मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली परंतु त्या पूर्वीच्या काळातील अनेक विचार प्रवाह, घडामोडी यांचा प्रभाव व परिणाम 1960 नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणावर झालेला दिसतो. एकोणिसाव्या शतकातील समाज प्रबोधन व समाज सुधारणा चळवळीमुळे सर्व समाज ढवळून निघाला. महात्मा फुले यांच्या विचार कृतीतून सुरू झालेल्या सामाजिक चळवळीचा राजकीय जीवनावर खोलवर परिणाम झाला ही चळवळ सत्यशोधक चळवळ म्हणून सर्व परिचित आहे. पुढे राजश्री शाहू महाराज यांनी ब्राह्मणेतर चळवळ सुरू केल्याने रुढीपरंपरानिष्ठ उच्च जातीय वर्चस्व चौकटीत तडे जाऊ लागले. महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ व शाहू महाराजांच्या पुढाकाराने सुरू झालेली ब्राह्मणेतर चळवळ हे केवळ औपचारिक हस्तक्षेप नव्हते. पश्चिम महाराष्ट्रात आणि विदर्भ या भागामध्ये ग्रामीण क्षेत्रात या चळवळीचा ठसाउमटला होता. राजकारणाचे सामाजिक चरित्र निव्वळ ब्राह्मणी न राहता बहु जातीय बनले जातीमध्ये राजकीय जागृतीचे आत्मभान निर्माण होऊ लागले. याच काळातील महत्त्वाची बाब म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली दलित चळवळीने प्रचंड आकार घेतला. या दलित चळवळीतून स्वआत्मभान निर्माण होऊन अनेक दलित कार्यकर्ते पुढे आले आणि त्यांनी सत्ता सहभागाचा मुद्दा लावून धरला. दुसऱ्या बाजूला लोकमान्य टिळक व त्यानंतर महात्मा गांधी यांच्यामुळे महाराष्ट्राचे राजकारण थेट लोकांपर्यंत जाऊन पोहोचले. लोकसहभाग शांततापूर्ण चळवळी व जागृती या मार्गांनी राजकारणाची वाटचाल झाल्यामुळे लोकशाहीची स्वरूप पक्के झाले. महात्मा फुले ची सत्यशोधक चळवळ, शाहू महाराजांची ब्राह्मणेतर व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची दलित चळवळ यांच्यामुळे वर्चस्वशाली उच्च जातीच्या वर्चस्वाला तडे जाऊन व्यवहारिक व वैचारिक मर्यादा पडल्या प्रत्येक जात समूह स्वतः प्रति अंतर्गत होऊन विचार करू लागला.

**ब्राह्मणेत्तर नेतृत्वाचे काँग्रेसमध्ये विलीनीकरण**

विसाव्या शतकाच्या आरंभापासून स्पर्धात्मक निवडणुकीच्या राजकारणाचा प्रारंभ झाला. त्यामध्ये प्रामुख्याने काँग्रेसमधील ब्राह्मण गट आणि ब्राह्मणोत्तर गट असे दोन भाग पाडले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र मजूर पक्ष आणि वि. दा. सावरकर यांच्या नेतृत्वाखाली हिंदू महासभेची भर पडली. कम्युनिस्टांनी मात्र स्वातंत्र पूर्व काळात निवडणुकीच्या राजकारणात थेट सहभाग घेतला नाही. 1936 च्या नंतर महाराष्ट्रातील काँग्रेसवर गांधीजींच्या अनुयायांचे संपूर्ण नियंत्रण होते. याच काळात ब्राह्मणेत्तर चळवळीतील काही गट काँग्रेसमध्ये सामील झाले. लोकमान्य टिळक व त्यांचे अनुयायी आणि ब्राह्मणोत्तर राजकीय नेतृत्व यांचे तीव्र मतभेद असल्यामुळे ब्राह्मणेतर नेतृत्व स्वातंत्र्यलढ्यापासून दूर होते. परंतु गांधीयुगामध्ये ब्राह्मणेतर मराठा नेतृत्व काँग्रेस बरोबरच्या संबंधाचा पुनर्विचार करू लागले. केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, माधवराव बागल यांच्यासारखे झुंजार तरुण मराठा नेतृत्व काँग्रेसमध्ये दाखल झाले. गाईच्या मागून वासरू यावे याप्रमाणे कर्मवीर शिंदे यांच्या बरोबर केशवराज जेथे आपल्या हजारो अनुयायासमवेत काँग्रेसमध्ये आले. असे सेनापती बापट यांनी सांगितले आहे. या सर्व राजकीय घडामोडीचा महाराष्ट्राच्या राजकारणावर दूरगामी परिणाम झाला. 1935 च्या कायद्यानुसार मताधिकाराचा विस्तार होऊन लोकनियुक्त सरकारला काही अधिकार मिळणार होते. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे एक नेते काकासाहेब गाडगीळ यांनी ब्राह्मणोत्तर पक्षाचे नेते केशवराव जिथे यांच्याशी बोलणी करून काँग्रेस व ब्राह्मणेतर नेतृत्वाचे एक्य घडवून आणले. ह्या मागे गाडगीळांचा समज असा होता की ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर महाराष्ट्रीयन समाजाची विभागणी होऊ नये. केशवराव जेधे व काकासाहेब गाडगीळ यांच्या सहकार्यामुळे महाराष्ट्रात दोन समाज घटकांची युती घडून आली. या युतीमुळे मराठा समाज काँग्रेसच्या जवळ आला आणि महाराष्ट्रातील मराठा वर्चस्वाची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्याचबरोबर ब्राह्मण नेतृत्वाने राजकारणात दुय्यम भूमिका स्वीकारल्याची तयारी दर्शविल्यामुळे ब्राह्मणाचे वैचारिक सांस्कृतिक प्रभुत्व कायम राहून नव्या राजकीय चौकटीची निर्मिती झाली. स्वतः केशवराज येते यांच्या पुढाकाराने पुढच्या काळात भाऊसाहेब हिरे यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व उदयाला येऊ शकले. पुढे संयुक्त महाराष्ट्र चळवळीने वेग घेतला. 1957 च्या सार्वत्रिक निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीने काँग्रेसच्या विरोधात निवडणूक लढवली. मराठी प्रदेशात काँग्रेसला पराभवही पत्करावा लागला. परंतु काँग्रेसची सत्ता येऊन श्री

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले. पुढे तीन वर्षात संयुक्त महाराष्ट्र समिती चळवळीने अधिक वेग घेतला व महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रात एका जातीचे वर्चस्व राहील का हा प्रश्न होता. पूर्वापार महाराष्ट्रात ब्राह्मण जातीचे वर्चस्व होते तर नव्या राज्यात मराठा जात ही लोकसंख्येने प्रबळ होती. अशावेळी महाराष्ट्रात मराठी भाषक समाजाचे वर्चस्व असावे असे मत चव्हाण यांनी व्यक्त करून जातीच्या मुद्द्याला बगल दिली. परंतु ब्राह्मणेतर किंवा मराठा जातीचे वर्चस्व यशवंतराव चव्हाण हे थोपवू शकले नाही. एवढेच नाही तर पुढे यशवंतराव चव्हाण यांनी अठरापगड जातींना राजकारणात सामावून घेऊन सत्ताकरण करावी लागले हे विसरून चालणार नाही. एकच बाब महत्त्वाची म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या निमित्ताने बहुविध जातींची एकजूट निर्माण होऊन स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी पोषक वातावरण तयार झाले.

**नेतृत्व वर्चस्वाचे आधारभूत घटक:-**

महाराष्ट्र राज्याची स्थापना 1960 मध्ये झाली. तेव्हापासून पुढे महाराष्ट्राच्या राजकारणाचा नव्याने प्रारंभ झाला. महाराष्ट्र राज्य स्थापनेपूर्वी काँग्रेस वर्चस्वाची चौकट आकार घेत होती. महाराष्ट्राच्या संदर्भात काँग्रेस वर्चस्वची खास वैशिष्ट्ये होते. इतर राज्यात काँग्रेस वर्चस्वाला धक्के बसत असताना मात्र महाराष्ट्रात काँग्रेस वर्चस्व 1975 - 1976 पर्यंत आबाधित राहिले याचे एकमेव कारण म्हणजे यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व काँग्रेस सत्ता बळकट करत होते. म्हणून अनेकवेळा महाराष्ट्रात काँग्रेसच्या वर्चस्वचे वर्णन चव्हाण मॉडेल असे केले जाते. यशवंतराव चव्हाण यांचे या संदर्भातील श्रेय वादातीत आहे. परंतु दीर्घकाळ हे वर्चस्व टिकून राहण्यात जे आधारभूत घटक आहे ते पुढील प्रमाणे सांगता येतील

**सामाजिक व आर्थिक आधार :-**

महाराष्ट्रातील राजकारणात मराठा- कुणबी समाजाच्या मध्यवर्ती स्थानाचा उल्लेख करावा लागेल. भारतातील कोणत्याही राज्यात एकाच जातीसमूहाचे एवढ्या मोठ्या प्रमाणात संख्याबळ कुठेही आढळत नाही. ' महाराष्ट्र राज्य कि मराठा राज्य 'असा प्रश्न महाराष्ट्र राज्य निर्माण होत असताना विचारला गेला होता. म्हणून एवढे मोठे संख्याबळ असल्यामुळे समान जातीभान निर्माण करणे मराठा नेतृत्वाला शक्य झाले. शाहू प्रणित ब्राह्मणेतर चळवळीतून कुणबी- मराठा जातीत आत्मबान निर्माण झाले. शिक्षण व राजकीय महत्त्वकांक्षा निर्माण होऊन एक मोठा समुह काँग्रेसमध्ये प्रविष्ट झाल्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसचा पाया विस्तारण्यास सुरुवात झाली. या बदल्यात काँग्रेसमार्फत आपल्या राजकीय आकांक्षा पूर्ण करण्याचे मराठा नेतृत्वाचे प्रयत्न सुरू झाले. यशवंतराव चव्हाण यांनी खानदानी मराठा नेतृत्व बाजूला करून मराठेत्तर जातीतील कार्यकर्त्यांना सत्तादालने खुली केली. यावरून राजकारण व सत्तास्थानासाठी बहुसंख्य असलेल्या कुणबी- मराठा जात समूहाचा आधार घेतला गेला हे स्पष्ट होते.

महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा-कुणबी नेतृत्वाने जी भूमिका बजावली तिचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी विशिष्ट हितसंबंध आणि व्यापक सामाजिक वास्तव यांची सांगड घातली. आपल्या जात समूहाचे वर्चस्व टिकवताना इथे जातीच्या समावेशाला वाव दिला ज्या-ज्या भागात बिगर मराठा जातीचे ठळक अस्तित्व असेल तिथे स्थानिक पातळीवर त्या जातींना सत्तेत सहभागी करून घेतले गेले त्यामुळे एक जातीय राजकीय वर्चस्व असून राजकीय नेतृत्वाची स्वरूप बहुजातीय राहिले खुद्द काँग्रेसच्या अंतर्गत आणि मराठा कुणबी समूहाच्या अंतर्गत सत्ता पदावरील अभिजनांची स्पर्धा ही महाराष्ट्राच्या राजकारणाचे वैशिष्ट्ये ठरले. ही स्पर्धात्मकता स्वीकारल्यामुळेच एक जातीय वर्चस्वाच्या पोटात बहुजातीय अभिजन नेतृत्व सुखाने नांदू लागले. उदा. यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्रीपद सोडल्यानंतर दीर्घकाळ मुख्यमंत्री पद बिगर मराठा नेतृत्व वसंतराव नाईक यांच्याकडे राहिले त्याचप्रमाणे साठीच्या दशकात रिपब्लिकन पक्षाबरोबर जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेसने केलेला समझोता हे देखील बहुजातीय सरचनेची उदाहरण आहे.

**वैचारिक आधार :-**

महाराष्ट्र राज्य निमित्त नंतर पुढील दोन दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेसचे वर्चस्व टिकून राहिले त्याचे कारण म्हणजे वैचारिक परिणाम हे सांगता येईल. काँग्रेसचे राजकारण आणि मराठा समाजाचे पुढारीपण यांचे समर्थन दोन प्रकारांनी करण्यात आले. बहुजन समाजाची सत्ता हा एक शब्दप्रयोग आणि बेरजेचे राजकारण हा दुसरा शब्दप्रयोग होय. महाराष्ट्र राज्य निर्माण होण्यासाठी काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वांनी चालढकल केली. त्याचा परिणाम त्यांनी 1957 च्या सार्वत्रिक निवडणुकीत भोगाव लागला. परंतु यशवंतराव चव्हाण यांनी समाजवादी पक्ष व शेतकरी कामगार पक्ष यांच्या नेतृत्वांना काँग्रेसकडे वळवले. त्यांच्यासाठी वैचारिक परिणाम हे वापरले की मराठा समाज व महाराष्ट्र राज्य यांच्या हिताच्या दृष्टीने काँग्रेसमध्ये सामील होणे आवश्यक आहे. यशवंतराव यांचे धोरण

म्हणजे बेरजेचे राजकारण होय. यामागील समन्वयाच्या वैचारिक भूमिकेचे आकर्षण बुद्धिवंत आणि पत्रकार यांच्यात निर्माण झाले. यशवंतराव चव्हाण यांनी जात, शहरे, गाव, पक्षांतर्गत अशा सर्वच पातळयावर समन्वय साधला

बहुजन समाजाचे राज्य महाराष्ट्राच्या मानसिकतेत दीर्घकाळ टिकून राहील. महाराष्ट्रात अठरापगड ब्राह्मणेतर जातीच्या तुलनेत मराठा कुणबी समाज हा विस्तृत आणि मोठ्या संख्येने आहे. ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय असणाऱ्या या समाजाकडे ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व होते. एकीकडे क्षत्रियत्वाचा दावा व त्यामुळे आपण निसर्गत नेते आहोत ही जाणीव आणि दुसरीकडे ब्राह्मणेतर चळवळीच्या निमित्ताने ब्राह्मणेतर जातीबरोबर राजकारण करण्याचा इतिहास मराठा कुणबी समाजाच्या नेतृत्वामागे आहे. याचाच अर्थ असा होतो की बहुजन समाज म्हणजे आपणच आणि जरी बहुजन समाजात अनेक जाती असल्या तरी त्यांचे नेतृत्व आपल्याकडेच असणार या विचार विश्वातून बहुजन समाज ही संकल्पना मराठा नेतृत्वाने स्वीकारली. यामुळे स्थानिक पातळीवर मराठेत्तर नेतृत्वाला मर्यादित व देश राज्य पातळीवर मराठा नेतृत्वाची धुरी तत्व टिकून राहिले. या बाबीस कारणीभूत घटक म्हणजे बहुजन समाजाची सत्ता हा वैचारिक आधार होय. थोडक्यात सांगायचे झाल्यास 1957-1975 या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात जे काँग्रेसचे वर्चस्व होते त्यास सामाजिक आर्थिक संस्थापक व वैचारिक आधारभूत घटक होते. या आधारभूत घटकामुळेच काँग्रेस पक्षाची घडी महाराष्ट्रात विस्कटली नाही .1971 मध्ये इंदिरा गांधींनी राजकीय चौकट बदलण्याचे प्रयत्न केले तरी काँग्रेसमधील मराठा नेतृत्वाची फळी 1972 नंतरही एकसंध राहिल्यास वरील आधारभूत घटक कारणीभूत आहेत.

**निष्कर्ष :**

1. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्राच्या राजकारणातील जातीवादाची भूमिका आणि नेतृत्व एक जटिल आणि बहुआयामी विषय आहे.
2. महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा समुदयाचे वर्चस्व हे काँग्रेस व इतर पक्षात असल्याचे दिसून येते.
3. मराठेत्तर समुदयातील नेतृत्वानेही राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे
4. स्वातंत्र्यपूर्व स्वतंत्र्योत्तर कालखंडातील राजकारणात काँग्रेस नेतृत्वाचे वर्चस्व प्रस्थापित असल्याचे दिसते.
5. मराठा राजकीय नेतृत्वाने इतर बहुजन समाजाला राजकारणात सहभागी करून सर्व समावेश नेतृत्वाचा विचार महाराष्ट्रात निर्माण केला.
6. इतर मागासवर्गीय समाजानेही राजकारणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.
7. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर ब्राह्मण राजकीय नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात दिसून येत असून या नेतृत्वाचे आधारभूत घटक ही सामाजिक राजकीय आर्थिक व वैचारिक असल्याचे दिसून येतात.

**संदर्भ :**

1. डॉ. खांदवे एकनाथ त्र्यंबक, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, आरती प्रकाशन, २००९.
2. डॉ. मेहदंळे विश्वास यशवंतराव ते विलाराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००७.
3. पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङःमय, गृह मुंबई, २०१०.
4. डॉ. नेमा जी.पी. भारत में राज्यो की राजनीती, कॉलेज बुक डेपो, जयपूर, 2002.
5. फडके य.दी. विसाव्या शतकातील महाराष्ट्र (खंड पाचवा) मौज प्रकाशन गृह 01997.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# लोकशाही शासनव्यवहार

**प्रा. राजेंद्र भोईवार[1], डॉ. भरत राठोड[2]**
[1,2] राज्यशास्त्र विभाग, बाबुरावजी घोलप महाविद्यालय,सांगवी, पुणे

**Manuscript ID:**
JRD -2026-180419
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 90-94
April- 2026
**Submitted:** 11 Mar. 2026
**Revised:** 25 Mar 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***गोषवारा***

*प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये लोकशाही शासन यावर प्रकाशझोत टाकला आहे. भारतीय लोकशाही आणि येथील घटनात्मक शासनव्यवस्थेची ७५ वर्षे पूर्ण झाले. या काळातील लोकशाही शासनव्यवहार हा कसा चालला आणि त्याची कार्यपद्धती कशी होती या अनुषगांने प्रस्तुत पेपरमध्ये आढावा घेण्यात आला आहे. थोडक्यात लोकशाहीची अंमलबजावणी कशी झाली आणि नागरिकांचा सहभाग कसा राहिला याचा आढावा यामध्ये घेण्यात आला आहे.*

***पारिभाषिक शब्द*** *– लोकशाही, शासनव्यवहार, पारदर्शकता, उत्तरदायित्व, नागरी सहभाग*

## प्रस्तावना

लोकशाही शासनव्यवहार ही संकल्पना आधुनिक राजकीय व्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण आणि व्यापक चौकट म्हणून उदयास आली आहे. पारंपरिक अर्थाने लोकशाही ही केवळ प्रतिनिधींच्या निवडणुकीपुरती मर्यादित नसून ती शासनाच्या सर्व स्तरांवर नागरिकांचा सक्रिय सहभाग, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कायद्याचे राज्य या मूलभूत तत्त्वांवर आधारित आहे. त्यामुळे लोकशाही शासनव्यवहार हा केवळ राजकीय प्रक्रियांचा संच नसून तो शासनाच्या गुणवत्तेचे आणि वैधतेचे मोजमाप करणारा एक महत्त्वाचा निकष मानला जातो. आधुनिक काळात लोकशाही शासनव्यवहारात सत्तेचे विभाजन, नियंत्रण व संतुलन, स्वतंत्र न्यायव्यवस्था, मुक्त व निष्पक्ष निवडणुका, तसेच नागरी स्वातंत्र्यांचे संरक्षण या घटकांना केंद्रस्थानी महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या घटकांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे शासन अधिक उत्तरदायी, पारदर्शक आणि लोकाभिमुख बनलेले दिसून येते. विशेषतः जागतिकीकरण, माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार आणि नागरी समाजाच्या वाढत्या भूमिकेमुळे लोकशाही शासनव्यवहार अधिक गतिशील आणि बहुआयामी बनला आहे. तथापि, प्रत्यक्षात लोकशाही शासनव्यवहारास अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. सामाजिक-आर्थिक असमानता, भ्रष्टाचार, राजकीय उदासीनता, तसेच संस्थात्मक दुर्बलता यामुळे लोकशाहीच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे. अनेक विकसनशील देशांमध्ये लोकशाही संस्थांची मजबुती आणि नागरिकांच्या प्रभावी सहभागाचा अभाव ही एक गंभीर समस्या म्हणून समोर येत आहे. त्यामुळे लोकशाही शासनव्यवहाराची गुणवत्ता आणि त्याची परिणामकारकता यांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते.

या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन पेपर हा लोकशाही शासनव्यवहाराच्या प्रमुख घटकांचा विशेषतः नागरिकांचा सहभाग, संस्थात्मक कार्यक्षमता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांचा परस्परसंबंधाचा आढावा घेण्यात आला आहे. लोकशाहीची तत्त्वे प्रत्यक्षात कितपत अंमलात येतात, लोकशाहीची गुणवत्ता कशी सुधारता येईल आणि शासन अधिक लोकाभिमुख कसे बनविता येईल, याचा शोध घेणे हा या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*राजेंद्र भोईवार राज्यशास्त्र विभाग, बाबुरावजी घोलप महाविद्यालय,सांगवी, पुणे*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21437102

**How to cite this article:**
*भोईवार, राजेंद्र. & राठोड, भरत. (2026). लोकशाही शासनव्यवहार. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 90–94. https://doi.org/10.5281/zenodo.21437102*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. लोकशाही शासनाची संकल्पना, स्वरूप आणि मूलभूत तत्त्वांचा अभ्यास करणे.
२. लोकशाही शासनातील प्रमुख घटकांचे (पारदर्शकता, उत्तरदायित्व, सहभाग) विश्लेषण करणे.
३. भारतात लोकशाही शासनाची अंमलबजावणी कशी होते याचा आढावा घेणे.
४. नागरी सहभाग आणि सुशासन यांच्यातील परस्परसंबंधाचे विश्लेषण करणे.

**संशोधनाची गृहितके**

१. लोकशाही शासनातील पारदर्शकता वाढल्यास शासनावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ होतो.
२. नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढल्यास लोकशाही शासनाची परिणामकारकता अधिक वाढलेली दिसून येते.
३. सामाजिक व आर्थिक असमानता लोकशाही सहभागावर नकारात्मक परिणाम करत असते.
४ नागरी शिक्षणाचा स्तर वाढल्यास लोकशाही मूल्यांप्रति नागरिकांची बांधिलकी अधिक दृढ होते.

**लोकशाहीव्यवस्थेतील शासनव्यवहाराची भूमिका –**

लोकशाही शासनव्यवस्थेत शासनाची भूमिका नागरिकांच्या गरजांची पूर्तता करताना वैधता आणि प्रशासकीय परिणामकारकता यांचा समतोल साधण्यात केंद्रित असते. सुशासनाच्या तत्त्वांवर आधारित लोकशाही शासनव्यवहार हा पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि प्रतिसादक्षमतेद्वारे नागरिकांचा विश्वास टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करते. या व्यवस्थेचे मूलभूत वैशिष्ट्य म्हणजे कायद्याचे राज्य, वैयक्तिक स्वातंत्र्यांचे संरक्षण आणि समानतेचा आग्रह होय. लोकशाही शासनव्यवस्थेत सत्तेचे विभाजन, नियंत्रण व संतुलन, तसेच घटनात्मक हमी यांच्या माध्यमातून सत्तेचे केंद्रीकरण रोखले जाते आणि संस्थात्मक स्थैर्य सुनिश्चित केले जाते. याशिवाय, मुक्त व निष्पक्ष निवडणुका, अभिव्यक्ती आणि संघटन स्वातंत्र्य, तसेच सत्तेचे शांततापूर्ण हस्तांतरण ही तत्त्वे लोकशाहीच्या कार्यक्षमतेसाठी अत्यावश्यक मानली जातात. आधुनिक काळातील लोकशाही शासनव्यवस्था ही गतिशील आणि बहुआयामी प्रक्रिया असून ती स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरांवर कार्यरत विविध संस्थांद्वारे आकार घेत असते. त्यामुळे शासनाची भूमिका केवळ धोरणनिर्मितीपुरती मर्यादित न राहता ती सर्वसमावेशक विकास, संस्थात्मक कार्यक्षमता आणि नागरिक केंद्रित प्रशासन सुनिश्चित करण्यावरही भर देते.

**लोकशाही आणि शासनाचा समतोल –**

लोकशाहीमध्ये सहभाग, विचारविनिमय आणि उत्तरदायित्वावर भर दिला जातो. तर प्रभावी शासनासाठी कार्यक्षमता, तज्ञता आणि निर्णायक कृती आवश्यक असते. यशस्वी लोकशाही व्यवस्था या दोन्हींना जपणाऱ्या संस्था आणि राजकीय पद्धती निर्माण करून संतुलन साधत असतात. कारण त्यांना हे माहीत असते की, यापैकी कोणत्याही एकाशी पूर्णपणे तडजोड करता येत नाही. उदाहरणार्थ, बहुमताचे राज्य असेल तर अल्पसंख्यांकाच्या हक्कांचे समतोल साधणे अत्यंत महत्त्वाचे असते. लोकशाहीमध्ये अल्पसंख्यांकाच्या हितांचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करताना बहुमतांच्या निर्णयाचा आदर करणे गरजेचे असते. शिवाय जनतेच्या इच्छेविरूद्ध तज्ज्ञांचा सल्ला अधिक मोलाचा ठरतो. कारण गुंतागुंतीच्या धोरणात्म आव्हांनाना सामोरे जाण्यासाठी अनेकदा तज्ज्ञांच्या मताची आवश्यकता असते. जे मत जनमताच्या विरोधात असू शकते. सशक्त लोकशाही व्यवस्था जनतेप्रती असलेल्या उत्तरदायित्वाशी तडजोड न करता तज्ञांच्या सल्ल्याचा समावेश यात करतात.

**सुशासनाच्या माध्यमातून लोकशाही बळकटीकरण –**

लोकशाहीची लवचिकता वाढवण्यासाठी लोकशाही संस्था आणि प्रशासकीय पद्धती या दोन्हींना बळकट करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक असते. लोकशाही बळकटीकरणासाठी संस्थात्मक रचनेतील सुधारणा आणि लोकशाही मूल्ये व पद्धतींना समर्थन देणारे सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम यांच्या मेळ घातला जातो.

**लोकशाही मजूबत करण्याचे विविध मार्ग**

१. **संस्थात्मक लवचिकता आणि विश्वास निर्माण करणे** :

मजबूत लोकशाही शासनसंस्था तणावपूर्ण परिस्थितींना सामोरे जाण्यास तसेच संकटांच्या काळातही आपली कार्यक्षमता आणि परिणामकारकता टिकवून ठेवण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. या संदर्भात **संस्थात्मक लवचिकता** ही संकल्पना महत्त्वाची ठरते. Samuel P. Huntington यांच्या मते, संस्थांची स्थिरता आणि अनुकूलता ही लोकशाहीच्या टिकावासाठी अत्यावश्यक असते. तसेच Douglass North यांनी संस्थात्मक चौकटींच्या प्रभावी कार्यक्षमतेवर आर्थिक आणि राजकीय स्थैर्य अवलंबून असल्याचे प्रतिपादन केले आहे. संस्थात्मक लवचिकतेमध्ये अतिरिक्त सुरक्षात्मक उपाययोजना, आपत्कालीन परिस्थितीसाठी स्पष्ट कार्यपद्धती आणि बदलत्या परिस्थितीनुसार संस्थात्मक सुधारणा करण्यासाठी यंत्रणा विकसित करणे यांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, भारतामध्ये कोविड काळात केंद्र आणि राज्य सरकारांनी आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत विविध उपाययोजना

राबवल्या. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ने समन्वय साधत आरोग्य, स्थलांतरित कामगार आणि सार्वजनिक वितरण प्रणालीसंदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यामुळे संकटाच्या काळात संस्थात्मक प्रतिसादक्षमतेचे महत्त्व स्पष्ट होते.

याशिवाय, जनतेचा विश्वास संपादन करणे ही लोकशाही शासनाची मूलभूत गरज आहे. वर्ल्ड बँकेच्या सुशासन संकल्पनेनुसार पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षम सेवा वितरण हे विश्वास निर्माण करण्याचे मुख्य आधारस्तंभ आहेत. भारतात माहितीचा अधिकार २००५ च्या अंमलबजावणीमुळे प्रशासनातील पारदर्शकता वाढली असून नागरिकांना माहितीचा अधिकार प्राप्त झाला आहे. तसेच भारतीय निवडणूक आयोगाद्वारे निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता राखण्यासाठी विविध सुधारणा करण्यात आल्या आहेत. तसेच नियमांची सुसंगत आणि न्याय्य अंमलबजावणी ही लोकशाही व्यवस्थेतील वैधता टिकवून ठेवण्यासाठी अत्यावश्यक असते. उदाहरणार्थ, सर्वोच्च न्यायालयाच्या सक्रिय भूमिकेमुळे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे झाले आहे.

**२. समावेशक सहभागाला प्रोत्साहन देणे** :

समावेशक सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा अर्थपूर्ण व व्यापक सहभाग सुनिश्चित करणे अत्यावश्यक ठरते. लोकशाही केवळ प्रतिनिधिक स्वरूपापुरती मर्यादित न राहता सहभागात्मक स्वरूपात विकसित होणे आवश्यक असल्याचे Carole Pateman यांचे मत आहे. शिवाय त्यांच्या मते, नागरिकांचा सक्रिय सहभाग हा लोकशाहीच्या वैधतेस आणि कार्यक्षमतेस बळकटी देणारा मूलभूत घटक आहे. तथापि, प्रत्यक्षात नागरिकांच्या सहभागावर विविध संरचनात्मक व प्रक्रियात्मक अडथळ्यांचा परिणाम होत असल्याचे दिसून येते. रॉबर्ट ढाल यांच्या बहुशासन सिद्धांतानुसार, प्रभावी लोकशाहीसाठी सर्व नागरिकांना समान राजकीय संधी उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांना राजकीय प्रक्रियांमध्ये सहभागी होण्यापासून रोखणारे अडथळे दूर करणे ही लोकशाही शासनाची प्रमुख जबाबदारी ठरते.

या अडथळ्यांमध्ये गुंतागुंतीच्या मतदार नोंदणीच्या अटी, निवडणुकीची गैरसोयीची वेळ, तसेच सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांवर असमान परिणाम करणाऱ्या प्रवेश योग्यतेशी संबंधित समस्या यांचा समावेश होतो. भारताच्या संदर्भात मतदान नोंदणी सुलभ करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाद्वारे ऑनलाइन मतदार नोंदणी, विशेष अभियान (SVEEP) आणि जागरूकता कार्यक्रम राबवले जातात. तसेच दिव्यांग, वृद्ध आणि दुर्गम भागातील नागरिकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न केले जात आहेत. याशिवाय, महिलांचा, अनुसूचित जाती-जमातींचा आणि इतर वंचित घटकांचा सहभाग वाढवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे, जी समावेशक लोकशाहीच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जाते.

**३. शासकीय पारदर्शकता आणि देखरेख वाढवणे** :

लोकशाही शासनामध्ये पारदर्शकतेचे उपक्रम केवळ माहिती प्रसारित करण्यापुरते मर्यादित न राहता, ती माहिती नागरिकांसाठी सुलभ, समजण्यायोग्य आणि कार्यवाही करण्यायोग्य स्वरूपात उपलब्ध करून देणे अत्यावश्यक ठरते. सुशासनाच्या चौकटीत पारदर्शकतेला मध्यवर्ती स्थान देत अमर्त्य सेन यांनी माहितीप्राप्ती व सार्वजनिक चर्चा यांना लोकशाहीची गुणवत्ता वृद्धिंगत करणारे घटक मानले आहे. तसेच वर्ल्ड बँकेच्या सुशासन संकल्पनेनुसार पारदर्शकता ही उत्तरदायित्व आणि नागरिक-केंद्रित प्रशासनाची पूर्वअट आहे. या पार्श्वभूमीवर संस्थांचे बळकटीकरण हे लोकशाहीतील उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा संस्थांना शासकीय कामकाजाची प्रभावी चौकशी करण्यासाठी पुरेशी आर्थिक व मानवी संसाधने, स्पष्ट कायदेशीर अधिकार आणि कार्यकारी स्वायत्तता प्रदान करणे आवश्यक आहे. Guillermo O'Donnell यांनी मांडलेल्या "आडवी जबाबदारी" या विचारानुसार लोकशाही व्यवस्थेमध्ये विविध संस्थांदरम्यान परस्पर नियंत्रण व संतुलन राखणे अत्यावश्यक असते, शिवाय सत्तेचा गैरवापर रोखला जाऊन शासन अधिक उत्तरदायी व पारदर्शक बनते. भारताच्या संदर्भात माहितीचा अधिकार २००५ हा कायदा पारदर्शकतेस चालना देणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो. कारण त्यामुळे नागरिकांना शासकीय माहिती मिळविणे अधिक सुलभ झाले आहे. त्याचप्रमाणे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) ही संस्था सार्वजनिक खर्चाचे लेखापरीक्षण करून शासनाच्या आर्थिक उत्तरदायित्वाची खात्री करते, तर केंद्रीय दक्षता आयोग (CVC) भ्रष्टाचारविरोधी यंत्रणा म्हणून कार्य करते. तसेच माहितीचे सुलभीकरण करण्यासाठी ई-गव्हर्नन्स उपक्रम (उदा. डिजिटल इंडिया) राबवले जात असून, विविध शासकीय पोर्टल्सद्वारे नागरिकांना माहिती अधिक सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न शासनव्यवस्था करताना दिसून येते.

**४. लोकशाही शिक्षण आणि नागरी साक्षरतेला प्रोत्साहन देणे** :

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

लोकशाहीच्या दीर्घकालीन स्थैर्य व सुदृढतेचा पाया असा नागरिकवर्ग असतो, जो लोकशाही तत्त्वांची सखोल जाण ठेवतो, आवश्यक नागरी कौशल्ये आत्मसात करतो आणि लोकशाही मूल्यांप्रति आपली सातत्यपूर्ण वचनबद्धता जपत असतो. सहभागात्मक लोकशाहीच्या संदर्भात Carole Pateman यांनी नागरिकांच्या सक्रिय व सुजाण सहभागाला लोकशाहीच्या गुणवत्तेचा मूलभूत आधार मानले आहे, तर John Dewey यांच्या मते लोकशाही ही केवळ राजकीय व्यवस्था नसून एक सामाजिक जीवनपद्धती आहे. या अनुषंगाने, नागरी शिक्षण कार्यक्रमांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. अशा कार्यक्रमांद्वारे नागरिकांना लोकशाही संस्था कशा कार्य करतात याची समज दिली जाते, तसेच राजकीय माहिती, विचारसरणी आणि युक्तिवादांचे चिकित्सक मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक असलेली विचारक्षमता विकसित केली जाते. UNESCO ने शिक्षणाच्या माध्यमातून सक्रिय, जबाबदार आणि माहितीपूर्ण नागरिक घडविण्याला आणि लोकशाही सुदृढ करण्यासाठी अत्याआवश्यक मानले. भारतामध्ये शालेय व उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमांमध्ये नागरीशास्त्र व राज्यशास्त्र विषयाद्वारे भारतीय संविधान, मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांची माहिती दिली जाते. भारतीय निवडणूक आयोगाच्या SVEEP (Systematic Voters' Education and Electoral Participation) कार्यक्रमाद्वारे मतदार जागरूकता आणि सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच युवा संसद आणि विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव व चिकित्सक विचारक्षमता विकसित करण्यावर भर दिला जातो.

**लोकशाही शासनव्यवहारातील प्रमुख आव्हाने**

लोकशाही ही केवळ शासनपद्धती नसून ती एक सामाजिक-राजकीय प्रक्रिया आहे. आधुनिक काळात लोकशाही व्यवहार अनेक गंभीर आव्हानांना सामोरे जात आहे. यामध्ये

**१. राजकीय आव्हाने** – निवडणूक प्रक्रियेतील वाढती विकृती. पैसा आणि सत्तेचा अधिकाधिक दुरूपयोग, मतदार खरेदी, जात धर्म भाषा यावर आधारित निवडणुकां केंद्रीत करणे. अर्थात विकास हा निवडणूक काळात गौण ठरत आहे. त्यामुळे समाजाचे विभाजन वाढत आहे.

**२. प्रशासकीय आव्हाने** – भ्रष्टाचार अधिकाधिक वाढत आहे. त्यामुळे संसाधनाचे अपुरे वितरण होऊन निर्णयप्रकियेत अपारदर्शकता वाढली आहे. शासकवर्गामध्ये उत्तरदायित्वाचा अभाव दिसून येते. त्यामुळे लोकाभिमुखतेचा अभाव दिसून येतो.

**३. सामाजिक आणि आर्थिक आव्हाने** – समाजामध्ये जेवढी सामाजिक असमानता निर्माण झाली आहे. गरीबी आणि बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. त्याचा परिणाम लोकशाही सहभागावर होताना दिसून येतो. आणि संसाधनाचे असमान वितरण होत आहे. महिलांचा राजकीय सहभाग कमी होत आहे. एका विशिष्ट वर्गाने सामाजिक व आर्थिक घटकावर वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

**४. संस्थात्मक आव्हाने** – भारतामध्ये स्वायत्त संस्था वरचेवर अधिक कमकुवत बनत चालले आहे. त्यामुळे न्याय व्यवस्था आणि निवडणूक आयोगावर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. अर्थात कायद्याचे राज्य कमजोर होताना दिसून येते. लोकशाही व्यवहार टिकविण्यासाठी केवळ संस्थात्मक चौकट पुरेशी ठरत नाही तर नागरिकांचा सक्रिय सहभाग, नैतिकता आणि पारदर्शक शासन यांची अत्यंत आवश्यकता आहे.

**निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये लोकशाही शासनव्यवहार हा केवळ संस्थात्मक चौकटीपुरता मर्यादित नसून तो नागरिकांचा सहभाग, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कायद्याचे राज्य या घटकांवर आधारित एक गतिशील प्रक्रिया असल्याचे अभ्यासातून मांडण्यात आले. ज्या ठिकाणी नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि प्रभावी संस्थात्मक यंत्रणा अस्तित्वात आहेत, तेथे शासन अधिक प्रतिसादक्षम आणि लोकाभिमुख स्वरूपाची बनलेली दिसून येते. नागरिकांचा वाढता सहभाग शासनाच्या उत्तरदायित्वात वाढ घडवून आणतो. तसेच नियंत्रण व संतुलन यंत्रणा सत्तेचे केंद्रीकरण रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. सामाजिक-आर्थिक असमानता, भ्रष्टाचार आणि संस्थात्मक दुर्बलता यांसारख्या घटकांमुळे लोकशाहीच्या कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचेही दिसून येते. लोकशाही शासनव्यवस्थेची गुणवत्ता केवळ निवडणूक प्रक्रियेवर अवलंबून नसून, ती दैनंदिन प्रशासनातील पारदर्शकता, धोरणांची अंमलबजावणी आणि नागरिक केंद्रित दृष्टिकोनावरही अवलंबून असते. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणामुळे लोकशाही अधिक समावेशक आणि प्रभावी बनण्याची शक्यता दृढ बनते. लोकशाही शासनव्यवहार अधिक परिणामकारक करण्यासाठी नागरिकांच्या सहभागाला प्रोत्साहन देणे, संस्थात्मक पारदर्शकता वाढविणे, आणि उत्तरदायित्वाची यंत्रणा मजबूत करणे आवश्यक आहे. तसेच सामाजिक, आर्थिक विषमता कमी करण्यासाठी समावेशक धोरणांची अंमलबजावणी करणेही तितकेच गरजेचे आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**संदर्भ**

1. कुंभार नागोराव, २०२५, भारतीय लोकशाही आव्हाने व भविष्य विशेषांक, विचारशलाका, (प्रा. डॉ. अशोक चौसाळकर गौरवांक), एप्रिल २०२४ – मार्च २०२५.
2. सुमंत यशवंत, २०१८, भारतीय लोकशाही, नागरी समाज आणि वंचित समूह (प्रा. यशवंत सुमंत यांची तीन भाषणे), पुणे, द युनिक ॲकॅडमी.
3. व्हार राजेंद्र आणि सुहास पळशीकर, (अनुवाद – चित्रा लेले), २०१०, भारतीय लोकशाही : अर्थ आणि व्यवहार, पुणे, सेज व डायमंड प्रकाशन.
4. यादव योगेंद्र, सुहास पळशीकर आणि पीटर डिसूझा, (अनुवाद – मनोहर सोनवणे), २०१७, लोकशाही जिंदाबाद, पुणे, समकालीन प्रकाशन.
5. पळशीकर सुहास, २०१३, राजकारणाचा ताळेबंद भारतीय लोकशाहीची वाटचाल, पुणे, साधना प्रकाशन.
6. Palshikar Suhas, 2017, Indian Democracy, Delhi, Oxford.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# ग्रामीण विकासात आधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण संकल्पनांचा प्रभाव

**विश्वनाथ नारायण मरगजे**
अनंतराव थोपटे कॉलेज भोर, पुणे
**Email**: vnmaragaje@mail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180420
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 95-97
April- 2026
**Submitted:** 11 Mar. 2026
**Revised:** 25 Mar 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***गोषवारा***

*भारत हा प्रामुख्याने ग्रामीण लोकसंख्येचा देश आहे आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामीण विकास अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. पारंपरिक काळात ग्रामीण विकास मुख्यतः शेती, हस्तकला आणि स्थानिक संसाधनांवर आधारित होता; परंतु २१व्या शतकात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीमुळे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत आमूलाग्र बदल घडले आहेत. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT), कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT), डिजिटल पेमेंट प्रणाली, ई-गव्हर्नन्स आणि हरित तंत्रज्ञान या साधनांनी ग्रामीण जीवनमान उंचावण्यास महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या शोधनिबंधात ग्रामीण विकासाच्या विविध पैलूंवर आधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण संकल्पनांचा प्रभाव तपासण्यात आला आहे. कृषी, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि प्रशासन या क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाच्या वापरामुळे झालेल्या बदलांचे विश्लेषण केले आहे. स्मार्ट शेती, ड्रोन तंत्रज्ञान, डिजिटल शिक्षण, टेलिमेडिसिन आणि ऑनलाइन आर्थिक व्यवहार यांसारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण भागात कार्यक्षमता वाढली आहे. तसेच, ग्रामीण स्टार्टअप्स, महिला स्वयं-सहायता गट, सौर ऊर्जा प्रकल्प आणि सामाजिक उद्योजकता यांसारख्या नाविन्यपूर्ण संकल्पनांनी स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना दिली आहे.तथापि, डिजिटल साक्षरतेचा अभाव, इंटरनेट सुविधांची कमतरता, तांत्रिक प्रशिक्षणाची गरज आणि आर्थिक मर्यादा ही प्रमुख आव्हाने अजूनही अस्तित्वात आहेत. या पार्श्वभूमीवर, शासन, खाजगी क्षेत्र आणि स्थानिक समुदाय यांच्या समन्वित प्रयत्नांची आवश्यकता अधोरेखित होते. या अभ्यासाचा निष्कर्ष असा आहे की आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेशक आणि स्थानिक गरजांशी सुसंगत वापर केल्यास ग्रामीण भारताचा शाश्वत आणि सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो.*

***कीवर्ड्स:*** *ग्रामीण विकास , आधुनिक तंत्रज्ञान , नाविन्यपूर्ण संकल्पना , माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान , कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्स, स्मार्ट शेती, ई-गव्हर्नन्स*

## प्रस्तावना

ग्रामीण विकास हा देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीचा पाया मानला जातो. भारतातील मोठा लोकसंख्या घटक ग्रामीण भागात राहतो आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा केल्याशिवाय देशाचा विकास अपूर्ण राहतो.

पूर्वी ग्रामीण भागात पारंपरिक शेती, कमी उत्पन्न, शिक्षणाचा अभाव आणि आरोग्य सुविधांची कमतरता यामुळे विकासाची गती मर्यादित होती. मात्र, माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे ग्रामीण भागात नवे बदल घडू लागले. मोबाईल फोन, इंटरनेट, डिजिटल सेवा आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानामुळे ग्रामीण जीवनशैलीत परिवर्तन झाले आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

१. ग्रामीण विकासामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका समजून घेणे.
२. नाविन्यपूर्ण संकल्पनांचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर प्रभाव अभ्यासणे.
३. तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेल्या संधी आणि आव्हाने तपासणे.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*विश्वनाथ नारायण मरगजे अनंतराव थोपटे कॉलेज भोर, पुणे*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21437236

**How to cite this article:**
*मरगजे, विश्वनाथ. नारायण. (2026). ग्रामीण विकासात आधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण संकल्पनांचा प्रभाव. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 95–97. https://doi.org/10.5281/zenodo.21437236*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

४. ग्रामीण विकासासाठी प्रभावी उपाययोजना सुचवणे.

**संशोधन पद्धती (Methodology)**

या शोधनिबंधासाठी खालील पद्धतींचा वापर करण्यात आला आहे.

दुय्यम माहिती संकलन पुस्तके, शासकीय अहवाल, संशोधन लेख विश्लेषणात्मक पद्धत विविध घटकांचे सखोल विश्लेषण

तुलनात्मक पद्धत - पारंपरिक आणि आधुनिक पद्धतींची तुलना

वर्णनात्मक पद्धत - संकल्पना आणि परिणामांचे स्पष्टीकरण

**ग्रामीण विकासाची संकल्पना**

ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानात सर्वांगीण सुधारणा करणे होय. यामध्ये पुढील घटकांचा समावेश होतो:

कृषी आणि संबंधित व्यवसाय, शिक्षण आणि साक्षरता, आरोग्य सेवा, रोजगार आणि उद्योग, पायाभूत सुविधा

**आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रकार**

माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT)

ICT मुळे माहितीचा प्रसार जलद झाला आहे. शेतकरी हवामान अंदाज, बाजारभाव आणि सरकारी योजना जाणून घेऊ शकतात.

स्मार्ट शेती (Smart Farming)

ड्रोनद्वारे निरीक्षण, मृदा परीक्षण, स्वयंचलित सिंचन

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)- AI चा वापर पिकांचे विश्लेषण, रोग ओळख आणि उत्पादन वाढीसाठी होतो.

इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT)- IoT सेन्सर्स मातीतील आर्द्रता आणि तापमान मोजतात.

ई-गव्हर्नन्स- सरकारी सेवा ऑनलाइन उपलब्ध झाल्यामुळे पारदर्शकता वाढली आहे.

डिजिटल पेमेंट प्रणाली - UPI, मोबाईल बँकिंगमुळे व्यवहार सुलभ झाले आहेत.

**नाविन्यपूर्ण संकल्पना**

ग्रामीण स्टार्टअप्स- स्थानिक समस्यांवर आधारित उद्योग उभे राहिले आहेत.

सौर ऊर्जा प्रकल्प- ऊर्जा समस्येवर पर्यावरणपूरक उपाय.

महिला स्वयं-सहायता गट (SHGs)- महिलांचे सक्षमीकरण आणि आर्थिक स्वावलंबन.

सामाजिक उद्योजकता- समाजाच्या गरजा पूर्ण करत व्यवसाय निर्माण.

**क्षेत्रनिहाय प्रभाव**

कृषी क्षेत्र-उत्पादन वाढ, खर्च कमी, थेट बाजारपेठ संपर्क

शिक्षण क्षेत्र- ऑनलाइन शिक्षण, डिजिटल क्लासरूम

आरोग्य क्षेत्र- टेलिमेडिसिन, ऑनलाइन सल्ला

रोजगार क्षेत्र- नवीन उद्योग, डिजिटल नोकऱ्या

**फायदे**

माहितीचा वेगवान प्रसार, उत्पादनक्षमता वाढ, आर्थिक प्रगती, पारदर्शक प्रशासन

**आव्हाने**

डिजिटल साक्षरतेचा अभाव, इंटरनेट सुविधा कमी, आर्थिक अडचणी, तांत्रिक प्रशिक्षणाची गरज

**उपाययोजना**

डिजिटल साक्षरता अभियान, ग्रामीण इंटरनेट सुविधा वाढवणे, प्रशिक्षण केंद्रे उभारणे, सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी

**चर्चा (Discussion)**

ग्रामीण विकासात तंत्रज्ञानाचा वापर हा केवळ साधन म्हणून न पाहता एक परिवर्तनकारी शक्ती म्हणून पाहणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानामुळे ग्रामीण भागातील लोकांना माहिती, बाजारपेठ आणि सेवांपर्यंत थेट प्रवेश मिळाला आहे. तथापि, केवळ तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे पुरेसे नाही. त्याचा योग्य वापर करण्यासाठी प्रशिक्षण, जागरूकता आणि पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. नाविन्यपूर्ण संकल्पनांचा उपयोग स्थानिक गरजांशी सुसंगत असावा.

**निष्कर्ष (Conclusion)**

आधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण संकल्पनांनी ग्रामीण विकासाला नवी दिशा दिली आहे. उत्पादनक्षमता, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यामध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे.

तथापि, डिजिटल दरी आणि पायाभूत सुविधांची कमतरता दूर करण्यासाठी समन्वित प्रयत्न आवश्यक आहेत. योग्य धोरणे, प्रशिक्षण आणि संसाधनांचा वापर केल्यास ग्रामीण भारताचा शाश्वत आणि सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो.

**संदर्भ सूची (References - संबंधित साहित्य)**

1. डॉ. सुनील देशमुख ग्रामीण विकासाचे तत्त्वज्ञान.
2. प्रा. आर. जी. पाटील भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था.
3. डॉ. शरद जोशी- कृषी व तंत्रज्ञान.
4. प्रा. मंगला कर्वे सामाजिक संशोधन पद्धती.
5. डॉ. अ. रा. कुलकर्णी भारतीय समाजरचना व ग्रामीण विकास.
6. महाराष्ट्र शासन डिजिटल इंडिया व ग्रामीण विकास अहवाल.
7. भारत सरकार ग्रामीण विकास मंत्रालय वार्षिक अहवाल.
8. विविध संशोधन लेख ग्रामीण तंत्रज्ञान व विकास विषयक.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# हवामान बदल कमी करण्यासाठी धोरण रचना: वर्तनात्मक व अर्थशास्त्रीय दृष्टिकोन

**Dhanapune Sonal Vasantrao**
Department of Economics, Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar
**Email**: sonalidhanapune@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180421
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 98-100
April- 2026
**Submitted:** 15 Mar. 2026
**Revised:** 28 Mar 2026
**Accepted:** 13 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***सारांश (Abstract)***

*हवामान बदल हा आजच्या काळातील सर्वात गंभीर जागतिक आव्हानांपैकी एक आहे. पारंपरिक धोरणे प्रामुख्याने तांत्रिक उपाययोजना, करप्रणाली, आणि नियामक नियंत्रणांवर आधारित असतात; परंतु या धोरणांमध्ये मानवी वर्तन आणि आर्थिक प्रोत्साहनांचा समन्वय अभावाने दिसतो. प्रस्तुत संशोधनपत्रात हवामान बदल कमी करण्यासाठी धोरण रचनेत वर्तनात्मक (behavioral) आणि अर्थशास्त्रीय (economic) दृष्टिकोन यांचे एकत्रित महत्त्व स्पष्ट केले आहे. मानवी निर्णय प्रक्रियेत संज्ञानात्मक पूर्वग्रह, सवयी, सामाजिक मानके आणि आर्थिक प्रलोभने यांचा प्रभाव असतो. त्यामुळे केवळ कायदे किंवा दंडात्मक उपाय प्रभावी ठरत नाहीत. या अभ्यासात 'नज सिद्धांत', करप्रणाली (carbon tax), अनुदान (subsidies), आणि बाजाराधारित उपाययोजना (market-based instruments) यांच्या साहाय्याने प्रभावी धोरणे कशी तयार करता येतील यावर चर्चा करण्यात आली आहे.तसेच, भविष्यातील धोरणात्मक रचनेत हरित अर्थव्यवस्था (green economy), शाश्वत गुंतवणूक, आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर यांचा कसा उपयोग होऊ शकतो याचा आढावा घेतला आहे. भारताच्या संदर्भात विविध सरकारी उपक्रमांचे विश्लेषण करून वर्तनात्मक व आर्थिक घटकांचा प्रभाव स्पष्ट केला आहे. या संशोधनातून असे निष्पन्न होते की, वर्तनशास्त्र आणि अर्थशास्त्र यांचा समन्वय केल्यास हवामान धोरणे अधिक प्रभावी, सहभागी आणि शाश्वत बनू शकतात.*

***मुख्यशब्द:*** *हवामान बदल, धोरण रचना, वर्तनात्मक अर्थशास्त्र, कार्बन कर, उत्सर्जन व्यापार प्रणाली, नज सिद्धांत, हरित अर्थव्यवस्था, शाश्वत विकास, पर्यावरणीय निर्णयप्रक्रिया, कार्बन उत्सर्जन नियंत्रण.*

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives)**

1. हवामान बदल कमी करण्यासाठी धोरण रचनेतील मर्यादा समजून घेणे
2. मानवी वर्तनाचा पर्यावरणीय निर्णयांवर होणारा प्रभाव अभ्यासणे
3. वर्तनशास्त्रीय तत्त्वांचा वापर करून प्रभावी धोरणे सुचवणे

**स्पष्टीकरण**

**हवामान बदलासाठी प्रमुख धोरणे:**

हवामान बदलाचा सामना करण्यासाठी कार्बन कर, उत्सर्जन व्यापार प्रणाली (Emission Trading -ETS), आणि सबसिडी/प्रोत्साहन ही प्रमुख आर्थिक धोरणे आहेत. कार्बन कर उत्सर्जनावर किंमत लावून प्रदूषण कमी करतात, तर ETS उत्सर्जनाची मर्यादा निश्चित करून परवान्यांचा व्यापार सुलभ करता येतो. ही धोरणे आर्थिक दृष्टिकोनातून योग्य असली तरी त्यांना काही मर्यादा आहेत

**कार्बन कर (Carbon Tax):**

कार्बन कर (Carbon Tax) हे जीवाश्म इंधनांच्या (कोळसा, तेल, वायू) वापरामुळे होणाऱ्या कार्बन डायऑक्साइड ($CO_2$) उत्सर्जनावर लावला जाणारा कर आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*Dhanapune Sonal Vasantrao Department of Economics, Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar*

**How to cite this article:**
*Dhanapune, S. V. (2026). हवामान बदल कमी करण्यासाठी धोरण रचना: वर्तनात्मक व अर्थशास्त्रीय दृष्टिकोन. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 98–100.* https://doi.org/10.5281/zenodo.21437456

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21437456
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(XXII)| April - 2026

हा कर हवामान बदलाचा सामना करण्यासाठी, प्रदूषण कमी करण्यासाठी आणि स्वच्छ उर्जेचा वापर वाढवण्यासाठी उद्योगांवर लावला जातो. उद्योग जेवढे जास्त कार्बन उत्सर्जन करतील, तेवढा त्यांना जास्त कर द्यावा लागतो. यामुळे कंपन्या कमी प्रदूषण करणारे तंत्रज्ञान वापरण्यास प्रवृत्त होतात. या कराचा थेट परिणाम इंधनांच्या किमती वाढण्यावर होतो, ज्यामुळे पेट्रोल, डिझेल आणि वीज महाग होऊ शकते.कमी-उत्सर्जन करणाऱ्या पर्यायांना प्रोत्साहन देण्यासाठी हा सर्वात प्रभावी मार्ग मानला जातो।

**उत्सर्जन व्यापार प्रणाली (Emission Trading System - ETS):**

उत्सर्जन व्यापार प्रणाली (Emission Trading System - ETS), ज्याला "कॅप-अँड-ट्रेड" (Cap-and-Trade) देखील म्हणतात, ही वायू प्रदूषण कमी करण्यासाठी एक बाजार-आधारित पद्धत आहे.यामध्ये सरकार प्रदूषणाची कमाल मर्यादा (Cap) निश्चित करते आणि उद्योगांना उत्सर्जनाचे परमिट (Allowances) देते, जे विकले किंवा खरेदी केले जाऊ शकतात. यामध्ये कमी प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांना नफा मिळतो, तर जास्त प्रदूषण करणाऱ्यांना दंड किंवा अतिरिक्त परमिट खरेदीचा खर्च सहन करावा लागतो. या प्रणालीचा उद्देश पर्यावरणाचे रक्षण करणे आणि हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे हा आहे. भारतात विशेषतः महाराष्ट्र आणि गुजरात (सुरत) मध्ये, या प्रणालीचा वापर $SO_2$ (सल्फर डायऑक्साइड) सारख्या प्रदूषकांना नियंत्रित करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर (उदा. EPIC-India द्वारे समर्थित प्रकल्प) करत आहे. तसेच, ICWA च्या अहवालानुसार, कार्बन सीमा समायोजन यंत्रणेला (CBAM) तोंड देण्यासाठी भारत आपली स्वतःची कार्बन मार्केट प्रणाली विकसित करत आहे.

**सबसिडी आणि प्रोत्साहन (Subsidies and Incentives):**

सबसिडी (अनुदान) म्हणजे सरकारकडून दिले जाणारे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आर्थिक साहाय्य होय, जे परत करावे लागत नाही सरकारकडून वस्तू किंवा सेवांच्या किमती कमी करण्यासाठी विशिष्ट संस्था किंवा व्यक्तींना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या आर्थिक लाभ किंवा पाठिंबा यामध्ये दिला जातो. प्रत्यक्ष अनुदान म्हणजे रोख रकमेच्या स्वरूपात दिलेला आधार. याउलट, अप्रत्यक्ष अनुदान म्हणजे कर कपात किंवा कमी व्याजदराच्या कर्जाद्वारे दिली जाणारी मदत . कर्ज अनुदानाचा अर्थ म्हणजे कमी व्याजदराने आणि व्यवसायाच्या वाढीस मदत करणाऱ्या इतर वैशिष्ट्यांसह कर्ज उपलब्ध करून देणे. आणि शासकीय अनुदान म्हणजे सरकारकडून दिली जाणारी आर्थिक मदत, जी लाभार्थ्यांवरील भार कमी करण्यासाठी आणि सार्वजनिक हिताच्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी दिली जाते.

**हवामान बदल कमी करण्यासाठी धोरण रचनेतील मर्यादा**

: विकसित आणि विकसनशील देशांमधील मतभेद, जलद औद्योगिक विकासाची गरज आणि जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व यामुळे हवामान बदलांच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी प्रभावीपणे होताना दिसून येत नाही,ज्यामुळे जागतिक तापमान वाढीचे लक्ष (१.५°C) गाठणे आव्हानात्मक ठरते.हवामान बदल कमी करण्याच्या धोरणांमध्ये तांत्रिक अडथळे, उच्च आर्थिक गुंतवणूक, राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि सामाजिक स्वीकारार्हता यांसारख्या मर्यादा आहेत.

**हवामान बदल धोरण रचनेतील प्रमुख मर्यादा:**

**आर्थिक गुंतवणूक मर्यादा:** अपारंपरिक ऊर्जा (Renewable Energy) आणि हरित तंत्रज्ञानाकडे वळण्यासाठी लागणारा प्रचंड निधी, जो विशेषतः विकसनशील देशांसाठी उपलब्ध करणे कठीण आहे.

**राजकीय आणि आंतरराष्ट्रीय मतभेद:** 'तोटा आणि नुकसान' (Loss and Damage) निधी आणि उत्सर्जन कपातीची जबाबदारी निश्चित करण्यावरून विकसित व विकसनशील देशांमध्ये तणावाचे वातावरणा दिसून येते.

**तंत्रज्ञानाचा अभाव:** कार्बन कॅप्चर (Carbon Capture) सारखे प्रगत तंत्रज्ञान अद्याप पूर्णपणे विकसित झालेले नाही आणि ते परवडण्यासारखे देखील नाही.

**जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व:** कोळसा, तेल आणि वायूवर आधारित उद्योग आणि ऊर्जा क्षेत्राला त्वरित बदलणे खूप कठीण आहे.

**सामाजिक आणि वर्तणुकीशी संबंधित आव्हाने:** लोकांच्या जीवनशैलीत बदल (उदा. वाहतूक, ऊर्जा वापर) करण्यास होणारा सामाजिक विरोध

**अंमलबजावणीतील त्रुटी:** धोरणे कागदावर उत्तम असली तरी, स्थानिक स्तरावर तांत्रिक, प्रशासकीय किंवा राजकीय कारणांमुळे त्यांची प्रभावी अंमलबजावणी न होणे हे अडथळे दूर करण्यासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान, वित्तीय पाठबळ आणि जागतिक सहकार्य आवश्यक आहे.

**मानवी वर्तनाचा पर्यावरणीय निर्णयांवर होणारा प्रभाव**

**सवयी (Habit)** लोक सर्व माहितीचा पूर्णपणे विचार करत नाहीत. ते सोप्या नियमांवर आधारित निर्णय घेतात.परिणामी लोकांच्या सवयी बदलणे कठीण असते.ऊर्जा वापर, पाणी वापर, वाहतूक पद्धती या सर्व गोष्टी सवयींवर आधारित असतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

**सामाजिक प्रभाव (Social Influence)**

लोक इतरांच्या वर्तनावरून प्रेरित होतात. उदाहरणार्थ:शेजारी ऊर्जा बचत करत असल्यास आपणही तेच करतो,समाजातील मान्यता (norms) महत्त्वाची ठरते.

**नज (Nudge) सिद्धांत**

नज म्हणजे लोकांना त्यांच्या स्वातंत्र्यावर परिणाम न करता योग्य निर्णय घेण्यासाठी प्रोत्साहित करणे. उदाहरणार्थऊर्जा बिलावर शेजाऱ्यांच्या वापराची तुलना दाखवणे ,पर्यावरणपूरक पर्याय default म्हणून ठेवणे.

**भावनिक घटक (Emotions)**

भीती, अपराधीपणा आणि अभिमान यासारख्या भावना पर्यावरणीय निर्णयांवर परिणाम करतात.

**माहितीचे सादरीकरण (Framing Effect)**

एकच माहिती वेगवेगळ्या प्रकारे सादर केल्यास लोकांचे निर्णय बदलतात.

**धोरणात्मक शिफारसी (Policy Recommendations)**

हवामान बदल कमी करण्यासाठी सौर/पवन ऊर्जेचा वापर वाढवणे, ऊर्जा कार्यक्षमता सुधारणे, शाश्वत शेती, वनीकरण आणि कार्बन कॅप्चर (CCUS) तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे .या धोरणात्मक शिफारशींमध्ये जीवाश्म इंधनाचा वापर कमी करणे, इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन आणि शाश्वत शहरी नियोजनाचा समावेश आहे. गाड्यांचा वापर कमी करणे, इलेक्ट्रिक वाहनांकडे वळणे आणि विमान प्रवास कमीत कमी करणे यामुळे केवळ हवामान बदल रोखण्यास मदत होणार नाही, तर वायू प्रदूषणही कमी होईल.याबरोबरच –

**ऊर्जा क्षेत्रातील सुधारणा:** कोळशाचा वापर कमी करून सौर, पवन आणि जलविद्युत यांसारख्या नूतनीकरणयोग्य ऊर्जा स्रोतांकडे वेगाने संक्रमण करणे

**शाश्वत वाहतूक:** इलेक्ट्रिक वाहनांचा (EV) वापर वाढवणे आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था (मेट्रो, इलेक्ट्रिक बसेस) मजबूत करणे

**वनीकरण आणि नैसर्गिक उपाय:** पुनर्वनीकरण, पाणथळ जमिनींचे संरक्षण आणि कार्बन शोषून घेण्यासाठी वनांचे जतन करणे

**औद्योगिक आणि तांत्रिक उपाय:** कार्बन कॅप्चर, युटिलायझेशन आणि स्टोरेज (CCUS) तंत्रज्ञानाचा वापर करून कारखान्यांमधून होणारे उत्सर्जन कमी करणे.

**शाश्वत शेती:** हवामान-अनुकूल शेती पद्धती, ठिबक सिंचन आणि रासायनिक खतांचा कमी वापर करणे .

**कचरा व्यवस्थापन:** 'Reduce, Reuse, Recycle' (कमी करा, पुनर्वापर करा, पुनर्चक्रण करा) तत्त्वाचा अवलंब करणे आणि प्लास्टिकचा वापर कमी करणे .

**जागरूकता आणि धोरण:** स्थानिक आणि राष्ट्रीय स्तरावर हवामान धोरणे (उदा. NAPCC) राबवणे आणि शाश्वत जीवनशैलीसाठी लोकांना प्रोत्साहित करणे. भारताचे धोरण २०७० पर्यंत 'नेट झिरो' (Net Zero) लक्ष्यासाठी ऊर्जा कार्यक्षमता वाढवणे आणि सौर ऊर्जेवर भर देणारे आहे .

**निष्कर्ष (Conclusion)**

हवामान बदलाशी लढण्यासाठी केवळ पारंपरिक आर्थिक उपाय पुरेसे नाहीत. मानवी वर्तनातील गुंतागुंत लक्षात घेऊन धोरणे तयार करणे आवश्यक आहे. वर्तनात्मक अर्थशास्त्राचा वापर करून अधिक प्रभावी, सुलभ आणि टिकाऊ धोरणे विकसित करता येतात.यासाठी सरकार, उद्योग आणि नागरिक यांचा संयुक्त सहभाग आवश्यक आहे. योग्य धोरण रचना आणि प्रभावी अंमलबजावणीद्वारे हवामान बदलाचे परिणाम कमी करता येऊ शकतात.

**संदर्भ (References)**

1. Thaler, R. & Sunstein, C. (2008). *Nudge: Improving Decisions About Health, Wealth, and Happiness*
2. IPCC Reports on Climate Change
3. World Bank Climate Policy Papers
4. Behavioral Insights Team Reports

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# शाश्वत आर्थिक वाढ काळाची गरज

**डॉ. आर. पी. शिरसकर**
अनंतराव पवार महाविद्यालय पिरंगुट तालुका मुळशी जिल्हा पुणे

**Manuscript ID:**
JRD -2026-180422
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 101-102
April- 2026
**Submitted:** 15 Mar. 2026
**Revised:** 28 Mar 2026
**Accepted:** 13 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***प्रस्ताविक***

*शाश्वत आर्थिक विकास होणे ही काळाची गरज आहे. आजचा विकास हा तात्पुरता व भविष्यकाळावरती आघात करणारा आहे. जागतिक पातळीवर पाहता अगणित विकास होत असताना दिसून येत आहे प्रगती होत आहे. विकासदर वाढत आहे. परंतु तो जीवसृष्टीवर आहात करत असलेला दिसून येतो. जरी शाश्वत विकास ही संकल्पना अलीकडील काळात विकसित होत असली तरी पाहिजे त्या प्रमाणामध्ये देशपातळीवर अथवा जागतिक पातळीवर शाश्वत विकास ही संकल्पना अस्तित्वात येत नसल्याचे दिसून येते. आर्थिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणीय ऱ्हास सर्रास सुरू आहे.  शाश्वततेची समस्या सोडवणे कठीण आहे, कारण व्यवस्थेतील बदलाला होणारा विरोध व्यवस्था आणि वैयक्तिक सामाजिक घटक कोणत्याही बदलाला तीव्र विरोध करतात. जंगल तोडल्यानंतर त्याच्या तुलनेत त्याचे आर्थिक मूल्य अधिक असते अशी बाजार आधारित अर्थव्यवस्थेकडे संक्रमण करणाऱ्या देशांसाठी एक विशेष समस्या आहे. तसेच खाणकाम इत्यादी सारखे पैसा कमावणारे उद्योग राज्याच्या अर्थव्यवस्थेत प्रमुख भूमिका बजावत असल्याने व राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाने सरकारी सामान्यतः प्रभावी पर्याय पूर्वक धोरण लागू करण्यास असमर्थ ठरतात. तसेच धोरण निर्मिती प्रक्रियेत सामुदाय व व्यावसायिक यांच्या संवादात वारंवार अपयश येते.*

***मुख्यशब्द :*** *शाश्वत आर्थिक वाढ, शाश्वत विकास, पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधने, हवामान बदल, हरित ऊर्जा, आर्थिक स्थिरता, सामाजिक समता, जैवविविधता संवर्धन, भावी पिढ्यांचे कल्याण, हरित उद्योग, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान.*

**व्याख्या**

"शाश्वत आर्थिक वाढ म्हणजे अशी आर्थिक प्रगती जी दीर्घकाळ  टिकणारी असते आणि जी पर्यावरण समाज आणि भविष्यातील पिढ्यांवर नकारात्मक परिणाम न करता साध्य केली जाते". म्हणजेच आज विकास करणे पण भविष्य काळातील संसाधने न संपवता आर्थिक प्रगती बरोबर पर्यावरणाचे संरक्षण करणे उदाहरणार्थ. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, पाण्याची बचत, हरित उद्योग, सेंद्रिय शेती, लोकसंख्येची संतुलित वाढ होय.

**शाश्वत आर्थिक विकासाची मुख्य कारणे आणि गरजः**

**पर्यावरण आणि संसाधनांचे रक्षणः** नैसर्गिक संसाधने (पाणी, जंगले, खनिजे) मर्यादित आहेत. त्यांच्या ऱ्हासामुळे जैवविविधता नष्ट होत आहे. शाश्वत विकासाद्वारे या संसाधनांचे जतन करणे आवश्यक आहे.

**हवामान बदलाचा सामनाः** हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करून आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान (उदा. सौर ऊर्जा) वापरून हवामान बदलाचे परिणाम कमी करणे ही आजची मोठी गरज आहे.

**दीर्घकालीन आर्थिक स्थिरताः** शाश्वत विकास केवळ पर्यावरणासाठी नाही तर आर्थिक लवचिकता निर्माण करण्यासाठीही महत्त्वाचा आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21437672

**Address for correspondence:**
*डॉ. आर. पी. शिरसकर अनंतराव पवार महाविद्यालय पिरंगुट तालुका मुळशी जिल्हा पुणे*

**How to cite this article:**
*आर. पी. शिरसकर. (2026). शाश्वत आर्थिक वाढ काळाची गरज. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 101–102. https://doi.org/10.5281/zenodo.21437672*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

शाश्वत पद्धतींमुळे नवीन उद्योग, रोजगार आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन मिळते.

**सामाजिक समता आणि गुणवत्तापूर्ण जीवनः** सर्वसमावेशक विकासाद्वारे गरिबी निर्मूलन, आरोग्य सुविधा, शिक्षण आणि स्वच्छ पाणी सर्वांना उपलब्ध करून देणे हे शाश्वत विकासाचे ध्येय आहे.

**भावी पिढीसाठी सुरक्षित भविष्यः** आजचा अनिर्बंध विकास उद्याच्या पिढीसाठी पृथ्वीवरील संसाधने संपवून टाकेल. भावी पिढीच्या जगण्याचा अधिकार सुरक्षित करण्यासाठी शाश्वतता अनिवार्य आहे.

शाश्वत विकास हा केवळ एक पर्याय नसून पृथ्वीवर मानवी अस्तित्त्व टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेला मार्ग

**शाश्वत विकास फक्त कागदपत्री**

अलीकडील काळामध्ये प्रत्येक देश हा प्रगती करण्याच्या हव्यासापोटी भावी पिढी जगण्याकरिता नैसर्गिक साधनसामग्री नष्ट करत आहे. भावी पिढी करिताच नाही तर चालू आर्थिक स्थितीमध्ये स्वतः जगण्याकरता सुद्धा नैसर्गिक साधनसामग्रीचे जतन करत नसल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ हवा, पाणी, जंगल, मृदा, ग्लोबल वार्मिंग यासारख्या समस्या आजही निर्माण झालेल्या आहे. भावी पिढीचा प्रश्न हा विचारात घेतला जात नाही.

शाश्वत विकास ही संकल्पना 1972 मध्ये प्रथमतः संयुक्त राष्ट्र संघाच्या माध्यमातून आली. 2012 मध्ये उद्दिष्ट निश्चित करण्यात आली. परंतु वास्तवामध्ये पाहिजे त्या प्रमाणामध्ये जागतिक पातळी पासून व्यक्ती स्वरूपापर्यंत ती राबवली जात नसल्याचे दिसून येते. प्रदूषण, जागतिक तापमान वाढ, नैसर्गिक साधनसामग्रीचे ऱ्हास वाढतच आहे. म्हणून शास्वत विकास हा वास्तवामध्ये आणणे आवश्यक आहे.

**सारांश.**

एकंदरीत व्यक्तिगत पातळीपासून राष्ट्र व जागतिक पातळीपर्यंत शाश्वत विकास हा 1972 पासून फक्त कागदोपत्री अमलात आणला जातो आहे. पाहिजे त्या प्रमाणामध्ये तो वास्तवामध्ये येताना दिसून येत नाही. तसेच संयुक्त राष्ट्र संघाकडून पाहिजे त्या प्रमाणामध्ये अंमलबजावणी होत नसल्याची दिसून येते. या कारणाने भविष्य काळामध्ये नैसर्गिक चक्र संपुष्टामध्ये येणार आहे म्हणून शाश्वत विकास ही काळाची गरज आहे.

**संदर्भ :-**

1. भारतीय अर्थव्यवस्था, भालेराव व देसाई
2. शाश्वत विकास, दत्ता वानखेडे
3. पर्यावरण प्रदुषण -कुमार प्रदिप
4. www.Google.in

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

Original Article

# यवतमाळ व वाशीम जिल्ह्यातील बंजारा समाजातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर एक दृष्टिक्षेप

**नित्ता श्रीराम राठोड**
श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड जिल्हा वाशिम

**Manuscript ID:**
JRD -2026-180423
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(XXII)
Pp. 103-106
April- 2026
**Submitted:** 15 Mar. 2026
**Revised:** 28 Mar 2026
**Accepted:** 13 Apr. 2026
**Published:** 30 Apr. 2026

***सारांश***

*प्रस्तुत संशोधन लेखामध्ये यवतमाळ व वाशीम जिल्ह्यातील बंजारा समाजातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा अभ्यास करण्यात आला आहे. बंजारा समाज हा महाराष्ट्रातील विमुक्त व भटक्या जमातींपैकी एक असून, त्यांच्या पारंपरिक जीवनपद्धती, स्थलांतर, शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेच्या साधनांचा महिलांच्या जीवनावर मोठा प्रभाव पडतो. अभ्यासातून असे दिसून येते की बंजारा महिलांचे कुटुंब व समाजातील योगदान महत्त्वपूर्ण असूनही त्यांना सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मर्यादांचा सामना करावा लागतो. निरक्षरता, गरिबी, स्थलांतर, आरोग्य सुविधांचा अभाव, लिंगभेद आणि निर्णय प्रक्रियेत कमी सहभाग यांसारख्या समस्या त्यांच्या विकासात अडथळा निर्माण करतात. तथापि, आधुनिक शिक्षण, शासकीय योजना आणि सामाजिक जागृतीमुळे महिलांच्या स्थितीत सकारात्मक बदल घडून येत आहेत. बंजारा महिलांनी आपल्या सांस्कृतिक परंपरा जपत आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल सुरू केली असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी वाढविणे आवश्यक आहे.*

***मुख्यशब्द:*** *बंजारा समाज, बंजारा महिला, सामाजिक स्थिती, आर्थिक जीवन, स्थलांतर, विमुक्त जाती, शिक्षण, महिला सक्षमीकरण, आरोग्य, सामाजिक परिवर्तन.*

## प्रस्तावना :

महाराष्ट्रातील यवतमाळ व वाशीम जिल्ह्यातील राहणाऱ्या बंजारा महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती आणि घरगुती अर्थव्यवस्थेतील त्यांच्या योगदानाशी संबंधित आहे. बंजारा समाजाचे वर्गीकरण महाराष्ट्रात विमुक्त जाती म्हणून केले जाते. महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागात, एकमेकांना लागून असलेल्या यवतमाळ व वाशिम या दोन्ही जिल्ह्यांचे भौगोलिक स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे, यवतमाळ जिल्हा हा उत्तर अक्षांश १९°२६ ते २०°४२ आणि पूर्व रेखांश ७७°१८ ते ७९°९ रेखांशावर स्थित आहे. तर वाशीम जिल्हा उत्तर अक्षांश १९°६' ते २१°१६' आणि पूर्व रेखांश ७६°७' ते ७७°१४' रेखांशावर स्थित आहे. या संशोधन लेखाचा हेतू हा समाजातील पारंपरिक व्यवसाय, स्थलांतर आणि महिलांच्या स्थितीत बदल घडवून आणणाऱ्या घटकांवरही लक्ष केंद्रित करतो. भारत हा जगातील एक प्राचीन संस्कृती मानला जाणार एक प्रमुख देश आहे. भारतात अनेक प्रकारच्या संस्कृती, जाती, धर्म आणि परंपरांमध्ये जगणारे लोक राहतात. भारतातील अनेक जाती जमातींना व समाजावर अभ्यास झालेले आहेत, परंतु आजही भारतातील काही मागासलेल्या समुदायांकडे दुर्लक्ष केले गेले आहे आणि त्यापैकीच एक म्हणजे बंजारा समाज होय. बंजारा समुदाय हा भारतातील एक मागासलेला समुदाय म्हणून ओळखला जातो. हजारो वर्षांपासून हा समुदाय शहरे, गावे आणि इतर सामाजिक व्यवस्थांपासून दूर राहत आहे. हा समुदाय सुखसोयी आणि विकासाच्या लाभांपासून वंचित आहे. हा समुदाय एक विमुक्त जाती आणि स्थलांतर करणारा म्हणजेच भटकणारा म्हणून ओळखला जातो आणि हेच या समुदायाचे मूळ वैशिष्ट्य आहे. बंजारा लोकांची संस्कृती आणि परंपरा इतर समुदायांपेक्षा अद्वितीय आणि वेगळी आहे. भारतातील सर्वच राज्यांमध्ये बंजारा लोकांचे वास्तव्य आहे. त्यांची प्रमुख लोकसंख्या आंध्र प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश आणि गुजरात या राज्यांमध्ये जास्त प्रमाणात आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*नित्ता श्रीराम राठोड श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड जिल्हा वाशिम*

**How to cite this article:**
*राठोड, नित्ता. श्रीराम. (2026). यवतमाळ व वाशीम जिल्ह्यातील बंजारा समाजातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर एक दृष्टिक्षेप. Journal of Research & Development, 18(4(XXII)), 103–106. https://doi.org/10.5281/zenodo.21437757*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21437757

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

सर्व राज्यांमध्ये बंजारा लोकांमध्ये भाषा, पेहराव, केशभूषा, चालीरीती, परंपरा आणि सण हे समान वैशिष्ट्ये आढळतात.बंजारा समुदाय देशातील इतर सर्व समुदायांपेक्षा सर्वात खालच्या स्तरावर आहे. दुर्दैवाने, त्यांचा इतिहास, विशेषतः भारतातील त्यांची वेशभूषा, संस्कृती, चालीरीती, परंपरा आणि भाषा यांसंबंधीचा इतिहास, अजूनही अज्ञात आहे. या समुदायाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, वसाहतवादी राजवटीला विरोध करणाऱ्या भारतातील पहिल्या गटांपैकी हा एक होता आणि त्यानंतर त्यांना एक गुन्हेगार जमात म्हणून हिणवण्यात आले. पारंपरिकरित्या मीठ आणि इतर वस्तूंच्या व्यापारात गुंतलेल्या भटक्या लमन बंजारा लोकांना रस्ते आणि रेल्वेच्या आगमनामुळे मोठ्या संकटाचा सामना करावा लागला आणि त्यांना गुन्हेगारी जीवन जगण्यास भाग पडले. हा बंजारा समुदायाचा खरा इतिहास आहे, त्यानंतर हा समाज त्यांच्या गुरांसह जंगलमय असलेल्या विविध ठिकाणी विभागले गेले.

स्वातंत्र्योत्तर काळात इतर माजी गुन्हेगार जमातींप्रमाणेच, त्यांना विमुक्त जातीच्या श्रेणीत टाकण्यात आले आहेत. महाराष्ट्रात विमुक्त जातीचा एक अविभाज्य भाग म्हणून ओळखले जातात. त्यांच्यापैकी काहींनी जीवनात प्रगती केली असली तरी, गुन्हेगारीचा शिक्का मोठ्या प्रमाणात पुसून टाकण्यात यश आले असले तरी ही विमुक्त हा शिक्का कायम ठेवण्यात आला. विमुक्त हा शब्द नेहमीच सेटलमेंट अक्ट व गुन्हेगारी कायद्याची आठवण करून देतो. ह्या समाजातील बहुसंख्य अजूनही तीव्र गरिबीत जगत आहेत. महाराष्ट्र राज्यात, प्राचीन काळापासून वास्तव्य करणारे अनेक प्रकारचे समुदाय आहेत. हे समुदाय त्यांना भटक्या जमाती आणि विमुक्त जाती म्हणतात, ज्यांची लोकसंख्या महाराष्ट्रात सुमारे १ पेक्षा जास्त आणि संपूर्ण भारतात सुमारे १० कोटी च्या जवळपास आहे. येथे ३१३ भटक्या जमाती आणि १९८ वि-अधिसूचित जमाती आहेत. शेकडो वर्षांपासून उपजीविकेचे कोणतेही स्पष्ट साधन नसताना भटक्या जमातींच्या परंपरांमुळे आणि जातीय व्यवस्थेच्या प्रभावामुळे, त्यांना अमानवीय परिस्थितीत जगण्यास भाग पाडले आहे. या जमातींमधील मोठा वर्ग हा "विमुकता जाती" किंवा माजी गुन्हेगार जमाती म्हणून ओळखला जातो, कारण "गुन्हेगार जमाती कायदा १८७१" नुसार त्यांना जन्मतःच गुन्हेगार म्हणून घोषित करण्यात आले होते. सुमारे एक शतकापूर्वी, हा भटका वाहतूकदार आणि छोटे व्यापारी होते; आज, त्यांच्या भटक्या जीवनशैलीमुळे त्यांच्या पारंपरिक अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांमुळे ते काहीप्रमाणात स्थिर जीवन जगतांना दिसतो.

**२. बंजारा समाजातील महिलांची सामाजिक जीवनाची माहिती :**

बंजारा समुदाय हा स्वतःच्या परंपरा आणि चालीरीतींसह गावाबाहेर राहतो. सततचे स्थलांतरांमुळे हा समुदाय भौगोलिकदृष्ट्या वेगळा पडला आहे. बंजारा समाज हा आपल्या स्त्रिया आणि मुलांसोबत स्थलांतर करतात. स्थलांतरामुळे बंजारा समाजातील लोकांच्या जीवनावर मोठा परिणाम पडतो. जसेकी, शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेवर प्रभाव पडतो. या समुदायाची साक्षरता पातळी खूप कमी आहे. पारंपरिक नोकऱ्या आणि उत्पन्नाचे स्रोत गमावल्यामुळे टांड्यातील लोकांवर सर्वात मोठा फटका बसला आहे. कुटुंब आणि मुलांचा मुख्य आधार असलेल्या स्त्रिया मोठ्या अडचणीत सापडल्या आहेत. बंजारा स्त्रियांशी संबंधित साहित्य आणि महत्त्वाच्या वास्तवांचा आढावा घेतल्यावर असे दिसून येते की, बंजारा समुदायातील स्त्रियांचा दर्जा प्रत्येक टांडामध्ये लक्षणीयरीत्या भिन्न आहे. गेल्या काही दशकांमध्ये प्रदेशाच्या किंवा अर्थव्यवस्थेच्या विकासातील त्यांची भूमिका मोठ्या प्रमाणात नियंत्रित केली गेली आहे. पूर्वीच्या काळात, स्त्रियांकडे स्वयंपाक करणे, घरकाम करणे आणि मुलांची काळजी घेणे या दृष्टीने पाहिले जात असे. घरांमध्ये आणि टांडा समाजात, स्त्री ही केवळ एक गृहिणी आणि काळजीवाहू होती, हे समजू शकते. स्त्रियांना स्वतःचे मत, आवाज आणि स्वातंत्र्य नव्हते. पुरुषांच्या सामाजिक धारणांखाली त्या चिरडल्या गेल्या होत्या. स्त्रीचे योग्य स्थान नेहमीच पुरुषाच्या पुरुषी चौकटीमागे होते.

जिथे शेती हा मुख्य व्यवसाय आहे, तिथे स्त्रिया भरपूर काम करतात. अनेकदा तिला 'शेतकरी स्त्री' असे यथार्थपणे म्हटले जाते. वास्तविक पाहता, स्त्रिया सहसा दोन प्रकारच्या कामांमध्ये गुंतलेल्या दिसतात: एक ज्यातून उत्पन्न मिळते आणि दुसरे ज्यातून कोणतेही उत्पन्न मिळत नाही. पहिले काम म्हणजे घराबाहेरचे, ज्यासाठी तिला मोबदला दिला जातो; आणि दुसरे काम आर्थिक क्रियाकलाप मानले जात नाही, कारण ते पगारी काम नसते. स्वयंपाक, स्वच्छता, मुलांची काळजी, पशुधनाची देखभाल, इंधन, चारा, पाणी आणि वनोपज गोळा करणे इत्यादी घरगुती कामे विनामोबदला मजुरी असते. कुटुंब आपले उत्पन्न कसे खर्च करते, यावर तिचे मत विचारात घेतले जाण्याची शक्यता कमी किंवा अजिबात नसते असे नसून काही कुटूंबामध्ये त्यांचे प्रमुख स्थान असते. बंजारा महिलांचे रंगीबेरंगी जीवन हे त्यांचे बाह्य जग मानले जात असले तरी, त्यांना तांडा आणि घरामध्ये सर्व प्रकारचा त्रास सहन करून समस्यांना तोंड द्यावे लागते. आज ही ह्या महिला आपल्या उपजीविकेसाठी भटके जीवन जगतांना दिसत आहे. बंजारा महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती आणि कौटुंबिक अर्थव्यवस्थेतील त्यांच्या योगदानाचे स्वरूप व व्याप्ती समजून ते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

बंजारा समाजात स्त्रिया आपल्या पुरुषांच्या अधीन असल्या तरी, त्या घरात आणि समाजात महत्त्वाची भूमिका बजावतात. पुरुष आपल्या अधिकाराचा वापर करून स्त्रियांवर सर्व प्रकारच्या जीवनशैलीत नियंत्रण ठेवतात. सामाजिक कार्यात, स्त्रियांना आपल्या पुरुषांची आज्ञा पाळावी लागते आणि कुटुंब व समाजाच्या उदरनिर्वाहासाठी काम करावे लागते. कौटुंबिक उत्पन्नात तिचे योगदान मोठे असते आणि ती पुरुषांइतकाच किंबहुना त्याहून अधिक भार उचलते. तिचे आर्थिक योगदान काहीही असले तरी, तिला पुरुषांच्या अधीन राहावेच लागते. तसे न केल्यास, पुरुषांचे वर्चस्व असलेली गोर पंचायत तिच्यावर कारवाई करते. धार्मिक आणि राजकीय बाबींमध्ये पुरुषांची भूमिका प्रबळ असते. समाजात पुरुष कसेही वागले तरी स्त्रियांना दडपल्यासारखे वाटत नाही. स्त्रिया त्यांना आपली शक्ती मानतात. मुलाच्या जन्माचा उत्सव साजरा केला जात असे. मुलीच्या जन्माची गणना होत नाही. मुलाला अधिक महत्त्व दिले जाते. परंतु आता मुलींकडे पाहण्याचा दृष्टिकोन काही प्रमाणात का असोना बदलत आहे. बंजारा समाजात निरक्षरता सामान्य आहे, परंतु स्त्रिया जवळजवळ निरक्षर आहेत. त्यांच्या बैलगाडी वाहतुकीच्या अर्थव्यवस्थेत अडथळा आल्यानंतर, पुरुषांनी जंगलात बैलगाडी चालवणे सुरू

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

ठेवले, जे नंतर प्रतिबंधितही करण्यात आले. स्त्रियांवरील शेतीचा भार वाढला. स्त्रिया घरकाम आणि मुलांचे संगोपन करण्यात गुंतलेल्या असत. बंजारा स्त्रियांना उच्च जाती आणि वर्गातील लोकांकडून तसेच त्यांच्या स्वतःच्या समाजातील लोकांकडून दुहेरी दडपशाही आणि शोषणाचा सामना करावा लागतो.

भारताचे संविधान पुरुष आणि स्त्रियांच्या हक्कांमध्ये भेद करत नाही. बंजारा समाजातील स्त्रियांमधील कमी साक्षरता दर आणि बंजारा स्त्रिया दुर्गम भागात आणि तांडांमध्ये (वस्त्या) राहत असल्यामुळे, या समस्येवर मात करण्यासाठी त्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध होत नाहीत. ही प्रथा समाजात थांबवली पाहिजे आणि स्त्रियांना समान वागणूक दिली पाहिजे. भारताने स्वातंत्र्याची ६० वर्षे पूर्ण केली आहेत, परंतु राज्य किंवा केंद्र सरकारांकडून पूर्ण जनजागृती केली गेलेली नाही. निवडणुकीच्या वेळी मतपेढीसाठी राजकारणी तांडांना भेट देतात, परंतु इतर वेळी ते दिसत नाहीत. बंजारा संस्कृतीची ओळख स्त्रियांमुळे आहे. तथापि हे खेदजनक आहे की अविकास आणि शोषणाच्या बाबतीत त्या वरच्या क्रमांकावर आहेत.

कुटुंबासाठी महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असूनही, त्यांचे काम दुर्लक्षित आणि औपचारिकरित्या असंघटित राहते. महिलाच कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात आणि पुरुषांपेक्षा जास्त तास काम करतात. कमी लेखले जाणे कुटुंबातील आणि परिसरातील महिलांचा कमी दर्जा दर्शवते; घरातील निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग खूप कमी आहे. उत्पन्नातील वाट्यातील तफावतीकडे १९९५ च्या मानवी विकास अहवालात पुरेसे लक्ष दिले गेले आहे: "पुरुषांना उत्पन्नाचा मोठा वाटा आणि त्यांच्या आर्थिक योगदानासाठी मान्यता मिळाली, तर बहुतेक महिलांचे काम विनावेतन, दुर्लक्षित आणि कमी मूल्यांकित राहिलेत.

आर्थिक संकट, उपजीविकेच्या पर्यायांची अनिश्चितता आणि स्थलांतरामुळे मुलींचे उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. बंजारा समाजात प्राथमिक शाळेतून शिक्षण अर्धवट सोडण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. कारण मुलींना शिक्षण देणे परवडत नाही. बंजारा समाजातील मुलींच्या खराब शैक्षणिक स्थितीमागे विवाह हे एक प्रमुख कारण आहे. मुलींना शिक्षण देणे म्हणजे मुलाकडून हुंड्याची जास्त अपेक्षा आणि मुलीकडून चांगल्या मुलाची जास्त अपेक्षा. विवाहाव्यतिरिक्त, खराब आर्थिक परिस्थिती, गावातील शाळांच्या पायाभूत सुविधांचा अभाव आणि सामाजिक असुरक्षितता ही इतर कारणे ही आहेत. टांडा समाजाच्या स्थलांतराचा मुलांच्या शिक्षणावर वाईट परिणाम झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु काही प्रमाणात का असो ना आजच्या आधुनिक काळात शिक्षणामुळे बंजारा स्त्रियांच्या परिस्थितीत लक्षणीय बदल होत आहे. मुलींच्या शिक्षणाला आता समाजाकडून प्राधान्य दिले जात असून, अनेक तरुण मुली उच्च शिक्षण घेत आहेत आणि विविध क्षेत्रांत प्रगती करत आहेत. बंजारा समाजाच्या कलांना जागतिक पातळीवर मान्यता सुद्धा मिळत असल्याने महिलांना आर्थिक स्वावलंबनही प्राप्त होत आहे.

**३. बंजारा समाजातील महिलांची आर्थिक जीवन :**

महिला प्रामुख्याने उपजीविकेसाठी शेती, ऊसतोड खाणकाम या सारख्या असंघटित क्षेत्रावर अवलंबून आहेत. लोक वर्षातून ४ ते ८ महिने उपजीविकेसाठी हंगामी स्थलांतर करतात. लोकांचे उत्पन्नाचे स्रोत असुरक्षित आहेत. कुटुंबाचे सरासरी मासिक फारच कमी आहे. कुटुंबातील सर्व सदस्यांना, मुलांसह आणि वृद्ध व्यक्तींसह, कुटुंबाचे उत्पन्न वाढवण्यासाठी मदत करावी लागते. बंजारा महिला लग्न, आरोग्य, जत्रा आणि सणांसाठी सावकारांकडून पैसे उधार घेतात. व्याजाचे दर खूप जास्त असल्यामुळे त्या वेळेवर परतफेड करू शकत नाहीत. बहुतेक महिला कंत्राटदारांकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेतात आणि रक्कम परत करण्यासाठी त्यांना वर्षभर काम करावे लागते. उदाहरणार्थ, बंजारा समाजातील ऊसतोडणी कामगार सुमारे ७०,००० ते ८०,००० रुपयांची आगाऊ रक्कम घेतात आणि कंत्राटदाराच्या निर्देशानुसार वर्षभर काम करतात. त्यामुळे त्यांना आपली उपजीविका टिकवणे कठीण जाते. कुटुंबाच्या आर्थिक निर्णयांमध्ये महिलांकडे बहुतेकदा दुर्लक्ष केले जाते. त्या आपल्या पतीसोबत शेतात (दगडाची खाण, बांधकाम स्थळे, शेती इत्यादी) काम करतात. पैसे खर्च करण्याबाबत तसेच बचत करण्याबाबत त्यांना कोणताही अधिकार नसतो, परंतु काही स्त्रिया भविष्यातील कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी गुपचूप पैसे वाचवतात. गर्भधारणेसारख्या गंभीर परिस्थितीत महिलांना आरोग्य सुविधा मिळवण्यात अडचणी येतात. हा समुदाय आपल्या वस्त्यांमध्ये दुर्गम भागात राहतो. त्यांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध नसतात. बहुतेक बंजारा महिला दिवसातून १४ ते १६ तास काम करतात. जसे की, स्वयंपाक करणे, कपडे धुणे, भांडी घासणे, मुलांची काळजी घेणे, पाणी आणणे, शेतात काम करणे इत्यादी विविध प्रकारच्या कामांमध्ये गुंतलेल्या असतात. महिलांशी झालेल्या चर्चेदरम्यान असे आढळून आले की, बहुतेक महिलांना दगडाच्या खाणीसारख्या जोखमीच्या कामाच्या ठिकाणी काम करण्याची इच्छा नसते.

**४. निष्कर्ष :**

पूर्वीच्या काळात स्त्री-पुरुषांचे प्रमाण समान होते, परंतु सध्याच्या परिस्थितीत पुरुषांची संख्या स्त्रियांपेक्षा जास्त आहे. आधुनिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे स्त्री-पुरुषांच्या समान प्रमाणावर परिणाम झाला आहे. बंजारा तांडा समाजात मुलींच्या लग्नाचे वयात बदल होत आहे. मुलींच्या चांगल्या आरोग्यासाठी वयाचा विचार केला पाहिजे म्हणून मुलींच्या लग्नासाठी सरासरी वय १८ ते २० वर्षे ते स्वीकारत आहेत. कालांतराने कुटुंबाचे स्वरूप संयुक्त कुटुंबाकडून विभक्त कुटुंबाकडे बदलत आहे. बंजारा लोकांकडे जमीन हा एक कायमस्वरूपी वारसा आहे, या देणगीमुळे लोकांचे कायमस्वरूपी स्थलांतर टळले आहेत. हा समाज उपजीविकेसाठी एकाच स्रोतावर अवलंबून नाही. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची परंपरा अजूनही बदललेली नाही. बंजारा लोक उपजीविकेच्या पर्यायांसाठी स्थलांतर करतात. तिथेही त्यांना नवीन निवासस्थानी चांगले उत्पन्न, आरोग्य आणि शैक्षणिक सुविधा मिळवण्यात अडचणी येतात आणि

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.orgVolume-18, Issue-4(XXII)| April - 2026

नवीन ठिकाणी राहण्याची कोणतीही खात्री नसते. बहुतेक स्त्रियांनी सांगितले की मद्यपान आणि कुटुंबातील आर्थिक ताणामुळे घरगुती हिंसाचार होतो. बंजारा समाजात जत्रा आणि देवपूजा यांना खूप महत्त्व आहे. लोक शिक्षणापेक्षा देवांच्या प्रार्थनेवर जास्त पैसे खर्च करतात.

जगभरात मुली आणि स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जातो. सर्व सोयीसुविधा, चैनीच्या वस्तू आणि अगदी तरतुदीही आधी मुले आणि पुरुषांना पुरवल्या पाहिजेत. त्यानंतरच उपलब्ध असल्यास मुली आणि स्त्रियांना दिल्या जाऊ शकतात हे जगभरात काही प्रमाणात खरे आहे, परंतु भारतात ते अधिक आणि अगदी स्पष्टपणे दिसून येते. बंजारा समाज ही या विधानाला अपवाद नाही. तसे पाहिले तर बंजारा समाजाची खरी संस्कृती स्त्रियांच्या पारंपरिक वेशभूषेत आणि टांडा (वस्ती) संस्कृतीत आहे. पुरुषांच्या तुलनेत बंजारा स्त्रिया अधिक असुरक्षित आहेत. बंजारा स्त्रिया पितृसत्तेच्या छत्राखाली जगत आहेत. याची प्रचिती प्रत्येक टप्प्यावर दिसून येते. स्त्रियांना दुहेरी बहिष्काराचा सामना करावा लागतो. एक म्हणजे समाजातून आणि दुसरे घरातून. प्रत्येक बाबतीत पुरुष आणि मुलांना नेहमीच प्राधान्य दिले जाते. कुटुंबाला वाटते की ते मुलींना शिक्षण देऊ शकत नाहीत. परंतु या उलट ते मुलांच्या चैनीच्या वस्तूंवर प्रचंड खर्च करतात. मुलांना पिढीचे भावी आधारस्तंभ आहेत असे मानले जाते. तर मुली त्यांच्या सासरच्या कुटुंबाचा आधारस्तंभ असतात. स्त्रिया किंवा मुलींना लग्नासाठी कोणताही पर्याय नसतो. कुटुंबातील वडीलधारी सदस्य मुलींच्या वतीने निर्णय घेतात आणि मग त्यांना ठरलेल्या व्यक्तीशीच लग्न करावे लागते. समाजातील पुरुष निर्णय प्रक्रियेत अधिक गुंतलेले असत, तर स्त्रियांना केवळ मजूर म्हणून पाहिले जात असे. या सर्व परिस्थितीत स्त्रियांना कुटुंबातील हिंसाचारासोबतच तणाव आणि चिंतेचा सामना करावा लागतो अशी विचित्र विषमते बरोबरच समता ही दिसून येते. कारण बंजारा समाजात स्त्रियांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे पण मिश्र स्वरूपाचे आहे. एकीकडे त्यांना संस्कृतीचे रक्षक व कुटुंबाचा कणा मानले जाते तर दुसरीकडे आजही अनेक तांड्यांवर त्यांना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मर्यादांचा सामना करावा लागत आहे. परंतु बंजारा समाजातील महिलांचा पोशाख हा अत्यंत आकर्षक, रंगीबेरंगी आणि वैशिष्ट्यपूर्ण असतो. हा पोशाख केवळ सौंदर्याचे प्रतीक नसून तो बंजारा संस्कृती, समृद्ध इतिहास आणि कडक हवामानापासून संरक्षणाचा एक उत्कृष्ट संगम आहे.

**संदर्भ :**

1. बर्मन, जे. जे., विमुक्त जमातीचे मानववंशशास्त्र: लमन बंजारा, मित्तल पब्लिकेशन्स नवी दिल्ली.
2. हलबर, बी. जी. बदलत्या काळातील लामानी अर्थव्यवस्था आणि समाज, मित्तल पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.
3. प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो, राष्ट्रीय विमुक्त, भटक्या आणि अर्ध-भटक्या जमाती आयोग, सामाजिक न्याय आणि
4. सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
5. राठोड, एम., डिनोटिफाइड अँड नोमॅडिक राइट ॲक्शन ग्रुप न्यूजलेटर वडोदरा, भारत डीएनटी राइट ॲक्शन ग्रुप.
6. राठोड, एम., गोर-बंजारा जन जाती का इतिहास, विद्या प्रकाशन कानपूर.
7. http://www.kbk.nic.in/tribes.htm
8. tribal.intellectual.collective@gmail.com
9. http://vaishalibhandwalkar.blogspot.in/p/articles.html